सोमवार
९
मार्च २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३६१
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



## थोडक्यात

### मनसे रायगडावरुन फुंकणार रणशिंग



मुंबई: स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाला मोठा धक्का बसला. ठाकरे बंधूंसोबत युती करुन देखील मुंबई महापालिकेवर सत्ता मिळवता आलेली नाही. यानंतर आता पक्षाला नवीन उभारी देण्यासाठी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. उद्या (दि.०९) मनसे पक्षाचा वर्धापन दिन आहे. यानिमित्ताने पक्षासाठी सभासद नोंदणी केली जाणार आहे. याची सुरुवात स्वतः राज ठाकरे करणार असून यासाठी ते रायगडावर दाखल होणार आहेत. मनसे नेते राज ठाकरे यांनी एक्स या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे.



# किवींना नमवीत भारत जगज्जेता!

## संजू सॅमसन, अभिषेक शर्मा, इशान किशन यांची झुंजार खेळी

**अहमदाबाद: दि. ८** वृत्तसंस्था

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ चा महाअंतिम सामना आज यजमान भारत आणि न्यूझीलंड या दोन बलाढ्य संघांमध्ये नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडला. या महान लढतीत संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि इशान किशन यांची झुंजार खेळी आणि बुमराह, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल यांच्या भेदक गोलंदाजीच्या बळावर भारतीय संघाने न्यूझीलंडला धूळ चारीत त्यांचा ९६ धावानी दणदणीत पराभव करुन भारताला विजयश्री मिळवून दिली. याआधी झालेल्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धांमध्ये कुठल्याही यजमान संघाला जेतेपदाची ट्रॉफी उंचावता आली नाही. भारतीय संघाने विजय मिळवत हा रेकॉर्ड प्रस्थापित केला.. भारतीय संघ टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाची ट्रॉफी सलग २ वेळा उंचावणारा पहिलाच यजमान संघ ठरला.

न्यूझीलंडने टॉस जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रित केले आणि भारताने न्यूझीलंडसमोर २५६ धावांचे लक्ष्य ठेवले.

नाणेफेक गमावता भारताला फलंदाजी मिळाली आणि टीम इंडियाने किवी संघाला धुवायला सुरुवात केली. भारतीय ओपनरने जी तोडफोड करायला सुरुवात केली ते थांबलेच नाही. अभिषेक आणि संजू सॅमसन या जोडीने पहिल्या विकेटसाठी ५० हून अधिक धावांची भागीदारी करत विश्वचषकाच्या फायनलमधील १७ वर्षांपूर्वीचा ऐतिहासिक रेकॉर्ड मोडीत काढला. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात आतापर्यंत कोणत्याही संघाच्या सलामीवीरांना फायनलमध्ये ५० धावांची (पान २ वर)



### संजू सॅमसनचा वर्ल्ड रेकॉर्ड!

संजू सॅमसनला या स्पर्धेतील सुरूवातीचे सामने खेळण्याची संधी मिळाली नव्हती. पण जेव्हा जेव्हा त्याला संधी मिळाली. त्याने संधीचं सोनं केलं. वेस्ट इंडिजविरूद्ध खेळताना त्याने नाबाद ९७ धावांची खेळी केली होती. तर इंग्लंडविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याने ८९ धावांची खेळी केली होती. न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात पावरप्लेमध्ये अभिषेक शर्माने १९ चेंडूत ५२ धावांची खेळी केली. तर संजू सॅमसनने १७ चेंडूत ३३ धावांची खेळी केली. यादरम्यान त्याने २ चौकार आणि ३ खणखणीत षटकार खेचले. यासह तो टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील पावरप्लेमध्ये फलंदाजी करताना सर्वाधिक षटकार मारणारा भारतीय फलंदाज ठरला आहे. त्याने या स्पर्धेतील पावरप्लेमध्ये फलंदाजी करताना १० हून अधिक षटकार मारले आहेत. याआधी कुठल्याही भारतीय फलंदाजाला १० हून अधिक षटकार मारता आलेले नाहीत.

**संजू सॅमसन: ४६ चेंडूत ८९ धावांची वादळी खेळी.**
**अभिषेक शर्मा: २१ चेंडूत ५२ धावांचे तुफानी अर्धशतक.**
**इशान किशन: २५ चेंडूत ५४ धावांचे धडाकेबाज योगदान.**

### नायर रुग्णालयाला बॉम्बस्फोटाची धमकी

**मुंबई** : मुंबईच्या नायर रुग्णालयाला ईमेलद्वारे धमकी मिळाली आहे. संध्याकाळी चार वाजता बॉम्बस्फोट करून रुग्णालय उडवून देऊ अशी धमकी देण्यात आली आहे. धमकी मिळताच रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना माहिती दिली आहे. माहिती मिळताच मुंबई पोलिसांचे पथक तसेच बॉम्ब स्काड आणि डॉग स्काड घटनास्थळी पोहोचले. संपूर्ण रुग्णालयात तपासणी करण्यात आली. या तपासणीत बॉम्ब सापडला नाही. अखेर ई मेलद्वारे फक्त त्रास देण्याच्या हेतूने धमकी देण्यात आल्याचे लक्षात आले. पोलिसांनी सायबर तज्ज्ञांच्या मदतीने ई मेल पाठवणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू केला. धमकीचा मेल पाठवणाऱ्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

# राष्ट्रपती विरुद्ध मुख्यमंत्री; बंगालमध्ये राजकीय रणकंदन!

**कोलकाता: दि. ८** वृत्तसंस्था

पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दौऱ्यावरून राजकारण चांगलेच तापले आहे. ९ व्या आंतरराष्ट्रीय संथाल परिषदेसाठी राष्ट्रपती बंगालमध्ये आल्या असताना, शिष्टाचार (प्रोटोकॉल) पाळला नसल्याचा आरोप भाजपने केला आहे. यावर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आक्रमक पवित्रा घेत राष्ट्रपतींवरच टीकेची झोड उठवली आहे. निवडणुकीच्या काळात भाजपच्या सांगण्यावरून राजकारण करू नका, असा खळबळजनक सल्ला ममतांनी राष्ट्रपतींना दिला आहे.शनिवारी सिलिगुडी येथे झालेल्या संथाल परिषदेला राष्ट्रपती उपस्थित होत्या. यावेळी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी किंवा राज्याचे इतर कोणतेही मंत्री त्यांच्या स्वागताला उपस्थित नव्हते. यावर राष्ट्रपतींनी नाराजी व्यक्त करत म्हटले की, कदाचित माझी धाकटी बहीण (ममता) माझ्यावर रागावली असावी. या विधानानंतर भाजप आणि तृणमूल कॉंग्रेसमध्ये शाब्दिक युद्ध सुरू झाले.



### पंतप्रधान मोदींचा पलटवार

या वादात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उडी घेत ममता सरकारवर जोरदार टीका केली आहे. पंतप्रधान म्हणाले की, तृणमूल सरकारने सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. स्वतः आदिवासी समाजातून आलेल्या राष्ट्रपतींचा असा अपमान करणे लज्जास्पद आणि अभूतपूर्व आहे. लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकासाठी ही खेदाची बाब आहे. ममता बॅनर्जी यांनी जाहीर केले आहे की, त्यांचे खासदार डेरेक ओब्रायन आणि सुदीप बंडोपाध्याय राष्ट्रपतींची भेट घेतील. बंगाल सरकारने आदिवासी आणि विशेषतः संथाल समुदायासाठी राबवलेल्या योजनांचा अहवाल ते राष्ट्रपतींना सादर करतील.

### ममता बॅनर्जींचे गंभीर आरोप

मतदार यादीतून नावे वगळल्याच्या विरोधात धरणे आंदोलनावर बसलेल्या ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रपतींच्या टीकेला उत्तर दिले. त्या म्हणाल्या, आम्ही राष्ट्रपतींचा आदर करतो, पण त्यांना भाजपचा अजेंडा राबवण्यासाठी बंगालमध्ये पाठवण्यात आले आहे. तुम्ही भाजपच्या जाळ्यात अडकला आहात. मध्य प्रदेश, छत्तीसगड किंवा मणिपूरमध्ये जेव्हा आदिवासींवर अत्याचार झाले, तेव्हा राष्ट्रपतींनी आवाज का उठवला नाही? मतदारांच्या यादीतून हजारो आदिवासींची नावे काढली गेली, तेव्हा तुम्ही गप्प का होता? ममतांनी स्पष्ट केले की, हा कार्यक्रम एका खासगी संस्थेचा होता आणि राज्य सरकार त्यात सहभागी नव्हते. तरीही जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांनी राष्ट्रपतींचे रीतसर स्वागत केले आहे.

# पश्चिम बंगालच्या राज्यपालांचा तडकाफडकी राजीनामा!

**कोलकाता: दि. ८** वृत्तसंस्था

पश्चिम बंगालच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. राज्यपाल सी.व्ही. आनंद बोस यांनी आपल्या पदाचा अचानक राजीनामा दिल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. गेल्या वर्षी माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी तडकाफडकी राजीनामा दिल्याच्या घटनेचे पडसाद अद्याप कायम असताना, बोस यांच्या या निर्णयाने नवा वाद निर्माण झाला आहे.



चार दिवसांपूर्वी (४ मार्च २०२६) राजीनामा दिल्यानंतर रविवारी (८ मार्च २०२६) कोलकाता विमानतळावर मीडियाशी बोलताना बोस यांनी सूचक विधान केले, ज्यामुळे त्यांच्या राजीनाम्यामागील कारणांबाबत उत्सुकता वाढली आहे. मीडियाशी संवाद साधताना बोस यांनी सांगितले की, त्यांनी विचारपूर्वक राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. खेळ कधी थांबवायचा, याबाबत एक नियम असतो. राज्यपाल म्हणून मला माहिती होते की, एंट्रीनंतर एक्झिटही असेल. मला स्वत:ला निर्णय घेण्यास सांगितले होते, आणि मी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला, असे ते म्हणाले. त्यांनी पुढे क्रिकेटच्या भाषेत आपली भूमिका स्पष्ट केली: मी राज्यपाल म्हणून १२०० दिवस पूर्ण केले, म्हणजे क्रिकेटच्या भाषेत १२ शतके! हे खूप आहे. थांबण्याचीही एक वेळ असते, आणि माझ्यासाठी हीच योग्य वेळ होती. बोस यांनी राजीनाम्याचे स्पष्ट कारण सांगितले नाही, परंतु योग्य वेळी सर्व काही स्पष्ट होईल, असे सूचक विधान केले. यामुळे राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले आहे. काहींचा अंदाज आहे की, केंद्र सरकार आणि राज्य सरकारमधील तणाव, विशेषतः राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याशी संबंधित प्रोटोकॉल उल्लंघनाच्या ताज्या वादामुळे हा निर्णय घेतला गेला असावा.

पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दौऱ्यादरम्यान प्रोटोकॉलचे उल्लंघन याबाबत बोस म्हणाले, राष्ट्रपती एक अनुभवी, संतुलित आणि प्रतिष्ठित व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी जे सांगितले, त्यामागे त्यांची काही कारणे असतील. पण त्यांच्या टिप्पणीवर बोलण्याचा मला अधिकार नाही. बोस यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी किंवा राज्य सरकारवर थेट टीका करणे टाळले, ज्यामुळे त्यांच्या भूमिकेबाबत आणखी कुतूहल निर्माण झाले आहे. सी. व्ही. आनंद बोस यांनी २३ नोव्हेंबर २०२२ पासून पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून कार्यभार स्वीकारला होता. त्यांच्या कार्यकाळात ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस सरकारशी अनेकदा खटके उडाले. विधेयके मंजुरी, विश्वविद्यालयांमधील नियुक्त्या, आणि राज्य सरकारच्या काही धोरणांवरून बोस आणि तृणमूल काँग्रेसमध्ये मतभेद निर्माण झाले होते.

# नेपाळमध्ये बालेंद्र शाह यांनी घडविला इतिहास

## ११७ जागा जिंकत ठरला मोठा पक्ष



**काठमांडू : दि. ८** वृत्तसंस्था


नेपाळमध्ये माजी गायक आणि राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीचे नेते बालेंद्र शाह यांनी सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निर्विवाद बहुमत मिळवून ऐतिहासिक विजय मिळवला आहे. नेपाळमधील प्रस्थापित राजकीय पक्षांना पिछाडीवर टाकून या पक्षाने देशाला नवीन युवा नेतृत्व दिले आहे.

रावी लामिछाने यांनी २०२२ मध्ये राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीची स्थापना केली होती. आरएसपी या पक्षाने संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या प्रतिनिधी गृहातल्या प्रत्यक्ष निवडणूक झालेल्या १६५ मतदार संघांपैकी ११७ जागांवर विजय मिळवला आहे. अजूनही या पक्षाचे उमेदवार ८ जागांवर आघाडीवर आहेत. आतापर्यंत १६५ पैकी १५२ जागांवरील मतमोजणी पूर्ण झाली असून, तेथील निकाल निवडणूक आयोगाने जाहीर केले आहेत. नेपाळी काँग्रेस हा पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला असून, या पक्षाला जेमतेम १७ जागांवर विजय मिळाला आहे. माजी पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांच्या कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (युनिफाइड मार्क्सवादी-लेनिनवादी) पक्षाला जेमतेम ७ जागांवर विजय मिळवता आला आहे. हा पक्ष ३ जागांवर आघाडीवर आहे. नेपाळ कम्युनिस्ट पार्टीने ७, श्रम संस्कृती पार्टीने २ तर राष्ट्रीय प्रजातंत्र पार्टीने एका जागेवर विजय (पान २ वर)

# नाशिकला ४ दिवसांत दोनदा भूकंपाचे धक्के

**नाशिक: दि. ८** वृत्तसंस्था

उत्तर महाराष्ट्रात उन्हाचा कडाका वाढत असतानाच नाशिकच्या सीमावर्ती सुरगाणा तालुक्यात निसर्गाच्या एका वेगळ्याच कोपाचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरगाणा तालुक्यातील उंबरठाण आणि आसपासच्या परिसरात भूकंपाच्या सौम्य धक्क्यांची मालिका सुरू असल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



सुरगाणा तालुक्यातील उंबरठाण, निवरापाडा, चुली, राशा आणि गोंडाळविहीर यांसारख्या दुर्गम आणि डोंगराळ भागांत भूगर्भातील या हालचालींचे तीव्र पडसाद उमटत आहेत. या धक्क्यामुळे घरांवरील छताचे पत्रे वाजू लागले आणि स्वयंपाकघरातील भांडी कोसळत आहे. तसेच जमीन हादरल्याने नागरिक सुरक्षिततेसाठी घराबाहेर पडत आहे.

# पहिले खासगी व्यावसायिक रॉकेट विक्रम १ चे मोदींच्या हस्ते उद्घाटन!

**हैदराबाद : दि. ८** वृत्तसंस्था

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हैदराबाद येथील स्पेसटेक स्टार्टअप स्कायरूट एरोस्पेसच्या इन्फिनिटी कॅम्पसचे व्हर्च्युअल उद्घाटन केले. तसेच पंतप्रधान मोदींनी भारताच्या पहिल्या व्यावसायिक ऑर्बिटल रॉकेट, विक्रम-१ चे उद्घाटन केले. हे रॉकेट उपग्रहांना पृथ्वीजवळच्या लो अर्थ ऑर्बिट अर्थात लिओमध्ये घेऊन जाईल.**

हैदराबादमधील २ लाख चौरस फूट जागेवर पसरलेल्या इन्फिनिटी सुविधेत दरमहा एक ऑर्बिटल रॉकेट तयार करण्याची क्षमता आहे. तसेच स्पेसटेक ही कंपनी प्रक्षेपण वाहनांच्या डिझाइन पासून निर्मिती आणि चाचणी पर्यंतची सर्व कामं करण्यास तत्पर आहे. स्कायरूटचे इन्फिनिटी कॅम्पस हे भारताच्या नवीन विचारसरणीचे, नवोपक्रमाचे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे युवाशक्तीचे प्रतिबिंब आहे. आपल्या युवाशक्तीची नवोपक्रम, जोखीम घेण्याची क्षमता आणि उद्योजकता नवीन उंची गाठत आहे; असे पंतप्रधान मोदी उद्घाटनपर कार्यक्रमात म्हणाले. येणारा काळ भारताचा, त्याच्या तरुणांचा आणि नवोन्मेषाचा आहे आणि येत्या पाच वर्षांत देश आपली प्रक्षेपण क्षमता नवीन उंचीवर नेईल. भारत जागतिक उपग्रह प्रक्षेपण परिसंस्थेत एक नेता म्हणून उदयास येईल, असा विश्वास पंतप्रधान मोदींनी (पान २ वर)






# पान 1 वरून...

## नेपाळमध्ये बालेंद्र शाह यांनी...

मिळवला आहे. याशिवाय एक अपक्ष उमेदवारही विजयी झाला. विजयी झालेल्यांमध्ये १० महिलांचाही समावेश आहे. यात आरएसपीच्या ९ आणि नेपाळी काँग्रेसच्या एका उमेदवार महिलेचा समावेश आहे. पंतप्रधानपदाचे दावेदार समजले जात असलेल्या के.पी. शर्मा ओली यांच्याशिवाय नेपाळी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष गगन तापा हे दोघेही पराभूत झाले आहेत. आरएसपीने ज्या ठिकाणी विजय मिळवला, त्यामध्ये काठमांडू खोऱ्यातल्या ३ जिल्ह्यांमधल्या १५ मतदार संघांचा समावेश आहे. बालेन नावाने प्रसिद्ध असलेल्या ३५ वर्षीय बालेंद्र शाह यांनी चारवेळा पंतप्रधान राहिलेल्या आणि एकेकाळी सत्तारुढ पक्ष असलेल्या सीपीएन-यूएमएल पक्षाचे प्रमुख के.पी. शर्मा ओली यांचा ५० हजारांपैक्षा जास्त मतांनी पराभव केला. ही त्यांची सर्वात लक्षणीय कामगिरी ठरली. प्रस्थापित राजकीय नेतृत्वाला कंटाळून युवा पंतप्रधानाला संधी देण्याची जनतेच्या मागणीला अनुसरून बालेंद्र शाह हेच आता नेपाळचे पंतप्रधान होणार आहेत. ते देशाचे पहिले मधेशी पंतप्रधान असतील. त्यांच्या समोर देशाची ढासळणारी अर्थव्यवस्था पुन्हा सुरळीत करण्याशिवाय पाश्चात्य देशांचे बाहुले न होण्याचेही आव्हान असणार आहे.

## पहिले खासगी व्यावसायिक रॉकेट...

व्यक्त केला. भारतातील अभियंते, उच्च दर्जाचे उत्पादन परिसंस्था, जागतिक दर्जाचे प्रक्षेपण स्थळे आणि नाविन्यपूर्ण मानसिकता यामुळे आपली अंतराळ क्षमता किफायतशीर आणि विश्वासार्ह आहे, म्हणूनच जगाला भारताकडून खूप अपेक्षा आहेत; असे पंतप्रधान मोदींनी भाषणातून ठामपणे सांगितले. जागतिक कंपन्या भारतात उपग्रह बांधू इच्छितात, भारताकडून प्रक्षेपण सेवा घेऊ इच्छितात आणि भारतासोबत तंत्रज्ञान भागीदारी करू इच्छितात. भारताचे अंतराळ क्षेत्र जागतिक गुंतवणूकदारांसाठी एक आकर्षक ठिकाण बनत आहे; असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले. भारताच्या अंतराळ प्रवासाला नवीन पंख देण्यात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) भूमिकेचे त्यांनी कौतुक केले आणि सांगितले की या क्षेत्राने राष्ट्रीय सुरक्षेसह सर्व क्षेत्रांमध्ये पायाभूत भूमिका बजावली, ज्यामुळे सरकारने ऐतिहासिक अवकाश सुधारणा हाती घेतल्या आणि अवघ्या सहा ते सात वर्षांत त्यात परिवर्तन घडवून आणले, असे सांगत मोदींनी इस्रोचे जाहीर कौतुक केले. जगात लहान उपग्रहांची मागणी सतत वाढत आहे, प्रक्षेपण वारंवारता देखील वाढत आहे, नवीन कंपन्यांनी उपग्रह सेवा देण्यास सुरुवात केली आहे. येत्या काळात जागतिक अंतराळ अर्थव्यवस्था वाढणार आहे आणि भारतातील तरुणांसाठी ही एक मोठी संधी आहे; असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

------------------------

**विक्रम १ विषयी महत्त्वाचे :** हैदराबादच्या स्कायरूट एरोस्पेसने बनवलेले हे भारतातील पहिले खासगी व्यावसायिक रॉकेट; विक्रम साराभाई यांच्या नावाचा संदर्भ असलेले विक्रम-१ हे २०२६ च्या सुरुवातीला पृथ्वीच्या कक्षेत पहिले उड्डाण करेल; तब्बल सात मजली उंच असलेल्या या रॉकेटमध्ये एकाच मोहिमेत अनेक उपग्रह प्रक्षेपित करण्याची क्षमता; परवडणाऱ्या दरात पृथ्वीच्या विविध कक्षांमध्ये ३५० किलोग्रॅम पर्यंतचे उपग्रह प्रक्षेपित करण्याची क्षमता; भारतातील पहिले प्रक्षेपण वाहन आहे जे पूर्णपणे कार्बन फायबरपासून बनवल्यामुळे वजनाला हलके पण कामगिरीच्या बाबतीत प्रभावी; विक्रम-१ मध्ये ३डी-प्रिंटेड हायपरगोलिक इंजिन; प्रगत कार्बन कंपोझिट वापरून बनवलेली कलाम-१२०० बूस्टर स्टेज भारतातील सर्वात मोठी खासगीरित्या विकसित केलेली रॉकेट स्टेज.

## किवींना नमवीत भारत जगज्ञेता!

भागीदारी करता आली नव्हती. २००९ मध्ये पाकिस्तानच्या कामरान अकमल आणि शाहजेब हसन यांनी श्रीलंकेविरुद्ध ४८ धावांची भागीदारी केली होती. आज अभिषेक आणि संजूने हा १७ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडत नवा कीर्तिमान प्रस्थापित केला आहे. पूर्ण विश्वचषकात फार्म न मिळालेला अभिषेक शर्मा फायनलला तापला आणि त्याने २१ चेंडूत ५२ धावांची घातक खेळी केली. तसेच जबरदस्त फार्म असलेल्या संजूने आज पुन्हा चमत्कार केला. त्याने ४६ चेंडूत ५ चौकार आणि ८ षटकारासह ८९ धावांची खेळी केली. भारतीय संघात पुनरागमन करणारा इशान किशन या सीजनमध्ये चांगलात गाजला, त्याने २५ चेंडूत ५४ धावा केल्या. शेवटी शिवम दुबेने फिनिशरची भूमिका बरोबर निभावली. त्याने ८ चेंडूत दोन षटकार आणि ३ चौकारासह २६ धावा करत कहर केला. भारतीय फलंदाजांनी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियच्या खेळपट्टीचा पुरेपूर वापर केला आणि न्यूझिलंडसमोर २५६ धावांचे आव्हानात्मक लक्ष्य ठेवले. न्यूझीलंडकडून नशीम जेम्सने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. तर रचिन रवींद्र आणि मॅट हॅनरी यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली. अक्षर पटेलने टी-२० विश्वचषक फायनलमध्ये आपल्या फिरकीने न्यूझीलंडच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले.

## पाटील समाज महिला मंडळातर्फे ११ मार्चला महिला दिन कार्यक्रम


अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ८ :** पाटील समाज महिला मंडळ अकोला तर्फे बुधवार दि. ११ मार्च २०२६ रोजी महिला दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. स्थानिक जुन्या आर टी ओ कार्यालया समोरील मराठा सेवा संघाच्या सभागृहात दुपारी ४ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अकोला महानगरपालिकेच्या महापौर सौ. शारदा ताई खेडकर याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांकरिता पाककला स्पर्धे सह इतरही काही कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाकरिता समाजातील महिलांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पाटील समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा वैशाली बहाकर, कार्याध्यक्षा रूपाली नाकट, सचिव ॲड. दिपाली जानोरकर, जिल्हा संघटिका सरिता वाकोडे, उपाध्यक्षा अर्चना पाटील, मुख्य मार्गदर्शिका प्रा. डॉ. ममता इंगोले, कोषाध्यक्षा स्वाती बारब्दे, संगीता ताथोड, सोनाली मोरे, वर्षा पोरे, संगीता दाळू , संगीता वानखडे, रेणुका पाथ्रीकर, सुमित्रा काकड, वनमाला ठाकरे, जयश्री राऊत यांनी केले आहे.

# गर्भाशय मुखाच्या कर्करोगावर नियंत्रणासाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेची सुरुवात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोला, दि. ८ : महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या (गर्भाशय मुखाचा कर्करोग) रोखण्यासाठी शासनाने विरुद्ध एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू केली आहे. देशपातळीवर या मोहिमेचा शुभारंभ २८ फेब्रुवारी २०२६ रोजी पंतप्रधान यांच्या हस्ते करण्यात आला. राज्यात ही मोहीम ८ मार्चपासून सुरू करण्यात येत असून अकोला जिल्ह्यातही तिची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.**

अकोला जिल्ह्यात ही मोहीम जिल्हाधिकारी वर्षा मीना ,मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम आणि उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ डॉक्टर सुशील कुमार वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या मोहिमेचे नियोजन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर बळीराम गाढवे आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर आरती कुलवाल यांनी केले आहे.

महिलांमधील गर्भाशय मुखाचा कर्करोग ही गंभीर चिंतेची बाब असून तो प्रामुख्याने ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस या विषाणूमुळे होतो.

हा असा एकमेव कर्करोग आहे जो लसीकरणाद्वारे टाळता येऊ शकतो. ही मोहीम पुढील तीन महिन्यांपर्यंत राबविण्यात येणार असून त्यानंतर ही लस नियमित लसीकरण कार्यक्रमासोबत देण्यात येईल.

या मोहिमेत १४ वर्षे पूर्ण झालेल्या परंतु १५ वर्षे पूर्ण न झालेल्या मुलींना ४ या एचपीव्ही लसीची ०.५ मिली मात्रा डाव्या दंडातील स्नायूमध्ये दिली जाणार आहे. ही लस जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, महिला रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालय येथे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. लसीकरणाच्या वेळी तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपस्थित राहतील तसेच आवश्यक उपचार सुविधा देखील उपलब्ध ठेवण्यात येणार आहेत.

मोहीम यशस्वी होण्याकरिता आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचे सोबतच शिक्षण विभाग ,महिला बाल कल्याण विभाग ,आदिवासी विभाग व इतर विभागांचे सहकार्य लाभणार आहे.

» एचपीव्ही लसीकरणाबाबत समाजमाध्यमांवर काही चुकीचे गैरसमज पसरविले जात असल्याने नागरिकांनी अशा अफवांवर विश्वास ठेवू नये, मोहिमेत सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांनी केले आहे.

## माँ गायत्री ज्येष्ठ नागरिक संघ कडून जागतिक महिला दिन साजरा



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ८ :** माँ गायत्री ज्येष्ठ नागरीक संघा मार्फत रविवार दिनांक ८ मार्च २०२६ ला ''जागतीक महिला दिन'' साजरा करण्यात आला. कार्यक्रमची सुरवात माँ साहेब जिजाऊ यांचे प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती कमलाताई बलोदे माजी शिक्षण सभापती मनपा अकोला, प्रमुख अतिथी योगीताताई गणेश पावसाळे, सदस्या स्थायी समिती मनपा अकोला

मंगलाताई गजानन सोनोने माजी नगरसेविका,उज्वलाताई धनंजय धबाले, दिपालीताई आनंद बलोदे, उषाताई ठाकरे व आशाताई मांगुळकर संचालीका यांचे हस्ते महिला दिनाचे औचित्य साधुन विशेष कार्य, उल्लेखनीय काम, सामाजीक/धार्मीक कार्य, गरीब व होतकरु कष्टकरी महिला सिंदुताई पदमावार, बबीताताई सर्जेकर, चित्राताई ठाकरे उज्वलाताई परनाटे व ईशा पाटील सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमला उपाध्यक्ष रामदयाल इंगळे, सचिव अशोक मांगुळकर, शामराव ठाकरे, नितीन ठाकरे, राजाराम उपाध्याय उपस्थित होते.

## पातूर येथे शिवजयंती उत्साहात साजरी



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. ८ :** येथे छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक उत्सव समितीच्या वतीने शिवजयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन श्री सिदाजी महाराज व्यायामशाळा व समस्त गावकरी मंडळी, पातूर यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला गावातील नागरिक, तरुण मंडळी आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मंगेश गाडगे मित्रपरिवारानेही कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. वारकरी संप्रदायाचे कीर्तन व भजन हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले. या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. शेवटी आयोजकांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त 'अस्मिता लीगचा शुभारंभ'

### युवती व महिला क्रीडापटूंनी घडविले स्त्री शक्तीचे दर्शन

अकोला : दि. ८ वृत्तसंस्था






प्रत्येक स्त्री ही करुणा, साहस आणि शक्तीचे प्रतीक आहे हा संदेश देत आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त केंद्रीय क्रीडा मंत्रालय, मेरा युवा भारत केंद्र, व जिल्हा प्रशासनाच्या वतीने वसंत देसाई क्रीडांगण येथे अस्मिता लीगचे आयोजन आज करण्यात आले.

महाविद्यालयांच्या विद्यार्थिनी, युवती व महिला यांनी स्पर्धेत सहभागी होत स्त्री शक्तीचे दर्शन घडवले.

विद्यार्थिनी व महिलांसाठी १३ वर्षांखालील, १३ ते १८ वर्ष, १८ हून अधिक अशा तीन वयोगटात धावण्याची स्पर्धा झाली. १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर इतक्या अंतराच्या या स्पर्धांमध्ये जिल्ह्यातील युवती व महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. क्रीडा क्षेत्रात उत्तम कामगिरी बजावलेल्या मान्यवर महिला क्रीडापटू, विद्यार्थिनी क्रीडापटू यांच्या हस्ते मशाल पेटवून उपक्रमाचा शुभारंभ झाला.

या उपक्रमासाठी जिल्हा क्रीडा कार्यालय, स्काऊट-गाईड कार्यालय, शिक्षणाधिकारी कार्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विविध शाळा-महाविद्यालये, महिला आर्थिक विकास महामंडळ यासह विविध संस्थांचा सहभाग मिळविण्यात आला.

राज्य क्रीडा मार्गदर्शक नलिनी जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट्ट, स्काऊट गाईड जिल्हा संघटक किरण लहाने, जयमालाताई जाधव, जिल्हा क्रीडा कार्यालयाचे राजेश गावंडे,मेरा युवा भारत केंद्राचे मदन भरगाटे यासह क्रीडा मार्गदर्शक उपस्थित होते.

## आदर्श ग्रामसेवक मनोज गवईंचा बार्शीटाकळी पंचायत समितीत गौरव!

### माझी वसुंधरा ५.० मध्ये विभागात प्रथम; ५० लाखांचे पारितोषिक मिळवल्याबद्दल सन्मान



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शीटाकळी, दि. ८ :** ग्रामसेवा हीच ईश्वरसेवा मानून दुर्गम भागातील राजनखेड गावाचा कायापालट करणारे आदर्श ग्रामपंचायत अधिकारी मनोज देविदास गवई यांचा पंचायत समितीच्या वसंतराव नाईक सभागृहात जाहीर सत्कार करण्यात आला. माझी वसुंधरा ५.० अभियानात अमरावती विभागात प्रथम क्रमांक पटकावून गावाला ५० लक्ष रुपयांचे पारितोषिक मिळवून दिल्याबद्दल हा गौरव करण्यात आला.

मनोज गवई यांनी २०१७ मध्ये विमुक्त जाती-जमाती बहुल राजनखेड येथे रुजू झाल्यापासून गावाला हागणदारीमुक्त केले. कोरोना काळात उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना प्रशस्तीपत्र मिळाले होते. त्यानंतर संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात जिल्हा व विभाग स्तरावर एकूण १८ लाखांचे, तर आता माझी वसुंधरामध्ये ५० लाखांचे बक्षीस मिळवून अकोला जिल्ह्याची मान राज्यात उंचावली आहे.

याप्रसंगी गटविकास अधिकारी रविकांत पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनीता इंगळे, प्रशासन अधिकारी दिलीप शिरसाट, विस्तार अधिकारी दीपक इंगळे, विनोद वसु, संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब बोचरे, तालुकाध्यक्ष नारायण दिवनाले, सचिव राजेश बंड, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर तांबडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात रविकांत पवार यांनी गवई यांचा आदर्श सर्व कर्मचाऱ्यांनी समोर ठेवावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन नारायण दिवनाले यांनी केले, तर आभार ज्ञानेश्वर तांबडे यांनी मानले. या सोहळ्याला तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## हप्ता अडविल्याने घरकुल लाभार्थी आक्रमक; सीईओंकडे धाव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. ८ :** तालुक्यातील पिंपळखुटा येथील एका घरकुल लाभार्थ्याने ग्रामपंचायत सचिवावर हप्ता थांबविल्याचा गंभीर आरोप करत थेट जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे (सीईओ) दाद मागितली आहे. संबंधित सचिवावर कारवाई न झाल्यास कुटुंबासह ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा लाभार्थ्याने निवेदनातून दिला आहे.

पिंपळखुटा येथील लाभार्थी युसुफ शहा यांनी ६ मार्च रोजी सीईओना निवेदन दिले. निवेदनानुसार, घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवून देण्यासाठी पाच हजार रुपये घेण्यात आले होते. आता तिसरा हप्ता मिळवून देण्यासाठी पुन्हा पैशांची मागणी होत असून, पैसे देण्यास नकार दिल्याने दोन महिन्यांपासून प्रस्तावावर स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप शहा यांनी केला आहे. मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या शहा यांनी कौटुंबिक व आजारपणाच्या अडचणी मांडत, १५ मार्चपर्यंत कारवाई न झाल्यास १६ मार्च रोजी आईसह सीईओंच्या दालनात आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.

संबंधित लाभार्थ्याने घरकुल मंजूर करताना दुसऱ्या जागेचे कागदपत्र दाखवले आणि प्रत्यक्ष बांधकाम सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण करून केले आहे. नागरिकांनी या अतिक्रमणाबाबत तक्रार केली असून लाभार्थ्याने शासनाची दिशाभूल केली आहे. मी लाभार्थ्याला ओळखत नाही आणि कोणत्याही पैशांची मागणी केलेली नाही असे सागर रोठे, ग्रामसेवक, पिंपळखुटा यांनी यावेळी सांगितले.

## उरळ बु. येथे 'महाराजस्व' समाधान शिबिर उत्साहात

### शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बाळापूर, दि. ८ :** महाराष्ट्र शासनाच्या ध्येयधोरणानुसार 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अभियानाचा टप्पा क्रमांक एक शनिवारी, ७ मार्च रोजी उरळ बु. येथील श्री शिवशंकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पार पडला. या शिबिराच्या माध्यमातून महसूलसह विविध विभागांच्या योजनांचा लाभ आणि मार्गदर्शन एकाच छताखाली मिळाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी डॉ. संतोष येवलिकर होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून तहसीलदार वैभव फरतारे उपस्थित होते. या शिबिरात संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, पुरवठा विभाग, पंचायत समिती, पशुसंवर्धन, आरोग्य, कृषी, भूमी अभिलेख आणि महिला व बालकल्याण विभागाचे स्टॉल्स लावण्यात आले होते. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकरी, मजूर आणि विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांना प्रत्यक्ष दाखले व प्रमाणपत्रांचे वाटप केले.

याप्रसंगी माजी पं.स. सदस्य योगेश्वर वानखडे, प्रशांत पोहरे, तालुका कृषी अधिकारी डोंगरे, नायब तहसीलदार डॉ. भागवत व सय्यद साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वीतेसाठी उरळ महसूल मंडळातील सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील, मंडळ अधिकारी आणि महसूल व कृषी मित्रांनी परिश्रम घेतले.

सन्मान | निराधार, बेघर आणि अनाथ नागरिकांना दिलासा

# महिला आयोगाच्या राज्यस्तरीय पुरस्काराने प्रीती सागर बहुउद्देशीय संस्थेचा गौरव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. ८ :** सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या वसाळी नागापूर बोर्डी येथे तेथे प्रीती सागर बहुउद्देशीय संस्थेच्या अंतर्गतकार्यरत असलेल्या जनाई निराधार वृद्धाश्रमाला महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक क्षेत्रात निराधार, बेघर आणि अनाथ नागरिकांसाठी निस्वार्थ सेवा देणाऱ्या या संस्थेच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

मुंबईतील प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे ७ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्राच्या माननीय उपमुख्यमंत्री श्रीमती. सुनेत्राताई अजित पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपालीताई चाकणकर, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मेघना बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

अकोला येथील प्रीतीसागर बहुउद्देशीय संस्था संचालित जनाई निराधार वृद्धाश्रम गेल्या काही वर्षांपासून नागापूर बोर्डी परिसरात निराधार, बेघर आणि अनाथ नागरिकांना निवारा, अन्न व मूलभूत सुविधा निशुल्क उपलब्ध करून देत आहे. या सेवाभावी कार्यामुळे संस्थेची समाजात वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

सन २०१४ पासून प्रीती सागर बहुउद्देशीय संस्था विविध सामाजिक उपक्रम राबवत असून बेघर व निराधार नागरिकांना मदत, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, महिलांवरील अन्याय-अत्याचारांविरोधात लढा तसेच बालकांना कायदेशीर मार्गदर्शन अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजसेवा केली जात आहे.

या कार्याची दखल घेत संस्थेचे अध्यक्ष जनार्दन जामनिक, सचिव एस्तेर जामनिक(स्वामी) , कोषाध्यक्ष सुदेश रजाने तसेच विक्की वाकोडे, समीर स्वामी आणि श्रीकांत शिरसाट यांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

दरम्यान, महिला शक्तीचा गौरव करणाऱ्या या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या 'महिला सन्मान पोर्टल'चे अनावरण, आयोग कार्यालयातील 'सायबर वेलनेस' कक्षाचे उद्घाटन आणि 'आत्मसन्मानाच्या वाटा' या पुस्तक व भित्तीपत्राचेही अनावरण करण्यात आले.

## अडगाव बुद्रुकमध्ये शिवजन्मोत्सव जल्लोषात

### ६८ रक्तदात्यांनी रक्तादानातून वाहिली शिवरायांना आदरांजली!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अडगाव बु., दि. ८ :** येथील छत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीनुसार ६ मार्च रोजी अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरलेल्या भव्य रक्तदान शिबिरात ६८ शिवप्रेमींनी उत्स्फूर्त रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली.

सोहळ्याची सुरुवात हिवरखेडचे ठाणेदार गजानन राठोड, पोलीस पाटील हितेश हागे आणि छत्रपती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष पंकज देशमुख यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. सायंकाळी ५ वाजता गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये बँजो पथक आणि महाकाल वाद्य पथकाने रंगात भरली. गावातील मुख्य मार्गावरून निघालेल्या या मिरवणुकीत शेकडो युवक आणि शिवप्रेमी सहभागी झाले होते. ठिकठिकाणी शिवरायांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले.

दुसरीकडे, प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात तरुणांनी मोठा प्रतिसाद दिला. अकोला येथील ठाकरे ब्लड बँक यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वी झाले. जगद्गुरु तुकाराम महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराचा प्रारंभ झाला होता. अकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार गजानन राठोड व अडगाव पोलीस चौकीच्या कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवल्याने सोहळा शांततेत पार पडला. प्रतिष्ठानच्या या विधायक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महत्त्वाचे

### अंशिका वर्मा आणि एसपी के.के. बिश्नोई अडकणार लग्नबंधनात!

**लखनौ:** उत्तर प्रदेश पोलीस दलातील दोन कार्यक्षम आणि चर्चेत असलेले आयपीएस अधिकारी लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत. आपल्या कडक कार्यशैलीमुळे गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या लेडी सिंघम अंशिका वर्मा आणि संभलचे पोलीस अधीक्षक कृष्ण कुमार बिश्नोई यांची ही जोडी सध्या संपूर्ण राज्याच्या पोलीस वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. येत्या २९ मार्च रोजी राजस्थानमधील जोधपूर येथे हा शाही विवाह सोहळा पार पडणार आहे.
बरेली येथे एसपी म्हणून कार्यरत असलेल्या अंशिका वर्मा यांना त्यांच्या तडाखेबंद निर्णयामुळे लेडी सिंघम म्हणून ओळखले जाते. मूळच्या प्रयागराजच्या असलेल्या अंशिका यांनी आपल्या कार्यकाळात महिला सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले. २०२५ मध्ये त्यांनी बरेलीत वीरांगना युनिट स्थापन केले, जे उत्तर प्रदेशातील पहिले विशेष महिला कमांडो पथक मानले जाते. या पथकातील महिलांना तायक्कांदो आणि दंगल नियंत्रणाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. गुन्हेगारी नियंत्रण आणि अंमली पदार्थ विरोधी मोहिमांमध्ये त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे.

### इराणमध्ये नवीन सर्वोच्च नेत्याची झाली निवड!

**तेहरान :** इराणचे सर्वोच्च धर्मगुरू आयातुल्ला अली खमेनी यांच्यानंतर देशाची धुरा कोणाकडे जाणार, यावर तज्ज्ञांच्या समितीचे एकमत झाले आहे. सध्या सुरू असलेले युद्ध आणि राजकीय तणाव पाहता, खबरदारी म्हणून नवीन नेत्याचे नाव गुप्त ठेवण्यात आले आहे. आयातुल्ला अली खमेनी यांच्या निधनानंतर इराणच्या तज्ज्ञ समितीने देशाच्या पुढील सर्वोच्च नेत्याची निवड जवळपास निश्चित केली आहे. या समितीचे सदस्य आयातुल्ला मोहम्मदमेहदी मीरबाकेरी यांनी रविवारी माहिती दिली की, नवीन नेत्याच्या नावावर सर्व धर्मगुरूंचे एकमत झाले आहे.सध्या केवळ काही तांत्रिक आणि कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण होणे बाकी असल्याने अधिकृत घोषणा थांबली आहे. मात्र, नवीन उत्तराधिकारी निवडीचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे, असे वृत्त इराणच्या मेहर वृत्तसंस्थेने दिले आहे. इराणच्या नवीन सर्वोच्च नेत्याची निवड झाली असली तरी, या निर्णयावर अधिकृत शिक्कामोर्तब कसे करावे, यावरून धर्मगुरूंच्या समितीत दोन गट पडले आहेत. काही सदस्यांच्या मते, एवढ्या मोठ्या निर्णयासाठी सर्वांनी प्रत्यक्ष एकत्र येणे आवश्यक आहे. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव इतर सदस्य प्रत्यक्ष बैठक टाळून निर्णय जाहीर करण्याच्या बाजूने आहेत.

# ‘अमेरिकेचे ते प्रयत्न कधीही यशस्वी होणार नाहीत’

## इराणमधील युद्धाबाबत चीनचे मोठे वक्तव्य

**नवी दिल्ली : दि.८ वृत्तसंस्था**



अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव शिगेला पोहोचला आहे. या युद्धात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्यासह आतापर्यंत शेकडो जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील हे युद्ध आणखी भडकण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. अद्यापही हे युद्ध सुरू असून इराण अमेरिका-इस्रायलला जोरदार प्रत्युत्तर देत आहे.
मध्यपूर्वेत निर्माण झालेल्या या युद्धजन्य परिस्थितीबाबत आता अनेक देशांच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. यावर आता चीनने देखील मोठी भूमिका मांडली आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणधील राजवट बदलण्याबाबत अनेकदा वक्तव्य केलेली आहेत. या अनुषंगाने आणि अमेरिका-इस्रायल व इराणमधील संघर्षाबाबत चीनने भूमिका मांडली आहे. अमेरिका-इस्रायलच्या सुरू असलेल्या हल्ल्यादरम्यान इराणमध्ये राजकीय बदल घडवून आणण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांविरुद्ध चीनने इशारा देत म्हटलं की, अमेरिकेच्या अशा प्रयत्नांना सार्वजनिक पाठिंबा मिळणार नाही, तसेच बाह्यरित्या चालविलेले राजवट बदल घडवून आणण्याचे प्रयत्न कधीही यशस्वी होणार नाहीत. तसेच अमेरिका-इस्रायल व इराणमधील हे युद्ध घडायलाच नको होतं'', असं चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांनी म्हटलं आहे. बीजिंगमधील एका पत्रकार परिषदेत बोलताना चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी म्हटलं की,''तेहरानमध्ये 'रंग क्रांती' किंवा बाह्यरित्या चालविलेले राजवट बदल घडवून आणण्याचे प्रयत्न कधीही यशस्वी होणार नाहीत. कारण 'रंग क्रांती' घडवणं किंवा सरकार बदलण्याची मागणी करणं याला लोकांचा पाठिंबा मिळणार नाही. इराण आणि इतर देशांच्या सार्वभौमत्वाचा आदर केला गेला पाहिजे आणि शत्रुत्व थांबवलं पाहिजे'', असं मंत्री वांग यी यांनी म्हटलं.''अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील हे असं युद्ध आहे, जे घडायला नको होतं आणि हे असं युद्ध आहे जे कोणाचंही भलं करत नाही. शक्ती कोणताही उपाय देत नाही आणि सशस्त्र संघर्ष केवळ द्वेष वाढवतो व नवीन संकटे निर्माण करतो'', असंही मंत्री वांग यी यांनी म्हटलं आहे. चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी असंही म्हटलं की, ''मध्य पूर्वेतील देशांनी त्यांचे व्यवहार स्वतः ठरवले पाहिजेत. मध्य पूर्वेतील लोक या प्रदेशाचे खरे हकदार आहेत आणि या प्रदेशाचे व्यवहार तेथील देशांनी स्वतंत्रपणे ठरवले पाहिजेत.''
दरम्यान, चीनने अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील संघर्षाबाबत सर्व पक्षांना राजनैतिक संबंध पुन्हा व्यवस्थित करण्याचे आणि शक्य तितक्या लवकर वाटाघाटीकडे व संवादाद्वारे मतभेद सोडवण्याचे आवाहन केले.

## खामेनींच्या हत्येचा बदला घेतल्याशिवाय मागे हटणार नाही: इराणचा निर्धार

**नवी दिल्ली : दि.८ वृत्तसंस्था**



मध्यपूर्वेत अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होत चालला आहे. इराणच्या सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या मृत्यूनंतर परिस्थिती अधिक चिघळली असून इराणकडून अमेरिकेच्या लष्करी तळांवर आणि मालमत्तांवर हल्ले केल्याचा दावा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना कठोर इशारा दिला आहे.
२८ फेब्रुवारी २०२६ रोजी अमेरिका आणि इस्रायलने संयुक्त कारवाई करत इराणवर हल्ला केला होता. या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. तसेच या युद्धात आतापर्यंत शेकडो इराणी नागरिकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर इराणने बदला घेण्याची भूमिका घेतली आहे.
इराणचे सुरक्षा प्रमुख अली लारीजानी यांनी सरकारी दूरचित्रवाणीशी बोलताना स्पष्ट इशारा दिला की, ''आमच्या नेत्याच्या रक्ताचा बदला घेतल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. डोनाल्ड ट्रम्प यांनी जे केले त्याची किंमत त्यांना चुकवावी लागेल. त्यांनी आमच्या नेत्याला मारले आणि हजाराहून अधिक लोक शहीद झाले. ही साधी गोष्ट नाही.''
लारीजानी यांनी पुढे सांगितले की, ट्रम्प यांनी इराणच्या प्रतिक्रियेचा चुकीचा अंदाज लावला आहे. ''त्यांना वाटले व्हेनेझुएलामध्ये जे घडले ते इराणमध्येही घडेल. पण आता ते स्वतःच या संघर्षात अडकले आहेत. आम्ही ट्रम्पला सोडणार नाही,'' असे ते म्हणाले. याचबरोबर सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत त्यांनी पुन्हा एकदा इशारा दिला की, ''जोपर्यंत आम्ही बदला घेत नाही, तोपर्यंत आम्ही मागे हटणार नाही. दरम्यान, लारीजानी यांच्या वक्तव्यांवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. सीबीएस न्यूजशी बोलताना ट्रम्प म्हणाले, ''तो कोण आहे, तो काय बोलतो आहे याची मला काहीच कल्पना नाही. मला त्याची अजिबात पर्वा नाही.'' त्यांनी इराणी नेतृत्व कमकुवत झाल्याचा दावा करत अमेरिकेच्या लष्करी कारवाया सुरू राहतील असेही स्पष्ट केले.

## शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंदांवर लैंगिक छळाचे आरोप करणाऱ्या आशुतोष ब्रह्मचारींवर प्राणघातक हल्ला


**कोशाम्बी: दि.८ वृत्तसंस्था**



शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंदांवर लैंगिक छळाचे आरोप करत त्यांच्याविरोधात कोर्टात खटला दाखल करणाऱ्या आशुतोष ब्रह्मचारींवर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात त्यांना गंभीर दुखापत झाली आहे तसंच त्यांचं नाक कापण्याचाही प्रयत्न झाला आहे.
उत्तर प्रदेशातील कोशाम्बी जिल्ह्यात असलेल्या सिराथू या रेल्वे स्टेशनच्या जवळ ट्रेन होती. त्या ट्रेनमध्ये आशुतोष ब्रह्मचारी बसले होते. त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. त्यांचं नाक कापण्याचा प्रयत्न करण्यात आला. आशुतोष ब्रह्मचारी यांच्यावर वारही करण्यात आले आणि त्यांना गंभीर जखमी करण्यात आलं. आशुतोष ब्रह्मचारी कसेबसे स्वच्छतागृहात पळाले आणि त्यांनी दार लावून घेतलं. ज्यामुळे त्यांचा जीव वाचला आहे. आशुतोष ब्रह्मचारी यांच्यावर हल्ला कुणी केला हे अद्याप स्पष्ट नाही. पोलीस या प्रकरणी तपास करत आहेत.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आशुतोष ब्रह्मचारी हे प्रयागराजला जात असताना त्यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला. हल्लेखोरांकडे धारदार हत्यारं होती. हल्लेखोरांनी त्यांच्या चेहऱ्यावर आणि अंगावर वार केले तसंच त्यांचं नाक कापण्याचाही प्रयत्न केला. मात्र त्यावेळी आशुतोष ब्रह्मचारी पळाले आणि त्यांनी स्वच्छतागृहात स्वतःला बंद करुन घेतलं. हल्लेखोरांनी हा दरवाजा तोडण्याचाही प्रयत्न केला. पण तोपर्यंत रेल्वेच्या डब्यात हलकल्लोळ माजला होता त्यामुळे हल्लेखोरांनी तिथून काढता पाय घेतला. तसंच इतर प्रवासीही तोपर्यंत सावध झाले होते आणि मदतीसाठी हाका मारत होते. त्यामुळे हल्लेखोर पळाले. आशुतोष ब्रह्मचारी यांनी स्वच्छतागृहातूनच पोलिसांना फोन केला आणि घडलेली घटना सांगितली. प्रयागराजला ट्रेन पोहचल्यानंतर पोलीस तिथे आले आणि आशुतोष ब्रह्मचारींना रुग्णालयात नेण्यात आलं आणि त्यांच्यावर उपचार करण्यात आले.
आशुतोष ब्रह्मचारी यांच्यावर जो हल्ला झाला त्यामागे कट असल्याचा आरोप ब्रह्मचारी यांनी केला आहे. शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद आणि त्यांचे सहकारी मुकुंदानंद यांनी हा हल्ला घडवून आणला असेल असा संशय आशुतोष ब्रह्मचारींनी व्यक्त केला. जे हल्लेखोर आले होते त्यांनी माझं नाक कापण्याचा प्रयत्न केला असा आरोपही आशुतोष ब्रह्मचारींनी केला. शंकराचार्यांच्या विरोधात न्यायालयात मी कायदेशीर दाद मागितली आहे.

## तेहरानमधील इंधन केंद्रांवर इस्त्रायलच्या हवाई दलाचे जोरदार हल्ले
### मध्यपूर्वेतील संघर्ष अधिक तीव्र

**तेहरान : दि.८ वृत्तसंस्था**



इस्त्रायल आणि अमेरिकेचे इराणविरुद्ध सुरू असलेल्या युद्धाचे परिणाम दिवसेंदिवस तीव्र होत आहेत. इस्त्रायलने इराणच्या तेहरानमधील विमानतळावर हल्ला केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणनेही इस्त्रायलमधील प्रमुख शहर असलेल्या तेल अवीववर क्षेपणास्त्रांचा मारा केला. तसेच इराणने सौदी अरेबियातील अमेरिकेच्या मालमत्ता आणि सैनिक तळ असलेल्या काही ठिकाणांवरही हल्ले केले. मात्र, हे हल्ले रोखण्यात यश आल्याचे सौदी अरेबियाने सांगितले आहे.
अमेरिकेकडून या युद्धात नौदलाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. भूमध्य समुद्रात तैनात असलेल्या अमेरिकन युद्धनौका या संघर्षात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. तसेच अमेरिकेने इराणला इशारा दिला आहे की, अमेरिका इराणवर मोठा हल्ला करू शकते. त्यावर प्रत्युत्तर देताना इराणने आम्ही सहा महिने महायुद्ध लढू शकतो, असा दावा केला आहे. इराणच्या 'रिव्होल्युशनरी गार्ड्स'ने हा दावा केला आहे.
दरम्यान, इस्त्रायलने इराणच्या इंधन साठवणूक केंद्रांवरही हल्ले केले आहेत. याबाबतची माहिती इस्त्रायलच्या 'आयडीएफ'ने 'एक्स'वर पोस्ट करून दिली आहे. या पोस्टमध्ये म्हटले आहे की, तेहरानमधील आयआरजीसीच्या मालकीची अनेक इंधन साठवणूक केंद्रे नष्ट करण्यात आली आहेत. या कारवाईसाठी आयडीएफच्या गुप्तचर यंत्रणेची महत्त्वाची भूमिका होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली 'आयएएफ'ने या केंद्रांवर हल्ले केले. या ठिकाणांहून इराण आपल्या लष्करासाठी आवश्यक इंधन साठवून त्याचे वितरण करत होता. या हल्ल्यांमुळे इराणच्या लष्करी पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाल्याचा दावा आयडीएफने केला आहे.


## आम्ही ६ महिने महायुद्ध लढू शकतो!:इराणच्या ‘रिव्होल्युशनरी गार्डर्स’चा दावा

**नवी दिल्ली : दि.८ वृत्तसंस्था**

इराणविरोधात इस्त्रायलच्या मदतीने अमेरिकेने युद्ध छेडले आहे. इराणला सर्वतोपरी कमकुवत करण्याचे प्रयत्न या दोन्ही देशांकडून केले जात आहेत. त्यांच्या लष्करी तळांपासून तेल डेपोपर्यंत सगळीकडे या दोन्ही देशांनी हल्ले केले. दरम्यान, इराण पराभूत राष्ट्र ठरलं आहे, असं डोनाल्ड ट्रम्प म्हणालेले असताना आता इराणमधून महत्त्वाची माहिती समोर येत आहे. इराण पुढील सहा महिने युद्ध लढू शकतो, असं रिव्होल्युशनरी गार्ड्सने म्हटल्याचं वृत्त फार्स या वृत्तसंस्थेने दिलं आहे. इराण अमेरिका आणि इस्त्रायलविरुद्ध किमान सहा महिने तीव्र युद्ध लढू शकतो, असे वृत्त 'फार्स' या वृत्तसंस्थेने रिव्होल्युशनरी गार्ड्सच्या हवाल्याने दिले आहे. गार्ड्सचे प्रवक्ते अली मोहम्मद नैनी यांच्या म्हणण्यानुसार, ''इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणचे सशस्त्र दल सध्याच्या ऑपरेशन्सच्या वेगाने किमान ६ महिने तीव्र युद्ध सुरू ठेवण्यास सक्षम आहे. इराणचे एलिट फोर्स असलेल्या गार्ड्सने असेही म्हटले आहे की, त्यांनी या प्रदेशातील अमेरिकन आणि इस्त्रायली तळांशी आणि सुविधांशी संबंधित २०० हून अधिक ठिकाणांना लक्ष्य केले आहे.इराण आता मध्य पूर्वेचा दादा राहिलेला नाही तर मध्य पूर्वेतील पराभूत राष्ट्र बनलं आहे आणि तो शरण येईपर्यंत अनेक दशकं इराण असंच पराभूत राष्ट्र राहील किंवा कदाचित पूर्णपणे कोसळेल. आज इराणवर मोठा हल्ला होईल. इराणच्या वाईट वर्तनामुळे ज्या क्षेत्रांना आणि लोकसंख्येला आतापर्यंत लक्ष्य मानलं जात नव्हतं, त्यांनाही विनाश किंवा मृत्यूचा धोका निर्माण झाला आहे.

## महिन्यात एकच गॅस सिलिंडर मिळणार; केंद्र सरकारच्या सूचनांनंतर गॅस वितरकांकडून पाऊल

**नवी दिल्ली : दि.८ वृत्तसंस्था**



दुसरा घरगुती गॅस सिलिंडर मिळण्यासाठी आता २५ दिवस वाट पाहावी लागणार आहे. आखातात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर आधीचा १५ दिवसांचा कालावधी आता १० दिवसांनी वाढविण्यात आला आहे. गॅस वितरक कंपन्यांनी व्यावसायिक आणि घरगुती गॅस सिलिंडर ग्राहकांना महिन्यातून एकच गॅस सिलिंडर देण्याबाबत केंद्र सरकारने सूचना दिल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर हा कालावधी वाढला असला, तरी तो कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय अचानक लागू झाल्याने काही ग्राहकांचा गोंधळ उडाला.
'एलपीजी' गॅसचा वापर घरात स्वयंपाकासाठी केला जातो. नागरिकांना दोन सिलिंडर वापरण्याची परवानगी असते. त्यासाठी पहिला सिलिंडर वापरायला सुरुवात केल्यानंतर १५ दिवसांनी अर्ज करता येत होता. आता अचानक हा कालावधी वाढविण्यात आला आहे.
'आखातात सुरू असलेल्या युद्धामुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाला असेल, तर तसे जाहीर करावे. अशा कठीण परिस्थितीत नागरिकांना विश्वासात घेणे गरजेचे आहे. सत्यस्थिती समजल्यास नागरिकांनाही पर्यायी व्यवस्था उभारण्यासाठी वेळ मिळेल,' असे सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी सांगितले.

## इराणच्या क्षेपणास्त्राचे अवशेष ‘२३ मरीना’ टॉवरवर कोसळले
### धुराच्या लोटांनी परिसर काळवंडला



**तेहरान : दि.८ वृत्तसंस्था**

दुबई येथे इराणने हल्ला केला. यावेळी इराणच्या क्षेपणास्त्राचे अवशेष २३ मरिना टॉवरच्या एका इमारतीवर कोसळले. ज्या इमारतीवर हल्ला झाला तेथून आगीच्या ज्वाळा निघत होत्या. तसंच, या इमारतीच्या एका भागाला किरकोळ नुकसान झालं आहे. तसंच, दर्शनी भागातून धूरही निघत होता.
दुबई सरकारने या घटनेची माहिती दिली असून हवाई संरक्षण प्रणालींनी येणाऱ्या प्रक्षेपणास्त्राला यशस्वीरित्या रोखले आहे, परंतु कोसळलेल्या ढिगाऱ्यामुळे मरीनामधील एका इमारतीच्या बाहेरील भागाला किरकोळ नुकसान झाल्याचे त्यांनी सांगितले. 'दुबई मरीना येथील टॉवरच्या दर्शनी भागावर यशस्वीरित्या अडवण्यात आलेल्या ढिगाऱ्यामुळे एक किरकोळ घटना घडल्याची पुष्टी अधिकाऱ्यांनी केली आहे. परिस्थिती नियंत्रणात आली आहे. कोणतीही दुखापत झाली नाही,'' असे दुबई सरकारच्या अधिकृत मीडिया हँडलने वर लिहिले. ''ऐकलेले आवाज हे हवाई संरक्षण प्रणालीने क्षेपणास्त्रे आणि ड्रोन रोखल्याचा परिणाम आहेत,'असे निवेदनात म्हटले आहे.
मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, शनिवारी एकूण १६ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आढळून आली, त्यापैकी १५ पाडण्यात आली तर एक समुद्रात कोसळले. ट्रॅक केलेल्या १२१ ड्रोनपैकी ११९ ड्रोन नष्ट करण्यात आले. युएईचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांनी यापूर्वी अबू धाबी टीव्हीवर सार्वजनिक भाषण दिले, संघर्ष वाढल्यानंतर प्रथमच ते थेट त्यांच्या राष्ट्राशी बोलत होते.
इस्रायलचा इराणवर जोरदार हल्ला
इस्रायलने इराणविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून इराणच्या अनेक इंधन केंद्रावर हल्ले केले. परिणाीम तेहरान आणि शेजारील कारज शहर स्फोटांमुळे हादरले होते. यामुळे आकाशात आगीचे आणि धुराचे मोठे लोळ उठले होते. सोशल मीडियावर फिरणाऱ्या व्हिडिओंमध्ये हल्ल्याच्या ठिकाणांहून मोठ्या प्रमाणात ज्वाळांचे लोळ उठताना दिसत आहेत. गेल्या आठवड्याभरात अमेरिका आणि इस्त्रायलने इराणच्या सर्व ऊर्जा पायाभूत सुविधांवर हल्ले केले. या हल्ल्यांमधअये तेहरान आणि अल्बोर्झ प्रांतातील अनेक तेल साठवणूक डेपोंना लक्ष्य करण्यात आलं होतं.

## काळजी
### भारतीयांसाठी एअर इंडिया आणि इंडिगोकडून अतिरिक्त विमानांची घोषणा

# अडकलेल्या प्रवाशांसाठी विशेष विमानांची सोय


**नवी दिल्ली : दि.८ वृत्तसंस्था**



पश्चिम आशियातील सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर, एअर इंडिया, एअर इंडिया एक्सप्रेस आणि इंडिगो आपल्या प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी महत्त्वाची पावती दिली आहे. जेद्दाह आणि मस्कत ही शहरे विमान प्रवासासाठी सुरक्षित असल्याचे स्पष्ट करत, या ठिकाणची नियमित विमान सेवा सुरू राहणार असल्याचे कंपन्यांनी जाहीर केले आहे.
विविध देशांत अडकलेल्या भारतीय प्रवाशांना मायदेशी परत आणण्यासाठी एअर इंडियाने कंबर कसली आहे. त्यानुसार ८ मार्च रोजी अबु धाबी, दुबई, मस्कत, रास अल-खैमाह आणि शारजाह येथून विशेष (नॉन-शेड्युल्ड) विमानांचे नियोजन करण्यात आले आहे. अडकलेल्या प्रवाशांना भारतात परत आणण्यासाठी एअर इंडियाने ८ मार्च रोजी अबू धाबी, दुबई, मस्कत, रास अल-खैमाह आणि शारजाह येथून ३० हून अधिक अतिरिक्त विमानांचे नियोजन केल्याचे म्हटलं आहे. दरम्यान, एअर इंडियाची युरोप आणि उत्तर अमेरिकेला जाणारी विमाने सुरक्षित पर्यायी मार्गांचा वापर करत असून, ही सेवा पूर्णपणे सुरळीत सुरू असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.
एअर इंडिया दिल्ली आणि मुंबई ते दुबई दरम्यान अतिरिक्त नॉन-शेड्युल्ड विमाने चालवणार आहे. एअर इंडिया एक्सप्रेस भारत आणि युएईच्या शहरांदरम्यान (अबू धाबी, दुबई, रास अल खैमाह आणि शारजाह) ३० अतिरिक्त विमाने चालवेल. नल ८ मार्चपासून युरोपमधील प्रमुख ठिकाणांशी पुन्हा संपर्क जोडण्याचे नियोजन केले असून मध्य-पूर्वेतील ८ शहरांसाठी आपली विमान सेवा सुरू ठेवणार असल्याचे इंडिगो कंपनीने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. इंडिगोने जाहीर केले आहे की, त्यांनी युरोपसाठी आपली विमान सेवा पुन्हा सुरू केली असून अमेरिका-इस्रायल-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पश्चिम आशियातील आठ शहरांमधून कामकाज सुरू आहे. पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थितीमुळे विमान सेवांच्या वेळापत्रकात ऐनवेळी बदल होऊ शकतो. त्यामुळे प्रवाशांनी घराबाहेर पडण्यापूर्वी एअर इंडियाच्या अधिकृत वेबसाइटवर आपल्या विमानाची सद्यस्थिती तपासून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावरही कंपनीकडून वेळोवेळी अपडेट्स दिले जातील. अधिक माहितीसाठी प्रवासी २४ तास उपलब्ध असलेल्या संपर्क केंद्राशी संपर्क साधू शकतात. अमेरिका-इस्रायल-इराण युद्धामुळे पश्चिम आशियातील विमान सेवा विस्कळीत झाली आहे. २८ फेब्रुवारीपासून बहरीन, दुबई, कुवेत आणि कतार यांसारख्या प्रमुख केंद्रांवरील विमाने मोठ्या प्रमाणात रद्द करण्यात आली होती. दरम्यान, आखाती देशांमधील एमिरेट्स, एतिहाद आणि कतार एअरवेज सारख्या प्रमुख विमान कंपन्यांनी मर्यादित प्रमाणात बचाव मोहिमेसाठी विमान सेवा पुन्हा सुरू केली आहे. दिल्ली आणि मुंबई विमानतळांवर शनिवारी (दि. ७ मार्च) किमान १०० आंतरराष्ट्रीय विमाने रद्द करण्यात आली, असे वृत्त पीटीआयने दिले आहे. मुंबई विमानतळावरील ३५ उड्डाणे आणि ३६ आगमने , तर दिल्ली विमानतळावरील २२ उड्डाणे आणि १७ आगमने रद्द करण्यात आल्याचे कंपन्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, एअर इंडियाची बहरीन, दम्माम, दोहा, कुवेत आणि रियाध येथून येणारी आणि जाणारी सर्व नियोजित विमाने १३ मार्चपर्यंत रद्द राहणार आहेत.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# 'ती'च्या प्रवाहातील अक्षरे होत जाताना...



संवाद
सौ. श्रद्धा राऊत बुरले
नागपूर ९६६५९५८८९४

**जन्मावरच्या तिच्या कळीचे**
**फुल वाचण्यासाठी**
**गर्भातल्या धरेची साद**
**आतून ऐकण्यासाठी**
**तिच्या प्रवाही सुरेख अक्षरे**
**गिरवून घेत जाताना**
**मी आईच्या भूमिकेतून**
**जेव्हा अक्षर अक्षर झाले. जन्मावरच्या तिच्या कळीचे......**

होय, तिच्या वाटेवर माझेही मन पिंगा घालत होते. स्त्री म्हणून तिच्या मनातला वारसा माझ्या मनी प्रवाह सांगत होता. कारण आईच्या भूमिकेतून मुलीला प्रवाहाचे संस्कारक्षम दान जेव्हा आपसूकच मिळत जाते, तेव्हा सगळं साहजिकच आपल्या पुढ्यात लिहीत जाताना वाचनीय होत जाते.आणि तिच्याशी संवादीत सुद्धा ,मग तिच्या अनुभवांची सूत्रे आपल्यात प्रवाही होत जाताना जेव्हा उंबरठा ओलांडला जातो तेव्हा जे जाणवत ते ह्या शब्दप्रवाही आहे. अर्थातच ते अनुभवाअंती पुढ्यात लिहिलं जातं. हृदयातून हृदयाकडे आईकडून मुलीकडे जाणिवांची एक सरिता असते, जी तिच्यातून आपल्यात झिरपत येते,आणि मग वृतांत काठातून तिचा प्रवास कळत जातो. म्हणूनच भावपूर्णतेचा वैचारिक सुगंध जेव्हा प्रवाह सेतू गाठत जातो,तेव्हा आसपासच्या आप्त स्वकीय धरेवर तिचा पडसाद उमटत जातो. जाणिवांचा पदर भावनेच्या विश्वातला सुंदर महामेरूच जणू.. तिच्यात उपजतच निर्माण असलेला प्रेमळ वैचारिक भाव कालांतराने तिच्यातलं मन, तिच्यातला वैचारिक गुण प्रगल्भ करीत जात असतो आणि मग "तिच्यातला प्रवाह घेऊन, निघते काठात दुसऱ्या,जिथे तिचेही जगणे आईशी संवादीत होते".आणि मग आई- वडिलांच्या उंबरठ्याआत असताना जाणिवांचे कोष ती गुंफत जाते,आईपणाच्या विशाल पदराच्या छत्रछायेत..स्त्री म्हणून तिच्यातल्या अनंत कलेचं दर्शन सोशिकपणे जाणवत असतच, तद्नंतर तिच्यातल्या सिमारेषेतले तिचे पाऊल दुसऱ्या वेशीवर लक्ष्मीरूपाने पोचते झाल्यावर येणाऱ्या अनंत चांगल्या तसेच वाईट अनुभवांची फार मोठी खोली तिच्या पुढ्यात येऊन ठेपते कुणाला चांगल्या अनुभवांची वेशी गवसते, तर कुणाला जरासे काट्याचे कुंपण, त्यातून तिच्या प्रवासाच्या सगळ्याच दिशा फिरल्या जातात, कधी सरळ रेषेत तर कधी उलट्या दिशेने . हा अनुभव प्रत्येकाचा सारखा नसतो, ह्याला अपवाद आहे. नात्यातला बांध स्त्री तत्वाशी जुळून असतो, जुळवून घेण्याची तिची तऱ्हा तिच्या ठायी नव्या आशेच्या किनारीवर सुंदर सेतूचे नूतनीकरण करीत असते,भावनेचा बंध हृदयातून हृदयाशी हृदयभर पसरत ठेवण्याची तिची किमया मोठी ठरते,, कारण जगण्याचे मूलमंत्र आशा निराशेच्या कोंदणात अडकवून ठेवण्यापेक्षाही आदराच्या खुणा तिच्यातही तिला गवसाव्या अशी मनाच्या गाभारी जाणिवांची खोल आभा झिरपत असते. ही साहजिकता. ह्या साऱ्याच भावनेतून तिच्यात संस्कार पेरणारी माती सरितेच्या काठातून तिच्यात खळाळत असते.ती जगत असताना अनेकदा दुसऱ्याच्या विचारांचा आणि भावनेचा विचार करूनच प्रवाहाचे काठ भरीत असताना जाणवते.तिच्यातलं लक्ष्मीतत्व फक्त गळ्यातल्या हाराशीच मंडपात हितगुज करीत असते ते अखेरचेच,, कुठेकुठे ती सन्मानपात्र असतेही पण कुठेकुठे तिच्या विचारांचा, मनाचा विचार होत नाही, ती पत्नी म्हणून कर्तव्याची कास कधीच सोडत नसताना तिला प्रत्येक वेळी गृहीत धरल्या जात,,कुठेतरी तिच्या सन्मानाची दोर सैल सोडली जाऊन तिच्या भावनांचा अनादर केला जातो वा दुर्लक्ष,,पण सहनशक्तीचा पराकोट करून आयुष्याला प्रश्न उपस्थित असूनही स्वतःच्या दिमतीने स्वतःच उत्तरांची बांधणी करीत असते, कारण तिच्यातला सरितेचा प्रवाह आणि त्यातून तिच्यात झिरपलेली समज.जग तसं फार पुढे पुढे जात आहे,, आधीचा इतिहास वाचला की किंवा अनुभवाच्या काठातून एकला की स्त्री वागणूक फारच विचित्र,अपमानास्पद आणि पुरुषप्रधान काळाशी संलग्न होती, काळ पुढे गेला तशी ती सुद्धा पुढे गेली आणि तिच्यातली तत्वरेषा तिच्या सन्मानाची दखल घेऊ लागली पण तरीही आजही कुठेतरी तिच्यातल्या जाणिवेची उणीव अनुभूतीने तर कधी संवादीत भावनेने गवसत जाते.पत्नी म्हणून तिच्या मतांचा तिच्या विचारांचा अनादर केलेला दिसतो. आई बहीण ह्या पारड्यापासून पत्नीचे वजन का हलके असावे?जेव्हा नात्याच्या विचारबांधावर ती सर्वतोपरी खरी उतरत असेल तरीही तिला जाणिवांची दुय्यम रेषा तिच्यातून तिला कोलमडून टाकीत असेल तर,, तिच्या बांधाचा संयम हा कुठेतरी तुटतोच.. कुठेकुठे पत्नी प्राधान्य भावना इतकी फोफावली असते की इतर नात्यासोबत तिचाही आलेख उंच असतो, ती सुखाच्या त्या किनारीवर आनंद यात्रा अनुभवत असते..प्रत्येक वेळी आयुष्याला आनंदाचा भार द्यावाच अस नाही पण समाधानाचे स्थैर्य तिच्या आयुष्यात माळून राहावं हे मनोमन वाटतं. जग पुढारत चाललंय, विचारांच्या कक्षा रुंदावत चाललाय.स्त्री फक्त उपभोगायची जिवंत वस्तू नाही तर तिलाही भावनेचा परिसस्पर्श आहे तो प्रत्येकाने जाणीवपूर्वक जाणावा..!!घरच्या उंबरठयाआत ती कर्तव्ये जाणीवपूर्वक रित्या पार पाडत असतेच शिवाय बाहेरही तीच विश्व खूप मोठे आणि प्रगतिशील आहे,वाढत्या जबाबदारीतून स्वतःला आर्थिक पाठबळ मिळावं हया हेतूने तिची भावना सर्वतोपरी खरी ठरतेच,स्त्री सन्मानाचा हा एक दिवसीय सन्मान लिहिला जाऊ नये, तर रोजचाच दिवस तिच्यातूनच सुरू होतो म्हणून तिच्याशी बोलण्याची सन्मानार्थ लकब ही शिकता यायला हवी.कुठे कुठे फार आदरयुक्त भावनेचा सुरेख संचय जाणवतो. आई, बहीण, पत्नी, मुलगी ह्यात समान वैचारिक आदरभाव वाखाळण्याजोगा असतो. ही स्त्री भावनेची जाणीव आणि उणिवांची वैचारिक बांधणी. त्याही पुढे जगाच्या पाठीवर विक्षिप्त अनुभवांची फार किळसवाणी जळमटे पसरलेली आहेत, कोवळ्या श्वासावर नको तो स्पर्श होऊन जीवन उध्वस्त करण्याचा अधिकार ह्या नराधमांना कोणी दिला असेल ?शिवाय आपल्या कर्तव्य भावनेशी निष्ठा असताना तिच्यावर रात्री अपरात्री एक नव्हे तर अनेक नराधमाच्या नीच कृत्यातून तिचे जीवन संपवून टाकल्याच्या बातम्या अगदी सुन्न करीत जातात तिचे शील जपायच्या आतच वासनाधीन झालेल्या नजरेस ती बळी पडत जाते आणि तिच्या श्वासाची अंतिम लक्तरे भावनाशून्य होऊन जातात,,जगाच्या किळसवाण्या काठावर स्त्रीतत्व जपणं इतकं का कठीण होऊन बसलंय काही कळत नाही.. सन्मानाच्या नजरा आणि दृष्टिकोनच बदलत चाललाय जगाचा, कधी थांबणार हे सगळं?कायद्याच्या वाटेवर मोकाट सुटतात ही जनावर,आणि स्त्रीच्या अनंत वेदनेला ग्रहण लागत जातं. आणि सर्वसामान्यपणे स्वत्व जाणिवांची नवनिर्माण क्षमतेचा जिवंत मेरू आहे,, लहानापासून तर मोठ्यांपर्यंत सन्मानाचे बांध सहजीकरित्या बांधले जातात, तसेच तिच्याही बाबतीत असायलाच हवे. "ती जिवातून निर्मितीचा बांधगाठतेतेव्हानाळेच्या भाव गाथेत एक जन्म सोहळा असतो."अनंत गर्भ भावनेतली खोळ तिला आनंदाचे आव्हानात्मक भार देऊ करते, मग तिचे आभार मानायलाच हवे होय ना!! तिच्या अनंत भाव कथेतला आशय फार निर्मळ आणि संथ सरितेच्या पात्रा सम नितळ असतो, तो तसाच असू द्या . तो आटल्यावर वा बाटल्यावर भावनाशून्य तर होतेच शिवाय अनंत खडक लागलेच तर आयुष्याला ग्रहण लागतेच पण ती स्त्री मनाच्या खोल एकांत तटातून तुटुन गेलेली असते जी परत जुळणे केवळ अशक्यच,,,तिच्या कोवळ्या विश्व कथेतल्या प्रवाहापासून वैचारिक भावना रेषेपर्यंत शिवाय सासर माहेरच्या वेशीसह तिला सन्मानाने जगवा.. ती कळीतला अंश आहे, फुलणाऱ्या भावकथेचा ती आयुष्याला गंध सांधते लाखमोलाचा...

# स्त्री-पुरुष समानता वास्तवात किती?

प्रासंगिक
पंकज रामेश्वर ताठे
खामगाव मो. 7798877247




८ मार्च हा दिवस जगभरात महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव केला जातो, त्यांच्या संघर्षाची आठवण केली जाते आणि समाजाच्या प्रगतीत त्यांच्या योगदानाची दखल घेतली जाते. सोशल मीडियावरून महिलांना शुभेच्छांचा वर्षाव होतो, वृत्तपत्रांमध्ये स्तुतीपर लेख प्रसिद्ध होतात, विविध कार्यक्रमांमध्ये महिलांचा सत्कार केला जातो. एकूणच त्या दिवशी महिलांविषयी आदर व्यक्त करणारे संदेश सर्वत्र दिसतात. मात्र या सर्व गजराच्या वातावरणात एक प्रश्न मनात निर्माण होतोखरंच महिलांना समाजात सर्व स्तरांवर समान अधिकार मिळाले आहेत का? स्त्री-पुरुष समानतेचा जो पाढा आपण वर्षानुवर्षे वाचत आलो आहोत, तो प्रत्यक्षात कितपत खरा आहे? महिला दिन साजरा करताना या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणे अत्यंत गरजेचे आहे. आजच्या आधुनिक युगात स्त्री-पुरुष समानतेची चर्चा मोठ्या प्रमाणावर होते. संविधानाने महिलांना समान अधिकार दिले आहेत. शिक्षण, नोकरी, राजकारण, उद्योग, प्रशासन अशा सर्व क्षेत्रात महिलांना संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अनेक महिला या संधींचा उपयोग करून आपल्या कर्तृत्वाने समाजात वेगळे स्थान निर्माण करत आहेत. परंतु या प्रगतीच्या चित्रामागे एक वेगळी वास्तवता देखील दडलेली आहे. महिलांना मिळालेल्या अधिकारांची अंमलबजावणी प्रत्यक्ष जीवनात कितपत होते, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. अनेकदा महिला दिनाच्या दिवशी जे आदराचे शब्द ऐकू येतात, ते पुढील काही दिवसांतच विसरले जातात. समाजाच्या दैनंदिन व्यवहारात मात्र महिलांना अनेक मर्यादा आणि अडथळ्यांना सामोरे जावे लागते. घराच्या उंबरठ्यावरच समानतेची परीक्षा स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न सर्वप्रथम आपल्या घरापासूनच सुरू होतो. घर ही समाजाची पहिली शाळा मानली जाते. जर घरातच समानतेचे मूल्य रुजले नाही, तर समाजात त्याची अपेक्षा करणे कठीण ठरते. अनेक घरांमध्ये आजही गृहिणीला पूर्ण स्वातंत्र्य मिळालेले नसते. ती घरातील सर्व कामे करत असते, कुटुंबाची काळजी घेत असते, मुलांचे संगोपन करते; परंतु तिच्या मताला किंवा इच्छेला तितकेसे महत्त्व दिले जात नाही. घरातील निर्णय बहुतेक वेळा पुरुषच घेतात. गृहिणीचे काम 'कर्तव्य' म्हणून स्वीकारले जाते, परंतु त्याची योग्य दखल घेतली जात नाही. नोकरी करणाऱ्या महिलांची परिस्थितीही वेगळी नाही. त्या बाहेर नोकरी करून आर्थिक हातभार लावतात, तरीही घरातील जबाबदाऱ्या त्यांच्या खांद्यावरच असतात. नोकरी, घरकाम, मुलांचे संगोपन, कुटुंबाची काळजीया सर्व जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांच्यावर मोठा ताण येतो. पुरुषांना मात्र अनेकदा या जबाबदाऱ्यांपासून काही प्रमाणात सूट मिळालेली दिसते. यामुळेच अनेक महिलांना स्वतःसाठी वेळ मिळत नाही. त्यांच्या स्वप्नांना, आवडी-निवडींना दुय्यम स्थान दिले जाते. समानतेचा मुद्दा याच ठिकाणी कमकुवत होतो. मुलगा-मुलगी भेदभावाची अद्याप छाया समाजात मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव कमी झाला आहे, असे आपण म्हणतो; पण तो पूर्णपणे संपलेला नाही. आजही अनेक कुटुंबांमध्ये मुलाला अधिक स्वातंत्र्य दिले जाते, तर मुलीवर अधिक बंधने घातली जातात. मुलाला रात्री उशिरा बाहेर राहण्याची मुभा असते, तर मुलीला वेळेची मर्यादा असते. मुलाला निर्णय घेण्याची मोकळीक असते, तर मुलीला अनेक गोष्टींसाठी परवानगी घ्यावी लागते. या छोट्या-छोट्या गोष्टी मुलीच्या मनात तिच्या दुय्यम स्थानाची जाणीव निर्माण करतात. समाजाने या मानसिकतेत बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी यांना समान संधी मिळाल्या तरच खऱ्या अर्थाने समानतेची सुरुवात होईल. आज महिलांचे शिक्षण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. अनेक मुली उच्च शिक्षण घेत आहेत, विविध क्षेत्रात करिअर करत आहेत. प्रशासन, विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा, कला, उद्योग, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांमध्ये महिलांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे. तरीही कार्यक्षेत्रात महिलांना काही वेगळ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. अनेक ठिकाणी महिलांकडे कमी क्षमतेने पाहिले जाते. एखाद्या महत्त्वाच्या जबाबदारीच्या पदासाठी पुरुष आणि महिला यांच्यात निवड करायची झाली, तर अनेकदा पुरुषांची निवड केली जाते. कारण महिलांपेक्षा पुरुष अधिक सक्षम असतात, अशी चुकीची धारणा अजूनही काही ठिकाणी अस्तित्वात आहे. काही वेळा महिलांना 'कमकुवत' किंवा 'भावनिक' असल्याचे लेबल लावले जाते. यामुळे त्यांना महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेतून दूर ठेवले जाते. ही मानसिकता बदलणे अत्यंत गरजेचे आहे. राजकारणातील महिलांचे स्थान राजकारणात महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगर परिषद या संस्थांमध्ये अनेक महिला पदाधिकारी म्हणून निवडून येतात. ही बाब निश्चितच सकारात्मक आहे. परंतु प्रत्यक्षात अनेक ठिकाणी महिलांच्या नावावर पद असले, तरी निर्णय मात्र पुरुषच घेतात. 'सरपंच पती', 'सभापती पती' किंवा 'नगराध्यक्ष पती' अशी संज्ञा ग्रामीण भागात प्रचलित झाली आहे. म्हणजेच महिला केवळ पदावर असते, परंतु सत्ता पुरुषांच्या हातात असते. यामुळे महिलांना स्वतंत्रपणे काम करण्याची संधी मिळत नाही. त्यांच्या क्षमतेचा योग्य उपयोग होत नाही. महिला नेतृत्व विकसित होण्यासाठी या परिस्थितीत बदल होणे आवश्यक आहे. महिलांच्या प्रगतीचे चित्र पाहताना ग्रामीण आणि शहरी भागातील परिस्थितीत मोठी तफावत दिसून येते. शहरांमध्ये महिलांना शिक्षण, रोजगार, प्रशिक्षण, माहिती आणि संसाधने तुलनेने अधिक उपलब्ध असतात. त्यामुळे त्यांना स्वतःचे करिअर घडवण्याची संधी मिळते. परंतु ग्रामीण भागातील अनेक महिलांना या संधी सहज उपलब्ध होत नाहीत. आर्थिक मर्यादा, शिक्षणाचा अभाव, सामाजिक बंधने यामुळे त्यांच्या प्रगतीचा मार्ग कठीण होतो. तरीही ग्रामीण भागातील महिलांमध्ये काहीतरी करण्याची प्रचंड इच्छा आणि जिद्द असते. योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळाले, तर त्या मोठी प्रगती करू शकतात. महिलांच्या सक्षमीकरणासाठी केवळ अधिकार देणे पुरेसे नाही; त्यांना त्या अधिकारांचा उपयोग करण्यासाठी सक्षम बनवणेही आवश्यक आहे. महिलांना अधिकार मिळावेत, ही अपेक्षा योग्यच आहे; परंतु त्या अधिकारांचा योग्य वापर करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. महिलांनी समाजात प्रगती करताना आपल्या संस्कृतीचा आणि मूल्यांचा सन्मान राखणे आवश्यक आहे. परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल साधत पुढे जाणे हेच खरे सक्षमीकरण आहे.

# महिला शिक्षक, कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल कोण घेणार?



मागोवा
जयदीप सोनखासकर
मो. 9890508017

दरवर्षी आपण मोठ्या थाटामाटात दिनांक ८ मार्च म्हणजेच आज रोजी महिला दिवस साजरा करीत असतो. या दिवशी विविध क्षेत्रातील कार्य कुशल महिलांचा सन्मान करण्याचे अनेक शासकीय सोहळे आयोजित केले जातात. माझ्या मते महिलांचा सन्मान हा एक दिवस नसून वर्षभर व्हावा याकरता उपाय योजना करणे आवश्यक आहे. त्यासाठी आजपर्यंत झालेल्या किमान शिक्षण क्षेत्रातील महिला शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापिका, मुख्याध्यापिका,प्राचार्य, संशोधक इत्यादी क्षेत्रातील महिलांचा शासनाने सुमोटो सन्मान करून गौरव केला पाहिजे. खास करून भारतीय शिक्षण व्यवस्थेतील आजपर्यंतच्या महिलांच्या उन्नतीसाठी योगदान देणाऱ्या महिलांचा विशेष बाब म्हणून उल्लेख करून इतिहास लिहिला गेला पाहिजे. मात्र आजच्या स्थितीत हा सन्मान तर सोडाच अनेक महिला शिक्षक, कर्मचारी,अधिकारी विविध प्रशासकीय अडचणींमुळे त्रस्त झालेले दिसून येतात. अशा मानसिकतेत काम करणाऱ्या महिला कर्मचारी,शिक्षक, अधिकारी यांच्या कार्याची दखल कोण घेणार? हाच प्रश्न शिक्षण विश्व विचारत आहे!

शिक्षण ही सर्वांगीण मानवी विकासाची प्राथमिक पायरी आहे. मानव समूहाचा विकास होण्यासाठी आजपर्यंत भारतात अनेक शिक्षणतज्ञ महिलांनी कार्य केले आहे. महिला शिक्षणतज्ञ यांनी समाज निर्मितीची ही अखंड परंपरा कायम ठेवली आहे. प्राचीन काळापासून स्त्रियांच्या शिक्षणाची पण मर्यादित स्वरूपातील चळवळ होती. मात्र इंग्रजांनी भारतात आल्यावर १८४९ च्या काळात स्त्री शिक्षणासाठी पावले उचलायला सुरुवात केली. मुंबई प्रांत, पश्चिम बंगाल या ठिकाणीही सकारात्मक सुरुवात झाली. पुढे महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाई फुले या आपल्या पत्नीला शिक्षित बनवून स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ १८४८ मध्ये महाराष्ट्रात रोवली. मुलींसाठी पहिली शाळा काढून त्यांनीआद्य शिक्षिका म्हणून आजच्या स्त्रीचा सन्मान वाढवला. त्यांना फातिमा शेख या त्यांच्या सहकारी शिक्षिकेने मोलाची मदत केली. सावित्रीबाईचा वसा अनेक समाज धुरीन महिला शिक्षकांनी पुढे चालविला. पुणे, मुंबई सारख्या शहरात अनेक महिला शिक्षिका स्वतः शिक्षित होऊन समाजाच्या भल्यासाठी पुढे निघाल्या. स्त्रियांच्या जीवनातील समाज परिवर्तन करण्यासाठी महिला शिक्षकांची भूमिका कौतुकास्पद राहिली आहे. अनेक महिला शिक्षकांनी आपला व्यवसाय करीत असताना आपल्या अंगी असणाऱ्या कौशल्याने नवसंशोधन, नवोपक्रम, विविध साहित्य निर्मिती करून शालेय अभ्यासक्रमाला एका उच्च दर्जाचा आयाम दिला आहे. अनेक महिला शिक्षक यांचे साहित्य अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट झाले आहे. अनेक महिला शिक्षक,प्राध्यापक राज्य, राष्ट्रीय पातळीवर स्वतःचे नाव करीत आहेत. अनेक शाळांचा कायापालट महिला शिक्षकांच्या योगदानातून झाला आहे.

असे असले तरी शासन आज महिला शिक्षकांच्या अनेक समस्यांकडे दुर्लक्ष करीत आहे. हक्काच्या प्रसूतीकालीन रजा, बालसंगोपन रजा, वैद्यकीय कारणास्तव मिळणाऱ्या रजा घेण्यासाठी महिला शिक्षकांना अनेकदा कार्यालयामध्ये खेटे घ्यावे लागत असतात. अनेक शाळेत, महाविद्यालयांमध्ये, शासकीय शिक्षण विभागाच्या कार्यालयांमध्ये महिलांच्या स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था आहे. त्यांच्या हक्काची पदोन्नती,वेतनवाढ, प्रशिक्षणे यासाठी त्यांना संघर्ष करावा लागतो. अनेक महिला शिक्षकांना पती-पत्नी एकत्रिकरन योजनेचा लाभ न मिळता केवळ प्रशासकीय कारणास्तव दुरगामी अंतरावर, कुटुंबाला वाऱ्यावर सोडून नोकरीसाठी संघर्ष करावा लागत आहे. शासनाने या बाबीची स्वतःहून दखल घेऊन सोयीच्या ठिकाणी महिला शिक्षकांची बदली केल्यास त्या अधिक मातृवत्सल भूमिकेतून आपली शैक्षणिक कार्याची पावती देऊ शकतात. मात्र त्यासाठी सुद्धा शासन तयार नसते. अनेक महिला शिक्षिका क्लिष्ट अश्या शासकीय पुरस्कार योजना असल्यामुळे स्वतःहून कधीही त्यामध्ये सहभागी होत नाहीत. अशा महिला शिक्षकांच्या कार्याचे मूल्यमापन शाळा,केंद्र स्तरावर होऊन त्यांना शासकीय पुरस्कार मिळायला पाहिजे,अशी अपेक्षा आहे. महिला शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षणे सोयीच्या काळात आणि योग्य वेळापत्रकाद्वारे घेण्यात आल्यास अधिक सोयीचे होऊ शकते.

या व्यतिरिक्त ही महिला शिक्षकांच्या अनेक समस्या असू शकतात. त्याचा योग्य तो आढावा घेऊन उपाययोजना शासनाने कराव्यात ही अपेक्षा ठेवायला हरकत नाही. मात्र आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिला शिक्षक कर्मचाऱ्यांच्या कार्याची कुणीतरी दखल घ्यावी! यासाठीच हा प्रयत्न... तूर्तास एवढेच.... सर्व महिला शिक्षक कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक कार्याला सलाम करून थांबतो!

# सक्षम नारी आज आणि काल



चर्चा
अर्चना ठाकरे मोरे
मूर्तिजापूर

१९०८ साली न्यूयॉर्क सिटी येथे हजारो महिलांनी चांगले वेतन, कामाचे कमी तास आणि मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून आंदोलन केले होते. तसेच रशियामध्ये १९१७ साली मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून स्त्रियांचे आंदोलन झाले, तो दिवस आठ मार्च होता. १९७५ ला युनायटेड नेशन ने ८ मार्चला अधिकृतपणे "जागतिक महिला दिन" म्हणून मान्यता दिली. हा दिवस महिलांच्या कर्तुत्वाचा सन्मान करण्यासाठी तसेच स्त्री सशक्तिकरणाचा संदेश देण्यासाठी आपण साजरा करतो. म्हणूनच आज मनात आले की सशक्त नारी बद्दल काही लिहावे. नारी मग ती आजची असो की भूतकाळातील, तिच्यावर कितीही चिंतन-मंथन झाले तरी ते थोडेच आहे. आज असे एकही क्षेत्र नाही की जे स्त्रीने व्यापले नाही. आपण पूर्वी म्हणत होतो, " जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी" ही म्हण आता अर्धसत्य झाली आहे.कारण जगाचा उद्धार तर ती करतच आहे, पण तिचे दोन हात जे पाळण्याची दोरी धरून होते,त्या हातात आता पेन आला आहे, खडू आला, रेफरीची शिट्टी आली, शिक्षणाची डिग्री आली, पदाची पॉवर आली, स्कुटी पासून तर विमानापर्यंत सर्व स्टेरिंग आलेत. घरातला झाडू,लाटणं आणि बाळाच्या पाळण्याची दोरी, हे तर तिच्या हातात आहेच. पण ती घर सांभाळून बाहेर करिअर सुद्धा सांभाळत आहे. घरातील जबाबदारी आता फक्त सून, पत्नी, आई,बहीण ही नाती सांभाळण्यापूर्ती मर्यादित राहिली नाही तर तीआज घरातील आजारी लोकांची डॉक्टर आहे,आवडीचा स्वयंपाक करून सर्वांना तृप्त करणारी कुक आहे, मुलांना समजावणारी कौन्सिलर आहे, अभ्यास घेणारी टीचर आहे, आणि वेळ पडली तर या सर्वांना धारेवर धरणारी कडक शिपाई सुद्धा आहे. ती शांत असते तोपर्यंत सर्व ठीक आहे.पण तिच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला तर मात्र ती आक्रमक बनते .मग ती आपल्या निर्णयापासून परावृत्त होत नाही, आणि स्वतःवर झालेला अन्याय सहन करत नाही. नारी ही आज शिक्षणाने अधिक सक्षम झाली आहे. माझी आई मला लहानपणी सांगायची की इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या तेव्हा एक वाक्य नेहमी कानावर पडायचं "आता काय, बायांचे राज्य आलं बुवा!" पण एवढ्या पुरुषांना मागे टाकत इंदिराजी पंतप्रधान बनल्या,म्हणजे त्या सक्षम होत्या म्हणूनच ना? स्त्रियांच्या बाबतीत अतिशय मागासल्या विचाराच्या देशातील बेनझीर भुत्तो सारखी महिला पंतप्रधान झाली ती कणखर आणि सक्षम होती म्हणूनच ना? हे उदाहरण तर अगदी अलीकडील काळातील आहेत. पण सीते पासून तर द्रौपदी पर्यंत ज्या इतिहासात स्त्रिया होऊन गेल्या, त्या स्वाभिमानी होत्या.म्हणूनच रामाने घरी चल म्हटले तरी दुखावलेली, स्वाभिमानी सीता ही घरी न जाता धरतीत सामावली. द्रौपदीने आपला अपमान सहन केला नाही तर तो व्यक्त केला. लोक म्हणतात बाई मुळे रामायण महाभारत घडले. मी म्हणेन तिच्या अस्मितेला धक्का लागला म्हणून रामायण महाभारत घडले. पूर्वीपासूनच स्त्री सक्षम असल्याचे पुरावे पहायला मिळतात. कारण सीतेने आपल्या चारित्र्याचे पावित्र्य राखले म्हणूनच रामायण घडले, आणि द्रौपदीने आपला झालेला अपमान मुकाट्याने गिळला असता किंवा प्रतिशोधाची ज्वाला जिवंत ठेवली नसती तर महाभारतही कदाचित झाले नसते.अगदी मध्ययुगीन इतिहास पाहिला तर शूरवीर मराठे सरदार मुघलांची चाकरी करत होते. वाघासारखे माणसं पण स्वतःची शक्ती दुसऱ्यासाठी वापरत होते. मात्र स्वराज्याचे स्वप्न एका स्त्रीच्याच डोळ्यांनी पाहिले, आणि ती म्हणजे आपली महाराष्ट्राची माय जिजाबाई! तिने आपल्या मुलाच्या मनात स्वराज्याची ज्योत नव्हे तर मशाल जागवली असे म्हणावे लागेल. चारी बाजूंनी प्रखर विरोध होत असताना सावित्रीबाईंनी आपला लढा अतिशय सक्षमपणे दिला आणि स्त्रियांच्या पदरात शिक्षणासोबतच सन्मान,आत्मनिर्भरता,स्वातंत्र्य,स्वाभिमान हेसगळेच टाकले हे झाले आपल्या सामान्य माणसाचे! पण देवतांमध्ये सुद्धा आपण म्हणतो, "गणपती आपला साधा आहे बाई! शंकरजी ही आपले भोळे, पण देवी- महालक्ष्मी यांची पूजा कठीणच! खूप नियमानं करावं लागतं बाई सगळं!" मला तर यातूनही नारी शक्ती दिसते. दहा हात मग ते देवीचे असो की स्त्रीचे! तिच्यावर किती जबाबदाऱ्या आहेत याचे ते प्रतीक आहे आणि त्यात ती कुठेही कमी पडत नाही. ती वैज्ञानिक आहे, डॉक्टर आहे,इंजिनियर आहे,समाजसेविका सुद्धा आहे,खेळाडू आहे,मंत्री आहे,ती बॉक्सर आहे, वैमानिक आहे, ती सर्वच आहे. ती स्वयंपाक करते,ती शिकवते, ती खेळते,ती समुद्रात पोहोचते, ती गाणं म्हणते, ती कुस्ती खेळते, ती धावते,ती भाषण देते, ती देश चालवते,ती सर्वच करते. पण हे सगळं असलं तरी आज आपल्या स्त्रियांवर एक आरोप लावल्या जातो तो म्हणजे स्त्रीच स्त्रीची वैरी आहे. आणि हा आरोप काही अंशी खरा आहे असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते. म्हणजे घरात सुनेचा छळ करणारी सासू, वहिनीचा हेवा करणारी ननंद, एकमेकिंची चुगली करणाऱ्या जावा, ह्या बायकाच आहेत.आपण शिकलो,जागृत झालो. त्यासाठी माय सावित्रीने आपल्यासाठी नाना कष्ट सहन केलेत. त्याची थोडी जाण ठेवूया.आज आपण एकमेकींना आधार देऊया, एकमेकींची हिम्मत वाढवूया, बस मध्ये जागा देण्यापासून तर ऑफिसमध्ये प्रमोशन मिळण्या पर्यंत एकमेकींना सहकार्य करूया,मैत्री भाव जागृत करूया!आपण ही सुरुवात घरापासून करूया. घरातील कामवालीला सन्मान पूर्वक वागवूया, तिचा भक्कम आधार बनूया. सासूबाईमध्ये आई पाहूया, ननंदेशी मैत्रीचा हात पुढे करूया,जावेशी स्पर्धा न करता जुळवून घेऊया, मग घराचेच काय समाजाचे नंदनवन झाल्याशिवाय राहणार नाही.

आरोळी
मो. 73857358226

# वणी रंभापूर येथील सामाजिक क्रांतीची यशोगाथा




अकोल्याच्या मातीतून उमटलेली एक आरोळी आज महाराष्ट्रभर परिवर्तनाचा नवा अध्याय लिहीत आहे. गेल्या तीन वर्षांपासून समाधान वानखडे आणि सीमा वानखडे यांच्या नेतृत्वात ही संस्था केवळ करत नाही, तर ग्रामीण जीवनाचा कायापालट करत आहे. आरोळी सामाजिक संस्थेचा सहानुभूती सह समानुभूती पर्यंतचा हा प्रवास.

**१.प्रयोगधाम:** कौशल्यातून स्वावलंबनाकडे टाकलेले पाऊल वणी रंभापूर येथे संस्थेचे २,००० स्क्वेअर फूट जागेत स्वतःचे ग्रामीण उपजिविका प्रशिक्षण केंद्र आहे, ज्याला आम्ही प्रेमाने प्रयोगधाम म्हणतो. हे केंद्र म्हणजे ग्रामीण महिला आणि मुलींच्या स्वप्नांना मिळलेली उभारी आहे. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या सोबतीने आम्ही आतापर्यंत २० आणि संस्थेच्या सामाजिक दायितवाने ६२ असे एकूण ८२ निराधार महिलांना मोफत कौशल्य प्रशिक्षण दिले आहे. इथे केवळ टाके किंवा शिलाई शिकवली जात नाही, तर सन्मानाने जगण्याचा आत्मविश्वास दिला जातो.

**२.आनंदीग्राम:** जिथे सुरकुत्या पडलेल्या चेहऱ्यांवर हास्य फुलते एका निराधार आजीपासून सुरू झालेला आमचा प्रवास आज ३३ आजींपर्यंत पोहोचला आहे. ज्या आजींना स्वतःचे कोणी नाही किंवा ज्या वृद्धाश्रमात जाऊ शकत नाहीत, अशांसाठी आरोळी आशेचा किरण ठरली आहे. दरमहा किराणा किट, कडाक्याच्या थंडीत मायेची ऊब देणारे ब्लँकेट, मोफत आरोग्य तपासणी आणि चष्मे वाटप यांसारख्या सेवांतून आम्ही त्यांच्या आयुष्यात आनंदीग्राम साकारत आहोत.

**३. रविवार शाळा:** दप्तरविना संस्कारांची पेरणी अकोला, मूर्तिजापूर आणि पातूर तालुक्यातील ७ गावांमध्ये आज १८७ मुले रविवार शाळा उपक्रमात आनंदाने सहभागी होत आहेत. ही शाळा केवळ पुस्तकी ज्ञानाची नाही, तर ती आहे व्यवहाराची, संस्कारांची आणि माणुसकीची. मुलांमध्ये ज्येष्ठांप्रती आदरभाव निर्माण करणे आणि त्यांना निसर्गाशी जोडणे हा या उपक्रमाचा मुख्य गाभा आहे. जालना आणि अमरावतीच्या सहकाऱ्यांनी दिलेल्या शालेय साहित्यामुळे या मुलांच्या डोळ्यांत आज शिक्षणाची नवी चकाकी दिसत आहे.

**४. जलसंवर्धन:** माती आणि पाण्याचे ऋण फेडताना कृषी सहाय्यक अधिकारी कैलास बोधडे यांच्या मार्गदर्शनाखाली डाळंबी, कोळंबी आणि मिर्झापूर परिसरात आम्ही लोकसहभागातून वनराई बंधारे बांधले. श्रमदानातून उभे राहिलेले हे बंधारे केवळ पाणी अडवत नाहीत, तर ते भूगर्भाची तहान भागवत आहेत. आज याच पाण्यामुळे हजारो पशु-पक्ष्यांना जंगलात पाण्यासाठी वणवण फिरावे लागत नाही.

**५. आरोग्य आणि प्रबोधन:** पथनाट्यातून सामाजिक क्रांती ग्रामीण भागात ॲनिमिया, टी.बी. आणि कर्करोगाबाबत मोठ्या प्रमाणात गैरसमज आहेत. आरोळीची पथनाट्य टीम अहिल्यानगर, सांगली, कोल्हापूर आणि साताऱ्यापर्यंत पोहोचली आहे. शेकडो लोकांसमोर पथनाट्य सादर करून आम्ही आरोग्याबाबत जनजागृती करत आहोत.

**६. मार्गदर्शक आणि पुरस्कार:**
शून्यातून विश्व निर्माण करताना आम्हाला प्रयास (अमरावती), दिलासा (यवतमाळ), सहाय्यक ट्रस्ट (मुंबई) आणि कोरो इंडिया (मुंबई) यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आरोळी सामाजिक संस्थेला यांना मिळालेली कोरो इंडियाची ग्रासरूट नेतृत्व विकास फेलोशिप (२०२५-२६) ही आमच्या कामाची मोठी पावती आहे. तसेच अकोला भूषण (२०२४) आणि पसायदान (२०२३) यांसारख्या पुरस्कारांनी आमची जबाबदारी अधिक वाढवली आहे.

निष्कर्ष: श्रीमती कमलजीत कौर, केल्विन सुबी, दीपक पवार आणि इतर अनेक दानशूर व्यक्तींच्या सहकार्यामुळे आरोळी आज इथपर्यंत पोहोचली आहे. "माणूस जोडणे आणि निसर्ग वाचवणे" हेच आमचे अंतिम ध्येय आहे. या परिवर्तनाच्या प्रवासात तुम्हीही आमच्यासोबत सामील व्हा!

# महिला आणि मधुमेह: कुटुंबाच्या 'कणा'ला जडलेली वाळवी?





आरोग्य विशेष
डॉ. शुभांगी गावडे (भारती)
अमरावती, मो. 9423694203

घराची आणि मुलाबाळांची काळजी घेण्यामध्ये स्त्री अहोरात्र कष्ट उपसते. पण, या धावपळीत हा 'कणा'स्वतःच्या प्रकृतीकडे मात्र दुर्लक्ष करतो. आजच्या धावपळीच्या युगात, बदलती जीवनशैली आणि मानसिक तणावामुळे महिलांमध्ये 'मधुमेह'हा आजार एखाद्या छुप्या शत्रूसारखा शिरकाव करत आहे. जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने, महिलांनी या 'सायलेंट किलर'बद्दल जागृत होण्याची वेळ आली आहे.

महिलांमध्येच मधुमेहाचा धोका का वाढतोय?

पुरुषांच्या तुलनेत महिलांच्या शरीरात होणारे बदल मधुमेहासाठी अधिक कारणीभूत ठरतात. याची मुख्य ४ कारणे खालीलप्रमाणे आहेत:

१. हार्मोन्सल बदलांचा खेळ: मासिक पाळी, गर्भधारणा, प्रसूती आणि त्यानंतरची रजोनिवृत्ती या प्रत्येक टप्प्यावर स्त्रीच्या शरीरात मोठे हार्मोन्सल बदल होतात. हे बदल थेट रक्तातील साखरेच्या प्रमाणावर परिणाम करतात.

२. गर्भधारणेतील मधुमेह: अनेकदा गरोदरपणात साखरेचे प्रमाण वाढते. प्रसूतीनंतर ते सामान्य होत असले, तरी अशा महिलांना भविष्यात 'टाइप-२' मधुमेहहोण्याचा धोका ५०टक्क्यांनी जास्त असतो.

३. पी.सी.ओ.डी. आणि वजन: आजकाल तरुण मुलींमध्ये पी.सी.ओ.डी.ची समस्या वाढली आहे. यामुळेशरीरात 'इन्शुलिन रेसिस्टन्स'तयार होतो, ज्याचे रूपांतर पुढे मधुमेहात होते. त्यातच बैठी जीवनशैली आगीत तेल ओतण्याचे काम करते.

४. स्वतःच्या आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष: 'सगळ्यांचं जेवण झालं की मग मी बघते' किंवा 'थोडं डोकं दुखतंय, होईल ठीक'ही वृत्ती महिलांच्या अंगवळणी पडते. घरातील सर्वांना डॉक्टरांकडे नेणारी स्त्री, स्वतःची साधी तपासणी मात्र वर्षानुवर्षे पुढे ढकलत राहते.

दुर्लक्ष नको! हे धोके ओळखा

मधुमेह हा केवळ साखरेचा आजार नाही, तर तो शरीरातील इतर अवयवांनाही निकामी करू शकतो.

वारंवार होणारे संसर्ग: मधुमेहामुळे रोगप्रतिकारशक्ती कमी होते, परिणामी युरीनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन किंवा त्वचेचे आजार वारंवार उद्भवतात.

हृदयविकाराचा धोका: मधुमेही महिलांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता सामान्य महिलांपेक्षा ४ पटीने जास्त असते.

सततचा थकवा: रक्तातील साखर अनियंत्रित असल्यास कितीही विश्रांती घेतली तरी जाणवणारा 'गळून गेल्यासारखा थकवा'हा मधुमेहाचा मोठा संकेत असू शकतो.

महिला दिनाचा संकल्प : 'आधी माझे आरोग्य'

हा लेख केवळ वाचण्यासाठी नाही, तर कृतीत आणण्यासाठी आहे. या महिला दिनी स्वतःला एक वचन द्या:

नियमित तपासणी: वयाची ३० ओलांडली असेल, तर दर सहा महिन्यांनी साखर तपासा.

आहारावर नियंत्रण: पांढरी साखर, मैदा आणि जंक फूड टाळून आहारात फायबर आणि प्रथिनांचा समावेश करा.

३० मिनिटे स्वतःसाठी: दररोज किमान ३० मिनिटे वेगाने चाला किंवा योगासने करा.

पुरेशी झोप: तणाव कमी करण्यासाठी छंद जोपासा आणि पुरेशी विश्रांती घ्या.

शेवटी इतकेच लक्षात ठेवा... घरातील आई, पत्नी किंवा मुलगी आजारी पडली की संपूर्ण घर विस्कळित होते. त्यामुळे, तुम्ही स्वतः निरोगी राहणे हा स्वार्थीपणा नसून, तुमच्या कुटुंबाप्रति असलेले तुमचे कर्तव्यच आहे. यंदाच्या महिला दिनानिमित्त, आजाराला लपवू नका, तर त्याला हरवण्याची जिद्द बाळगा!

# आधुनिक जीवनशैली, गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमधील ताळमेळ

चर्चा
ॲड.डॉ. नीता कचवे
अमरावती, मो. ८८०५२५८०१६

आजचे युग वेगाचे आहे. बदलत्या काळाबरोबर माणसाचे विचार, जगण्याची पद्धत आणि जीवनशैलीही सतत बदलत आहे. या परिवर्तनाच्या प्रवाहात स्त्रीचे जीवनही मोठ्या प्रमाणात बदलले आहे. एकेकाळी घराच्या चार भिंतीत सीमित असलेली स्त्री आज शिक्षण, नोकरी, व्यवसाय, कला, राजकारण अशा अनेक क्षेत्रांत आपली ओळख निर्माण करताना दिसते. मात्र या बदलत्या आधुनिक जीवनशैलीत गृहिणी आणि नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये ताळमेळ कसा साधला जातो हा एक महत्त्वाचा वैचारिक प्रश्न बनला आहे. गृहिणी असो वा नोकरी करणारी स्त्री दोघींचेही जीवन एकाच नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे आहे. दोघींच्या जबाबदाऱ्या वेगळ्या असल्या तरी त्यांचे महत्त्व तितकेच आहे.

गृहिणी घराचा पाया सांभाळते, तर नोकरी करणारी स्त्री घराबरोबर समाजातही आपली भूमिका निभावते. पण आधुनिक जीवनशैलीच्या झगमगाटात कधी कधी या दोन भूमिका एकमेकांच्या तुलनेत मोजल्या जातात, आणि तिथेच गैरसमजांची सुरुवात होते.

गृहिणीचे आयुष्य पाहिले तर ते बाहेरून साधे वाटते; पण प्रत्यक्षात ते अत्यंत कष्टाचे असते. पहाटेच्या कोवळ्या किरणांसोबत तिचा दिवस सुरू होतो. घरातील प्रत्येकाची गरज ओळखून ती घराला उबदारपणा देते. कुटुंबातील प्रत्येक सदस्याचे सुख-दुःख समजून घेत ती घराला एक भावनिक आधार देते. तिच्या हातून तयार होणाऱ्या अन्नात केवळ चव नसते, तर त्यात प्रेमाचा सुगंध असतो. म्हणूनच घर हे फक्त विटांचे बांधकाम नसते; ते गृहिणीच्या ममतेने घडलेले एक जिवंत जग असते. दुसरीकडे नोकरी करणाऱ्या स्त्रीचे आयुष्यही तितकेच आव्हानात्मक आहे. घराची जबाबदारी आणि कामाचे दडपण यामध्ये तिला सतत संतुलन राखावे लागते. सकाळच्या घाईपासून ते रात्रीच्या थकव्यापर्यंत तिच्या आयुष्यात वेळेशी एक सततची शर्यत चालू असते. कार्यालयातील काम, सामाजिक अपेक्षा आणि घरातील कर्तव्ये या सगळ्यांमध्ये तिला स्वतःसाठी वेळ काढणेही अनेकदा कठीण होते. तरीही तिच्या चेहऱ्यावर एक आत्मविश्वास असतो स्वतःच्या कर्तृत्वाने जगण्याचा.

आधुनिक जीवनशैलीने स्त्रीला अनेक संधी दिल्या आहेत, पण त्याचबरोबर काही नवे ताणही निर्माण केले आहेत. सोशल मीडियाच्या झगमगाटात अनेकदा जीवनाची तुलना सुरू होते. गृहिणीला कधी वाटते की नोकरी करणाऱ्या स्त्रीचे जीवन अधिक प्रतिष्ठेचे आहे; तर नोकरी करणाऱ्या स्त्रीला कधी गृहिणीच्या शांत आयुष्याचा हेवा वाटतो. पण प्रत्यक्षात दोन्ही भूमिका महत्त्वाच्या आणि परस्परपूरक आहेत. खरं तर समाजाला गृहिणीचीही तितकीच गरज आहे, जितकी नोकरी करणाऱ्या स्त्रीची आहे. कारण कुटुंब ही समाजाची पहिली शाळा असते, आणि त्या शाळेची पहिली शिक्षिका अनेकदा गृहिणीच असते. तिच्या संस्कारातूनच पुढची पिढी घडत असते. त्याच वेळी नोकरी करणारी स्त्री समाजाच्या विकासात सक्रिय भूमिका बजावते. तिच्या कर्तृत्वाने आर्थिक आणि सामाजिक प्रगतीला चालना मिळते.

म्हणूनच या दोन भूमिकांची तुलना करण्याऐवजी त्यांच्यातील ताळमेळ समजून घेणे गरजेचे आहे. आधुनिक जीवनशैलीचा खरा अर्थ स्पर्धा नसून समजूतदार सहजीवन आहे. कुटुंबातील सदस्यांनीही महिलांच्या भूमिकेला समजून घेतले पाहिजे. घरातील कामांची विभागणी, भावनिक पाठबळ आणि परस्पर आदर यामुळे हा ताळमेळ अधिक सुलभ होऊ शकतो. आजची स्त्री अनेक भूमिका एकाच वेळी पार पाडते ती आई आहे, पत्नी आहे, मुलगी आहे, मैत्रीण आहे, आणि अनेकदा एक यशस्वी व्यावसायिकही आहे. या सगळ्या भूमिकांमध्ये संतुलन राखताना ती स्वतःचे व्यक्तिमत्त्वही जपते. तिच्या या बहुआयामी रूपामुळेच आधुनिक समाज अधिक समृद्ध होत आहे. शेवटी असे म्हणावेसे वाटते की गृहिणी आणि नोकरी करणारी स्त्री या दोन वेगळ्या वाटा असल्या तरी त्यांचा प्रवास एकाच दिशेने जातो.कुटुंब आणि समाजाच्या उन्नतीकडे. आधुनिक जीवनशैलीचा खरा अर्थ हा स्पर्धा नसून परस्पर सन्मान आणि समजूतदारपणा आहे. जेव्हा समाज या दोन्ही भूमिकांचा आदर करायला शिकेल, तेव्हाच स्त्रीच्या आयुष्याला खऱ्या अर्थाने समतोल आणि सौंदर्य प्राप्त होईल

# आंतरराष्ट्रीय महिला दिवस: इतिहास, संघर्ष आणि प्रेरणा




विचारमंथन
प्रा. राहुल माहुरे
मो. 9822278925

८ मार्च हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून साजरा केला जातो. हा केवळ उत्सवाचा दिवस नसून महिलांच्या अधिकार, समानता आणि सन्मानासाठी झालेल्या ऐतिहासिक संघर्षांची आठवण करून देणारा दिवस आहे. स्त्रीच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक योगदानाचा गौरव करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. आंतरराष्ट्रीय महिला दिनाची सुरुवात विसाव्या शतकाच्या प्रारंभी महिलांच्या हक्कांसाठी झालेल्या चळवळीमधून झाली. २८ फेब्रुवारी १९०९ रोजी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ''सोशलिस्ट पार्टी ऑफ अमेरिका'' या संघटनेने पहिल्यांदा राष्ट्रीय महिला दिवस साजरा केला. याच काळात औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी कामाचे तास, वेतनातील समानता आणि मतदानाचा अधिकार यासाठी मोठ्या प्रमाणावर आंदोलने केली. काही इतिहासकारांच्या मते १८५७ मध्ये वस्त्रोद्योगातील महिला कामगारांनी केलेल्या आंदोलनातून या चळवळीचे बीज पेरले गेले. यानंतर १९१० मध्ये डेन्मार्कच्या कोपनहेगन येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत ८ मार्च हा दिवस महिलांच्या सन्मानासाठी साजरा करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. या परिषदेत १७ देशांतील शंभराहून अधिक महिला प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. त्यानंतर ८ मार्च १९११ रोजी ऑस्ट्रिया, डेन्मार्क, जर्मनी आणि स्वित्झर्लंड या देशांमध्ये लाखो महिलांनी एकत्र येऊन मतदानाचा अधिकार, नोकरीतील समान संधी आणि लिंगभेदाविरुद्ध आवाज उठवला. रशियामध्ये १९१७ साली महिलांनी ''ब्रेड अँड पीस'' या घोषणेअंतर्गत युद्ध संपविण्याच्या मागणीसाठी मोठी चळवळ उभारली. पेट्रोग्रॅड (आजचे सेंट पीटर्सबर्ग) येथे सुरू झालेल्या या आंदोलनाने राष्ट्रीय स्वरूप धारण केले. सात दिवसांच्या या संघर्षानंतर रशियन सम्राट निकोलस यांनी महिलांच्या मागण्या मान्य केल्या आणि त्यांना मतदानाचा अधिकार प्रदान करण्यात आला. त्यानंतर रशियामध्ये ८ मार्च हा दिवस अधिकृत सुट्टीचा दिवस म्हणून घोषित करण्यात आला. जगभरात या दिवसाला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. अखेरीस १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने ८ मार्च हा दिवस अधिकृतपणे आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून घोषित केला. तेव्हापासून दरवर्षी या दिवसासाठी वेगवेगळ्या संकल्पना (थीम) जाहीर केल्या जातात. २०२६ साठी आंतरराष्ट्रीय महिला दिनाची थीम '' '' म्हणजेच ''देण्याद्वारे मिळवणे'' अशी आहे. या संकल्पनेचा मूलभूत अर्थ असा की महिलांना शिक्षण, संधी, संसाधने आणि पाठिंबा दिला तर त्याचा फायदा केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी मार्ग मोकळा होतो. स्त्री सक्षम झाली तर कुटुंब सक्षम होते, समाज सक्षम होतो आणि राष्ट्राची प्रगती अधिक वेगाने घडते. जगातील विविध देशांमध्ये महिला दिन वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. काही देशांमध्ये हा अधिकृत सुट्टीचा दिवस असतो, तर काही ठिकाणी महिला संघटना, सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्था महिलांच्या हक्कांबाबत जनजागृती कार्यक्रम आयोजित करतात. काही देशांत महिलांना फुले, भेटवस्तू देऊन सन्मानित केले जाते, तर काही ठिकाणी महिलांच्या हक्कांसाठी मोर्चे, चर्चा आणि परिषदांचे आयोजन केले जाते.

इतिहासात पाहिले तर स्त्रियांचे योगदान केवळ सामाजिक चळवळीपुरते मर्यादित नाही. वैदिक काळापासून शिक्षण, तत्त्वज्ञान, विज्ञान, राजकारण, युद्धनीती आणि प्रशासन अशा अनेक क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. भारताच्या इतिहासात अनेक पराक्रमी आणि दूरदर्शी स्त्रियांची नावे अभिमानाने घेतली जातात. दिल्ली सल्तनतची पहिली महिला शासक रजीया सुलताना, काकतीय राज्याची कुशल राज्यकर्ती रुद्रमा देवी, तामिळनाडूतील ब्रिटिशांविरुद्ध लढा देणारी राणी वेलू नाचियार, मराठा साम्राज्याचे नेतृत्व करणारी राणी ताराबाई, तसेच १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील पराक्रमी योद्धा झाशीची राणी लक्ष्मीबाई या स्त्रियांनी इतिहासात अमिट ठसा उमटवला आहे. त्याचप्रमाणे चांदबीबी, राणी अब्बाका, कित्तूर चेन्नम्मा, माई भागो आणि राणी दुर्गावती यांसारख्या अनेक रणरागिणींनी आपल्या धैर्याने आणि नेतृत्वाने समाजाला प्रेरणा दिली. आजच्या आधुनिक युगात महिला विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, प्रशासन, क्रीडा, कला आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. महिलांनी अवकाश संशोधनापासून ते सैन्यदलापर्यंत आणि उद्योगविश्वापासून ते राजकारणापर्यंत सर्वच क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध केली आहे. अनेक देशांमध्ये महिला राष्ट्रप्रमुख, वैज्ञानिक, उद्योजक आणि समाजसुधारक म्हणून नेतृत्व करताना दिसतात. भारतातही महिलांच्या प्रगतीसाठी अनेक सामाजिक आणि शैक्षणिक चळवळी झाल्या. महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे , रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी यांसारख्या समाजसुधारकांनी महिलांच्या शिक्षणासाठी मोठे कार्य केले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच महिलांना शिक्षण, स्वावलंबन आणि स्वाभिमानाचा मार्ग खुला झाला. आज शिक्षण, स्वयंसहाय्यता गट, उद्योजकता आणि प्रशासनाच्या माध्यमातून भारतीय महिला समाजपरिवर्तनाची मोठी ताकद बनल्या आहेत. म्हणूनच आंतरराष्ट्रीय महिला दिवस हा केवळ अभिनंदनाचा दिवस नाही, तर समाजाने आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृतीत उतरवणे ही काळाची गरज आहे. महिलांच्या सन्मानाचे, अधिकारांचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करणे ही प्रत्येक समाजाची जबाबदारी आहे. महिला म्हणजे केवळ कुटुंबाची आधारस्तंभ नव्हे, तर समाजाच्या प्रगतीची शक्ती आहे. तिच्या कर्तृत्वाला योग्य संधी मिळाल्यास ती इतिहास घडवू शकते. म्हणूनच महिलांच्या संघर्ष, पराक्रम आणि योगदानाला सलाम करताना आपण सर्वांनी समानता, सन्मान आणि सहकार्याच्या भावनेने पुढे जाण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. तमाम मातृशक्तीला माझे कोटी कोटी प्रणाम



## ओळख पक्ष्यांची : शिक्रा



आकार आणि रंग: हा पक्षी कावळ्यापेक्षा थोडा लहान असून, याच्या डोळ्यांचा रंग लाल असतो. शिक्रा अत्यंत चपळ आहे. तो झाडाच्या फांदीवर दबा धरून बसतो आणि संधी मिळताच भक्ष्यावर झडप घालतो. यांचा आवाज पिटी-पिटी-पिटी असा ऐकू येतो. केरळ व आसाम सोडून हा संपूर्ण भारतभरात आढळतो.
याला हिंदी आणि मराठीत शिक्रा म्हणूनच ओळखले जाते, कारण तो एक कुशल शिकारी आहे.

(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 329



संकेत शब्द :—

**दोन अक्षरी**
- अग्नि
- आंच
- कला
- कस
- काक
- काया
- खप
- खर
- गीर
- डर
- तव
- थर
- धाम
- नख
- नग
- नष्ट
- नानी
- पाप
- मत्त
- मंद
- मध
- माजी
- मान
- रजा
- रवि
- रस
- रसा
- वाक
- वाली
- क्षमा
- साक
- साव
- हक

**तीन अक्षरी**
- अखंड
- अटक
- अथक
- आंदण
- आदर
- अंजन
- कबंध
- कवच
- कातर
- कानस
- कारण
- कासव
- ताठर
- दामीनी
- धमाल
- नखरा
- पंकज
- पथक
- परीघ
- पाकळी
- पारणे
- पैजार
- पैठण
- बलक
- भटजी
- मकान
- रवंथ
- रंजना
- रागीट
- लगट
- लवाद
- वजीर
- वरात
- वरात
- शरद
- सणक
- समता
- समक्ष
- सावध
- स्वाधीन


**चार अक्षरी**
- करवत
- कवतिक
- कामधेनु
- घरंदाज
- गणगोत
- जानवसा
- डरकाळी
- दडपण
- दशरथ
- दोरखंड
- धनगर
- नरवटी
- बंदोबस्त
- रटरट
- रासलीला
- वरमणे
- वितरक
- संपादक
- सरकार
- सरलता
- सूत्रधार
- हनुमान

**पाच अक्षरी**
- अधिकमास
- गरजवंत
- जमीनदोस्त
- परस्वाधीन
- मंगळसूत्र
- वजीरमूठ
- शततारका
- शपथविधी

**सहा अक्षरी**
- गगनभरारी


(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 710



**आडवे संकेत :—**
2) छायाचित्र काढणे
5) पायाच्या नखापासून डोक्याच्या शेंडी पर्यंत
9) स्वर्गलोकीत कळ लावणारा देवर्षी
12) दर, मूल्य 14) मोठी मशाल
16) पैसा दिला की सर्व अडलेली कामे सहज होतात या अर्थाची एक म्हण
18) शरीराचा नाजूक व सुंदर बांधा
20) सायंकाळी देवघरात दिवा लावण्याचे दीपपात्र
22) पोळीचा एक प्रकार
23) धाव (इं.)
24) अभिप्राय, विचार
26) योग्य सत्कार किंवा व्यवस्था
28) उपकरण
30) प्रयत्न, कष्ट
31) बारीक झणझण
33) सारखे, तुल्य
35) लाकूड
36) त्याचा, तिचा (सं.)
38) नटून थटून गावभर भटकणारी स्त्री
39) शिवधनुष्य
40) रामायणातील खलनायक
41) इंग्रजीत बदक
43) विजयी झालेला, जिंकलेला
44) सौख्य, मनास वाटणारी स्वस्थता
45) आंब्याचा रस
46) सांखळी
47) मनाला रम्य वाटणारे
49) आपल्याच मनाप्रमाणे वागणारा
51) जनावरांचा समूह, झुंड
52) विनाकारण, उगाचच
53) पुरूष
55) साल, संवत्सर
56) लयास जाणे, मावळणे
57) द्रव, रूची
59) दुर्मीळता, अभाव
60) टीका, समीक्षण
62) निरोप, बातमी
64) चुरशीचा खेळ, झुंज
67) भान सुटलेला 68) स्पष्टीकरण
69) नाही म्हणणे, नापसंती
71) पायी जाता येईल अशी वाट
73) मोराचे ओरडणे
75) देवाच्या नावे भजन कीर्तन करीत रात्रभर जागणे
76) विपत्ती, कठीण परिस्थिती
77) थंड, गार
78) मध्यप्रदेशातून वाहणारी एक प्रमुख नदी
79) वड
80) नवीन, नऊ
81) बाळंतिणीची सकुशल सुटका करणारी
82) स्मृतिचिन्ह
83) वाळवंट

**उभे संकेत :—**
1) सूर्य, प्रभा प्रसारित करणारा
3) बशीचा जोडीदार
4) कमळांचा समूह
6) खजिन्यावरचा मुख्य अधिकारी
7) स्कंध 8) अंधार
9) स्त्री, महिला 10) स्तंभ
11) दाबून टाकणे, शांत करणे
13) उलटी, ओकारी
15) धांदल, त्रेधातिरपिट
17) मस्तक विहीन शरीर
19) नरकलोकी पापीजनांना भोगाव्या लागणाऱ्या यातना
21) उचलण्यास भारी, वजनी
25) मनाचे समाधान करून घेणे (उर्दू)
27) प्रार्थना, स्तुति
28) स्वतंत्रतापूर्व काळात 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संस्थेची स्थापना करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांचे आडनाव
29) तपकीर
32) आडदांडपणाने केलेले कार्य
34) अहंकारी, घमेंडी
35) काळ्या पाठीचा हरीण
37) ईश्वर, प्रभू
39) महाभारतात भीष्मांची उपाधि
40) चितेवरील भस्म
42) हाताची नाडी बघून केलेले आजाराचे निदान
44) फूल, पुष्प
45) मन वेधून घेणे, ओढणे
46) चावी, किल्ली
48) सेवक, चाकर
50) आवरण, चिलखत
52) श्रीविठ्ठलाचे एक परमभक्त संत
54) रचना करणारा
56) पैसा, आशय
58) एक भित्रा पण चपळ प्राणी
60) विचारविनिमयासाठी जमलेली मंडळी
61) मदन
62) कायदा 63) लाजिरवाणा, ओशाळलेला
65) तळहाताची मागची बाजू
66) देण्यालायक, देणारा
67) चहूबाजूंनी पाण्याने वेढलेली जमीन
70) राजकारण, डावपेच
71) पारड्यातील विषमपणा काढून टाकण्यासाठी त्यात टाकलेला जिन्नस
72) पांथस्थ, प्रवास करणारा
74) दूधात एखादे फळ टाकून केलेले पक्वान्न
75) मुलीचा नवरा

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



Uday Munde - 8446302691

## महत्त्वाचे

### पांढूर्णा बु. येथे समीर लेणगुरे यांचे व्याख्यान

**घाटंजी :** तालुक्यातील पांढूर्णा बु. येथे शिवप्रेमी मित्रमंडळातर्फे शुक्रवारी (दि. ६) शिवजयंतीनिमित्त संस्कारांचे महत्व पटवून देण्यासाठी वक्ते समीर लेणगुरे यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमामुळे डीजेवर धांगडधिंगा करण्याऐवजी शिवरायांचे विचार डोक्यात घेण्याची गरज समाजात रुजली आणि विद्यार्थी व पालकांना उत्तम माणूस घडविण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन मिळून सकारात्मक परिणाम झाला.या भव्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पांढुर्णा बु. चे पोलिस पाटील चंद्रशेखर ठावरी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून युवासेना जिल्हाप्रमुख यवतमाळ आकाश राठोड, कायरचे कुंदन टोंगे आणि मंगेश मोहितकर उपस्थित होते. आयोजकांकडून सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. त्यानंतर मुख्य व्याख्यानात समीर लेणगुरे यांनी प्रबोधन केले. लहानपणापासून मुलांना संस्काररूपी बाळकडू मिळाले तर उत्तम माणूस घडतो, असे सांगत त्यांनी संस्कारांचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी नेहमी मोबाईल व चुकीच्या सवयींपासून दूर राहून ज्ञानार्जनावर लक्ष केंद्रित करावे. तसेच शिवरायांच्या जीवनातील धैर्य, शौर्य, स्वाभिमान व राष्ट्रप्रेम ही मूल्ये जपावीत, असा मौलिक संदेश त्यांनी दिला. शेवटी मद्य पिऊन नाचण्यापेक्षा समाजप्रबोधन करणारे धार्मिक कार्यक्रम सातत्याने घेण्याची अत्यंत आवश्यकता असल्याची महत्त्वपूर्ण बाब सर्व उपस्थितांनी प्रामुख्याने व्यक्त केली आणि शिवप्रेमी मित्रमंडळाचे भरभरून कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन राजु नगराळे यांनी अतिशय उत्कृष्टपणे पार पाडले.

### पेंचची 'लंगडी' वाघीण काळाच्या पडद्याआड

**नागपूर :** मध्यप्रदेश पेंच व्याघ्रप्रकल्पातील पर्यटकांमध्ये विशेष ओळख निर्माण केलेली 'लंगडी' म्हणून प्रसिद्ध वाघीण शनिवारी वृद्धापकाळाने मृत्यूमुखी पडली. वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, -२० (-२०) अशी ओळख असलेली ही वाघीण सुमारे १८ वर्षांची होती आणि अभयारण्यात दीर्घकाळ अधिराज्य गाजवणाऱ्या वाघिणींमध्ये तिचा समावेश होत होता.पेंच व्याघ्र प्रकल्पाचे उपसंचालक पुनीत गोयल यांनी सांगितले की, शनिवारी सकाळी सुमारे साडेदहा वाजता करमाझिरी कोअर परिसरात तिचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक पाहणीत वृद्धापकाळामुळे तिचा मृत्यू झाल्याचे दिसून आले असून नियमानुसार शवविच्छेदनाची प्रक्रिया करण्यात आली.२००८ साली जन्मलेल्या या वाघिणीची एक वेगळीच ओळख होती. जन्मतःच तिच्या पुढच्या एका पंज्यात विकृती होती. त्यामुळे चालताना ती किंचित लंगडत असे. याच वैशिष्ट्यामुळे पर्यटक आणि वन्यजीव अभ्यासकांमध्ये ती 'लंगडी' या नावाने प्रसिद्ध झाली होती.

# नक्षल कमांडर सुन्नम पापारावला पकडण्यासाठी आता 'आरपार'ची लढाई

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. ८:** बस्तरच्या दंडकारण्यात गेली अनेक दशके दहशतीचे दुसरे नाव बनलेला आणि १ कोटींहून अधिक बक्षीस असलेला कुख्यात नक्षलवादी कमांडर सुन्नम पापाराव याच्या मुसक्या आवळण्यासाठी आता प्रशासनाने 'आरपार'ची लढाई सुरू केली आहे. मधल्या काळात पापाराव चकमकीत मारला गेल्याच्या चर्चा होत्या. मात्र, तो आजही सशस्त्र नक्षलवाद्यांच्या तुकडीसह जंगलात सक्रिय असल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आता पापारावच्या आत्मसर्पणासाठी भावनिक आवाहन आणि लष्करी दबाव असे दुहेरी चक्रव्यूह रचले आहे.

## बस्तरमध्ये प्रशासनाचे दुहेरी चक्रव्यूह!



नुकतेच तेलंगणामध्ये छत्तीसगडमधील तब्बल १२५ नक्षलवाद्यांनी एकाच वेळी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला. या ऐतिहासिक घटनेमुळे नक्षली चळवळीला मोठा हादरा बसला असून, याच धर्तीवर आता पापारावनेही शस्त्रे खाली टाकावीत, यासाठी पोलीस आणि महसूल प्रशासनाने थेट त्याच्या घराचा उंबरठा ओलांडला. सुकमा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनी स्वतः पापारावच्या गावी जाऊन त्याच्या कुटुंबीयांची भेट घेतली. पापारावला सांगा, आता हिंसाचाराचा मार्ग संपला आहे. १२५ सहकाऱ्यांनी घेतलेला मार्ग स्वीकारा आणि शरणागती पत्करा, असे आवाहन प्रशासनाने त्याच्या नातेवाइकांमार्फत केले आहे.

## आत्मसमर्पणाची शेवटची संधी

गृहमंत्री अमित शहा यांचा सूचनेनुसार सुरक्षा दलाची ३१ मार्चपूर्वी देशातून नक्षलवाद हद्दपार करण्यासाठी दोन वर्षापासून आक्रमक मोहीम सुरू आहे. त्यामुळे २०२६ च्या सुरुवातीलाच डीआरजी आणि विशेष पथकांनी पापारावला 'जिवंत किंवा मृत' पकडण्याचे लक्ष्य ठेवले आहे. तेलंगणातील मोठ्या प्रमाणावरील आत्मसमर्पणानंतर नक्षली फळी खिळखिळी झाली असून, पापारावने शरणागती पत्करल्यास बस्तरमधील नक्षलवादाचा अध्याय कायमचा मिटण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. प्रशासनाने आता चेंडू पापारावच्या कोर्टात टाकला असून, तो कुटुंबीयांच्या आवाहनाला प्रतिसाद देतो की जंगलातच आपला अंत ओढवून घेतो, याकडे आता सुरक्षा यंत्रणांचे लक्ष लागले आहे.

सुन्नम पापाराव उर्फ 'मंगू दादा' हा दंडकारण्य स्पेशल जोनल कमिटीचा अत्यंत प्रभावशाली सदस्य असून पश्चिम बस्तर विभागाचा इंचार्ज आहे.
एके ४७ सह वावरणारा पापारावला स्थानिक भौगोलिक रचनेची उत्तम माहिती व अभ्यास असल्याने तो अनेकदा सुरक्षा दलांच्या तावडीतून निसटला आहे. काही काळापूर्वी झालेल्या चकमकीत त्याची पत्नी उर्मिला मारली गेली, मात्र पापाराव तिथून पळ काढण्यात यशस्वी झाला होता. शंभरहून अधिक गंभीर गुन्ह्यांची नोंद असलेला हा नक्षल नेता सध्या सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर आहे. विशेष म्हणजे देशभरात नक्षल संघटनेचे पॉलीट ब्युरो सदस्य मुप्पला लक्ष्मणराव उर्फ गणपती आणि मिशीर बेसरा असे केवळ दोन सर्वोच्च नेते शिल्लक आहेत.

# दीड लाखांचा दारूसाठा जप्त, दोघांना अटक, पोलिसांच्या संशयास्पद भूमिकेवर प्रश्नचिन्ह

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ८ :** तालुक्यातील विदर्भ-मराठवाड्याच्या सीमेवर असलेल्या ब्राह्मणगाव येथे शनिवारी (दि. ७) सकाळी स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने धाडसी कारवाई करीत तब्बल दीड लाख रुपयांचा अवैध दारूसाठा जप्त केला. या कारवाईत दोन प्रमुख आरोपींना अटक करण्यात आली आहे. स्थानिक पोलिसांच्या नाकावर टिच्चून सुरू असलेल्या या अवैध धंद्यांच्या पर्दाफाशामुळे बीट जमादाराच्या संशयास्पद कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.
उमरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीत आणि विशेषतः विदर्भ-मराठवाड्याच्या सीमेलगत असलेल्या ब्राह्मणगाव व आजूबाजूच्या परिसरात सध्या अवैध धंद्यांनी मोठे थैमान घातले आहे. सट्टा, मटका, अवैध गुटखा विक्री आणि दारूचा महापूर या भागात राजरोसपणे वाहत आहे. हे सर्व बेकायदेशीर व्यवसाय स्थानिक बीट जमादाराच्या 'अर्थपूर्ण' आशीर्वादानेच बिनदिक्कतपणे सुरू असल्याचा उघड आरोप स्थानिक नागरिकांकडून वारंवार केला जात होता. स्थानिक पोलिसांच्या या संशयास्पद भूमिकेमुळे सर्वसामान्यांमध्ये मोठी खदखद आणि नाराजी निर्माण झाली होती. वाढत्या तक्रारींची आणि अवैध धंद्यांची अत्यंत गंभीर दखल घेत, यवतमाळ स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पुसद येथील विशेष पथकाने शनिवारी (७ मार्च) सकाळी ८ वाजताच्या सुमारास ब्राह्मणगाव येथे अचानक धाड टाकली. या धाडसी कारवाईत पथकाने तब्बल दीड लाख रुपयांच्या अवैध दारूसाठ्यासह मोठा मुद्देमाल जप्त केला. तसेच, या व्यवसायातील दोन प्रमुख आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अंतर्गत कठोर कारवाई केली आहे. एलसीबीने केलेल्या या धडक कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमधून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे. मात्र, दुसरीकडे या कारवाईने उमरखेड पोलिस आणि विशेषतः स्थानिक बीट जमादार यांच्या कार्यपद्धतीची लक्तरे अक्षरशः चव्हाट्यावर आली आहेत. अनेक महिन्यांपासून राजरोसपणे सुरू असलेल्या एवढ्या मोठ्या अवैध दारू व्यवसायाची स्थानिक पोलिसांना साधी भनकही कशी लागली नाही? असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

## एसबीएल एनर्जी स्फोट : आणखी दोन महिलांचे मृत्यू

**नागपूर:**नागपूर जिल्ह्यातील एसबीएल एनर्जी कंपनीत झालेल्या भीषण स्फोटातील गंभीर जखमी आणखी दोन महिलांचे गेल्या २४ तासात मृत्यू झाल्याने मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २१ झाली आहे. आम्रपाली कालसर्पे यांचे काल रात्री ११ वाजता निधन झाले. आज रोशनी उमाठे या महिला कामगाराचे निधन झाले. ऑरेंज सिटी रुग्णालयामध्ये दोघांवर उपचार सुरू होते. या घटनेने नागपूर जिल्ह्यातील विविध स्फोटक निर्मिती कंपनीच्या सेफ्टी ऑडिटचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विधिमंडळात देखील याविषयी लक्षवेधी चर्चा झाली. नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर पोलिस स्टेशनच्या हद्दीत राऊळगाव येथील एसबीएल एनर्जी लिमिटेड या स्फोटके तयार करणाऱ्या कंपनीत १५ दिवसापूर्वी ही भीषण घटना घडली.

# फुलसावंगीत भुरट्या चोरांचे थैमान; शाळा आणि मंदिरेही लक्ष्यावर

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**फुलसावंगी, दि. ८ :** येथे होळीच्या सुट्टीत भुरट्या चोरांनी पैशांच्या लालसेपोटी शाळा, मंदिरे आणि शेतातून साहित्य चोरून अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. जिल्हा परिषद शाळेतील पंखे, शनी मंदिरातील घंटा आणि शेतकऱ्यांचे साहित्य चोरीला गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे चोरट्यांचे धाडस वाढले असून नागरिकांनी तक्रार देण्याकडे पाठ फिरविल्याचा गंभीर परिणाम सध्या दिसत आहे.
स्थानिक गुन्हे शाखेने अलीकडेच पैनगंगा नदी पात्रातील अवैध दारूभट्ट्या उध्वस्त केल्या आहेत. मात्र, स्थानिक महागाव पोलिसांचा तपास पूर्णपणे शून्य असल्याचे दिसते. चोरट्यांनी होळीच्या दोन दिवसांच्या सुट्टीत जिल्हा परिषद केंद्रीय मराठी शाळेतून लोकवर्गणीतून घेतलेले ५४०० रुपयांचे दोन वॉल फॅन पळविले. यापूर्वी याच शाळेतून इन्व्हर्टर, सीसीटीव्ही कॅमेरे, तेलाच्या पिशव्या आणि कपाटातील रोख रक्कम चोरीला गेली होती. याशिवाय जानेवारी महिन्यात शनी मंदिरातून ७ किलोची पितळी घंटा व घागर चोरीला गेल्याची तक्रार पंढरी पहुरकर यांनी दिली होती. तसेच चिल्ली गावातील शेतकऱ्यांच्या घरासमोरून दोन बोकड आणि बकऱ्या चोरीला गेल्या आहेत. शिवाय कृषी पंपांच्या केबल आणि ट्रॅक्टरच्या बॅटरी चोरीच्या डझनभर घटना घडल्या. तक्रार देऊनही तपास लागत नसल्याने सर्व हताश नागरिक आता थेट पोलिस ठाण्यात जाणे पूर्णपणे टाळत आहेत.

> फुलसावंगी येथे पोलिस चौकी असून तिथे एपीआय, बिट जमादार आणि शिपाई तैनात आहेत. अशा घटना घडायला नकोत. मी संबंधित कर्मचाऱ्यांना या प्रकरणांचा सखोल तपास करण्याच्या कडक सूचना तातडीने देतो.
>
> **- धनराज निळे,** पोलिस निरीक्षक, महागाव.

# ३० मार्चला गौतमी पाटील यांच्या लावणीचा ठसका

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**दारव्हा, दि. ८ :**शहरालगतच्या पिंपरी फाटा येथे ३० मार्च रोजी प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या बहारदार लावणी कार्यक्रमाचे आयोजन मनमोहनसिंग चव्हाण मित्र परिवारातर्फे करण्यात आले आहे. नागरिकांना सांस्कृतिक मेजवानी मिळावी या उद्देशाने हा भव्य शो आयोजित केला असून, यामुळे परिसरात मोठी उत्सुकता निर्माण झाली असून रसिकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.
महाराष्ट्रभर आपल्या ठसकेबाज लावणी सादरीकरणामुळे चर्चेत असलेल्या गौतमी पाटील यांच्या ''गौतमी पाटील ग्रॅन्ड शो'' या कार्यक्रमाची दारव्हा परिसरात मोठी चर्चा आहे. मनमोहनसिंग चव्हाण मित्र परिवाराच्या वतीने या कार्यक्रमासाठी सध्या जोरदार पूर्वतयारी करण्यात येत आहे. ३० मार्च रोजी सायंकाळी पिंपरी फाटा येथे हा कार्यक्रम रंगणार असून, परिसरातील नागरिकांसाठी ही एक मोठी मनोरंजनाची पर्वणी ठरणार आहे. आयोजक मनमोहनसिंग चव्हाण आणि त्यांच्या मित्र परिवाराने या कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत नेटके केले आहे. लावणीचा हा खास ठसका अनुभवण्यासाठी परिसरातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. गौतमी पाटील यांच्या लोकप्रियतेमुळे या कार्यक्रमाला युवकांसह सर्वच थरातील प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.



# सेवानिवृत्त प्राध्यापकानेच फोडला १२वीचा पेपर




अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर , दि. ८ :** उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या इयत्ता १२ वी बोर्डात रसायनशास्त्राच्या पेपर फुटी प्रकरणात उमरेड पोलिसांनी आणखी एकाला अटक केली. सतीश मुकुंद खर्चे असे या निवृत्त प्राध्यापकाचे नाव आहे. नागपुरातील सेंट उर्सूला शाळेतील पेपर फूट प्रकरणाचा तपास करत असलेल्या सदर पोलिसांचे विशेष पथक नेमण्यात आले आहे. त्याच धर्तीवर ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या नेतृत्त्वाखाली पाच सदस्याचे विशेष तपास पथक नेमण्यात आले आहे. हे पथक आता संपूर्णपणे पेपर फूट प्रकरणात चौकशी करणार आहे.
सतीश हा सेवानिवृत्त प्राध्यापक असून त्यानेच टार्गेट अकादमी ऑफ सायंसेसचा संचालक अतूल चौधरी याच्या मदीतने १२ बार्डाचा रसायनशास्त्राचा पेपर फोडला होता. त्याने विद्यार्थ्यांना दिलेल्या रसायनशास्त्राची प्रश्नपत्रिका आणि प्रत्येक्ष बोर्डाच्या परिक्षेतील रसायनशास्त्राच्या प्रश्नपत्रिकेत मोठे साम्य आढळले आहे. धक्कादायक बाब म्हणजे पेपरमधील प्रश्नांचा क्रम देखील सारखाच आहे. एक दोन बदल वगळले तर सर्व पेपर एकसारखा असल्याचे आढळले आहे.
टार्गेट अकादमीतून फुटलेल्या पेपर फुट प्रकरणात सतीश खर्चे याचा देखील सहभाग असल्याची माहीती तपास पथकाला मिळाली होती. खर्चे हा सेवा काळात महाराष्टं राज्य माध्यामिक व उच्च माध्यमिक, विभागिय मंडळात कार्यरत होता. काही वर्षांपूर्वी १२ वीच्या रसायनशास्त्राची प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी त्याची नियुक्ती झाली होती.

## महिन्याभरापूर्वीच पोहोचला पेपर

१२ बोर्डाच्या परिक्षेत रसायनशास्त्राचा पेपर १८ फ ब्रुवारीला झाला होता. त्यापूर्वी २१ दिवस आधी २५ जानेवारीलाच उमरेड येथील टार्गेट अकादमी ऑफ सायंसेसचा संचालक अतूल चौधरीकडे पोचला होता. त्यात आता अतूल आणि बोर्डाने नेमलेला माजी अधिकारी खर्चे या दोघांमधल्या संपर्काने बोर्डावरच आता परीक्षा देण्याची वेळ आली आहे. बोर्डाचे अध्यक्ष डॉ. शिवलिंग पटवे हे बोर्डातून पेपर फुटला नसल्याचा दावा करत असले तरी खर्चे आणि अतूल चौधरीतला संपर्क निव्वळ योगायोग असूच शकत नाही, अशी ग्रामीण पोलिसांना शंका येत आहे.

दरम्यान खर्चे आणि टार्गेट अकादमीचा संचालक चौधरी बऱ्याच वर्षांपासून संपर्कात होते. गेल्या काही महिन्यांमध्ये त्यांच्यात संवाद वाढले होते, अशीही माहिती पथकाच्या हाती लागली होती. त्यामुळे ग्रामीण पोलिसांनी खर्चे याला अटक केली.

# डिवरे हत्याकांड खटल्यावर आजपासून सुनावणी

## सुनावणीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष, चार वर्षांआधीचे प्रकरण

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ८ :** भांब येथील शिवसेना पदाधिकारी सुनील डिवरे यांची अतिक्रमण हटविल्याच्या आणि जुन्या वादातून त्यांच्या राहत्या घरी गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या बहुचर्चित हत्याकांडाच्या खटल्याची सुनावणी यवतमाळ मुख्य सत्र न्यायालयात ९, १० व ११ मार्च रोजी होणार असून, चार वर्षांनंतर होत असलेल्या या सुनावणीकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.
कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व ग्रामपंचायत सदस्य सुनील डिवरे आणि त्यांची सरपंच पत्नी अनुप्रिया यांच्या पुढाकाराने गावातील जयस्वाल यांचे अतिक्रमण काढण्यात आले होते. तसेच २०१९ मध्ये नेहरू विद्यालयाच्या अध्यक्ष निवडीवरून मोठा वाद झाला होता. याच रागातून हत्या झाली. घटनेनंतर गावकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन सुरू केले होते. तेव्हा संदिपान भुमरे व संजय राठोड यांनी समजूत काढल्यानंतर ग्रामीण पोलिसांनी आरोपी पवन सोननकर, वैभव सोनकर, रोहित भोपळे, सुरेश पात्रीकर, सूरज मनवर, अमर जयस्वाल आणि रामकुमार जयस्वाल यांना अटक केली होती. त्यांच्यावर ३०२, ३२४, ३२३, १४३, १४७, १४८, १४९, १२०(ब), ५०६ व २०१ या कलमांन्वये ५९/२०२२ हा गुन्हा दाखल करण्यात आला होता.
तब्बल चार वर्षे प्रलंबित असलेला हा संवेदनशील खटला आता अंतिम टप्प्यात आला आहे. मुख्य जिल्हा सत्र न्यायाधीश मुनघाटे यांच्या न्यायालयात साक्ष व पुराव्यांसाठी सुनावणी निश्चित झाली आहे. त्यामुळे न्यायालय आता या प्रकरणात नेमका काय निर्णय देते, याकडे भांबराजा गावातील आणि संपूर्ण जिल्ह्यातील सर्व सामान्य लोकांचे पूर्ण लक्ष लागले आहे.

# जवळी येथे समाधान शिबिरातून झाले नागरिकांचे समाधान

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**भिवापूर, दि. ८:** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान अंतर्गत भिवापूर तालुक्यातील जवळी येथे शनिवारी (दि.७ मार्च) समाधान शिबिर पार पडले. या शिबिराला हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना थेट शिबिरस्थळी देण्यात आला.
या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या १५ पेक्षा अधिक सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच पंचायत समिती, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय आदी विविध विभागांचे स्वतंत्र स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलद्वारे नागरिकांना शासकीय योजनांची माहिती देण्यासोबतच विविध सेवांचा लाभ देण्यात आला.
पुरवठा विभागामार्फत २२ प्रकरणे निकाली काढण्यात आली, तर सेतू केंद्रामार्फत १२५ विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत ६३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून २६ लाभार्थ्यांना योजना देण्यात आल्या, तर बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयामार्फत ४२ लाभार्थ्यांना लाभ वितरित करण्यात आला. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत १४ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला तसेच ४२५ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. महसूल विभागामार्फत २५ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली. सातबारा दुरुस्ती संदर्भात २ फेरफार अर्ज स्वीकारण्यात आले. डिजिटल सातबारा ७९, नमुना ८-अ उतारा ७५ देण्यात आले. एक खिडकी योजनेअंतर्गत २० अर्ज स्वीकारण्यात आले. अशा प्रकारे एकूण ७२२ लाभार्थ्यांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ देण्यात आला. शिबिराचे उद्घाटन आमदार संजय मेश्राम यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण होते. निरीक्षक म्हणून नागपूर येथील तहसीलदार रुणय जक्कुलवार उपस्थित होते. यावेळी माजी आमदार राजू पारवे, सुधीर पारवे, तालुका समन्वय समिती अध्यक्ष आनंदराव राऊत, संजय गांधी निराधार समिती अध्यक्ष सुभाष राऊत, तहसीलदार संजय राठोड, गटविकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, तालुका कृषी अधिकारी सुप्रिया कोकणी, उपअधीक्षक भूमी अभिलेख दिपाली सोनसरे, तालुका आरोग्य अधिकारी प्रवीण राऊत, नायब तहसीलदार मनोज वाडे, प्रवीण राठोड, बालविकास प्रकल्प अधिकारी विजय जिडगीलवार, सरपंच मेघा मार्गनवार यांच्यासह जवळी मंडळातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी, उमेद व माविमचे कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.या शिबिरामध्ये विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ थेट गावपातळीवर उपलब्ध झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# राजुरा येथे बारा दिवसांनी पुन्हा एका वकिलाने संपविले जीवन

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर , दि. ८ :** राजुरा येथील तरूण वकील, नोटरी आणि भारतीय जनता पक्षाचे राजुरा शहर उपाध्यक्ष ॲड. नितीन कमलाकर वासाडे (४२) यांनी आज रविवार ८ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान १२ दिवसातील वकिलाची ही दुसरी आत्महत्या असल्याने शहरात शोककळा पसरली आहे.
बिनधास्त व्यक्तीमत्व असलेल्या ॲड. नितीन वासाडे यांच्या आत्महत्येमुळे हळहळ व्यक्त होत आहे. नितीन यांनी १५ दिवसांपूर्वीच आपल्या घराचे नूतनीकरण करून कार्यक्रम केला होता. नेमकी कोणत्या कारणांनी नितीन यांनी आत्महत्या केली, याचे कारण स्पष्ट होऊ शकले नाही. राजुरा शहरातील एवढ्यातील गळफास घेऊन आत्महत्या केल्याची ही दहावी घटना आहे तर शहरातील १२ दिवसातील ही दुसऱ्या वकिलाची आत्महत्या आहे. यापूर्वी दिनांक २४ फेब्रुवारी रोजी ॲड. अमित जयपूरकर यांनी घरीच गळफास घेऊन आत्महत्या केली होती. नितीन वासाडे हे विवाहित असून त्यांना एक मुलगी आहे. त्यांची मुलगी शिकवणीला गेली होती, तिला आणायला त्यांची पत्नी घराबाहेर गेली होती. तेव्हा घरी कुणी नसतांना वेळ साधून आपल्या घरी गळफास घेऊन नितीन वासाडे यांनी आत्महत्या केली. पत्नी व मुलगी घरी येताच हा प्रकार उघडकीस आला. मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. त्यांचेमागे वडील श्री शिवाजी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त अधिक्षक कमलाकर वासाडे, आई, पत्नी व मुलगी आहे. राजुरा पोलिस घटनास्थळी पोहचले असून पंचनामा सुरू आहे. या तरूण वकिलाच्या मृत्यूबद्दल येथे हळहळ व्यक्त होत आहे.
मागील काही दिवसांत राजुरा शहरात आत्महत्या वाढल्या आहेत. ११ फेब्रुवारी रोजी फिरोजशहा लेआउट येथील रहिवासी तरुण अभियंता दीपक बाबा पाडे (३४) याने स्वतःच्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. दीपक पाडे हे पुण्यातील एका नामांकित कंपनीत नोकरीला होते. काही दिवसांपूर्वीच ते पुण्यावरून राजुराला आले होते. या तरुणाची आत्महत्या धक्कादायक होती. त्यानंतर १४ फेब्रुवारी रोजी राजुरा तालुक्यातील पाचगाव येथील शेतकरी कमलाकर राजेश्वर भेंडे (६५) याने आत्महत्या केली.

# टीम इंडिया ३ दिवसही टिकली नाही

## ऑस्ट्रेलियाने पिंक बॉल टेस्ट १० विकेट्सने जिंकली!




**नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियन महिला संघाने पर्थमधील वेस्टर्न ऑस्ट्रेलिया क्रिकेट असोसिएशन ग्राउंड येथे खेळल्या गेलेल्या दिवस-रात्र कसोटी सामन्यात सहज विजय मिळवला. भारतीय महिला संघ या सामन्यात पूर्णपणे अपयशी ठरला, ज्यामुळे बहु-स्वरूपातील मालिका गमावावी लागली. या सामन्यात भारतीय महिला संघ तीन दिवसही टिकू शकला नाही आणि तिसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात ऑस्ट्रेलियाने १० विकेट्सने विजय मिळवला.ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि पहिल्या सत्रापासूनच सामन्यावर वर्चस्व गाजवले. भारतीय संघ पहिल्या डावात ६२.४ षटकांत १९८ धावांवर सर्वबाद झाला. जेमिमा रॉड्रिग्जने अर्धशतक झळकावले, परंतु इतर फलंदाज जास्त काळ टिकू शकले नाहीत. ऑस्ट्रेलियाकडून ॲनाबेल सदरलँडने सर्वाधिक चार बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३२३ धावा केल्या, ज्यामुळे त्यांना १२५ धावांची मजबूत आघाडी मिळाली. गोलंदाजीनंतर ॲनाबेल सदरलँडनेही फलंदाजीतून शानदार कामगिरी केली, शतक झळकावले आणि १२९ धावा केल्या. एलिस पेरीनेही ७६ धावा केल्या आणि महिला कसोटीत ऑस्ट्रेलियाची सर्वाधिक धावा करणारी फलंदाज ठरली. दरम्यान, भारताच्या सायली सातघरेने पदार्पणातच चार बळी घेतले, परंतु ऑस्ट्रेलियाला मोठी धावसंख्या उभारण्यापासून रोखू शकली नाही.दुसऱ्या डावातही भारतीय संघाला चांगली कामगिरी करता आली नाही. स्मृती मानधना आणि शफाली वर्मा पुन्हा एकदा लवकर बाद झाल्या. सदरलँड आणि पदार्पण करणाऱ्या लुसी हॅमिल्टन यांनी मिळून वरच्या फळीला उध्वस्त केले, ज्यामुळे या डावातही भारताचा डाव १४९ धावांवर संपुष्टात आला.

प्रतिका रावलच्या लढाऊ ६३ धावांच्या जोरावर संघाने हे लक्ष्य गाठले आणि ऑस्ट्रेलियासमोर २५ धावांचे लक्ष्य ठेवले, जे ऑस्ट्रेलियाने ४.३ षटकांत एकही विकेट न गमावता पूर्ण केले.ही एक बहु-स्वरूपातील मालिका होती, ज्यामध्ये तीन टी-२०, तीन एकदिवसीय आणि एक कसोटी सामना होता. भारताने टी-२० मालिका २-१ ने जिंकून आघाडी घेतली. तथापि, त्यानंतर ऑस्ट्रेलियाने जोरदार पुनरागमन केले. त्यांनी प्रथम एकदिवसीय मालिका ३-० ने जिंकली आणि नंतर कसोटी सामना जिंकून मालिका ५-२ ने जिंकली.

## डी कॉकने साधला आयसीसीवर निशाणा



**नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था**

२०२६ च्या टी विश्वचषकातून बाहेर पडल्यानंतर दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिजचे खेळाडू भारतातच अडकून पडले आहेत. याउलट इंग्लंडचे खेळाडू मात्र लवकर घरी पोहोचले आहेत. या विचित्र प्रकारामुळे खेळाडूंनी आयसीसीवर टीका केली असून, काही देशांना प्रवासासाठी झुकते माप दिले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.कोलकाता येथे झालेल्या पहिल्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडच्या राष्ट्रीय क्रिकेट संघाकडून पराभव झाल्यानंतर दक्षिण आफ्रिका बाहेर पडला, तर ईडन गार्डन्सवर भारताच्या राष्ट्रीय क्रिकेट संघाकडून पाच विकेटने पराभव झाल्यानंतर वेस्ट इंडिज बाहेर पडला. इंग्लंडचा राष्ट्रीय क्रिकेट संघ शनिवारी उपांत्य फेरीत पराभव झाल्यानंतर लंडनला चार्टर फ्लाइटने मुंबईहून निघाला, तर अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील तणावामुळे विमानातील व्यत्ययांमुळे दक्षिण आफ्रिका राष्ट्रीय क्रिकेट संघ आणि वेस्ट इंडिजचा राष्ट्रीय क्रिकेट संघ अजूनही भारतात वाट पाहत आहेत.दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिजचे खेळाडू कोलकात्याहून एकाच विशेष विमानाने (चार्टर फ्लाइट) निघण्याची शक्यता आहे, पण त्यांच्या प्रवासाची वेळ अजूनही ठरलेली नाही. या नियोजनावर दक्षिण आफ्रिकेचा यष्टिरक्षक क्विंटन डी कॉक याने सोशल मीडियाच्या माध्यमातून आयसीसीवर कडक शब्दांत टीका केली आहे. पोस्टमध्ये डी कॉकने म्हटलं की, ''आयसीसीचा हा कारभार खरोखरच विचित्र आहे. आम्हाला कोणतीही माहिती दिली जात नाहीये, पण इंग्लंडचे खेळाडू मात्र आमच्याआधीच घरी निघाले आहेत. वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंना अंधारात का ठेवले आहे? काही संघांना इतरांपेक्षा जास्त महत्त्व का दिले जातेय, हे समजत नाही.'' त्याचा सहकारी डेव्हिड मिलर यानेही संताप व्यक्त केला. तो म्हणाला, ''आमच्यानंतर स्पर्धेतून बाहेर होऊनही इंग्लंडचे खेळाडू आज रात्रीच विशेष विमानाने घरी परतत आहेत, हे पाहून आश्चर्य वाटते.''वेस्ट इंडिजचे प्रशिक्षक डॅरेन सॅमी यांनीही खेळाडूंच्या टीकेला पाठिंबा दिला आहे. त्यांनी डेव्हिड मिलरला साथ देत म्हटले की, ''शांत बसलेल्या लोकांना ऐकू जाईल इतक्या मोठ्या आवाजात हा प्रश्न मांडायला हवा.''इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉन यानेही आयसीसीवर निशाणा साधला आहे. तो म्हणाला, ''इंग्लंडचा संघ गुरुवारी स्पर्धेतून बाहेर पडला आणि आजच विशेष विमानाने घरी निघाला. मात्र, वेस्ट इंडिजचा संघ गेल्या रविवारीच बाहेर पडूनही

## मेस्सी समोरच ट्रम्प यांनी गायले रोनाल्डोचे गुणगाण!





**नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २०२५ एमएलएस कप विजेत्या 'इंटर मियामी' संघाचे व्हाईट हाऊसमध्ये यजमानपद भूषवले. यावेळी ट्रम्प यांनी आपल्या खास शैलीत भाषण केले. या भाषणादरम्यान त्यांनी मेस्सीची तुलना फुटबॉल सम्राट पेले यांच्याशी केली, तर मेस्सीच्या उपस्थितीतच त्याचा कट्टर प्रतिस्पर्धी ख्रिस्तियानो रोनाल्डोचाही उल्लेख 'ग्रेट' म्हणून केला.आपल्या भाषणात डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, ''आज २०२५ एमएलएस कप चॅम्पियन इंटर मियामीचे स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

आजपर्यंत कोणत्याही अमेरिकन राष्ट्राध्यक्षाला जे म्हणण्याची संधी मिळाली नाही, ती मला मिळाली आहे, लिओनेल मेस्सी, तुझे व्हाइट हाऊसमध्ये स्वागत आहे!''ट्रम्प पुढे म्हणाले, ''मी पेले यांना खेळताना पाहिले आहे. मला माहित नाही, कदाचित तू त्यांच्यापेक्षाही सरस असू शकतोस. पेले खूप चांगले होते.'' त्यानंतर ट्रम्प यांनी तिथे उपस्थित खेळाडूंना विचारले, ''मेस्सी श्रेष्ठ की पेले?'' सर्वांनी एकच गलका करत मेस्सीचे नाव घेतले, त्यावर ट्रम्प यांनीही हसत ''मी पण मेस्सीच मानतो'' असे उत्तर दिले.या कार्यक्रमात इंटर मियामी संघाने डोनाल्ड ट्रम्प यांना आपल्या संघाची जर्सी भेट दिली.

मात्र, सर्वांचे लक्ष वेधले ते लिओनेल मेस्सीने दिलेल्या भेटीने. मेस्सीने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना एक 'रत्नजडित गुलाबी फुटबॉल' भेट म्हणून दिला. मेस्सीने यावेळी कोणतेही भाषण केले नाही, मात्र ट्रम्प यांच्या प्रत्येक विधानावर तो स्मितहास्य करत दाद देत होता.



## लग्नानंतर दुसऱ्या दिवशी सेमीफायनल खेळण्यासाठी मैदानात उतरला अर्जुन तेंडुलकर

**नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था**

दिग्गज क्रिकेटर सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकर याने ५ मार्चला सानिया चांडोकच्या साथीनं आपल्या आयुष्यातील नव्या इनिंगची सुरुवात केली. प्री वेडिंगआधी क्रिकेटच्या मैदानात उतरुन मॅन ऑफ द मॅचचा मानकरी ठरलेला अर्जुन लग्नानंतर दुसऱ्या दिवशीच मैदानात उतरल्याचे पाहायला मिळाले. वैयक्तिक आयुष्यातील अविस्मरणीय क्षण आणि त्यानंतर त्याने मैदानात उतरून खेळावर दाखवलेले प्रेम ही गोष्ट सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. अर्जुन तेंडुलकर हा डीवाय पाटील टी २० कप २०२६ स्पर्धेत डीवाय पाटील ब्लू टीम या संघाकडून खेळताना पाहायला मिळाले. वैभव सूर्यवंशी देखील या संघाचा भाग आहे. सेमीफायनलमध्ये वैभव आणि अर्जुन यांच्या संघाचा सामना मुंबई कस्टम्स संघाविरुद्ध रंगल्याचे पाहायला मिळाले. ६ मार्चला झालेल्या या सामन्यात अर्जुन तेंडुलकरनं एका षटकात २० धावा खर्च केल्या. फलंदाजीतही तो फक्त ९ धावांवर बाद झाला. वैभव सूर्यवंशीला तर सामन्यात खातेही उघडता आले नाही. या सामन्यातील पराभवासह डीवाय पाटील ब्लू टीमचा स्पर्धेतील प्रवास संपुष्टात आला. लग्नाआधीच्या कार्यक्रमादरम्यानही अर्जुन तेंडुलकर या स्पर्धेत खेळताना दिसला होता.

## गोलंदाज ली ताहुहूची क्रिकेटमधून निवृत्ती

**नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था**




भारतामध्ये आज टी विश्वचषक २०२६ चा फायनलचा सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी मैदानावर खेळवला जाणार आहे. हा सामना भारत आणि न्यूझीलंड या दोन संघामध्ये खेळवला जाणार आहे. आजच्या सामन्याची चर्चा जगभरामध्ये सुरू आहे. त्याआधी न्यूझीलंडच्या पहिल्या क्रिकेट खेळाडूबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. न्यूझीलंडची स्टार वेगवान गोलंदाज ली ताहुहूने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. ती किवी संघासाठी एक यशस्वी वेगवान गोलंदाज राहिली आहे. २०२६ मध्ये इंग्लंडमध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषकासह, तिला केवळ टी-२० स्वरूपावर लक्ष केंद्रित करायचे आहे, म्हणूनच तिने हा निर्णय घेतला आहे. ली ताहुहूने २०११ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध किवी संघासाठी पदार्पण केले. तिच्या १५ वर्षांच्या एकदिवसीय कारकिर्दीत, तिने एकूण १०३ एकदिवसीय सामने खेळले आहेत आणि चार एकदिवसीय विश्वचषकांमध्येही ती सहभागी झाली आहे.ली ताहुहूने न्यूझीलंडच्या महिला क्रिकेट इतिहासात आपले नाव कोरले आहे. ती आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये संघाची सर्वाधिक विकेट घेणारी गोलंदाज आहे. वयाच्या २० व्या वर्षी पदार्पण केल्यापासून, तिने संघासाठी सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे, १२५ एकदिवसीय विकेट्स घेतल्या आहेत. ताहुहूने संघासाठी चार एकदिवसीय विश्वचषकांमध्येही खेळले आहे. ताहुहूने २०१३, २०१७, २०२२ आणि २०२५ विश्वचषकांमध्ये न्यूझीलंडचे प्रतिनिधित्व केले आहे. २०२५ मध्ये, तिने इंग्लंडविरुद्ध तिचा शेवटचा एकदिवसीय सामना खेळला. ली ताहुहूने फक्त एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे.

## एका आठवड्यात सोने ५०६० रुपयांनी स्वस्त

**नवी दिल्ली:** मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थिती आणि इस्रायल-इराण यांच्यातील वाढता तणाव असूनही, भारतीय सराफ बाजारात या आठवड्यात सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण पाहायला मिळाली आहे. गेल्या सात दिवसांत २४ कॅरेट सोन्याच्या किमतीत प्रति १० ग्रॅम तब्बल ५,०६० रुपयांची कपात झाली आहे, तर चांदीच्या दरात १०,००० रुपयांची घसरण नोंदवण्यात आली आहे.शुक्रवारी (६ मार्च) दिल्लीच्या सराफा बाजारात सोन्याच्या किमतीत १,१०० रुपयांची घट होऊन भाव १,६४,१०० रुपयांवर आला होता. व्यापाऱ्यांनी सलग दुसऱ्या दिवशी केलेल्या नफाखोरीमुळे ही घसरण झाल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मात्र, आंतरराष्ट्रीय बाजारात भू-राजकीय तणावामुळे सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्याची मागणी वाढली असून, तिथे सोन्याचा भाव ५,०९५.८१ डॉलर प्रति औंसवर पोहोचला आहे.सोन्यापाठोपाठ चांदीच्या किमतीतही मोठी घसरण झाली आहे. एका आठवड्यात चांदी १०,००० रुपयांनी स्वस्त झाली आहे. आज ८ मार्च रोजी सकाळी चांदीचा भाव २,८५,००० रुपये प्रति किलो इतका आहे. विशेष म्हणजे, जानेवारी महिन्यात चांदीने ४ लाख रुपयांचा ऐतिहासिक टप्पा ओलांडला होता, त्या तुलनेत आता मोठी सवलत मिळत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात चांदीचा भाव १.४ टक्क्यांनी वधारून ८३.४० डॉलर प्रति औंस झाला.

# ऑस्ट्रेलियाकडून अतिरिक्त गॅस पुरवठ्याचे आश्वासन

## संकटाच्या काळात भारताला मदतीचा हात!

**नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था**



इराणवर इस्रायल आणि अमेरिकेने केलेल्या हल्ल्यानंतर मध्य-पूर्वेतील परिस्थितीत प्रचंड तणाव निर्माण झाला आहे. या युद्धजन्य स्थितीमुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः हॉर्मुज जलडमरूमध्य या महत्त्वाच्या समुद्री मार्गावरून होणारा पुरवठा बाधित होण्याचा धोका निर्माण झाला आहे.मात्र, अशा कठीण परिस्थितीतही भारत आपली ऊर्जा सुरक्षा टिकवून ठेवण्यासाठी सज्ज झाला असून, सुरक्षित आणि पर्यायी मार्गांचा शोध घेत आहे. सरकारी सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑस्ट्रेलिया आणि कॅनडासह अनेक देशांनी भारताला अतिरिक्त गॅस पुरवठा करण्याची तयारी दर्शवली आहे, ज्यामुळे भारताला मोठा दिलासा मिळाला आहे.मध्य-पूर्वेतील या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, भारताने आता आपल्या तेल आयातीचे धोरण अधिक व्यापक केले आहे. भारताची इंधन सुरक्षा आता केवळ एकाच समुद्री मार्गावर किंवा विशिष्ट क्षेत्रावर अवलंबून नाही. यापूर्वी भारताच्या एकूण तेल आयातीपैकी मोठा हिस्सा हॉर्मुज जलडमरूमध्यातून येत असे, परंतु आता चित्र बदलले आहे. भारत आपल्या गरजेचा उर्वरित कच्चा तेल इतर सुरक्षित मार्गांनी मिळवत आहे, ज्यावर सध्याच्या तणावाचा कोणताही




परिणाम झालेला नाही. भारताने गेल्या काही वर्षांत आपल्या तेल पुरवठ्याचे जाळे इतके विस्तारले आहे की, आता आपला देश रशिया, पश्चिम आफ्रिका, अमेरिका खंड, मध्य आशिया आणि खाडी क्षेत्राबाहेरील मध्य-पूर्व देश अशा तब्बल ४० देशांकडून इंधन आयात करत आहे. सहा खंडांमध्ये पसरलेल्या या २७ हून अधिक देशांसोबतचे हे व्यावसायिक संबंध भारताची ऊर्जा सुरक्षा अधिक सक्षम करत आहेत.याशिवाय, भारताने अमेरिका आणि संयुक्त अरब अमिराती सारख्या प्रमुख देशांसोबत ऊर्जा पुरवठ्याबाबत नवी आणि दीर्घकालीन करार केले आहेत. या करारांचा मुख्य उद्देश भविष्यात इंधनाचा पुरवठा विस्कळीत होऊ नये आणि स्थिरता कायम राहावी हा आहे. जागतिक स्तरावर सुरू असलेल्या या तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत गेल्या काही दिवसांत १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. असे असतानाही, केंद्र सरकारच्या कुशल धोरणांमुळे भारतात पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर राहण्यास मदत झाली आहे.इतर देशांच्या तुलनेत भारताने इंधन दरवाढीवर प्रभावीपणे नियंत्रण मिळवले आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास, पाकिस्तानमध्ये पेट्रोलच्या किमती ५५ टक्क्यांनी वाढल्या आहेत, तर जर्मनी आणि फ्रान्समध्ये अनुक्रमे २२ आणि १९ टक्क्यांचा मोठा फटका बसला आहे. अमेरिकेतही इंधन किमतीत ११ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. याउलट, भारतात याच काळात पेट्रोलच्या किमतीत १ टक्क्यापेक्षाही कमी वाढ झाली आहे.

## भारत बनला 'अब्जाधीशांचा कारखाना'! दर आठवड्याला एक नवा अब्जाधीश

**नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था**

भारत आता 'अब्जाधीशांचा कारखाना' बनला आहे. हुरुन ग्लोबल रिच लिस्ट २०२६ हे सिद्ध करते. या वर्षी, भारताची संपत्ती इतक्या वेगाने वाढली आहे की, दर आठवड्याला सरासरी एक नवीन चेहरा अब्जाधीशांच्या यादीत सामील झाला आहे. चीन आणि अमेरिकासारख्या दिग्गजांशी स्पर्धा करत, भारत आता जगातील तिसरा सर्वांत मोठा 'अब्जाधीश केंद्र' बनला आहे. यावर्षी, भारतीय श्रीमंतांच्या यादीत ५७ नवीन नावे जोडली गेली, त्यामुळे देशातील अब्जाधीशांची एकूण संख्या ३०८ झाली. या अब्जाधीशांची एकत्रित संपत्ती अंदाजे ११२ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे.आज जगभरात ४,०२० अब्जाधीश आहेत, ज्यात एलोन मस्क ७९२ अब्ज



डॉलर्ससह यादीत आघाडीवर आहेत, संपत्तीच्या या शर्यतीत, रिलायन्सचे अध्यक्ष मुकेश अंबानी पुन्हा एकदा भारत आणि आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून उदयास आले आहेत.

गौतम अदानी ७.५ लाख कोटी रुपयांच्या एकूण संपत्तीसह त्यांच्या मागे दुसऱ्या स्थानावर आहेत. रोशनी नादर मल्होत्रा ३.२ लाख कोटी रुपयांच्या एकूण संपत्तीसह भारतातील टॉप १० श्रीमंत व्यक्तींमध्ये एकमेव महिला आहेत. दरम्यान, सायरस पूनावाला यांच्या कुटुंबात ४४% ची मोठी वाढ झाली आहे, ज्यामुळे त्यांची संपत्ती ३ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. आरोग्यसेवा क्षेत्राने सर्वाधिक नवीन अब्जाधीश निर्माण केले आहेत, ज्यात ५३ आहेत. त्यानंतर औद्योगिक उत्पादने आणि ग्राहकोपयोगी वस्तूंचा क्रमांक लागतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ऊर्जा क्षेत्रात फक्त आठ अब्जाधीश आहेत.भारतीय अब्जाधीशांची सरासरी संपत्ती अंदाजे ३६,५७० कोटी इतकी आहे, जी चिनी अब्जाधीशांच्या सरासरी संपत्तीपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक आहे. हे स्पष्टपणे दर्शविते की, भारतात संपत्ती निर्मिती अधिक मोठ्या प्रमाणात आणि व्यापक प्रमाणात होत आहे.स्वप्नांचे शहर, मुंबईने पुन्हा एकदा केवळ भारताचीच नव्हे तर जगाची 'पैशाची राजधानी' म्हणून आपले स्थान सिद्ध केले आहे.

## इराण-इस्रायल युद्धाच्या तणावामुळे व्यापार संकट; भारतीय बंदरांवर हजारो कंटेनर पडले अडकून

**नवी दिल्ली: दि.८ वृत्तसंस्था**

मध्य पूर्वेतील वाढत्या युद्ध आणि भू-राजकीय तणावामुळे जागतिक व्यापार मार्गांवर, विशेषतः होर्मुझच्या सामुद्रधुनी आणि पर्शियन आखातातून जाणाऱ्या पुरवठा साखळ्यांवर खोलवर परिणाम झाला आहे. याचा परिणाम आता भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील बंदरांवर, जसे की जेएनपीटी (नवी मुंबई) आणि मुंद्रा बंदर (गुजरात) थेट दिसून येत आहे, जिथे लॉजिस्टिक कोंडी गंभीर पातळीवर पोहोचली



आहे.युद्धाभोवतीच्या अनिश्चिततेमुळे प्रमुख शिपिंग कंपन्यांनी बुकिंग स्थगित केली आहे आणि केप ऑफ गुड होप सारख्या लांब पल्ल्याच्या मार्गांवर जहाजे वळवली आहेत. परिणामी, उच्च-मूल्य असलेल्या कृषी आणि औद्योगिक उत्पादनांसह हजारो कंटेनर भारतीय बंदरांवर अडकले आहेत.जेएनपीटीवर ५,००० हून अधिक कंटेनर ग्राउंड आहेत, स्टोरेज आणि वीज शुल्क प्रति कंटेनर दररोज सरासरी ८,५०० आहे. घाऊक बाजारात पोहोचणारा अतिरिक्त साठा शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे नुकसान करत आहे. मध्य पूर्वेतील युद्धाचा भारताच्या पुरवठा साखळीवर खोलवर परिणाम होत आहे. जर इस्रायल-इराण संघर्ष सुरू राहिला तर कृषी निर्यात, औद्योगिक उत्पादन, ऊर्जा सुरक्षा आणि देशांतर्गत किमतींवर परिणाम व्यापक आणि दीर्घकालीन असेल.

## थोडक्यात

### विविध राज्य पुरस्कारांसाठी अर्ज मागविले

**नागपूर :** समाज कल्याण क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोदणीकृत स्वयंसेवी संस्था व या क्षेत्रामध्ये क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणारे समाज सेवक यांना दरवर्षी विविध पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात येते. सन २०२४-२५ व २०२५-२६ या आर्थिक वर्षात देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांसाठी १५ मार्चपर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. ज्या वर्षासाठी पुरस्कारांकरीता अर्ज करण्यात येत आहे त्या वर्षासाठी त्या पुरस्कारासाठी विहित केलेल्या अटीची पुर्तता करणे आवश्यक राहील. सन २०२४-२०२५ या वर्षांकरीता पात्रतेचा कालावधी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ व २०२५-२६ या वर्षांकरीता पात्रतेचा कालावधी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ असा विचारात घेण्यात येईल.

### शेतकरी प्रशिक्षण १० मार्च रोजी

**नागपूर :** सन २०२८-२६ या आर्थिक वर्षात जिल्हास्तरावर खरेदीदार-विक्रेता आयोजन १० मार्च रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी नागपूर येथील शेतकरी प्रशिक्षण सभागृह परिसर येथे करण्यात आले. जिल्हास्तरावर आयोजित खरेदीदार-विक्रेते त्यानुषंगाने प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत तालुक्यातील बँक कर्ज मंजूर होऊन प्रकल्पांचे उत्पादन सुरु झाले आहे, अशा उत्पादकांची खरेदीदार-विक्रेता व्दारे भेट करुन त्यांच्यामध्ये करार करणे आहे. संमेलनात २५ ते ३० स्टॉल उद्योजकाना मोफत देऊन उद्योजक आपल्या उत्पादकांचे प्रदर्शन करून विक्री आणि करार करू शकणार आहेत.

### 'एचपीव्ही' लसीकरण सुरू

**नागपूर :** नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत राज्य शासनाच्या सूचनेनुसार शहरात एचपीव्ही लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत नागपूर महानगरपालिकेतील ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांद्वारे सोमवार ०९ मार्च २०२६ पासून लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत १४ ते १५ वर्ष वयोगटातील (१५ वा वाढदिवस न झालेल्या) मुलींना एचपीव्ही लस देण्यात येणार आहे. शहरातील गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या विशेष मोहिमेत एकूण ११,२२९ मुलींना लसीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ही मोहीम ९० दिवसांच्या कालावधीत राबविण्यात येणार असून त्यानंतर ही सेवा नियमित लसीकरण सत्रामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. सदर एचपीव्ही लस खाजगी रुग्णालयांमध्ये ३ हजार रुपयांपेक्षा जास्त किमतीत उपलब्ध असते. मात्र शासनातर्फे नागपूर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या ५१ UPHC केंद्रांमध्ये ही लस पात्र मुलींना मोफत उपलब्ध करून देण्यात येईल असे आव्हाहन मनपाच्या आरोग्य विभागातर्फे करण्यात आलेले आहे.

## निधन

### जगदीश असाटी

**नागपूर :** बेलतरोडी येथील गार्डन कोर्टचे रहिवासी जगदीशकुमार दिगंबरप्रसाद असाटी यांचे आजाराने निधन झाले. ते ५० वर्षांचे होते. जगदीश असाटी यांच्या पार्थिवावर मानेवाडा घाट स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या मागे पत्नी, मुलगा,चार भाऊ आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# नागपुरात रोबोटिक्स-ड्रोन प्रकल्प

## ड्रोन, रोबोट, युएव्हीसह विविध संरक्षण उपकरणांची निर्मिती

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ८ : विकासाच्या दिशेने निघालेले उपराजधानीचे शहर आता 'डिफेन्स हब' अशी नवी ओळख मिळवत आहे सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसच्या वतीने मिहानच्या विशेष आर्थिक क्षेत्रात 'रोबोटिक्स अँड युएव्ही फॅसिलिटी' हा नवा प्रकल्प उभारण्यात येणार आहे.**




सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडकडून उभारल्या जाणाऱ्या या युनिटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित मध्यम उंचीवर आणि लांब पल्ल्याचे उड्डाण करणारे ड्रोन, रोबोट, युएव्ही आणि विविध संरक्षण उपकरणांची निर्मिती केली जाणार आहे. कंपनी अत्याधुनिक तंत्रज्ञानासह पूर्णपणे स्वदेशी उत्पादनावर भर देणार आहे यामुळे मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला बळकटी मिळणार आहे. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील, असा अंदाज आहे. याशिवाय या प्रकल्पामुळे नागपूरची 'डिफेन्स हब' म्हणून ओळख आणखी घट्ट होणार आहे. मिहानमध्ये आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, वित्त व नियोजन राज्यमंत्री आशीष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंग ठाकूर, सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल, व्यवस्थापकीय संचालक मनीष नुवाल, राघव नुवाल, हर्ष नुवाल आदी उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की जगातील संरक्षणाचे क्षेत्र वेगाने बदलत आहे. व्यापाराचाही शस्त्र म्हणून वापर होत आहे. अशा काळात ज्या देशाजवळ सामरिक शक्ती आणि तंत्रज्ञान आहे, तोच देश भविष्यात आघाडीवर असेल. या दिशेने आपला देशही मोठी वाटचाल करत असताना देशाच्या सामरिक शक्तीला नवी दिशा देण्याचे कार्य सोलर समूह करत आहे. एकेकाळी संरक्षण सामग्रीच्या उत्पादन क्षेत्रात कुठलीही स्पष्टता नसताना सोलर समूह या क्षेत्रात कार्य करीत राहिला. आज या समूहाने देशातील आघाडीच्या संरक्षण उत्पादन कंपन्यांमध्ये स्थान मिळवले आहे. अत्याधुनिक ड्रोन असो की पिनाका रॉकेटसारखे तंत्रज्ञान असो, देशाच्या सामरिक शक्तीला नवी दिशा देण्याचे कार्य या समूहाने केले आहे. बदलत्या जगात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान, सेमी कंडक्टर इकोसिस्टीम तसेच क्वांटम टेक्नॉलॉजी महत्त्वाची भूमिका बजावित आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने संरक्षण तंत्रज्ञान, एरोस्पेस आणि डीपटेक क्षेत्रासाठी नवे धोरण तयार केले. सोलरच्या माध्यमातून या धोरणांतर्गत झालेली ही सर्वात मोठी गुंतवणूक आहे, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

### 'सोलर'चे योगदान अभिमानास्पद

**जागतिक स्तरावर संरक्षण सिद्धतेच्या क्षेत्रात होत असलेल्या परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर आम्ही आमची संरक्षणसिद्धता वाढवित आहोत आणि विश्वशांतीसाठी ते अत्यंत आवश्यक आहे. रोबोटिक इंजीन आणि ड्रोनच्या क्षेत्रात मोठी प्रगती होत असून सध्या जगभरात सुरु असलेल्या संघषार्तून त्याची झलकही बघायला मिळत आहे. सोलरचा हा प्रकल्प देखील भविष्यातील तंत्रज्ञानाशी जुळलेला आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात खासगी क्षेत्राची क्षमता लक्षात घेता सरकार या क्षेत्राला प्रोत्साहन देत आहे, असे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले.**

### बेपत्ता अल्पवयीन मुलाचा शोध!

**नागपूर, दि. ८ :** घरून कोणालाही न सांगता निघून गेलेल्या एका मतिमंद अल्पवयीन मुलाचा शोध घेण्यास नागपूर पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाला यश आले आहे. ३ मार्च २०२६ रोजी वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून हा मुलगा बेपत्ता झाला होता. याप्रकरणी अज्ञात आरोपीने फुस लावून पळवून नेल्याच्या संशयावरून तक्रार नोंदवण्यात आली होती. गुन्हे शाखेच्या पथकाने ७ मार्च रोजी मुलाला सुरक्षितरित्या शोधून काढले. तपासात हा मुलगा मतिमंद असून त्याला घरून निघून जाण्याची सवय असल्याचे समोर आले. पोलिसांनी त्याचे समुपदेशन करून त्याला वाठोडा पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त रविंद्र कुमार सिंगल, सह पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त राहुल माकणीकर, सहाय्यक पोलीस आयुक्त अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ललिता तोडासे व त्यांच्या पथकाने फत्ते केली.

# मनपाच्या भव्य 'पिंक मॅरेथॉन' स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ८ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नागपूर महानगरपालिकेतर्फे स्त्री-शक्तीचा जागर आणि आरोग्याचा संदेश देण्यासाठी आयोजित 'पिंक मॅरेथॉन' स्पर्धेला हजारो महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सशक्त भविष्य आणि स्वतःच्या आरोग्यासाठी महिलांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

यशवंत स्टेडियम येथे आयोजित या भव्य स्पर्धेचे उद्धाटन समाजसेविका अमृता देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर नीता ठाकरे होत्या. यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, विविध समिती सभापती दर्शनी धवड, सारिका नांदुरकर, दिव्या




धुरडे, शिवानी दाणी वखरे, अश्विनी जिचकार, निधी तेलगोटे, संतोषदेवी लड्ढा यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., उपायुक्त मिलिंद मेश्राम आणि डॉ. रंजना लाडे याही उपस्थित होत्या. ही स्पर्धा १६ वर्षांखालील ३ किमी, ५ किमी सर्वसाधारण आणि २ किमी विशेष पिंक रन अशा तीन गटांत घेण्यात आली. यात मानसी ठाकरे, पूजा दुबे आणि अश्विनी पांढरे या तीन विजेत्यांना रोख बक्षिसे देण्यात आली. विशेष म्हणजे ७५ वर्षीय शकुंतला काटनाडे यांनी ५ किमीची स्पर्धा पूर्ण केल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. उत्कृष्ट वेशभूषा स्पर्धेत अनुष्का शर्मा, शिवण्या शर्मा, चंचल सोनुले व आनंदी बाबुळ यांना पारितोषिक देण्यात आले. याप्रसंगी अमृता फडणवीस यांनी "महिला सुदृढ तर समाज सशक्त होईल" असे प्रतिपादन केले. कार्यक्रमात नगरसेवक शकील पटेल, पवन कोये, कल्पना शर्मा, डॉ. गजेंद्र महल्ले, मंगेश खवले, डॉ. दीपक सेलोकर, डॉ. पीयूष आंबुलकर, वीरसेन तांबे व डॉ. रिचा सुगंध यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. झुम्बा डान्सच्या उत्साहात महिलांनी आरोग्याप्रति सजग राहण्याचा नवा संकल्प केला.

### ३ किलोमीटर रनचे विजेते

- मिताली भोयर- प्रथम
- अंजली मडावी- द्वितीय
- भव्यश्री महल्ले- तृतीय
- जान्हवी बावणे
- पूजा पंचबुधे
- निकिता शाहू
- स्नेहल जोशी
- भुवनेश्वरी मसराम
- स्वाती पंचबुधे
- संजना जोशी

### ५ किलोमीटर रनचे विजेते

- रुही रामेकर - प्रथम
- हिमांशी बावणे- द्वितीय
- रिशा रामेकर- तृतीय
- मृणाली बुरडे
- नव्या चितळे
- सानिया खान
- अर्णवी महल्ले
- प्रेरणा काळे
- जागृती कामळे
- जान्हवी खराबे

# सुमारे तीन लाखांचे दागिने लंपास

## काटोल मार्गावरील नर्मदा कॉलनीत घरफोडी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ८ :** गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नर्मदा कॉलनी येथे बंद घरातून अज्ञात चोरट्यांनी ३ लाख ७०० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. ही घटना ४ ते ७ मार्च २०२६ दरम्यान घडली.

फिर्यादी आयुष लल्लीन तिवारी (नर्मदा कॉलनी, काटोल रोड सध्या रा. पुणे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे आई-वडील घराला कुलूप लावून कुटुंबासह आजीच्या अंत्यसंस्कारासाठी बनारस आणि त्यानंतर मूळ गावी आरा (बिहार) येथे गेले होते. या कालावधीत घराची सुरक्षा होत नसल्याचा फायदा घेत चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप आणि कडी-कोंडा तोडून बेडरूममधील लाकडी आणि लोखंडी कपाटातून सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. तक्रारीवरून गिट्टीखदान पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिताच्या कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिस उपनिरीक्षक देशमुख या प्रकरणाचा पुढील तपास करत असून, आरोपीचा शोध सुरू आहे.दरम्यान, नागरिकांनी बाहेरगावी जात असल्यास स्थानिक पोलिस ठाण्याला माहिती द्यावी किंवा घरात सीसीटीव्ही कॅमेरे आणि सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ग्रंथांतूनच घडते व्यक्तिमत्त्व - डॉ. संध्या पवार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ८ :** ग्रंथ हे जीवनाचा अविभाज्य घटक असून ग्रंथवाचनामुळे माणसाचे जीवन घडते. आजच्या डिजिटल युगात नवीन पिढीचा कल मोबाईलकडे वाढला असला तरी खऱ्या अर्थान व्यक्तिमत्त्व घडविण्याचे सामर्थ्य ग्रंथांमध्येच आहे. ग्रंथ हे केवळ पुस्तक नसून ते जीवनाला नवा आयाम देतात. त्यामुळे ग्रंथालयांची वाढ आणि ग्रंथविक्रीसाठी ग्रंथोत्सव ग्रामीण भागातही आयोजित होणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संध्या पवार यांनी केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय मुंबई आणि वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था नागपूर




यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नागपूर ग्रंथोत्सव' उद्धाटनप्रसंगी त्या बोलत होत्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय नागपूर-अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोठेकर, संस्थेचे संचालक डॉ. मनोहर कुंभारे, प्र-जिल्हा ग्रंथालय अधिकारी मिनाक्षी कांबळे तसेच ग्रंथपाल रामदास साठे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथपूजन व ग्रंथदिंडीने करण्यात आली.

ग्रंथप्रेमातून ग्रंथांची जोपासना करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. विविध उदाहरणांद्वारे त्यांनी ग्रंथांचे महत्त्व स्पष्ट केले. ग्रंथचळवळ लोकाभिमुख झाल्यास समाजाची साथ मिळेल आणि तेव्हाच खरा ग्रंथोत्सव साजरा होईल.'वाचाल तर वाचाल' असे आवाहन डॉ. पवार यांनी उपस्थितांना केले.

डॉ. गणेश मुळे यांनी भाषणात सांगितले, की ग्रंथ लिहिणारे, प्रकाशित करणारे आणि वाचणारे या तिन्ही घटकांची जोपासना करणे आवश्यक आहे. उत्तम ग्रंथालयांचा लाभ समाजाने घेतला पाहिजे. पुस्तके वाचली नाहीत तर मानवी मनाची जडणघडण परिपक्व होणार नाही. ग्रंथोत्सवामुळे समाजात वाचन संस्कृतीबद्दल आपुलकीची भावना निर्माण होते, असे मत महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोठेकर यांनी व्यक्त केले.

डॉ. मनोहर कुंभारे यांनी सांगितले, की ग्रंथोत्सवामुळे वाचन संस्कृतीला चालना मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितल्याप्रमाणे एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचे पुस्तक घ्या; एक भूक भागवते तर दुसरे ज्ञान देते. ज्ञानवृद्धी करणे हेच ग्रंथोत्सवाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र-जिल्हा ग्रंथालय अधिकारी मीनाक्षी कांबळे यांनी केले.

# लोकशाहीच्या प्रगतीसाठी निवडणूक प्रक्रिया अत्यंत प्रभावी!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ८ :** भारतीय लोकशाहीच्या विकासात निवडणूक प्रक्रिया अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट (पुणे) येथील डॉ. परिमल माया सुधाकर यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाच्या ८० वर्षपूर्तीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी भूषविले. यावेळी लोक प्रशासन विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक यांची विशेष उपस्थिती




होती. 'भारतातील लोकशाहीचे स्वातंत्र्यानंतर निवडणुकीचे राजकारण' या विषयावर बोलताना डॉ. परिमल यांनी भारतीय लोकशाहीच्या प्रवासावर सखोल विवेचन केले. ते म्हणाले की, भारताने लोकशाही शासन पद्धतीचा यशस्वी स्वीकार करून जगासमोर आदर्श निर्माण केला आहे. लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून ती सत्ताविभाजन, न्यायपालिका आणि मूलभूत अधिकारांच्या संरक्षणावर आधारित आहे. १९५१-५२ मधील पहिल्या निवडणुकीत तंत्रज्ञानाचा अभाव असूनही निवडणूक आयोगाने बजावलेली कामगिरी क्रांतिकारी होती. १९५२ ते १९८९ पर्यंतच्या "काँग्रेस सिस्टीम" नंतर प्रादेशिक पक्षांचा उदय आणि आघाडी सरकारांमुळे भारतीय राजकारण अधिक गतिमान झाल्याचेही त्यांनी नमूद केले.

# 'नागपूर फिल्मसिटी' उभारणीची हीच वेळ

**विदर्भात मौल्यवान असे 'कलारत्न' दडलेले आहेत चित्रनगरीच्या माध्यमातून त्यांना कलाविश्वासमोर आणता येईल चित्रीकरणासाठी विविध लोकेशन्स, संगीत-लेखक-अभिनय-तंत्रज्ञ-दिग्दर्शन आदींतील अनेक गुणवान आहेत. नागपुरात फिल्मसिटी निर्माण होण्यास कलाप्रकारांतील विविध प्रकारचे घटक उपलब्ध आहेत नागपूरसह विदर्भात निसर्गसौंदर्य, स्थानिक लोकबोली, वेगवेगळ्या संस्कृतींची भरमार आहे याशिवाय मनुष्यबळ मुबलक प्रमाणात आहेत. विविध कलाप्रकारांतील ज्येष्ठ कलावंतांसह नव्या दमाचे कलावंत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी जाहीर केलेल्या अंदाजपत्रकात 'नागपूर फिल्मसिटी'साठी सुमारे १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.**

**विश्लेषण**
**संजय मुंदलकर**
**९५५२९८१५१४**

विकासाकडे झपाट्याने वेग घेतलेल्या उपराजधानी नागपूर जिल्ह्यात 'नागपूर फिल्मसिटी' उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे आता या प्रक्रियांना वेग देणे गरजेचे आहे कलावंत, तंत्रज्ञ, मनुष्यबळाची कमतरता नसलेल्या विदर्भात 'चित्रनगरी'ची निर्मिती मोठा 'टर्निंग पॉईन्ट' ठरणार आहे.

नागपूर शहर देशाच्या केंद्रस्थानी असून, या जिल्हा मुख्यालयापासून आंध्रप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि मध्य प्रदेशाची सीमा फारशी दूर नाही दक्षिणेतील दोन्ही राज्ये चित्रपटनिर्मितीसाठी प्रसिद्ध आहेत याशिवाय छत्तीसगडी चित्रपटांचीही निर्मिती मोठ्या संख्येत होत असते ही बाब लक्षात घेता 'नागपूर फिल्मसिटी' महाराष्ट्रासह एकूण ५ राज्यांसाठी महत्त्वाचे व्यावसायिक व्यासपीठ ठरणार आहे

मुंबई, कोल्हापूरच्या धर्तीवर नागपुरातही 'फिल्मसिटी' असावी, असा निर्णय तत्कालीन सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी घेतला होता यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी मौदा, कळमेश्वर आणि रामटेक तालुक्यातील तीन जागांची प्राथमिकस्तरावर निवड केली होती पुढील प्रक्रियांत रामटेकजवळील नवरगांव येथील जागेवर शिक्कामोर्तब करण्यात आले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष लक्ष दिल्याने भूसंपादनाची प्रक्रिया सुरू झाली.

मंत्रिद्वय ॲड. आशीष शेलार आणि ॲड.आशीष जयस्वाल यांनी १५ सप्टेंबर २०२५ रोजी रामटेक शेजारील नवरगांव येथे प्रस्तावित चित्रनगरीच्या जागेची पाहणी केली. यानंतर रामटेक येथे बैठकीत अधिकाऱ्यांना काही सूचना केल्या होत्या स्थानिक कलाकारांना योग्य मंच उपलब्ध करून देत विदर्भात चित्रपट निर्मिती आणि रोजगाराच्या संधी निर्माण होण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात रामटेक येथे चित्रनगरी उभारण्यात येत आहे. या कामाला गती देण्याच्या दिशेने महत्त्वाचे दोन निर्णय झाले असून,याअंतर्गत महसूल विभागाच्या मालकीची ६० एकर जागा चित्रनगरीसाठी हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले होते

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. शेलार यांच्या नेतृत्वात ४ सप्टेंबर २०२४ रोजी चित्रपट क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत पार पडलेल्या बैठकीत 'नागपूर फिल्मसिटी'चा निर्णय घेण्यात आला मौजा नवरगांव येथे सर्वे क्रमांक ७९/१ आणि क्षेत्र ५१.३४ हेक्टर (१२८.३५ एकर) इतके क्षेत्र असलेल्या शासकीय मालकीच्या जमिनीचे संपादन करण्याचेही निश्चित करण्यात आले १५ ऑक्टोबर २०२५ रोजी 'फिल्मसिटी' उभारण्यास शासकीय मान्यता प्रदान करण्यात आली ही प्रक्रिया पार पडल्यानंतर यानंतरची पुढील कार्यवाही महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या (मुंबई) संचालकांना पार पाडावी लागणार आहे.

# सहाय्यक संचालक भरतीचा निकाल रखडला

## उमेदवार अडीच वर्षांपासून प्रतीक्षेत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ८ :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) इतर मागास बहुजन कल्याण विभागातील सहाय्यक संचालक पदाच्या भरतीचा अंतिम निकाल अद्याप जाहीर न झाल्याने उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी आहे. आयोगाने ५ डिसेंबर २०२३ रोजी २६ जागांसाठी ही भरती प्रक्रिया जाहीर केली होती.

या पदासाठी २५ डिसेंबर २०२४ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली आणि २१ जानेवारी २०२६ रोजी मुलाखतींची प्रक्रियाही पूर्ण झाली. मात्र, मुलाखती होऊन दीड महिना उलटला तरी अद्याप निवड यादी आणि शिफारस यादी प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. इतर मागास बहुजन कल्याण विभाग हा राज्य शासनाचा नवा विभाग असून, भटक्या जमाती, ओबोसी व विमुक्त जातींसाठीच्या कल्याणकारी योजना या विभागामार्फत राबवल्या जातात. अनेक जिल्ह्यांत सहाय्यक संचालकांची पदे रिक्त असल्याने कार्यालयांचा डोलारा प्रतिनियुक्ती किंवा अतिरिक्त कार्यभारावर अवलंबून आहे. प्रशासकीय कामात अडथळे येत असल्याने, आयोगाने या भरतीचा निकाल तातडीने जाहीर करावा, अशी मागणी उमेदवारांनी केली आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला

अकोला, सोमवार, दि. ९ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

## महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आज

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन आज, सोमवार, दिनांक ९ मार्च रोजी दुपारी १:३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, महानगरपालिका अकोला येथे करण्यात आले आहे. या विशेष सभेमध्ये प्रामुख्याने तीन महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने अकोला महानगरपालिका हद्दीतील वार्षिक भाड्यावरील दुकाने व प्लॉट्सच्या वाणिज्य वापरासाठी, १२ जुलै २०१८ च्या ठराव क्र. १२ अन्वये मंजूर असलेल्या रेडी रेकनर दरांमध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबतचा विषय महासभेत मांडला जाणार आहे. याशिवाय, शहरात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल्सचे रि-बोअरिंग करून त्या दुरुस्त करण्याबाबत चर्चा केली जाईल. तसेच, अकोला महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतच्या विषयावरही निर्णय घेतला जाणार आहे. या सभेची माहिती महानगरपालिका आयुक्तांनाही सादर करण्यात आली आहे.

### महत्त्वाचे

## शास्ती माफीला २० मार्चपर्यंत मुदतवाढ

**अकोला :** महानगरपालिका प्रशासनाने थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफीच्या योजनेला मिळत असलेला प्रतिसाद पाहून, १०० टक्के सवलतीच्या मुदतीत २० मार्च २०२६ पर्यंत वाढ केली आहे. आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार आता ही योजना सुधारित टप्प्यांत राबवली जाणार आहे. टप्पा २: ९ ते २० मार्च या काळात थकीत कराचा भरणा केल्यास शास्तीच्या रकमेत १०० टक्के सूट मिळेल. टप्पा ३: २१ ते ३१ मार्च या काळात भरणा केल्यास शास्तीच्या रकमेत ९० टक्के सूट दिली जाईल. नागरिकांच्या सोयीसाठी मनपाचे मुख्य कार्यालय आणि चारही झोन कार्यालये शनिवार, रविवार व सुटीच्या दिवशीही सुरू राहणार आहेत. ज्या मालमत्ताधारकांनी आपला कर ऑनलाइन पद्धतीने भरल्यास त्यांना सामान्य करात अतिरिक्त ३ टक्के सूट देण्यात येईल. थकीत व चालू वर्षाचा कर एकरकमी भरून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने आणि उपायुक्त विजय पारतवार यांनी केले आहे.

## अकोल्यात आता ट्रॉमा केअर सेंटरसह प्रादेशिक मनोरुग्णालय

**अकोला:** अकोला जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक व्यापक आणि सक्षम करण्यासाठी आरोग्य विभाग सातत्याने प्रयत्नशील असून, या दिशेने काही महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात आली आहेत. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ११ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत अकोल्यात ट्रॉमा केअर सेंटर आणि प्रादेशिक मनोरुग्णालय (मनोचिकित्सालय) सुरू करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यांच्या निर्देशानुसार, गेल्या तीन महिन्यांतच आरोग्य विभागाने अत्यंत सक्रियता दाखवली आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त ‘अजिंक्य मी’तर्फे विशेष आरोग्य शिबिर

# अनेक महिलांनी घेतला आरोग्य शिबिराचा लाभ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ६ :** महिलांच्या कलागुणांना वाव देणारे आणि अल्पावधीतच मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय ठरलेले ''अजिंक्य मी'' हे व्यासपीठ समाजोपयोगी उपक्रमांमधूनही पुढाकार घेत आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत अजिंक्य मीतर्फे महिलांसाठी नामांकित आयकॉन हॉस्पिटल येथे रविवार ८ मार्चपासून विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून पहिल्याच दिवशी शेकडो महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला.






हे शिबिर दिनांक ८ मार्च ते १२ मार्च या कालावधीत आयकॉन हॉस्पिटल, अकोला येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात अजिंक्य मीच्या सदस्य महिलांसाठी सीबीसी, टीएसएच, पॅप स्मिअर आणि रँडम ब्लड शुगर यांसारख्या महत्त्वाच्या आरोग्य चाचण्या केवळ ५० रुपये शुल्कामध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या सर्व चाचण्या आयकॉन हॉस्पिटलमधील उच्चशिक्षित तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहेत.

या उपक्रमाचा जास्तीत जास्त महिला वर्गाने लाभ घ्यावा, असे आवाहन अजिंक्य मी संस्थेच्या संचालक सौ. तनुजा सुगत वाघमारे आणि आयकॉन हॉस्पिटलचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. राजेश काटे यांनी केले आहे.

**या आरोग्य शिबिराची संकल्पना अजिंक्य मीच्या संचालक तनुजा वाघमारे यांची असून, तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी, अजिंक्य मी, अजिंक्य भारत न्यूजची टीम तसेच आयकॉन हॉस्पिटलचे सहकारी व पदाधिकारी यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्याच्या दृष्टीने आयोजित केलेले हे शिबिर महिलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.**

# शहराचा श्वास कोंडला: बांधकाम साहित्याचा रस्त्यांवर कब्जा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ८ :** अकोला शहराच्या कानाकोपऱ्यात सध्या बांधकामांचा सपाटा सुरू आहे. मात्र, या बांधकामासाठी लागणारे साहित्य थेट रस्त्यांवर आणि खुल्या जागांमध्ये टाकले जात असल्याने शहराचा श्वास गुदमरत आहे. महापालिकेच्या उदासीनतेमुळे बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स आणि बांधकामधारकांचे चांगलेच फावत असून, यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. शहरातील मुख्य रस्त्यांपासून ते गल्लीबोळांपर्यंत शेकडो सप्लायर्सनी बेकायदेशीरपणे आपले व्यवसाय थाटले असून, महापालिका प्रशासन याकडे डोळेझाक करत असल्याचे चित्र आहे.



**या भागात आहे सर्वाधिक उपद्रव शहराच्या सर्वच दिशांना हे अवैध व्यवसाय फोफावले आहेत. यात प्रामुख्याने खालील भागांचा समावेश आहे.**
रिंग रोड, खदान, कौलखेड आणि खडकी.
मलकापूर, उमरी, डाबकी रोड आणि अकोट फैल.
गीता नगर, वाशिम बायपास, किल्ला चौक ते बाळापूर नाका.
हरिहर पेठ ते वाशिम बायपास रोड आणि शिवणी परिसर.

शहरातील विविध भागांत बिल्डिंग मटेरियल सप्लायर्सनी रस्त्याच्या कडेलाच गिट्टी, विटा, रेती, मुरुम आणि क्रेशर साहित्याचे ढीग लावले आहेत. हे साहित्य अनेक ठिकाणी थेट रस्त्याच्या मधोमध येत असल्याने वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. विशेषतः रिंग रोड, वाशिम बायपास आणि डाबकी रोडसारख्या वर्दळीच्या मार्गांवर यामुळे वाहतुकीची कोंडी नित्याची झाली आहे.

केवळ रस्तेच नव्हे, तर वस्त्यांमधील रिकाम्या जागा आणि ओपन स्पेसवरही या माफियांचे अतिक्रमण झाले आहे. नागरिक आपल्या बांधकामाचे साहित्य, सेंट्रिंगचे लाकूड आणि लोखंडी सळया कित्येक दिवस या जागेत टाकून ठेवतात. यामुळे लहान मुलांना खेळण्यासाठी जागा उरलेली नाही. सरकारी निधीतून होणाऱ्या कामांचे कंत्राटदार तर काम संपल्यावरही टाकाऊ (वेस्टेज) साहित्य उचलण्याची तसदी घेत नाहीत; परिणामी परिसरात अस्वच्छता आणि अडथळे निर्माण होत आहेत.

**कारवाईची मागणी:** आयुक्तांकडे लक्ष तक्रार करायला कुणी समोर येत नसल्याने या विक्रेत्यांची मुजोरी दिवसेंदिवस वाढत आहे. महापालिका आयुक्तांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन झोननिहाय सर्वे क्षण करावे आणि दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## स्मार्ट कार्ड योजनेवर प्रवाशांची तीव्र नाराजी; योजना स्थगित करण्याची परिवहन मंत्र्यांकडे मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ८ :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने राज्यभरात लागू केलेल्या स्मार्ट कार्ड योजनेबाबत प्रवाशांमध्ये असंतोष पसरला असून, ही योजना तात्काळ स्थगित करून त्यावर पुनर्विचार करावा, अशी मागणी निलेश देव यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या योजनेमुळे विशेषतः ग्रामीण भागातील प्रवासी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.




सवलतीच्या प्रवासासाठी स्मार्ट कार्ड अनिवार्य केल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवाशांवर नाहक आर्थिक भार पडत असून, ग्रामीण व दुर्गम भागात कार्ड वितरण केंद्रांची मोठी कमतरता असल्याचे देव यांनी निदर्शनास आणून दिले आहे. तांत्रिक सुविधांचा अभाव आणि पुरेशा मार्गदर्शनाअभावी प्रवाशांना वारंवार आगारांच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. तसेच, प्रवासादरम्यान नेटवर्कच्या समस्या, मशिन्समध्ये होणारे बिघाड आणि इतर तांत्रिक अडचणींमुळे तिकीट मिळण्यास विलंब होतो, ज्यातून अनेकदा प्रवाशांना अपमानास्पद प्रसंगांनाही सामोरे जावे लागते.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि डिजिटल साक्षरता कमी असलेल्या प्रवाशांसाठी ऑनलाइन नोंदणी व पडताळणीची प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट ठरत आहे. पूर्वी केवळ ओळखपत्राच्या आधारे मिळणारी सवलत आता स्मार्ट कार्डच्या सक्तीमुळे प्रशासकीय गुंतागुंतीत अडकली आहे. त्यामुळे ही योजना तूर्तास स्थगित करून, स्मार्ट कार्डची सक्ती रद्द करावी आणि पूर्वीप्रमाणेच ओळखपत्रावर सवलत द्यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. तांत्रिक व्यवस्था पूर्णपणे सक्षम होईपर्यंत ही योजना टप्प्याटप्प्याने राबवावी, जेणेकरून लाखो प्रवाशांची होणारी गैरसोय थांबेल, असेही निलेश देव यांनी परिवहन मंत्र्यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

## ॲड. विनोद फाटे यांच्या मातोश्री द्वारकाबाई फाटे यांचे निधन आज पहूरजिरा येथे अंत्यविधी

**अकोला :** येथील प्रसिद्ध विधितज्ज्ञ ॲड. विनोद प्रल्हादराव फाटे यांच्या मातोश्री द्वारकाबाई प्रल्हादराव फाटे (८९) यांचे रविवारी, ८ मार्च रोजी वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.



स्व. द्वारकाबाई या अत्यंत धार्मिक आणि प्रेमळ स्वभावाच्या होत्या. त्यांच्या निधनाने फाटे परिवारावर शोककळा पसरली आहे. त्यांचा अंत्यविधी आज , सोमवार ९ मार्च २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता पहूरजिरा (ता. शेगाव, जि. बुलढाणा) येथील स्थानिक स्मशानभूमीत पार पडणार आहे.

## विमानतळ विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा

**अकोला:** अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणाची गेल्या अनेक वर्षांपासून असलेली प्रतीक्षा आता संपली असून, राज्य सरकारच्या अर्थसंकल्पीय घोषणेमुळे या प्रकल्पाला मोठी गती मिळणार आहे. शिवनी विमानतळावरून नियमित विमान उड्डाणे सुरू करणे आणि रात्रीच्या वेळी विमानांचे लँडिंग सुलभ व्हावे, यासाठी सध्याच्या १,४०० मीटर धावपट्टीची लांबी १,८०० मीटरपर्यंत वाढवण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीपैकी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची ६० हेक्टर जमीन २०१६ मध्येच संपादित करून भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे सुपूर्द करण्यात आली होती. मात्र, उर्वरित २२.१४ हेक्टर खाजगी जमिनीचे संपादन प्रलंबित असल्याने कामात अडथळा येत होता. या प्रलंबित कामासाठी राज्य सरकारने गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये २०८ कोटी रुपयांच्या खाजगी जमीन खरेदीच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानंतर, ६ मार्च रोजी सादर झालेल्या राज्य अर्थसंकल्पात अकोला विमानतळाच्या विस्तारीकरणाचे काम याच वर्षी सुरू होणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. या घोषणेमुळे आता प्रत्यक्ष भूसंपादनाच्या प्रक्रियेला वेग येणार आहे. अकोला उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २२.१४ हेक्टर खाजगी जमीन संपादित करण्यासाठी २०८ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला आधीच मान्यता मिळाली असून, महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाकडून औपचारिक प्रस्ताव प्राप्त होताच भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने सुरू केली जाईल.

## अकोल्यात क्रिकेटचा ज्वर...



**अकोला: कौटुंबिक आणि क्रीडाप्रेमींच्या गराड्यात रविवारी अकोला शहरात क्रिकेटचा अभूतपूर्व ज्वर पाहायला मिळाला. निमित्त होते भारत विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात खेळल्या जाणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्याचे. या ऐतिहासिक लढतीचा आनंद घेण्यासाठी कौलखेड परिसरातील न्यू खेतान नगर येथील जय भवानी नवदुर्गा उत्सव मंडळ वतीने भव्य एलईडी स्क्रीनवर थेट प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते.**

## थकबाकीदारांवर मोठी कारवाई; मालमत्तांना लावले टाळे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ८ :** महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता कराची वसुली प्रभावीपणे करण्यासाठी प्रशासनाने आता कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ७ मार्च रोजी पूर्व झोन अंतर्गत येणाऱ्या विविध भागांतील मोठ्या थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली.

या कारवाईत जुना राधाकिसन प्लॉट येथील कमल अंभोरे यांच्या मालमत्ता क्रमांक २३५८ आणि २३५९ वर सन २०१६-१७ पासून प्रत्येकी ५९,१२९ रुपये, तसेच जठारपेठ येथील श्रीहरी नगरमधील सरिता दुबे (मालमत्ता क्र. ८२९) यांच्याकडे ५४,५९६ रुपये आणि सुधा डिडोळकर (मालमत्ता क्र. १०७८) यांच्याकडे ७८,४२३ रुपये कर थकीत असल्याने कारवाईचा बडगा उगारण्यात आला. वॉर्ड क्रमांक ५ मधील उदय देशमुख यांच्याकडे सन २०२१ ते २०२६ या कालावधीतील ३,६७,७९५ रुपये आणि शांताबाई व्यास यांच्याकडे सन २०१६-१७ पासूनची ३,१५,२२२ रुपये थकबाकी असल्याने त्यांच्या मालमत्तांवर टाच (जप्ती) आणण्यात आली. तसेच दुर्गा चौक येथील श्रद्धा वाखरकर (९७,११८ रुपये) आणि श्रीकांत पराडकर (६७,९७७ रुपये) यांच्या मालमत्तांवरही थकीत करामुळे जप्तीची कारवाई करण्यात आली. सदर मोहिमेत जप्ती पथक प्रमुख सुधीर मिसुरकर, कर वसुली लिपिक शुभम रील, राजेश साळुंखे, संतोष पांडे, दीपराज महल्ले, संतोष वेले, जय मोरे, विठोबा दळू, संतोष राजे, गणेश पद्मने आणि महिला सुरक्षा रक्षक संगीता शिंदे यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवला.

### आयोजन | शंभू ग्रुप व तिक्ष्णगत सोसायटीचा स्तुत्य उपक्रम

# ‘बालविवाह रोखा‘ संदेशासह साजरी झाली शिवजयंती

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ८ :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शंभू ग्रुप (राजंदा) आणि तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, राजंदा येथे विविध स्पर्धांचे उत्स्फूर्त आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या माध्यमातून शिवरायांच्या विचारांचा वारसा जपण्यासोबतच सामाजिक प्रश्नांवरही भाष्य करण्यात आले.




या महोत्सवांतर्गत शंभू ग्रुपच्या वतीने आकर्षक रांगोळी स्पर्धा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या देदीप्यमान जीवनावर आधारित माहितीपर पेपर सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. तसेच, तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली (बालविवाह रोखा) हा सामाजिक संदेश देणारी विशेष रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या सोहळ्यास शंभू ग्रुप मित्र परिवाराचे सर्व सदस्य तसेच तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटीचे सदस्य उमेश शिरसाट, श्वेता शिरसाट, यश साळवे, करण पळसपगार, अंकुश शिरसाट आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य सुनील बैस, एकराज चव्हाण, विजय ढुके, हुरसाळ सर, डाबेराव सर, भटकर मॅडम, पाथ्रीकर सर, आंधळे सर यांच्यासह सर्व शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### दिमाखदार बक्षीस वितरण सोहळा

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे अत्यंत उत्साहात पार पडला. शंभू ग्रुपच्या वतीने सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तिक्ष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटीच्या वतीने घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेत इयत्ता ५ ते ७ (अ गट) आणि इयत्ता ८ ते १० (ब गट) अशा दोन गटांतून विजेत्यांची निवड करण्यात आली. दोन्ही गटांतील प्रथम, द्वितीय, तृतीय आणि दोन प्रोत्साहनपर पारितोषिके देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

## टी-२० विश्वचषक; १०,००० कोटींच्या सट्टेबाजीची चर्चा

### नागपूर, गोवा व अकोल्यातूनही झाल्या तक्रारी; उच्चस्तरीय चौकशीची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ८ :** अहमदाबाद येथे भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्याच्या पार्श्वभूमीवर देशात सुमारे १०,००० कोटी रुपयांच्या अवैध क्रिकेट सट्टेबाजी रॅकेटची चर्चा सुरू झाली असून, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे. गोव्यातील रायबंदर (पणजी) येथील नागरिक दिलीप शेट्ये यांनी या संदर्भात पोलिसांकडे लेखी तक्रार दिली असून, नागपूरमधूनही ई-मेलद्वारे तक्रार नोंदविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.




या तक्रारींना ‘हिंदू जनजागृती समिती’ व ‘सुराज्य अभियान’ यांनी जाहीर समर्थन दिले असून, या संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशी करावी, अशी मागणी सुराज्य अभियानाच्या अकोला समन्वयक अधिवक्ता श्रुती भट यांनी केली आहे. अधिवक्ता श्रुती भट यांनी सांगितले की, ''हाय-टेक मोबाईल ॲप्स, ऑफशोअर सर्व्हर आणि डिजिटल पेमेंटच्या माध्यमातून चालणाऱ्या या आंतरराष्ट्रीय सट्टेबाजी रॅकेटचे धागेदोरे अकोल्यासारख्या शहरांपर्यंत पोहोचले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही वृत्तपत्रांमध्येही या सट्टेबाजीबाबत वृत्त प्रसिद्ध झाले आहे. अशा परिस्थितीत पोलिसांनी स्वतःहून दखल घेऊन तातडीने कारवाई करणे आवश्यक आहे.''

त्यांनी पुढे सांगितले की, फेब्रुवारी २०२५ मध्ये अकोला जिल्ह्यातील एमआयडीसी परिसरातील फार्महाऊसवर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून ३३ जणांना अटक केली होती, ज्यामुळे जिल्ह्यात क्रिकेट सट्टेबाजीचे जाळे असल्याचे स्पष्ट झाले होते. त्यामुळे या नव्या प्रकरणाचीही सखोल चौकशी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. सुराज्य अभियानाच्या मते, एवढ्या मोठ्या प्रमाणावर चालणारी अवैध सट्टेबाजी ही देशाच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेला धक्का देणारी बाब आहे. अनेकदा कारवाईत केवळ लहान बुकी पकडले जातात; मात्र या रॅकेटमागील मुख्य सूत्रधार अद्याप समोर येत नाहीत. त्यामुळे या प्रकरणात ‘मोठ्या माशांपर्यंत’ पोहोचण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. ''देशाची आणि क्रिकेटची बदनामी रोखण्यासाठी या रॅकेटवर तातडीने निर्णायक कारवाई होणे गरजेचे आहे.

महत्त्वाचे

## रामापूरची कन्या ज्ञानेश्वरी ठाकरे झाली सीए



**अकोट, दि. ८ :** सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या रामापूर येथील कु. ज्ञानेश्वरी प्रदीप ठाकरे हिने वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी सीए (चार्टर्ड अकाउंटंट) ही देशातील अत्यंत कठीण परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. रामापूर गावाची पहिली महिला सीए होण्याचा बहुमान तिने पटकावला असून, या यशामुळे संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. ज्ञानेश्वरीचे वडील प्रा. प्रदीप ठाकरे व आई (गृहिणी) यांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे यश संपादन केले. ठाकरे कुटुंब नोकरीनिमित्त चिखली येथे स्थायिक असून, ज्ञानेश्वरीचे प्राथमिक शिक्षण तेथील आदर्श कॉन्व्हेंटमध्ये झाले. जिद्द, चिकाटी आणि पुण्यात घेतलेल्या अथक परिश्रमाच्या जोरावर तिने हे स्वप्न साकारले. आई-वडील आणि गुरुजनांच्या पाठिंब्यामुळेच हे शिखर गाठता आले, अशी भावना तिने व्यक्त केली.

## अ.भा. ग्रामीण पत्रकार संघाच्या नियुक्त्या जाहीर!

**अकोला :** अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाची विशेष बैठक शनिवार, ७ मार्च रोजी वारी हनुमान मंदिरात मोठ्या उत्साहात पार पडली. संघटनेचे बळकटीकरण आणि विस्तारासाठी या बैठकीत जिल्हा व तालुकास्तरावरील महत्त्वपूर्ण पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल कवळकार होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून पश्चिम विदर्भ अध्यक्ष पुरुषोत्तम इंगोले यांची विशेष उपस्थिती होती. तसेच पश्चिम विदर्भ कार्याध्यक्ष (महिला आघाडी) प्रियंका केदार यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. नंदकिशोर नागपुरे (अकोला जिल्हा उपाध्यक्ष), देवकीनंदन मथारिया (पदवीधर जिल्हा अध्यक्ष), राजपाल दामोदर (जिल्हा उपाध्यक्ष - डिजिटल मीडिया), अर्जुन खिरोडकर (तेल्हारा तालुका अध्यक्ष), अ. शरीफ अ. शाहिद (जिल्हा सचिव) आणि कुलदीप चौरे (अकोट सहसचिव) यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना पुरुषोत्तम इंगोले यांनी ग्रामीण पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी संघटनेने सदैव तत्पर राहावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणात अनिल कवळकार यांनी पत्रकारितेतील नैतिक मूल्ये आणि संघटनेच्या एकतेवर भर दिला. या निवडीबद्दल जिल्ह्यातील पत्रकार वर्तुळातून नूतन पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कष्टाच्या घामावर वीरजण; पैलपाडा शिवारात गव्हाचे उभे पीक जळून खाक!

## शेतकऱ्याचे हजारोंचे नुकसान; पंचनाम्यासाठी कृषी विभागाकडे धाव

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कुरणखेड, दि. ८ :** मुदतीवर आलेले गव्हाचे सोनेरी पीक डोळ्यादेखत जळून खाक झाल्याची हृदयद्रावक घटना पैलपाडा शिवारात घडली. राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या प्रशांत देशमुख यांच्या चार एकर शेतातील उभ्या पिकाला अचानक आग लागल्याने सुमारे ५० ते ६० हजार रुपयांचे नुकसान झाले असून, बळीराजा पुन्हा एकदा संकटाच्या गर्तेत सापडला आहे.

बोरगाव मंजू मंडळ अंतर्गत येणाऱ्या पैलपाडा येथील शेतकरी प्रशांत देशमुख यांनी यंदा चार एकर क्षेत्रात गव्हाची पेरणी केली होती.



पीक काढणीवर आले असतानाच, शनिवारी दुपारी ४:३० वाजताच्या सुमारास अचानक आग भडकली. कडक ऊन आणि वाऱ्यामुळे आगीने रौद्र रूप धारण केल्याने सुमारे एक एकर क्षेत्रातील गहू जागीच भस्मसात झाला. आग नेमकी उन्हाच्या तीव्रतेमुळे लागली की अन्य काही कारणामुळे, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

धूर दिसताच पैलपाडा येथील ग्रामस्थांनी आणि तरुणांनी प्रसंगावधान राखून शेताकडे धाव घेतली. सर्वांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणल्याने उर्वरित तीन एकर पीक वाचवण्यात यश आले. मात्र, हाताशी आलेला घास हिरावला गेल्याने देशमुख कुटुंबियांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या घटनेचा तातडीने पंचनामा करून शासनाने तात्काळ मदत द्यावी, अशी मागणी संतप्त शेतकऱ्यांकडून होत आहे.

## मध्यस्थी करणाऱ्या विद्यार्थ्यावर कड्याने वार

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ८ :** येथील शासकीय पॉलीटेक्निक कॉलेजमध्ये गॅदरिंगच्या उत्साहात रंगात भंग पडल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि. ७) दुपारी घडली. मित्रांमधील वाद सोडवण्यासाठी मध्यस्थी करणाऱ्या एका १७ वर्षीय विद्यार्थ्यावर हातातील कड्याने प्रहार करून त्याला जखमी करण्यात आले. या प्रकरणी मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी एका संशयित आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. दीप गणेश साबळे (वय १७, रा. जुनी वस्ती, मूर्तिजापूर) हा विद्यार्थी कॉलेजमध्ये आयोजित गॅदरिंग कार्यक्रमासाठी उपस्थित होता. दरम्यान, त्याच्या एका मित्रासोबत काही जण विनाकारण वाद घालत असल्याचे त्याच्या लक्षात आले. वाद नेमका कशाचा आहे, अशी विचारणा करण्यासाठी दीप तिथे गेला असता, सुमित रवींद्र मुर्तडकर (रा. आलेगाव, ता. पातूर) याने त्यास अवाच्च सवाच्च शिवीगाळ केली. संतापाच्या भरात सुमितने आपल्या हातातील कड्याने दीपच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला, ज्यामध्ये तो जखमी झाला. तसेच यावेळी जिवे मारण्याची धमकीही देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी दीप साबळे याने दिलेल्या फिर्यादीवरून मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी अप.क्र. ५१/२५ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११८(१), ३५२, ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे शैक्षणिक परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. ठाणेदार श्रीधर गुठे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विजय मानकर या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

## जगाला प्रभू येशूंच्या प्रेम, शांतीची गरज - डॉ. ब्लेसिंग राजकुमार



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुंडगाव, दि. ८ :** सध्याच्या काळात मानवी मूल्ये जपण्यासाठी जगाला प्रभू येशू ख्रिस्ताच्या प्रेम व शांतीच्या शिकवणीची मोठी गरज असल्याचे प्रतिपादन हैदराबाद येथील प्रवक्ते डॉ. ब्लेसिंग राजकुमार यांनी केले. विजयनगर येथे ६ ते ८ मार्च दरम्यान आयोजित तीन दिवसीय ख्रिस्त संगती कार्यक्रमात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी चंद्रपूरचे पास्टर स्टिफन सुंदर यांनीही मार्गदर्शन केले. आशेर व रोहिणी परमार्थ यांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गजानन वानखडे, राजू तायडे, गौतम मोहोड, मोहन घनबहादूर, सरिता तायडे, पंचफुला मोहोड, कल्याणी पाटोळे, शारदा, सीमा व हर्षा तेलगोटे उपस्थित होते. संचालन आशेर परमार्थ यांनी, तर आभार पास्टर रोहिणी परमार्थ यांनी मानले. भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यशस्वीतेसाठी करण भालेराव, आदित्य व तेजस तायडे, संदीप वानखडे, अपर्णा मोहोड, दिव्या, भारती व रंजना तायडे, सुनीता व अनिता जंजाळ, कल्पना व आशा सहारे, आरती खोब्रागडे, नेहा हेरोडे, संगीता व जया वानखडे, पाळक डेव्हिड नाईक, दिनेश रायबोले, उमेश वानखडे, कैलास डाबेराव, प्रमिला भिसे, रश्मी परमार्थ यांच्यासह नागरिकांनी परिश्रम घेतले.



## मूर्तिजापुरात शिवजयंती उत्साहात साजरी

**मूर्तिजापूर :** येथील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या वतीने शहरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती तिथीनुसार मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शिवसेना शहरप्रमुख विनायक गुल्हाने, तालुकाध्यक्ष गजानन चौधरी, माजी सभापती गणेशराव महल्ले, छबिले पाटील, नगरसेवक सचिन देशमुख, बंडू लांडे पाटील, ज्ञानेश्वर गढवाले आदी मान्यवरांच्या हस्ते पूजन संपन्न झाले. या सोहळ्याचे औचित्य साधून, मागील अनेक वर्षांपासून प्रत्येक जयंतीनिमित्त अविरत सेवा देणारे ज्येष्ठ नागरिक सदाशिव शेळके व शकुंतलाबाई शेळके यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शहरप्रमुख विनायक गुल्हाने यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली जीवनचरित्राचा आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मुन्ना नाईकनवरे, उदय शिंदे, शरद हजबे, टिपरे पाटील, राजू, महेश बाहेती, श्रीकृष्ण जाधव, मंगेश उघड, मंगेश गुल्हाने यांच्यासह परिसरातील शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मूर्तिजापुरात आगळावेगळा महिला दिन

### रुग्णांचे पाय धुवून केले पूजन!



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ८ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून मूर्तीजापूर येथील न्यूगा बेस्ट फिजिओथेरपी केंद्रात एक आगळावेगळा कृतज्ञता सोहळा पार पडला. केंद्राचे संचालक प्रेम नारायण कुशवाह यांनी आपल्या पत्नीसह केंद्रात येणाऱ्या सर्व महिला व पुरुष रुग्णांचे सपत्नीक पाय धुवून पूजन केले. ७ मार्च रोजी श्री गाडगे महाराज विद्यालयासमोर असलेल्या सद्गुरू कॉम्प्लेक्समधील केंद्रात हा हृदयस्पर्शी कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी रुग्णांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. नि:शुल्क सेवा देणाऱ्या या केंद्रात केवळ उपचारच नाही, तर रुग्णांना आदर आणि सन्मान देण्याची अनोखी परंपरा जपली गेली. महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करत हा दिवस साजरा करण्यात आला. या उपक्रमात सेविका अरुणा कांबळे यांच्यासह शहरातील बहुसंख्य महिला व पुरुष रुग्ण उपस्थित होते. संचालकांच्या या सेवाभावी वृत्तीमुळे उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्वत्र या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## ८ ते १२ मार्चदरम्यान नागरिकांना सतर्क राहण्याचे प्रशासनाचे आवाहन

**बाळापूर :** हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, विदर्भासह अकोला जिल्ह्यात ८ ते १२ मार्च २०२६ या कालावधीत भीषण उष्णतेची लाट (हीट वेव्ह) येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या काळात बाळापूर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात तापमानात झपाट्याने वाढ होऊन पारा ३८ ते ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताचा (हीट स्ट्रोक) धोका लक्षात घेता, तहसीलदार व आरोग्य विभागाने नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. दुपारी १२ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत कडक उन्हात बाहेर जाणे टाळावे, शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्यावे, बाहेर पडताना डोक्यावर टोपी किंवा रुमाल ठेवावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींनी खबरदारी बाळगणे आवश्यक आहे. तब्येत बिघडल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## बालपणीच्या सवंगड्यांचे धुलीवंदन अन् स्नेहमिलन!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अडगांव बु., दि. ८ :** काळाच्या ओघात विखुरलेली मैत्री तब्बल ३२ वर्षांनंतर पुन्हा एकदा एकत्र आली आणि निमित्त ठरले धुलीवंदन व लाडक्या मित्रांच्या वाढदिवसाचे! बालपणीचे सर्व वर्गमित्र एकत्र येत एकमेकांना रंगात न्हाऊ घालत जुन्या आठवणींना उजाळा दिला. हा सुवर्णक्षण मित्रत्वाच्या नात्यातील एक अविस्मरणीय ठेवा ठरला.

राजू पाटील तराळे आणि गोपाल लापूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त हा सुंदर योग जुळून आला होता. ३२ वर्षांपूर्वी शाळेच्या बाकावर एकत्र बसणारे हे मित्र आज आपापल्या



आयुष्यात स्थिरावले असले तरी, मैत्रीची ओढ त्यांना पुन्हा एकत्र घेऊन आली. धुलीवंदनाच्या रंगात न्हाऊन निघत, हसत-खेळत आणि जुन्या शालेय आठवणींना उजाळा देत हा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा झाला.

या स्नेहसोहळ्याला हितेश भाऊ हागे, नारायण पत्की, शेख जमीर, नरेंद्र देशमुख, राजू बुटे, संतोष गवई, मनोज धाके, रामेश्वर धाके, भारत नागपुरे, नंदकिशोर तळेगावकर, विजय सपकाळ, प्रकाश आसरे, ओमप्रकाश पांडव, सदाशिव नेमाडे, मनोहर होळकर, राजू रंदे, सुभाष दवणे, गायक जावेद भाई, गजानन घोलप आणि मोहन डांगे यांच्यासह सर्व जिवलग मित्रांची उपस्थिती होती. ३२ वर्षांनंतरचे हे मिलन मनाला स्पर्शून जाणारे ठरले असून, मैत्रीचे रंग पुन्हा एकदा नव्याने खुलल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली. हा दिवस प्रत्येक मित्राच्या आयुष्यातील एक सुखद आणि आनंददायी आठवण म्हणून स्मरणात राहणार आहे.

## अकोटमध्ये शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा

**अकोट :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सक्षम सामाजिक संघटनतर्फे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटामाटात व उत्साहात पार पडला. शुक्रवारी ६ मार्च रोजी स्थानिक कबुतरी मैदान येथे या भव्य दिव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त संघटनेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये शिववंदना, महाराजांच्या गीतांवर नृत्य सादरीकरण, लाठी-काठी व विविध शिवकालीन शस्त्रांचे चित्तथरारक प्रदर्शन आणि प्रसिद्ध शिवकथाकार आशिष भारतवंशी यांचे कथा सादरीकरण असे भरगच्च कार्यक्रम पार पडले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांची महाआरती मोठ्या उत्साहात करण्यात आली. या शिवजन्मोत्सव सोहळ्याला अकोट शहरातील शिवप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. विशेषतः महिलांचा या सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सक्षम सामाजिक संघटन व शिवजन्मोत्सव सोहळा समिती (तिथीनुसार) चे अध्यक्ष अनिकेत नाना पोतले, कार्याध्यक्ष बजरंग दिलीप मिसळे यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## गायिका प्रजावती भारसाकडे यांना भावपूर्ण आदरांजली

### अशोक वाटिका येथे शोकसभा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**जानोरी मेळ, दि. ८ :** सागद येथील ज्येष्ठ गायिका प्रजावती तेजराव भारसाकडे यांचे २४ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी अकोला येथील ऐतिहासिक अशोक वाटिका येथे शोकसभेचे आयोजन करून भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.

अकोला जिल्हा कलावंत अध्यक्ष पंकज खंडारे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रजावती या ९० च्या दशकातील प्रसिद्ध शाहीर समाधान गावंडे (वझेगाव) यांच्या कन्या होत्या. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात गायन क्षेत्रात नाव कमावले. या आदरांजली सभेला भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष विजय वानखडे, नगरसेवक आशिष पवित्रकार, प्रा. सुरेश मोरे, ह्युमन



राईट संघटनेचे विदर्भ अध्यक्ष रवींद्र गवळी, हिम्मतराव शिरसाट, माजी सरपंच विजय शेगोकार, पीएसआय श्रीकृष्ण वानखडे, सरपंच साहेबराव वानखडे, देवानंद अंभोरे, मनोज सुरडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी त्यांचे पती तेजराव भारसाकडे, मुलगी प्रगती तायडे, भाऊ राजपाल गावंडे व संपूर्ण भारसाकडे-गावंडे परिवार आणि जिल्ह्यातील असंख्य कलावंत उपस्थित होते.

महानचा मसिहा हरपला! गोरगरिबांच्या मदतीला धावणारा दानशूर व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड

# शस्त्रक्रिया सुरू असताना डॉ. अजीम खान यांचे निधन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**महान, दि. ८ :** आपल्या नावाप्रमाणेच गोरगरीब रुग्णांसाठी खऱ्या अर्थाने मसिहा ठरलेले महान येथील सुप्रसिद्ध चिकित्सक डॉ. अजीम खान तसलिम खान (वय ५५) यांचे ७ मार्च रोजी नागपूर येथे हृदय शस्त्रक्रिया सुरू असताना दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी वाऱ्यासारखी पसरताच संपूर्ण महान परिसरावर शोककळा पसरली असून, एका अत्यंत मनमिळाऊ आणि दानशूर वैद्याला मुकल्याची भावना व्यक्त होत आहे.

४ मार्च रोजी डॉ. खान यांना छातीत दुखू लागल्याने त्यांना अकोला येथे हलवण्यात आले होते. तेथे तपासणीअंती डॉक्टरांनी एन्जियोग्राफीचा सल्ला दिला. त्यानंतर त्यांना तातडीने नागपूर येथील खाजगी रुग्णालयात भरती करण्यात आले. तपासणीत त्यांच्या हृदयाच्या चार रक्तवाहिन्यांमध्ये गंभीर ब्लॉक आढळून आले. ७ मार्च रोजी सकाळी १० वाजता नागपूर येथे एन्जियोप्लास्टी शस्त्रक्रिया सुरू असतानाच



त्यांना हृदयविकाराचा दुसरा तीव्र झटका आला आणि त्यांची प्राणज्योत मालवली.

महान येथील पिंजर रोडवर डॉ. खान यांचे मसिहा क्लिनिक होते. केवळ नावापुरतेच नव्हे, तर कृतीतूनही त्यांनी मसिहा ही ओळख सार्थ ठरवली होती. दवाखान्यात येणाऱ्या गरीब रुग्णाकडून त्यांनी कधीही फीची सक्ती केली नाही. उलट, खेड्यापाड्यावरून येणाऱ्या रुग्णांकडे पैसे नसल्यास ते स्वतःच्या खिशातील पैसे देऊन त्यांना औषधी आणि प्रवासाचे भाडे द्यायचे. त्यांच्या याच प्रेमळ स्वभावामुळे त्यांच्या दवाखान्यात रुग्णांचा नेहमी गराडा असायचा.

२०२०-२१ च्या भीषण कोरोना काळात डॉ. खान यांनी महान परिसरात शेकडो रुग्णांना जीवनदान दिले. अकोल्यासारख्या मोठ्या शहरात न पाठवता त्यांनी आपल्याच क्लिनिकमध्ये रुग्णांवर यशस्वी उपचार केले. अनेकांचा महागडा खर्च वाचवून त्यांना मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढल्याने ते संपूर्ण परिसरात लोकप्रिय झाले होते.

डॉक्टरांच्या निधनाची वार्ता समजताच महान बसस्थानक परिसरातील व्यावसायिकांनी आपली दुकाने स्वयंस्फूर्तीने बंद ठेवून श्रद्धांजली वाहिली. त्यांचे पार्थिव नागपूरहून बार्शिटाकळीकडे नेताना महान वासियांनी बस स्टँड चौकात रुग्णवाहिका अडवून अंतिम दर्शनाचा आग्रह धरला. त्यानंतर गजानन महाराज विद्यालयाच्या प्रांगणात शेकडो महिला-पुरुषांनी अश्रू नयनांनी आपल्या लाडक्या डॉक्टरला अखेरचा निरोप दिला.

### बार्शिटाकळी येथे अंत्यसंस्कार


डॉ. अजीम खान यांचे मूळ गाव बार्शिटाकळी असून, ७ मार्च रोजी रात्री १० वाजता त्यांच्यावर मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे बार्शिटाकळी येथील शहरे खामोशामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

## मूर्तिजापुरात अतिविषारी रतसर्प आढळल्याने खळबळ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तीजापूर, दि. ८ :** शहरातील टाकवाडी परिसरात असलेल्या सोळंके यांच्या निवासस्थानी दुर्मिळ आणि अत्यंत विषारी समजला जाणारा रतसर्प (पोंकळा) आढळल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते. मात्र, स्थानिक सर्पमित्र मुन्ना श्रीवास यांनी दाखवलेले धाडस आणि कौशल्यामुळे या सापाला सुरक्षितरीत्या पकडण्यात यश आले, ज्यामुळे सोळंके कुटुंबासह परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोळंके यांच्या घरात अचानक एक सडपातळ साप दिसल्याने घरातील सदस्यांची भंबेरी उडाली. या सापाच्या वेगळ्या स्वरूपामुळे परिसरात खळबळ उडाली. घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने सर्पमित्र मुन्ना श्रीवास यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी कोणतीही इजा न होता कौशल्याने सापाला जेरबंद केले आणि सुरक्षित नैसर्गिक अधिवासात मुक्त केले.



आढळलेला साप स्लेंडर कोरल स्नेक या प्रजातीचा असून, तो आकाराने लहान असला तरी जहाल विषारी मानला जातो. हा साप प्रामुख्याने निशाचर असून तपकिरी रंगाचा असतो. त्याच्या शेपटीवर दोन काळे आडवे पट्टे असतात. धोका जाणवल्यास हा साप आपली शेपटी वळवून खालील लालसर भाग दाखवून शत्रूला इशारा देतो. साधारणतः १ फूट २ इंच लांबीचा हा साप दगडाखाली किंवा वाळलेल्या पाल्यापाचोळ्यात दडून बसतो, त्यामुळे तो सहजासहजी नजरेस पडत नाही.

उन्हाळ्याची चाहूल लागताच थंड जागेच्या शोधात साप मानवी वस्तीत शिरण्याची शक्यता वाढते. त्यामुळे नागरिकांनी घराचा परिसर स्वच्छ ठेवावा, कचरा साचू देऊ नये आणि साप आढळल्यास त्याला मारण्याऐवजी तातडीने सर्पमित्र किंवा वनविभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन मुन्ना श्रीवास यांनी केले आहे. टाकवाडीतील या घटनेनंतर नागरिकांना अधिक सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

महत्त्वाचे

## दुचाकीच्या धक्क्यावरून चाकूने हल्ला; एकावर गुन्हा

**मंगरूळपीर :** दुचाकीचा किरकोळ धक्का लागल्याच्या कारणावरून वाद उफाळून आला आणि त्याचे पर्यवसान थेट जीवघेण्या हल्ल्यात झाले. शहरातील पंचशीलनगर भागातील एका चहा टपरीवर ५ मार्च रोजी रात्री ही घटना घडली. याप्रकरणी पोलिसांनी चंद्रशेखर संभाजी बुरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार विराग सुरेश हिवरकर (रा. शिंदेनगर) हे रात्री ११ वाजताच्या सुमारास चहा टपरीवर थांबले होते. यावेळी त्यांच्या दुचाकीचा धक्का आरोपी चंद्रशेखरच्या दुचाकीला लागला. यावरून आरोपीने अश्लील शिवीगाळ करत विराग यांच्यावर चाकूने वार करण्याचा प्रयत्न केला. हा वार अडवताना विराग यांच्या उजव्या हाताच्या मनगटावर आणि बोटांना गंभीर दुखापत झाली. ६ मार्च रोजी पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## सर्पदंशाने १३ वर्षीय बालकाचा करुण अंत

**कारंजा (लाड):** शहरातील लोकमान्य नगर (माळीपुरा) परिसरात शुक्रवारी दुपारी सर्पदंशामुळे एका १३ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. समर्थ सुरेश जिचकार असे मृत बालकाचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शुक्रवारी दुपारी समर्थचे आई-वडील कामासाठी बाहेर गेले होते. घरी एकटाच असताना समर्थला विषारी सापाने चावा घेतला. आई घरी परतल्यानंतर त्याने ही बाब सांगितली. कुटुंबीयांनी त्याला तत्काळ उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात सर्प अभ्यासक डॉ. राजा गोरे, डॉ. कुंडलिक फुफाटे व परिचारिका पल्लवी वैजाळे यांनी त्याला वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र, शरीरात विष पूर्णपणे पसरल्याने समर्थची प्राणज्योत मालवली. कारंजा पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## अंबिका माता मंदिरात चोरी

**मानोरा:** तालुक्यातील गव्हा येथील श्री अंबिका माता मंदिरात ७ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास धाडसी चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी देवीच्या मूर्तीवरील चांदीचे डोळे आणि दानपेटीतील रोख रक्कम लंपास केली. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्यामध्ये तीन अज्ञात चोरटे मंदिरात शिरताना दिसत आहेत. टेकडीवर वसलेल्या या मंदिरात झालेल्या चोरीमुळे भाविकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# महसूल सेवा आता नागरिकांच्या दारात; महाराजस्व अभियानाचा शुभारंभ

अजिंक्य भारत । प्रतिनिधी





**वाशिम, दि. ८ :** महसूल विभागाच्या सेवा थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवून त्यांच्या प्रलंबित समस्यांचा तात्काळ निपटारा करणे, हा छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचा मुख्य उद्देश आहे. प्रशासकीय कामांमधील क्लिष्टता दूर करून नागरिकांना दिलासा देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या या अभियानाचा लाभ जास्तीत जास्त जनतेने घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वाशिम तालुक्यातील अनसिंग आणि मंगरूळपीर तालुक्यातील आसेगाव येथे शनिवारी या अभियानाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

जिल्ह्यातील सहाही तालुक्यांमधील प्रत्येकी एका महसूल मंडळात आज एकाच वेळी सहा शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या एकात्मिक नियोजनामुळे संपूर्ण जिल्ह्यात या अभियानाचा शुभारंभ होऊन नागरिकांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शुभारंभाच्या पहिल्याच दिवशी महसूल प्रशासनाने गतीने कार्यवाही करत २१८ फेरफार नोंदी, ११० सातबारा दुरुस्ती, ९५४ डिजिटल सातबारा आणि ८४३ ८-अ उताऱ्यांचे वाटप केले. तसेच, विविध प्रकारची ८८८ प्रमाणपत्रे आणि एकल खिडकी व्यवस्थेंतर्गत ३४३ प्रकरणे निकाली काढण्यात आली. याशिवाय, १५ भूसंपादन प्रकरणांमध्ये पत्रके तयार करून गाव दप्तर अद्ययावत करण्यात आले, तर ३ अकृषक प्रकरणांना मंजुरी देण्यात आली.

या अभियानांतर्गत नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महसूल विभागाशी संबंधित आपले प्रश्न मांडले. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत अनेक प्रकरणांवर जागेवरच कार्यवाही केली. निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी प्रास्ताविकात या अभियानाचे महत्त्व विषद करताना सांगितले की, गावपातळीवर महसूल सेवा सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. या मोहिमेमुळे नागरिकांना शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या मारण्याची गरज कमी झाली असून, एकाच ठिकाणी अनेक सेवा उपलब्ध होत असल्याने सर्वसामान्यांकडून समाधान व्यक्त होत आहे.

प्रशासन आणि नागरिक यांच्यातील दुवा अधिक मजबूत करण्यासाठी हे अभियान १५ मे पर्यंत संपूर्ण जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या शिबिरांच्या माध्यमातून प्रलंबित महसूल प्रकरणे निकाली काढण्यावर विशेष भर दिला जात असल्याचे जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, रवी काळे, तहसीलदार निलेश पळसकर, सुधाकर अनासुने यांच्यासह महसूल व इतर विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरकुल वाटपात गोंधळ; गरजू लाभार्थी योजनेपासून वंचित

### अपात्रांना लाभ मिळाल्याचा नागरिकांचा आरोप



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कोंडोली, दि. ८ :** शासनाच्या महत्त्वाकांक्षी घरकुल योजनेच्या माध्यमातून गरिबांना हक्काचे छत मिळणे अपेक्षित असताना, श्रीक्षेत्र कोंडोली येथे मात्र या योजनेचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. घरकुल वाटपात पारदर्शकता नसल्याने अनेक गरजू आणि पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिले असून, ज्यांना घराची आवश्यकता नाही अशाच व्यक्तींना या योजनेचा लाभ देण्यात आल्याचा खळबळजनक आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोंडोली येथे घरकुल वाटपाची प्रक्रिया राबविताना निकषांना हरताळ फासण्यात आला आहे. ज्या लाभार्थ्यांच्या नावे घरकुले मंजूर झाली आणि ज्यांनी शासनाचे सर्व हप्ते उचलले आहेत, त्या घरांमध्ये प्रत्यक्ष पाहणी केली असता धक्कादायक वास्तव समोर आले आहे. अनेक मंजूर घरकुलांमध्ये मूळ लाभार्थी न राहता दुसरीच कुटुंबे वास्तव्यास असल्याचे दिसून येत आहे. यामुळे या योजनेत मोठा गैरप्रकार झाला असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

कोंडोली येथील ज्या घरांचे सर्व हप्ते पूर्ण झाले आहेत, त्या घरकुलांमध्ये सध्या प्रत्यक्षात कोण राहत आहे? लाभार्थी स्वतः तिथे राहतो की त्याने घर भाड्याने दिले आहे? याची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून निष्पक्ष चौकशी झाल्यास घरकुल वाटपातील पारदर्शकता स्पष्ट होईल. दोषींवर कठोर कारवाई करून खऱ्या गरजूंना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी आता कोंडोलीतील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

### पारदर्शकतेचा अभाव, सुज्ञ नागरिकांचा संताप

घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांची निवड करताना गरजूंच्या नावांना डावलून वशिलेबाजी करण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. खरोखरच ज्यांना निवाऱ्याची गरज आहे, असे गरीब कुटुंब आजही उघड्यावर आहेत, तर दुसरीकडे आर्थिकदृष्ट्या सधन असलेल्यांना घरांचे वाटप झाले आहे. या प्रकारामुळे प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, शासकीय निधीचा दुरुपयोग होत असल्याची भावना सुज्ञ नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# मार्चच्या सुरुवातीलाच पाणीपातळी घटल्याने गहू पीक धोक्यात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**इंझोरी, दि. ८ :** मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात वातावरणात झालेल्या बदलामुळे आणि तापमानाचा पारा अचानक वाढल्याने इंझोरी परिसरातील शेतकरी चिंतेत सापडला आहे. कडक ऊन आणि जमिनीतील पाणीपातळीत झालेली मोठी घट यामुळे हाताशी आलेले गव्हाचे पीक आता धोक्यात आले असून, सिंचनासाठी पाण्याची जुळवाजुळव करताना शेतकरी राजाची मोठी दैना होत असल्याचे चित्र दिसत आहे.

यावर्षी पावसाळ्यात झालेला समाधानकारक पाऊस आणि हिवाळ्यातील कडाक्याची थंडी लक्षात घेऊन, परिसरातील शेतकऱ्यांनी सोयाबीन काढणीनंतर मोठ्या आशेने गहू आणि हरभरा पिकाची पेरणी केली होती. विशेषतः, यावर्षी कपाशीच्या पिकाला निसर्गाचा मोठा फटका बसल्याने अनेक शेतकऱ्यांनी कपाशी उपटून त्या जागी गव्हाचा पेरा केला होता. फेब्रुवारी महिन्यापर्यंत वातावरणीय स्थिती अनुकूल असल्याने पिके जोमात होती आणि विहिरींनाही पुरेसे पाणी होते. मात्र, मार्च महिना सुरू होताच निसर्गाने आपला रंग बदलला आहे.

विहिरी आणि कूपनलिका पडल्या कोरड्या

वाढत्या उन्हामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढला असून जमिनीतील पाणीपातळी कमालीची खालावली आहे. यामुळे परिसरातील अनेक विहिरी आणि कूपनलिकांनी तळ गाठला असून काही स्त्रोत पूर्णपणे बंद पडले आहेत. ज्या विहिरींना थोडेफार पाणी आहे, त्यातून पिकांना पुरेसा पाणीपुरवठा करणे कठीण झाले आहे. गव्हाचे पीक सध्या ओबी भरण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेत असून, या काळात पिकाला पाण्याची अत्यंत गरज असते. मात्र, नेमक्या याच वेळी पाणी साठा संपल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

आर्थिक गणिते कोलमडणार

पिकाला पाणी मिळावे यासाठी शेतकरी जीवाचे रान करत आहेत, परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे गव्हाची पिके अर्धवट स्थितीतच सुकू लागली आहेत. पाण्याअभावी दाणे बारीक राहण्याची किंवा पीक करपण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. आधीच कपाशीने दगा दिल्यानंतर आता गव्हाचे पीकही हातातून जाण्याची भीती निर्माण झाल्याने, शेतकरी पुन्हा एकदा मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. प्रशासनाने या परिस्थितीची दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातील कास्तकार करत आहेत.

## महिला दिनी सामाजिक बांधिलकी; पाणपोईचे लोकार्पण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा (लाड), दि. ८ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आदिशक्ती सदाचार सभा, यशोदा नगर यांच्या वतीने मानोरा रोड परिसरात पाणपोई सुरू करण्यात आली आहे. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे लोकार्पण शनिवार, ७ मार्च रोजी उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वमांगल्य सभेच्या जिल्हा संघटक मनीषा जोशी होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून वाशिम जिल्हा बालसभा संयोजिका वृशाली लक्रस, विश्वमांगल्य सभेच्या कारंजा अध्यक्षा चारुलता एकघरे, नगरसेविका शालिनी ठाकरे व ज्योती राठोड उपस्थित होत्या. सौ. सुलोचना होनराव व होनराव परिवाराच्या हस्ते फीत कापून या पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी कोमल विभुते व रिता पुरी यांनी 'शक्तीगाण' सादर केले.

अध्यक्षीय भाषणात मनीषा जोशी यांनी आदिशक्ती सदाचार सभेच्या या कार्याचे कौतुक केले. ''महिलांच्या पुढाकारातून अशा प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम राबविणे कौतुकास्पद असून, इतर संस्थांसाठी हे एक प्रेरणादायी उदाहरण आहे,'' असे मत त्यांनी व्यक्त केले. जोत्स्ना बोन्ते व विशाखा भेंडे यांनी जयघोष करून उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रगती राऊत यांनी केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी निशा देशमुख, अर्चना सहाने, कोमल विभुते, चारुलता एकघरे, रिता पुरी यांच्यासह सभेच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# स्त्रीशक्तीच्या गौरवाने परिसर दुमदुमला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



जागतिक महिला दिन

**वाशिम, दि. ८ :** स्थानिक विद्याभारती शाळा येथे ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ''स्त्री ही कुटुंबाचा आणि समाजाचा आधारस्तंभ असून तिचा सन्मान करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे,'' असा सूर या कार्यक्रमातून उमटला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक नितेश मिटकरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे पर्यवेक्षक विजय गोटे, कांचन कापसे तसेच शाळेतील सर्व महिला शिक्षिकांची उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांतून महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला. स्त्रीशक्तीचे महत्त्व आणि समाजातील महिलांचे योगदान या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणे, कविता आणि प्रेरणादायी गीते सादर केली. प्रमुख पाहुण्या कांचन कापसे, कीर्ती कुलकर्णी आणि पद्मिनी खराटे यांनी आपल्या मार्गदर्शनातून महिलांच्या सामाजिक योगदानाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी महिलांचा आदर राखत त्यांच्या प्रगतीसाठी सदैव सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

शाळेचे पर्यवेक्षक विजय गोटे यांनी उपस्थितांना महिला दिनाच्या शुभेच्छा देतानाच, ''आधुनिकतेची कास धरताना आपली संस्कृती आणि मूल्ये जपली पाहिजेत,'' असा मोलाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल इंगळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

साथरोगाचे थैमान | ग्रामस्थ देवाच्या भरवशावर

# इंझोरीत गोवर, काजण्यांचा उद्रेक; आरोग्य विभाग सुस्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**इंझोरी, दि. ८ :** जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील इंझोरी परिसरात मागील महिनाभरापासून गोवर आणि काजण्यांसारख्या संसर्गजन्य साथरोगांनी थैमान घातले आहे. घराघरांत लहान मुलांपासून तरुणांपर्यंत या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असतानाही, आरोग्य विभागाकडून कोणतीही ठोस उपाययोजना किंवा प्रतिबंधात्मक मोहीम राबविली जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे. शासकीय वैद्यकीय मदतीअभावी मेटाकुटीला आलेले ग्रामस्थ आता जुन्या चालीरिती आणि श्रद्धेचा आधार घेत शितला माता मंदिराचा उंबरठा झिजवत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

इंझोरी गावामध्ये १ ते २५ या वयोगटातील मुलांमध्ये या रोगाचे प्रमाण सर्वाधिक आहे. सुरुवातीला तीव्र ताप येणे, थंडी वाजणे आणि प्रचंड अशक्तपणा जाणवणे ही लक्षणे दिसून येतात. प्राथमिक उपचार करूनही आजार नियंत्रणात येत नाही. काही दिवसांनंतर शरीरावर बारीक पुरळ किंवा फोड येण्यास सुरुवात होते, जे काजण्या किंवा गोवरचे स्पष्ट लक्षण मानले जाते. धक्कादायक बाब म्हणजे, संसर्गाचा वेग इतका प्रचंड आहे की घरातील एका मुलाला बाधा झाली की, पाठोपाठ इतर मुलेही या आजाराच्या विळख्यात सापडत आहेत. यामुळे गावातील शैक्षणिक उपस्थितीवरही परिणाम झाला असून पालकांमध्ये घबराट पसरली आहे. साथरोगाचा प्रादुर्भाव सुरू होऊन महिना उलटला, तरी आरोग्य विभागाने अद्याप गावात विशेष आरोग्य शिबिर किंवा सर्वेक्षण राबवलेले नाही. लसीकरण किंवा प्रतिबंधात्मक औषधोपचारांबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृतीचा अभाव दिसून येत आहे. ''आमची मुले तापाने फणफणत आहेत, पण शासकीय दवाखान्यातून फक्त गोळ्या देऊन बोळवण केली जाते. साथ रोखण्यासाठी गावात फवारणी किंवा तज्ज्ञ डॉक्टरांची पथके पाठवण्याची तसदी प्रशासनाने घेतलेली नाही,'' अशी संतप्त प्रतिक्रिया एका पालकाने दिली. ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे आणि औषधांचा तुटवडा यामुळे सर्वसामान्य रुग्ण खाजगी डॉक्टरांकडे धाव घेत आहेत, जिथे त्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

आरोग्य यंत्रणा हतबल ठरत असल्याचे पाहून हवालदिल झालेल्या महिला आता पारंपरिक पद्धतींचा अवलंब करत आहेत. गोवर आणि काजण्यांना ग्रामीण भागात देवीचा प्रकोप मानण्याची जुनी प्रथा आहे. त्यामुळे दररोज सकाळी गावातील शितला माता मंदिरात महिलांची मोठी गर्दी दिसून येत आहे. आपल्या मुलांना या आजारातून मुक्त करण्यासाठी महिला पूजा-अर्चा आणि नवस बोलताना दिसत आहेत. विज्ञानाच्या युगात अशा पद्धतीने उपचारांऐवजी अंधश्रद्धेकडे वळणे, हे आरोग्य विभागाच्या अपयशाचेच निदर्शक असल्याची चर्चा सुज्ञ नागरिकांमध्ये सुरू आहे.

**इंझोरीसह परिसरातील वाड्या-वस्त्यांवरही हा प्रादुर्भाव पसरण्याची भीती व्यक्त होत आहे. जर वेळीच उपाययोजना केल्या नाहीत, तर हा संसर्ग रौद्र रूप धारण करू शकतो. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन गावात तातडीने वैद्यकीय पथक पाठवावे, रक्त नमुने तपासावेत आणि बाधितांवर योग्य उपचार करावेत, अशी मागणी ग्रामपंचायत प्रशासन आणि ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.**

## गांधी विचार संस्कार परीक्षेत यावर्डीची वेदिका कदम जिल्ह्यातून दुसरी



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. ८ :** गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगावच्या वतीने आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षा २०२५ मध्ये यावर्डी येथील बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालयाने दैदीप्यमान यश संपादन केले आहे. विद्यालयाची विद्यार्थिनी कु. वेदिका मोहन कदम हिने जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक पटकावत रौप्य पदक (सिल्व्हर मेडल) प्राप्त केले.

विद्यालयात प्रथमच या परीक्षेचे आयोजन मुख्याध्यापक विजय भड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या परीक्षेत शाळेतील एकूण ५४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते आणि सर्वच्या सर्व ५४ विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे.

या यशाबद्दल मुख्याध्यापक विजय भड, परीक्षा समन्वयक अनिल हजारे व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

महत्त्वाचे

## धनश्री भटकर यांना सिंधुताई सपकाळ स्मृती पुरस्कार



**मूर्तिजापूर :** जागतिक महिला दिनानिमित्त समाजकार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठान, अकोला यांच्या वतीने आयोजित सोहळ्यात मूर्तिजापूर तालुक्यातील मुरंबा येथील सरपंच धनश्री अखिल भटकर यांना स्व. सिंधुताई सपकाळ राज्यस्तरीय स्मृती पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले. अकोला येथे आयोजित या सोहळ्यात धनश्री भटकर यांच्या समाजाभिमुख कार्याची दखल घेत मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ''हा सन्मान म्हणजे स्त्रीशक्तीचा गौरव असून, यामुळे भविष्यात अधिक जोमाने समाजकार्य करण्याची प्रेरणा मिळाली आहे,'' अशी भावना सरपंच भटकर यांनी यावेळी व्यक्त केली. पुरस्काराचे वितरण श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. भिसे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष पुंडकर, तसेच महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती घोगलिया यांच्या हस्ते करण्यात आले.

## अकोट रोटरी क्लबतर्फे कर्तृत्ववान महिलांचा गौरव



**अकोट:** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ अकोटच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आणि आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या महिलांचा सन्मानचिन्ह व वृक्षरोपे देऊन गौरव करण्यात आला. सन्मानित करण्यात आलेल्यांमध्ये क्रांतीबाई लोखंडे यांचा समावेश आहे, ज्यांनी इनरव्हील क्लब, नगर परिषद आणि जनता बँकेच्या माध्यमातून सामाजिक व सहकारी क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. वैद्यकीय सेवेसोबतच आधुनिक शेतीचा आदर्श निर्माण करणाऱ्या डॉ. पुष्पा वालशिंगे तसेच आरोग्य क्षेत्रात ३८ वर्षे सेवा देऊन दर्यापूर ग्रामीण रुग्णालयाला जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून देणाऱ्या उषा ढोरे यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. यासोबतच अल्पवधीत वैद्यकीय सेवेद्वारे गरिबांसाठी आरोग्य शिबिरे राबविणाऱ्या डॉ. श्रेया लहाने यांचाही गौरव रोटरी क्लबतर्फे करण्यात आला. हा सोहळा रोटरी क्लब ऑफ अकोटचे अध्यक्ष इंजि. रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी उपस्थितांना महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला सचिव डॉ. नावेश मोहता, राजकुमार गांधी, संतोष इस्तापे, शिरीष पोटे, दीपक कतोरे, उद्धव गणगणे आणि श्याम शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती.

## श्रीराम नवमी शोभायात्रा समितीच्या अध्यक्षपदी अरुण शर्मा

**अकोला :** विश्व हिंदू परिषद संचलित श्रीराम नवमी शोभायात्रा समितीच्या अध्यक्षपदी युवा समाजसेवी अरुण शर्मा यांची निवड करण्यात आली आहे. दुर्गा चौक येथे झालेल्या कार्यक्रमात ही घोषणा होताच कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी व जल्लोषात स्वागत केले. १९८६ पासून सुरू झालेल्या या ऐतिहासिक शोभायात्रेला दिवंगत आमदार गोवर्धन शर्मा यांनी भव्य स्वरूप प्राप्त करून दिले. यंदाही भव्य शोभायात्रा काढली जाणार आहे. समितीच्या माध्यमातून यंदा नवनवीन उपक्रम राबवून ही यात्रा अधिक उत्साहात साजरी करू, असा विश्वास नवनियुक्त अध्यक्ष अरुण शर्मा यांनी व्यक्त केला.

# काजीखेड-निंबा फाटा रस्ते कामाचा 'फज्जा'; डागडुजीच्या नावाखाली केवळ सारवासारव!

### २५ वर्षांपासून समस्या कायम; लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर प्रवाशांचा संताप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**जानोरी मेळ, दि. ८ :** निंबा अंदुरा महसूल मंडळांतर्गत येणाऱ्या काजीखेड ते निंबा फाटा या मार्गावरील रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, सध्या सुरू असलेली डागडुजी म्हणजे केवळ सारवासारव असल्याचा सूर नागरिकांमधून उमटत आहे. गेल्या २५ वर्षांपासून या परिसरातील जनता खड्डेमय रस्त्याचा त्रास सहन करत असून, या खराब रस्त्यामुळे झालेल्या अपघातांत अनेक निष्पापांना दुखापत झाली आहे.



या मार्गावरील दुरावस्थेबाबत बोलताना वझेगावचे निलेश माळी यांनी खंत व्यक्त केली की, ''मी २००२ मध्ये शाळेत असल्यापासून हा रस्ता असाच पाहत आहे, आज खाजगी काम करत असतानाही स्थिती बदललेली नाही. हा रस्ता कधी पूर्ण होईल, हा मोठा प्रश्न आहे.'' तर स्वरूपखेडचे दिगंबर घरमोर यांनी आपली व्यथा मांडली की, ''आमच्या पिढ्या बदलल्या पण रस्ता झाला नाही. बहुदा आमचे आयुष्य संपेल, पण रस्ता होणार नाही असेच वाटते.'' परिसरातील एका खाजगी डॉक्टरांनी प्रशासकीय नियोजनावर बोट ठेवताना सांगितले की, शेजारच्या बुलढाणा जिल्ह्यात सर्व रस्ते दर्जेदार झाले आहेत, मग अकोला जिल्ह्यातच अशी स्थिती का? हा एक यक्षप्रश्न आहे.

पाच वर्षांपूर्वी या मार्गासाठी सुमारे ४ कोटी ८० लाखांचा निधी प्रस्तावित होता, मात्र त्या निधीतून झालेल्या कामाची सद्यस्थिती समाधानकारक नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सध्या सुरू असलेले दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करत, खड्डे व्यवस्थित न भरता केवळ वरून मलमपट्टी केली जात असल्याची तक्रार होत आहे. लोकप्रतिनिधींनी या प्रश्नी गांभीर्याने लक्ष देऊन दर्जात्मक काम करून घ्यावे, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

❑ मी अनेक वर्षांपासून याच रस्त्याने प्रवास करत आहे, पण हा मुख्य रस्ता आहे की एखादा पांदन रस्ता, हेच कळायला मार्ग नाही. रस्ते कामाची केवळ घोषणा होते, पण प्रत्यक्षात दर्जेदार रस्ता कधी होणार? याकडे आमचे डोळे लागले आहेत.
- **गजानन मेहनकार** (माजी उपसरपंच, काजीखेड)

❑ या रस्त्याची अजून किती वर्षे वाट पाहावी लागेल? हा रस्ता नेमका कधी पूर्ण होणार की आम्हाला असेच खड्ड्यातून प्रवास करावा लागेल? लोकप्रतिनिधींनी जनतेच्या सुरक्षिततेचा विचार करून तातडीने कायमस्वरूपी कामाला सुरुवात करावी.
- **इंदुबाई वानखडे** (माजी तालुका अध्यक्ष, वं.ब.आ. महिला आघाडी)

❑ रस्त्याचे काम कशा प्रकारे सुरू आहे, याची पाहणी होणे गरजेचे आहे. अर्धे काम करायचे आणि अर्धे सोडून द्यायचे, या प्रकारामुळे डागडुजीचा मूळ हेतू साध्य होत नाही. संबंधित विभागाने या कामाची सखोल चौकशी करणे अपेक्षित आहे.
- **तुळशीराम वाघ** (वझेगाव)

## चरित्र्याच्या संशयातून पत्नीचा खून करणाऱ्या पतीला जन्मठेप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ८ :** पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिचा निर्घृण खून करणाऱ्या पतीला अतिरिक्त सत्र न्यायाधीश वैभव व्ही. पाटील यांनी ५ मार्च रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. रोशन विजय उगले (रा. मानोली, ता. मंगरुळपीर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव असून, न्यायालयाने त्याला १० हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास एक वर्ष अतिरिक्त कारावासाची शिक्षाही ठोठावली आहे.

मानोली येथील रिना हिचे लग्न २९ जुलै २०२० रोजी रोशन उगले याच्याशी झाले होते. लग्नानंतर काही दिवसातच आरोपी रोशन पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण व शिवीगाळ करू लागला. १० एप्रिल २०२१ रोजी आरोपीने रिना हिला लोखंडी पाईपने डोक्यावर व गळ्यावर गंभीर मारहाण केली आणि तिचे डोके फरशीवर आपटून तिची हत्या केली. याप्रकरणी मृत रिनाचे चुलते श्रीकृष्ण तुळशिराम वाकोडे (रा. आरखेड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मंगरुळपीर पोलिसांनी भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला होता. तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेंबडे यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्यादरम्यान सरकार पक्षातर्फे २१ साक्षीदार तपासण्यात आले. विशेष म्हणजे, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि पंच असे अनेक जण फितूर झाले होते. मात्र, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता गोवर्धन गंगावणे यांनी मांडलेला युक्तिवाद, वैद्यकीय अहवाल, रासायनिक विश्लेषक आणि तांत्रिक पुरावा (नोडल अधिकारी यांची साक्ष) ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले.

या खटल्यात पोलीस प्रशासनाच्या वतीने ठाणेदार किशोर शेळके यांच्या मार्गदर्शनात कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार राम नागूलकर व सुवर्णा मनवर यांनी सहकार्य केले. या निकालानंतर परिसरात खळबळ माजली असून, पीडित कुटुंबाला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

## तळेगाव बाजार येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तळेगाव बाजार, दि. ८ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून येथे आदिशक्ती प्रभाग संघाच्या वतीने महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाचा जागर करण्यात आला असून, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. तळेगाव बाजार येथील महिला संघाने महिला सक्षमीकरणासाठी अनेक उपक्रम यशस्वीरीत्या राबवले आहेत. शासनाच्या विविध योजनांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत या महिलांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.आजच्या युगात महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नसून, त्यांना अधिक सक्षम करण्याचे काम प्रभाग संघाच्या माध्यमातून केले जात आहे, असा सूर या कार्यक्रमात उमटला. महिलांना सन्मानाचे जीवन जगण्याचा अधिकार भारतीय संविधानामुळे प्राप्त झाला असून, याच कृतज्ञतेतून महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.




या प्रसंगी प्रभाग संघाच्या अध्यक्षा वनिता सुधाकर वाकोडे, सचिव सविता देविदास खारोडे, ग्राम सखी शारदा पिंजरकार, पूजा शिंगोकार, रजिया पटेल, लिपिका राधिका पिंजरकर, प्रतिभा खारोडे, पुष्पा खारोडे, सुनीता राऊत, रेणुका बोदडे, अरुणा टापरे, प्रियंका खिरोडकार यांच्यासह प्रभाग संघाच्या इतर सदस्य व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## वृद्ध मजुरावर रानडुकराचा जीवघेणा हल्ला; परिसरात घबराट

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ८ :** शहरालगत असलेल्या देवराज शिवारात वन्यप्राण्यांच्या वाढत्या हैदोसाने भीषण रूप धारण केले असून, रविवारी सकाळी एका ६० वर्षीय वृद्ध शेतमजुरावर रानडुकराने प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात करीम खान मोहम्मद खान हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात घबराटीचे वातावरण पसरले असून, वनविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सुरजप्रसाद विश्वास (डॉक्टर चांदशी) यांच्या शेतात करीम खान हे नेहमीप्रमाणे मजुरीचे काम करत होते. सकाळी ११ वाजेच्या सुमारास ते पिकाला पाणी देत असताना, दबा धरून बसलेल्या एका रानडुकराने त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. काही कळण्याच्या आतच डुकराने शरीराचे लचके तोडण्यास सुरुवात केली. करीम खान यांनी आरडाओरडा केल्याने परिसरातील इतर शेतकरी मदतीला धावले, त्यानंतर रानडुकराने तेथून पळ काढला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या खान यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले.

वन्यप्राण्यांचा वावर वाढल्याने शेतात जाणे आता जिवावर बेतू लागले आहे. वारंवार तक्रारी करूनही वनविभाग याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या घटनेचा तातडीने पंचनामा करून जखमी मजुरास शासनाकडून आर्थिक मदत देण्यात यावी आणि रानडुकरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### वनविभागाला शेवटचा इशारा!

देवराज शिवारात रानडुकरांचा वावर दिवसेंदिवस वाढत आहे. मजुराच्या रक्ताने शेत शिवार माखले असून, यापुढे कोणतीही जीवितहानी झाल्यास त्याला सर्वस्व वनविभाग जबाबदार राहील. आता केवळ आश्वासन नको, तर ठोस कारवाई हवी, असा पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला आहे.

## 'लेक वाचवा'चा संदेश देत महिला दिन उत्साहात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ८ :** येथील लिटिल फ्लॉवर्स इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर सायन्स कॉलेजमध्ये जागतिक महिला दिन सामाजिक जाणीवेतून साजरा करण्यात आला. यावेळी ज्या महिलांनी केवळ मुलींनाच कुलदीपक मानून त्यांचे संगोपन केले, अशा मातांचा विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या प्रा. दिव्या पाढेण होत्या. त्यांनी राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले. याप्रसंगी पतीच्या निधनानंतरही कष्टाने मुलींचे शिक्षण करणाऱ्या शालू चोपडे, तसेच पालक प्रतिनिधी वर्षा भुजाडे यांचा साडी-चोळी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच माया ताजणे, ममता बलखंडे, प्रियांका मनवर आणि कांचन देशमुख या कर्तृत्ववान महिलांचाही सन्मान झाला.



इतिहास विसरणारी व्यक्ती इतिहास घडवू शकत नाही. संविधानामुळेच आज महिलांना सर्वोच्च पदे मिळाली आहेत,असा संदेश प्रा. पाढेण यांनी यावेळी दिला. कार्यक्रमाचे संचालन पूनम व्यास यांनी केले, तर आभार श्रेया निंबेकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी पुष्पा खडसे, संजीवनी आठवले, प्रगती सुर्वे, दीपाली चोपडे व पूजा कांबळे यांनी सहकार्य केले.

## 'महाराजस्व' समाधान अभियानाचा दणक्यात प्रारंभ!

**मुंडगाव :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान टप्पा-१ चा अकोट तालुक्यातील शुभारंभ ७ मार्च रोजी मुंडगाव येथील श्रीकृष्ण महाराज संस्थानमध्ये झाला. तहसीलदार सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात महसूल, कृषी, आरोग्य आणि महावितरणसह विविध विभागांचे स्टॉल्स उभारून १५ पेक्षा जास्त सेवा एकाच छताखाली पुरविण्यात आल्या. यावेळी आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जनतेच्या तक्रारींचे निराकरण करण्यात आले. शिबिरासाठी नायब तहसीलदार सुधीर थेटे, मनोज मानकर, सुभाष सांवग, पुरवठा अधिकारी अंजली घरडे, उपसरपंच अनिल गाढे, मनोज लोणारकर यांच्यासह रितेश केळकर, अनिल रावणकर, आशेर परमार्थ, राहुल बंकेवार, के.डी. पवार, आर.ए. खामकर, जयश्री धवळे व महसूल कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. पुढील शिबिरे १४ मार्चला पणज, २१ मार्च अकोलखेड, २८ मार्च चोहट्टा बाजार, १० एप्रिल कुटासा, १७ एप्रिल पुंडा, ८ मे उमरा आणि १५ मे रोजी अकोट येथे पार पडणार आहेत.

### करून दान रक्ताचे, ऋण फेडू समाजाचे

## चिमुकल्या भूमीकाच्या स्मृतीला १०६ रक्तदात्यांचे अभिवादन!




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. ८ :** रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असून, एका व्यक्तीने केलेले रक्तदान कोणाचे तरी प्राण वाचवू शकते. हाच उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून स्व. भूमीका अनिल पालकर हिच्या पाचव्या पुण्यस्मरणार्थ अकोटमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तब्बल १०६ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून भूमीकाला भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

नया प्रेस येथील पालेकर सायकल प्रतिष्ठान येथे ६ मार्च रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९ वाजता स्व. भूमीकाच्या तैलचित्राला पुष्पहार अर्पण करून शिबिराचा प्रारंभ झाला. आजच्या धावपळीच्या युगात रक्ताची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी रक्ताला कोणताही कृत्रिम पर्याय उपलब्ध नाही. मानवाचे रक्त केवळ मानवाच्याच कामी येते, हे ओळखून पालेकर कुटुंबाने आपल्या चिमुकल्या मुलीच्या स्मृती प्रीत्यर्थ सामाजिक बांधिलकी जपली आहे. रक्ताची गरज कुणाला, कधी आणि कुठे लागेल हे सांगता येत नाही, म्हणूनच रक्तदान हेच जीवनदान हे सूत्र या शिबिराने अधोरेखित केले.

याप्रसंगी अकोटच्या नगराध्यक्षा माया धुळे, उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोडे यांच्यासह नगरपरिषदेचे विविध नगरसेवक, सभापती आणि प्रतिष्ठित नागरिकांनी भेट देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. अकोला ब्लड बँकेच्या पथकाने रक्त संकलनाची सेवा दिली. या सोहळ्याला व्यापारी, पत्रकार बांधव, पालेकर यांचा मित्र परिवार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपले रक्त गरजू रुग्णांना जीवनदान देऊ शकते, ही भावना या शिबिराच्या माध्यमातून यशस्वीरीत्या पोहोचवण्यात आली असून पालेकर कुटुंबाच्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### सामाजिक बांधिलकीचा वारसा

स्व. भूमीका पालेकरच्या स्मृतीनिमित्त दरवर्षी राबविला जाणारा हा उपक्रम अकोट शहरात आदर्श ठरत आहे. केवळ शोक न करता, रक्तासारख्या अनमोल दानातून लोकांचे प्राण वाचविण्याचा पालेकर सायकल प्रतिष्ठानचा हा प्रयत्न समाजाला नवी दिशा देणारा असून १०६ जणांचे रक्तदान हे त्याचे यश आहे.

कौशल्याचे कौतुक | आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेत ११० विद्यार्थ्यांचा सहभाग

## डिजिटल युगातही जपली पत्रलेखनाची कला

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**आलेगाव, दि. ८ :** आजच्या धावपळीच्या आणि डिजिटल युगात मानवी संबंधांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आयोजित युनिव्हर्सल पोस्टल युनियन - २०२६ अंतर्गत आंतरराष्ट्रीय पत्रलेखन स्पर्धेत आलेगाव येथील जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटच्या विद्यार्थ्यांनी आपली मोहोर उमटवली आहे. संपूर्ण अकोला जिल्ह्यातून या स्पर्धेसाठी १८७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता, त्यापैकी एकट्या प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटच्या तब्बल ११० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात शाळेचा दबदबा निर्माण केला आहे. ''डिजिटल युगात मानवी संबंधांचे महत्त्व'' या विषयावर आधारित ही स्पर्धा सकाळी १० ते १०:३० या वेळेत पार पडली. आलेगावसारख्या ग्रामीण भागात असूनही, पत्राच्या माध्यमातून आपल्या भावना प्रभावीपणे व्यक्त करण्याची कला या विद्यार्थ्यांनी जोपासली आहे. अकोला हेड पोस्ट ऑफिसचे आदित्य भालतिलक यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.



सदर उपक्रमाचे यशस्वी आयोजन गटशिक्षणाधिकारी प्रवीण डाबेराव, आलेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख निवास चव्हाण, विशेष साधनव्यक्ती राजेंद्र कटरे आणि शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मुख्याध्यापक महावीर जैन यांच्या नियोजनात शिक्षक विनोद नप्ते यांनी या स्पर्धे साठी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या या उत्स्फूर्त प्रतिसादाचे आणि शाळेच्या उपक्रमशीलतेचे शिक्षण विभागात सर्वत्र कौतुक होत आहे.

### ग्रामीण विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय झेप!

पत्राद्वारे संवाद साधण्याची कला लोप पावत असताना, प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटच्या ११० विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन ग्रामीण भागातील टॅलेंट सिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही शाळा नेहमीच तत्पर असल्याचे या उपक्रमातून पुन्हा एकदा दिसून आले.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, सोमवार, दि.९ मार्च २०२६




**महत्वाचे**

## काटेल येथे दिव्यांग वधू वर परिचय मेळावा

**संग्रामपूर :** तालुक्यात काटेल धाम येथे दिव्यांग वधु - वर परिचय मेळाव्याचे आयोजन काटेल धाम येथे १३ मार्च रोजी करण्यात आले आहे.अंध, मुकबधिर, अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींना हक्काचा जोडीदार मिळावा, त्यांच्या सामाजिक पुनर्वसनास चालना मिळावी आणि आयुष्याला नवीन उमेद मिळावी या उद्देशाने दिव्यांग वधू-वर परिचय मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. या परिचय मेळाव्यांमध्ये शारीरिक व मानसिक दिव्यांग बांधव एकत्र येऊन योग्य जोडीदाराची निवड करून ज्यामुळे त्यांच्या जीवनात त्यांच्या आयुष्यात सुसह्यता यावी या साठी संग्रामपूर तालुक्यातील अंध, मुकबधिर, अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींना हक्काचा जोडीदार मिळावा व त्यांचे जीवन उज्वल व्हावे त्या करीता नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लॉईड बुलढाणा,बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी म. बुलढाणा. श्रीराम कुटे गुरुजी फाउंडेशन जळगांव जामोद व श्री संत गुलाबबाबा संस्था काटेल धाम तसेच दिव्यांग क्रांती संघटना रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने संग्रामपूर तालुक्यातील काटेल धाम येथे १३ मार्च रोजी दीव्यांग वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्याला अध्यक्ष नॅशनल असो. फॉर द ब्लॉईड व संस्थापक अध्यक्ष, बुलढाणा अर्बन राधेश्याम चांडक व आमदार संजय कुटे , जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील. अध्यक्ष, नॅब, युनिट महाराष्ट्र राज्य, नाशिक रामेश्वर कलंत्री, डॉ.अपर्णा कुटे यांच्यासह इतर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत दिव्याग वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे तरी या मेळाव्याला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून या दीव्यांग व्यक्तींच्या आयुष्याला नवीन उमेद मिळावी यासाठी त्यांचे उज्वल जीवनासाठी साक्षीदार राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## नातवाने दगड मारुन डोके फोडले

**खामगाव :** छत्रपती शिवराययांनी महिलांचा सन्मानच केला नाही तर महिलांच्या सन्मानाला कृतीप्रवण संरक्षण दिले. जगदगूरू तुकोबांच्या त्याग आणि समर्पित वृत्तीतून छत्रपती शिवराय घडले. त्यामुळे छत्रपतींचे कार्य अजरामर झाले. असे मत प्रख्यात शिवव्याख्याते अँड सतीशचंद्र रोठे पाटील यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवरायांच्या तिथीनुसार जयंतीचे सहा मार्चला सायंकाळी बुलढाणा जिल्हा छत्रपती शिवराय सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, मातृतीर्थ रणरागिणी संघटना, रमाई ब्रिगेड, छत्रपती स्वराज्य यांच्या संयुक्त विद्यमानातून बुलढाण्यातील महात्मा फुले शॉपिंग कॉम्प्लेक्स परिसरात शिव जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी छत्रपती शिवरायांना मानवंदना देताना अँड रोठेंनी उपरोक्त मत व्यक्त केले. पुरोगामी बहुजन चळवळीचे नेते बाळासाहेब वानखेडे, कॉंग्रेसचे नेते साहेबराव डोंगरे, शिव विचारवंत नारायणराव भाकडे, इतिहास संशोधक निखिल राणे, महेश तायडे, ग्राम स्वराज्य समितीचे कमलाकर व्यवहारे, रमाई ब्रिगेडच्या सुरेखाताई निकाळजे, आझाद हिंद महिला संघटनेच्या पंचफुलाबाई गवई, मा.उपसरपंच किशोर चव्हाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १९०० - २१७६ |
| गहू | १७०० -२२५० |
| तुर | ६८०० - ८२५० |
| हरभरा | ४४५० - ५२५० |
| सोयाबीन | ४०००- ५२५० |
| उडीद | ५००० - ५००० |
| मुग | ३५०० - ४३०० |
| मका | १४०० - १४०० |

# चिखली मतदारसंघात रस्ते विकासकामांना गती

## निर्माणाधीन १४३ कोटी रु.च्या रस्त्याची आ. सौ श्वेता महाले पाटील यांनी केली पाहणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि. ८:** चिखली विधानसभा मतदारसंघाच्या आमदार तथा विकासकन्या मा.सौ. श्वेता महाले पाटील यांनी आज शनिवारी मतदारसंघातील शेतकरी बांधवांना दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू असलेल्या महत्त्वाकांक्षी रस्त्याच्या कामाची सविस्तर पाहणी केली. या रस्त्यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करण्यात येणार असून हे काम सध्या प्रगतिपथावर आहे. या विकास पाहणी दौऱ्यामध्ये संबंधित अधिकारी व पदाधिकारी यांच्यासमवेत आमदार श्वेता महाले पाटील यांनी मौजे चंदनपुर, मौजे काटोडा, मौजे अंबाशी, मौजे एकलारा, मौजे बोरगाव काकडे, मौजे पेठ, मौजे तेल्हारा फाटा, मौजे उतरादा, मौजे धोत्रा भनगोजी, व मौजे शेलसूर येथे पाहणी पूर्ण केली.

आमदार सौ.श्वेता महाले पाटील यांनी पाहणी दौऱ्यादरम्यान उपस्थित कार्यकर्ते, सरपंच, उपसरपंच व गावकरी यांना संबोधित करताना आमदार सौ.श्वेता महाले पाटील म्हणाल्या की,''चिखली मतदारसंघातील शेतकरी बांधवांना त्यांच्या शेतमालाची वाहतूक सुलभ व्हावी, त्यांना बाजारपेठेपर्यंत पोहोचणे सोपे व्हावे यासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. हे काम केवळ रस्ता नाही, तर अनेक पूल या रस्त्यामध्ये असून हा रस्ता मतदारसंघाच्या विकासाचा महामार्ग आहे. काम वेळेत आणि दर्जेदार व्हावे यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत राहू.'' त्या पुढे म्हणाल्या की, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने चिखली मतदारसंघाला विकासकामांसाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचा पुरेपूर उपयोग सामान्य माणसांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी केला जाईल.''प्रत्येक ठिकाणी रस्त्याच्या कामाचा आढावा घेऊन कामाच्या गुणवत्तेबाबत संबंधित यंत्रणेला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. या पाहणी दौऱ्यात मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आमदार सौ.श्वेता महाले पाटील यांच्याकडे काही महत्त्वाच्या बाबी मांडल्या. कार्यकर्त्यांनी रस्त्याचे काम जलद गतीने पूर्ण करण्याची मागणी केली. आमदार सौ. श्वेता महाले पाटील यांनी या सर्व मागण्यांची दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. पाहणी दौऱ्यात आमदार सौ.श्वेता महाले पाटील यांनी संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली. रस्त्याच्या कामाचा सध्याचा टप्पा, कामाची गुणवत्ता, निधीची उपलब्धता आणि काम पूर्णत्वाची अपेक्षित तारीख यांचा आढावा त्यांनी घेतला. कामात कोणत्याही प्रकारची हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. या विकास पाहणी दौऱ्याचे प्रत्येक गावात उत्साहाने स्वागत करण्यात आले. गावकरी, शेतकरी बांधव, सरपंच, उपसरपंच यांनी आमदार श्वेता महाले पाटील यांचे पुष्पगुच्छ व शाल-श्रीफळ देऊन सत्कार केला. मतदारसंघात इतक्या मोठ्या रकमेचे रस्त्याचे काम सुरू केल्याबद्दल गावकऱ्यांनी उत्साहाने आ. सौ. श्वेता महाले यांचे स्वागत केले. यावेळी संजय गाडेकर जिल्हा उपाध्यक्ष भाजप, डॉ कृष्णकुमार सपकाळ तालुका अध्यक्ष भाजप, नीरज गायकवाड तालुका अध्यक्ष युवा मोर्चा, तहसीलदार विजय सवडे, उपविभागीय कार्यकारी अभियंता, गटविकास अधिकारी समाधान वाघ, गणेश भगुरे, बंडू अंभोरे तालुका अध्यक्ष युवा मोर्चा, विलास चव्हाण, लक्ष्मण शेळके, बंडू गायकवाड, लक्ष्मण अंभोरे, शैलेश अंभोरे, तेजराव अंभोरे, मनोज कुटे, कृष्णा चौथे, सौ सिंधू तायडे माजी सभापती, नवलसिंग इंगळे, गोपीनाथ लहाने युवा सेना तालुका प्रमुख, पंजाब देशमुख, श्रीनिवास, विजय आडचूळे, शिवानंद गायकवाड, रमेश इंगळे सरपंच, बळीराम काळे, गुलाबराव सोनारे सरपंच, विष्णू शेळके सरपंच, लक्ष्मण रिंढे, गजानन रिंढे, विशाल नेमाने, तसेच विविध गावांतील सरपंच, उपसरपंच, बूथ प्रमुख आणि महायुतीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# राज्यात आयुष मंत्रालय व विद्यापीठ हवे

## केंद्रीय आयुषमंत्री जाधव यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.८:** राज्यात नवीन स्वतंत्र आयुष मंत्रालय आणि आयुष विद्यापीठ स्थापने संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांची काल केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट घेऊन मागणी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये आयुष मंत्रालय नव्याने स्थापन केले. याच मंत्रालयांतर्गत आयुर्वेदिक चिकित्सा पद्धतीचा उपयोग करून आरोग्य सेवेबाबत काम केले जात आहे. राज्यात सुद्धा आयुष मंत्रालयाची स्थापना केल्यास आयुष अंतर्गत सुरू असलेल्या कामांना गती मिळेल आणि लोकांना सहज सुलभ सेवा देता येणार आहे. त्यासाठी राज्यात आयुष मंत्रालयाची आणि आयुर्वेदिक विद्यापीठाची स्थापना करावी अशी मागणी केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल सहा मार्च रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन केली आहे. सोबतच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची ही भेट घेऊन या संदर्भत त्यांच्यासोबत ही चर्चा केली. विकासात्मक कामासंदर्भात केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली राज्यातील मंत्र्यांसोबत चर्चा

केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे ६ मार्च रोजी मुंबई दौऱ्यावर असताना त्यांनी आज विधानभवन येथे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची त्यांच्या दालनात सदिच्छा भेट घेतली. यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी त्यांचे स्वागत करून शाल व पुष्पगुच्छ देत त्यांचा सत्कार केला. आणि महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सव निमित्त प्रकाशित करण्यात आलेले ''विधान परिषदेने संमत केलेली महत्वपूर्ण विधेयके, ठराव आणि धोरणे'' हे पुस्तक नामदार प्रतापराव जाधव यांना भेट म्हणून दिले. या भेटीदरम्यान आयुष मंत्रालयामार्फत देशभरात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे व कामाचे कौतुक केले.विधान परिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे यांनी कौतुक केले. यावेळी ज्येष्ठ संपादक योगेश त्रिवेदी आणि किशोर आपटे उपस्थित होते. त्यांनतर जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन जिल्ह्यातील जलसंपदा विभाग अंतर्गत विकासात्मक कामांसंदर्भात आणि ग्राम विकास विभागाच्या योजना, वर्ग तीर्थक्षेत्र विकास कामांच्या निधी उपलब्ध करुन देण्यात बाबत चर्चा केली. यावेळी निधी उपलब्धते दोन्ही मंत्री महोदयांनी सकारात्मकता दर्शविली आहे.

# एकल महिलांच्या मुलांना स्वीकारून लग्न करण्याची तयारी ठेवा-प्रा.लहाणे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि. ८ :** प्रत्येक गावामध्ये तरुण मुलांना लग्नासाठी मुली मिळत नाही, लग्नाळू तरुणांनी एकल महिलांच्या मुलांना स्वीकारून त्यांच्यासोबत लग्न करण्याची मानसिकता ठेवावी व आयुष्याला जोडीदार मिळवून सुखी जीवन घालवावे असे आवाहन मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी एस लहाने यांनी केले आहे.

महाराष्ट्र मराठा सोयरीक संभाजीनगर व मानस फाउंडेशनच्या वतीने आयोजित मराठासमाजवएकल,महिलांचापरिचय मेळावा पानवडोद खुर्द ता. सिल्लोड,जिल्हा संभाजी नगर येथे महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर आज पार पडला यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष कावळे पाटील होते. उद्घाटक म्हणून मराठा सोयरिक चे अध्यक्ष पोपटराव सातपुते, विजय दौंड, प्रकाश गाडेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. परिचय मेळाव्यास मोठ्या संख्येने समाज बांधवांची उपस्थिती लाभली होती. यामध्ये तरुण-तरुणी यांच्यासह पालकही उपस्थित झाले.विधवा, विधुर ,घटस्फोटीत यांचा समावेशही दखलपात्र होता. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. पुढे बोलताना प्रा.डी एस लहाने म्हणाले, एखाद्या महिलेवर दुःखाचा डोंगर कोसळतो, जेव्हा तिचा आयुष्याचा जोडीदार सोडून जातो, यामध्ये तिला दोषी धरणे योग्य नाही. अतिशय कमी वयामध्ये बऱ्याचशा मुली विधवा होतात. दुसरीकडे तरुणांना लग्नासाठी मुली मिळत हे चित्र सर्वत्र आहे.दोघेही अडचणीत आहे. गावा गावांमध्ये अनेक तरुण बिना लग्नाचे आहे. अनेकांची वय देखील बरेचसे झाले आहे. अशा वेळी काळाची पावले ओळखून लग्नाळू तरुणांनी विधवा, घटस्फोटीत महिलांशी लग्न करण्याचा विचार केल्यास दोघांनाही जोडीदार मिळू शकतो व जीवन सुखी जगता येऊ शकते. यात गैर काहीही नाही. हीच सामाजिक मानसिकता तयार करण्याचे काम मानस फाउंडेशन करीत असल्याचे ते म्हणाले. संतोष दौंड, गजानन दौंड तात्यासाहेब गावंडे यांनी भूमिका विशद केली. पानवडोद खुर्द, पानवडोद बुद्रुक ग्रामपंचायत,सर्व सदस्य व ग्रामस्थांनी नियोजन करून कार्यक्रम यशस्वी केला. आयोजक विजय अंभोरे व पोपटराव सपकाळ पाटील यांनी आयोजनाची भूमिका मांडली.असे मेळावे प्रत्येक जिल्ह्यामध्ये झाले पाहिजे, जेणेकरून लग्न जुळवणे ही अति अवघड झालेली समस्या सोडवण्यास मदत होईल असे ते म्हणाले.




**मा.श्री.डॉ. किरण पाटील** (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी, बुलढाणा



**मा.ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस**
महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री



**मा.श्री.गुलाबराव खरात** (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बुलढाणा

## महाराष्ट्रात बुलढाणा जिल्हा अव्वल - अभिमानास्पद कामगिरी !

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय Nominal GDDP Growth ( 2024-25 vs 2023-24 ) आकडेवारीनुसार २२.६% आर्थिक वाढीसह बुलढाणा जिल्ह्याने संपूर्ण राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे, ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे. या उल्लेखनीय यशामागे आदरणीय जिल्हाधिकारी महोदय मा.डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.), मा. श्री. गुलाबराव खरात (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. बुलडाणा, मा. श्री. प्रमोद लांडे, उपसंचालक, जिल्हा औद्योगिक केंद्र, बुलडाणा, मा. श्री. संतोष डाबरे, जिल्हा कृषी अधिक्षक, बुलडाणा, मा. श्री. के. के. सिंग, Lead District Manager (LDM) दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, अचूक Micro Planning आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन हे प्रमुख कारण ठरले आहे. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीमुळे जिल्ह्यातील सर्व विभागांना स्पष्ट दिशा मिळाली त्यासर्व संबंधीत शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच बुलडाणा जिल्ह्याची सुव्यवस्था राखणारे सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यामुळे विकासाच्या उद्दिष्टांकडे एकजुटीने वाटचाल करता आली.

तसेच सर्व विभागप्रमुखांनी आपल्या आपल्या क्षेत्रात घेतलेली मेहनत, समन्वयाने केलेले काम आणि प्रशासनातील संपूर्ण टीमची समर्पित भावना यामुळेच आज बुलढाणा जिल्ह्याने राज्यात अव्वल स्थान मिळवले आहे. राज्यातील बहुतेक जिल्ह्यांची आर्थिक वाढ १०-१३% च्या दरम्यान असताना बुलढाणा जिल्ह्याने २२.६% वाढ नोंदवून विकासाचा नवा मापदंड निर्माण केला आहे.

आदरणीय जिल्हाधिकारी महोदय, सर्व विभागप्रमुख आणि संपूर्ण जिल्हा प्रशासन टीमचे मनःपूर्वक अभिनंदन! ही कामगिरी केवळ एक आकडा नाही, तर सुयोग्य नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि एकजुटीच्या टीमवर्कचे उत्कृष्ट उदाहरण आहे. ''योग्य नेतृत्व आणि समर्पित टीम असेल तर कोणतेही उद्दिष्ट अशक्य नाही - बुलढाणा जिल्ह्याने ते सिद्ध करून दाखवले आहे.'' बुलढाणा जिल्ह्याचे जी. डी. पी. वाढण्यास मुख्य कारण कृषी क्षेत्रामध्ये झालेली क्रांती जसे बुलढाणा घाटमाथ्यावर झालेले सिडहब शेतकऱ्यांनी अवलंबलेली आधुनिक शेती प्रणाली जसे पॉलीहाऊस यामुळे हे शक्य झाले. त्याकरीता सर्व शेतकरी बांधवांचे सुध्दा मनापासून धन्यवाद !

**जिल्ह्यातील निर्यात ८७४ वरुन पंधराशे कोटींपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट!**

'महा निर्यात इग्नाईट कन्व्हेन्शन' कार्यशाळा: कृषी उद्योग उभारण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**बुलढाणा जिल्हा नवउद्योग मंजुरीत राज्यात चौथा**

८३० प्रस्तावांना मान्यता; ३३० उद्योग उभारले

**३७८६** प्रस्तावांना विभागात मंजुरी देण्यात आली.

**बुलडाणा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा हा तुरा रोवण्यात, अर्थव्यवस्थेला अधिक गतिशील ठेवण्यासाठी बुलडाणा अर्बन परिवाराचे महत्वपूर्ण योगदान बुलढाणा जिल्ह्यातील एकूण रु. ५१८८.०० कोटीचा व्यवसाय याला जिल्ह्यातील संस्थेच्या १०६ गोदाम व २ कोल्ड स्टोरेजची जोड मिळाली आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो.**

... शुभेच्छुक...



**डॉ.सुकेश झंवर**
अध्यक्ष, बुलढाणा अर्बन



**राधेश्याम चांडक (भाईजी)**
संस्थापक अध्यक्ष, बुलढाणा अर्बन



**सौ. कोमलताई झंवर**
अध्यक्षा, बुलढाणा अर्बन चॅरीटेबल

**व सर्व संचालक मंडळ, बुलढाणा अर्बन परिवार**

Buldana Urban
Co-op. Credit Society Ltd., Buldana
Multi-state R. No. 267

बुलडाणा अर्बन
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बुलढाणा
मल्टिस्टेट रजि. नं. २६७


# होमगार्ड समादेशक कार्यालय येथे जागतिक महिला दिन उत्साहात





अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मंगरूळ नवघरे दि.८:** महिला म्हणजे केवळ कुटुंबाचा आधार नसून समाजाची खरी ताकद आहेत प्रत्येक स्त्रीमध्ये धैर्य,जिद्द, आणि आत्मविश्वासाने. कोणतीही गोष्ट सहज साध्य करण्याची क्षमता आहे आपल्या आयुष्यातील आई ,पत्नी , मुलगी, बहीण , मैत्रीण. किंवा सहकारी यांच्या योगदानाशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे. त्यांच्या अथक परिश्रमाने त्यागाने आणि प्रेमाने संपूर्ण समाज घडतो असे प्रतिपादन तालुका होमगार्ड समादेशक श्री शिवाजी राजपूत यांनी महिला दिनानिमित्त महिला होमगार्ड सैनिक यांचा सत्कार करून करण्यात आली. महिला केवळ घराची जबाबदारी सांभाळत नाही तर त्यांनी प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले आहे शिक्षण, विज्ञान तंत्रज्ञान ,कला क्रीडा राजकारण, व्यवसाय,अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी स्वतःचा ठसा संपलेला आहे त्यांची योगदान किंवा त्यांच्या कुटुंब कुटुंबापूर्ती मर्यादित नसून , तर त्यांनी संपूर्ण समाजाला आणि देशाला घडवण्याची महान कार्य केले आहे. असेही ते पुढे म्हणाले यावेळी चिखली तालुका पलटण नायक विजय खेडेकर, गजानन वरपे, तसेच राजेंद्र नरवाडे. कृष्णा सोळंकी असे होमगार्ड सैनिक कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# सूर्य आग ओकतोय; विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.८ :** भारत हवामान विभागाच्या प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर यांनी विदर्भातील अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांसाठी पुढील दोन दिवस उष्णतेच्या लाटेची चेतावणी जारी केली आहे. तसेच विदर्भातील बुलडाणा सह इतर भागांमध्येही कमाल तापमान सामान्यापेक्षा सुमारे ३४से. अधिक राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी.

उष्णतेच्या लाटेदरम्यान घ्यावयाची काळजी(मार्गदर्शक तत्वे): शक्यतो दुपारी १२ ते ३ या वेळेत बाहेर जाणे टाळावे. पुरेसे पाणी प्या, तहान नसली तरी नियमितपणे द्रवपदार्थ घ्यावेत. हलके, सैल आणि फिकट रंगाचे सूती कपडे परिधान करावेत. बाहेर पडताना टोपी, छत्री किंवा ओला कापड वापरून डोके झाकावे. मद्यपान, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड पेये कमी प्रमाणात घ्यावीत, कारण त्यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता वाढू शकते.लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी. जनावरांना सावलीत ठेवावे व त्यांना पुरेसे स्वच्छ पाणी द्यावे. उष्माघाताची लक्षणे (डोकेदुखी, चक्कर येणे, मळमळ, जास्त घाम येणे) जाणवली तर त्वरित सावलीत विश्रांती घ्यावी व आवश्यक असल्यास वैद्यकीय मदत घ्यावी. नागरिकांनी सतर्क राहून हवामान विभागाच्या पुढील सूचना व अद्ययावत माहितीकडे लक्ष द्यावे. असे भारत हवामान विभाग प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर यांनी म्हटले आहे.


तुझ्या कीर्तीचा लख्ख उजेड व्हावा तुझा आनंद गगनात न समावा असंच सुख समाधान तुझ्या पदरात पडत राहो तुझा हा वाढदिवस जल्लोषात साजरा व्हावा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!




**कु.राजवि काळे हिला वाढदिवसाच्या खुप-खुप हार्दिक शुभेच्छा..!**

शुभेच्छुक

रविंद्र कैलास काळे (वडील)
सौ.पूजा रवींद्र काळे (आई)
श्री.कैलास काळे (आजोबा)
सौ.सुमनबाई काळे (आजी)
सागर कैलास काळे (काका)
श्री.शरदचंद्र चौधरी (आजोबा चंद्रपूर)
सौ. ज्योती शरदचंद्र चौधरी (आजि चंद्रपूर)
श्री अनंतराव लांडे (मामा डीगी)
सौ.शारदा अनंतराव लांडे (आत्या)
तेजश शरदराव चौधरी (मामा चंद्रपूर

समस्त काळे परिवार मलकापूर,जि.बुलडाणा

## महत्त्वाचे

### महाशिबिर व शासकीय योजनांचा महामेळावा

**अमडापूर :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलडाणा, तालुका विधी सेवा समिती व तालुका वकील संघ चिखली, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा तसेच जिल्हा परिषद बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने चिखली तालुक्यातील जगदंबा बल्लाळ देवी संस्था, अमडापूर येथे दि. ८ मार्च रोजी सकाळी १० वाजता विधी सेवा महाशिबिर, शासकीय सेवा योजनांचा महामेळावा व आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या महाशिबिरामध्ये सुमारे ५० शासकीय स्टॉलद्वारे नागरिकांना विविध योजनांची माहिती व लाभ एकाच छताखाली उपलब्ध करून दिला जाणार आहे. यामध्ये आधार कार्ड नोंदणी व दुरुस्ती, संजय गांधी निराधार योजना, आयुष्यमान भारत कार्ड, जात व उत्पन्न दाखले, नवीन रेशन कार्ड तसेच इतर विविध शासकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय नागरिकांना नालसाच्या विविध योजना, लोकअदालत व मध्यस्थीचे फायदे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य तपासणी शिबिरात डोळ्यांची तपासणी, ओरल कॅन्सर तपासणी, दातांची तपासणी आदी विविध आजारांची तपासणी केली जाणार आहे. नागरिकांसाठी मोफत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकरी व गरजू नागरिकांनी या महाशिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अध्यक्ष आर. एन. रोकडे यांनी केले आहे.

### दोन गटात हाणामारी; परस्पर विरोधी तक्रार

**खामगाव :** लहान मुलांच्या भांडणाच्या कारणावरून दोन गटात हाणामारी झाल्याची घटना सजनपुरी येथे काल ६ मार्च २६ रोजी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी एका गटातर्फे जावेद खान मुख्तीयार खान (३५) यांनी शिवाजी नगर पोस्टेला दिलेल्या फिर्यादीत नमुद केले आहे की, सैय्यद रईस सैय्यद रऊफ, सैय्यद रऊफ सैय्यद अन्नु, सैय्यद अन्नु सैय्यद इम्रान, सैय्यद रईस सैय्यद रेआन या चौघांनी संगनमत करून लहान मुलांचे भांडणाच्या कारणावरून फिर्यादीला शिवीगाळ करून काठी व लोखंडी पाईपने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. तर दुसऱ्या गटातर्फे सैय्यद रईस सैय्यद रऊफ (४८) यांनी शिवाजी नगर पोस्टेला दिलेल्या फिर्यादीत नमुद केले आहे की, जावेद खान मुख्तीयार खान, अख्तर खान मुख्तीयार खान (रा. बऱ्हाणपुर म.प्र.), शेख फैजान शेख रहेमान व शेख रहेमान शेख समर या चौघांनी संगनमत करून लहान मुलाच्या भांडणाच्या कारणावरून लाकडी राफ्टर व लोखंडी पाईपने मारहाण करून जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. उपरोक्त परस्परविरोधी झालेल्या तक्रारीवरून दोन्ही गटातील ८ जणांविरूध्द कलम ३१८ (१), ३५२,३५१ (२), ३ (५) भान्यासं नुसार गुन्हा दाखल केला आहे.

### अमडापूर नाका भागातून इसम बेपत्ता


**संग्रामपूर :** स्थानिक अमडापुर नाका भागातील रहिवासी संजय सखाराम खैरे (५०) हे २३ फेब्रुवारी २६ रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास कोणाला काही न सांगता घरून निघुन गेले. मात्र घरी परतले नाही. याप्रकरणी धनंजय अशोक खैरे यांनी शिवाजी नगर पोस्टेला दिलेल्या फिर्यादी वरून बेपत्ताची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोहेकॉ. सुरज राठोड करीत आहेत. परिसरात त्याना शोधण्यासाठी नागरिकांनी प्रयत्न सूरू आहेत. मात्र त्यांचा शोध न लागल्याने पोलिसात तक्रार दिली आहे.

# अपघाताचा बनाव रचून पतीनेच केला पत्नीचा खून

## पोलिसांकडून सुपारी किलिंगचा पर्दाफाश

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**जळगाव जा. दि.८:** एका भीषण अपघाताच्या नावाखाली दडलेला खुनाचा थरारक कट उघडकीस आणण्यात जळगाव जामोद पोलिसांना मोठे यश आले आहे. किरकोळ अपघात वाटणारी घटना प्रत्यक्षात १ लाख रुपयांची सुपारी देऊन घडवून आणलेला थंड रक्ताचा खून असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक स्नेहा शेडगे यांनी या गुन्ह्याचा अत्यंत शिताफीने तपास लावून आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत.





दिनांक २ मार्च २०२६ रोजी सकाळी पावणे सातच्या सुमारास कवठळ गावाजवळ एका पांढऱ्या रंगाच्या टाटा इंट्रा गाडीने वृषाली प्रकाश गावंडे यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली होती. या अपघातात वृषाली यांचा मृत्यू झाला. सुरुवातीला हा अपघात वाटत होता, मात्र जळगाव जामोद पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला आणि सत्य समोर आले.पोलीस उपनिरीक्षक स्नेहा शेडगे यांनी घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीदारांच्या मदतीने तपास चक्रावून टाकला. तपासादरम्यान संशयाची सुई पांढऱ्या रंगाच्या टाटा इंट्रा ( २८ ५७५३) गाडीकडे वळाली. ही गाडी मनीष नारायणसिंग सुर्यवंशी (रा. जगदंबा नगर, शेगाव) याची असल्याचे समजताच त्याला ताब्यात घेण्यात आले. जळगाव जामोद पोलिसांनी केलेल्या कसून चौकशीत मनीषने या थरारक कटाची कबुली दिली आहे. मनीषने दिलेल्या कबुली जबाबातून धक्कादायक माहिती समोर आली आहे.

- मुख्य सूत्रधार: मृत वृषाली यांचा पती प्रकाश अनंता गावंडे आणि त्याचा साथीदार मंगेश चुलकार (रा. पातुर्डा) यांनी मिळून हा कट रचला होता.
- विषाचा प्रयोग फसला-यापूर्वी वृषाली यांना अन्नातून विष देऊन मारण्याचा तीन वेळा प्रयत्न झाला होता, मात्र तो यशस्वी झाला नाही. अखेर आरोपींनी मनीष सुर्यवंशी याला वृषाली यांना गाडीने उडवण्यासाठी १,००,००० रुपयांची सुपारी दिली होती. ठरल्याप्रमाणे २ मार्चच्या सकाळी मनीषने वृषाली यांच्या गाडीचा पाठलाग केला आणि मागून कट मारून त्यांना खाली पाडले, ज्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या गुन्ह्यात १. वाहन चालक मनीष नारायणसिंग सुर्यवंशी, २.मध्यस्थ मंगेश चुलकार आणि ३. पती प्रकाश अनंता गावंडे या तिघांनाही पोलिसांनी निष्पन्न केले आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ६१(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# स्व.संजय ठाकरे पाटील यांची जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि. ८ :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, जिल्हा परिषदचे माजी सदस्य तथा सकल मराठा सेवा संघटना व छत्रपती प्रतिष्ठानचे संस्थापक स्व. संजय ठाकरे पाटील यांची जयंती दि.६ मार्च रोजी विविध कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. सर्वप्रथम सकाळी ९ वाजता जलंब नाका स्थित सकल मराठा सेवा संघटनेच्या कार्यालयात स्व.संजय ठाकरे पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर सकाळी ९.३० वाजता जिल्हा सामान्य रुग्णलयात रुग्णांना फळ वाटप, १० वाजता लॉयन्स क्लब खामगाव द्वारा संचालित लॉयन्स अन्नछत्र येथे रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना भोजनदान, ११ वाजता जलंब नाका स्थित सकल मराठा सेवा संघटनेच्या कार्यालयासमोर वाटसरूंसाठी मोफत पाणपोईचे उद्घाटन, ११.३० वाजता स्व. संजयभाऊ ठाकरे पाटील बळीराजा आत्मसन्मान योजनेअंतर्गत आत्महत्याग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत, दुपारी १.३० वाजता रेल्वे स्टेशन येथे खामगाव अनाथ, अनवानी व्यक्तींना स्लिपर चप्पलचे वितरणासह आदी लोकोपयोगी कार्यक्रम राबविण्यात आले.या कार्यक्रमांना काँग्रेसचे खामगाव विधानसभा मतदार संघ समन्वयक ज्ञानेश्वर पाटील, काँग्रेस तालुका अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहान, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, अल्पसांख्यक विभागाचे सचिव मो.वसीमुद्दीन, जिल्हा कांग्रेस उपाध्यक्ष जुलकर नैन शेख चांद, जेष्ठ नेते राजाराम कालने, खामगाव शहर अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, डॉ.निखिल ठाकरे, अतुल शिरसाठ, संतोष देशमुख, नगरसेवक मूसा, सुरेशसिंह तोमर, अस्लम पटेल, प्रकाश टिकार, सचिन जयसवाल, अनंता ताठे, निलेश देशमुख, गजानन देवचे, वासुदेव सोळंके, कैलास ताठे ,पवन लांडे, जगदीप चौधरी, किशोर गवांडे, शामराव लांडे, दामोदर ताठे, संजय तायडे, प्रमोद चिंचोलकर, कैलास साबे, गजानन मुळीक, अजय पवार, अक्षय पात्रे, विनोद माळवंदे, सतेंद्र ठाकुर, अक्षय शंकरवार पंकज गमे,नितीन पाटील, सुमित बेंद्रे, जालिंदर चौधरी, रूपेश पाकधाने, भारत पाटिल, अंकित डिडवाणीया, संजय जवंजाल, सुधाकर डुकरे, शुभम कालूसे, शैलेश चोपड़े, मसब ख़ान, वैभव गायकवाड़, भूषण पथरे, संजय खराटे, गोपाल मारखेड़े , संतोष चव्हाण, श्रीनाथ पांडे, दीपक ठाकरे, जय बघेल, अमीत तायडे, घनश्याम सावरकर, अनिल ठाकरे, पंकज घोगले, अजिंक्य कंकाले, विलास नवसागर, लोमेश भोयर, प्रमोद हिंगने, श्रीहरि टीकार, विट्ठल पाटिल, गजानन हींगने, पुरशु रामेकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री छत्रपती प्रतिष्ठान, स्व.संजय ठाकरे पाटील चॅरिटेबल ट्रस्ट खामगावच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.




# तिंत्रव शाळेतील विद्यार्थी घेत आहेत संगणकाचे धडे

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**शेगाव दि.८:** तालुक्यातील पंचायत समिती मधिल जि. प. उच्च प्राथमिक मराठी शाळा तिंत्रव येथे शैक्षणिक सत्र २०२५/२६ मधे ''प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम '' अंतर्गत १० संगणक मिळाले आहेत. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी संगणक उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधे संगणकाविषयी उत्सुकता निर्माण झाली असून ते आनंदाने संगणकाचे धडे घेत आहेत.

शाळेत उपलब्ध संगणकाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान, टायपिंग कौशल्य, चित्रकला तसेच शैक्षणिक सॉफ्टवेअर चा वापर शिकविण्यात येत आहे. शाळेचे मुख्याध्यापक,मुख्याध्यापक--विष्णू घेतले शिक्षक--श्रीकृष्ण वाढोकार , कु. विजया नरवाडे, मधुकर चव्हाण, प्रमोद इंगळे, शैलेश साखरे, सचिन टोपले शिक्षक तसेच स्वयंसेवक आकाश भगवारे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी प्रत्यक्ष सराव करत असल्यामुळें त्यांचा आत्मविश्वास वाढत आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल युगाशी जोडण्यास मदत होत असून त्यांच्या शैक्षणिक प्रगतिस नवीन दिशा मिळत आहे. पालकांनीही ह्या उपक्रमाचे स्वागत केले असून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी हा उपक्रम नवपर्वणी व सर्वत्र दिशादर्शक ठरत आहे.

# हिंगणघाट-छ.संभाजीनगर मार्गे लोणार एकमेव बसफेरी सुरू

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**लोणार दि.८:** प्रवाशी सेवा संघटना,लोणार यांच्या मागणीनुसार जागतिक कीर्तीचे पर्यटन स्थळ लोणार मार्गे दि.०९ मार्च २६ सोमवार पासुन हिंगणघाट आगाराची हिंगणघाट-छ.संभाजीनगर हि नवीन हिंगणघाट करीता राज्य परिवहन महामंडळाची एकमेव बसफेरी प्रवाशांच्या वारंवार होणाऱ्या मागणीनुसार प्रवाशांच्या सेवेसाठी सुरू करण्यात आली आहे.

सदर बसफेरी हिंगणघाट येथुन सकाळी ०७.४५ वाजता निघुन ती वर्धा, यवतमाळ,दिग्रस, आर्णी, पुसद, अनसिंग, वाशिम,रिठद,रिसोड,भर, मोप,लोणी,लोणार,सुलतानपुर, बिबी, दुसरबीड, किंनगावराजा, सिंदखेडराजा, नाव्हा, जालना मार्गे रात्री १०.०० वाजता सिडको (छ.संभाजीनगर) येथे मुक्कामी पोहचेल दुसऱ्या दिवशी सिडको (छ.संभाजीनगर) बसस्थानक येथुन सकाळी ०८.०० वाजता हि बसफेरी हिंगणघाट करीता सुटुन ती रात्री १०.०० वाजता हिंगणघाट येथे पोहचेल लोणार,रिसोड आणि वाशिम या तिन्ही शहरातुन हिंगणघाट करीता हि बस फेरी एकमेव बसफेरी आहे,सदर फेरी सुरू करुन प्रवाशांची प्रवासाची गैरसोय दुर केल्याबद्दल नितीन मैंद, महाव्यवस्थापक (वाहतुक)मुंबई, श्रीकांत गभणे, प्रादेशिक व्यवस्थापक, नागपुर, भगवान जगणोर, विभाग नियंत्रक, वर्धा, स्वाती तांबे मॅडम,विभागीय वाहतुक अधिकारी, वर्धा आणि गौतम शेंडे, आगार व्यवस्थापक, हिंगणघाट यांचे प्रवाशी सेवा संघटनेच्या अध्यक्ष, उस्मान शेख, सचिव, भागवत खरात आणि उपाध्यक्ष अशोक काटकर यांनी आभार व्यक्त केले असुन प्रवाशी, पर्यटक, व्यापारी, रुग्ण, भक्तगण आणि विद्यार्थी यांनी सुरू करण्यात आलेली एकमेव बसफेरीचा लाभ घ्यावा असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी किसान सभेचा विदर्भ दौरा- प्रांताध्यक्ष मनकर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**शेगाव दि.८ :** राष्ट्रवादी किसान सभेच्या वतीने विदर्भ दौऱ्याचे आयोजन करण्यात आले असून हा दौरा दिनांक १३ मार्च २०२६ ते १७ मार्च २०२६ दरम्यान पार पडणार आहे. या दौऱ्याचे नेतृत्व किसान सभा प्रांताध्यक्ष ऍड. वसंत मनकर करणार आहेत. या दौऱ्यात अॅड मनकर तसेच प्रदेश सरचिटणीस तथा संपर्कप्रमुख डॉ. गणेश डोंगरे, राज्य समन्वयक डॉ. मंगेश देशमुख, तसेच विदर्भप्रमुख व उपाध्यक्ष जगदीश वासुदेव जुनगरी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि शासनामार्फत त्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे.

दौऱ्याचा कार्यक्रम :- १३ मार्च : सकाळी १० वाजता बुलढाणा (शेगाव) दुपारी २ वाजता अकोला सायं. ४ वाजता वाशिम (मालेगाव) - १४ मार्च : सकाळी ११ वाजता अमरावती दुपारी ३ वाजता यवतमाळ (पुसद) - १५ मार्च : सकाळी ११ वाजता वर्धा दुपारी ३ वाजता नागपूर १६ मार्च : सकाळी ११ वाजता भंडारा दुपारी ३ वाजता गोंदिया- १७ मार्च : सकाळी ११ वाजता गडचिरोली दुपारी ३ वाजता चंद्रपूर या दौऱ्यात संबंधित जिल्ह्यांतील जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी तसेच फ्रंटल ऑर्गनायझेशनचे कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. मुख्य उद्दिष्टे- शेतकऱ्यांचे प्रश्न व मनोगते समजून घेणे - केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे.

# यशस्वी स्त्रीच्या पाठीमागे डॉ. आंबेडकरांचा हात- अस्मिता क्षिरसागर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**जळगाव जा. दि. ८:**प्रत्येक महापुरुषाच्या यशस्वीतेत स्त्रियांचा सहभाग असतो. त्याचप्रमाणे प्रत्येक यशस्वी स्त्रीच्या पाठीमागे घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाने दिलेल्या समता,स्वातंत्र्य व न्याय या तत्वाचा हात आहे असे स्पष्ट प्रतिपादन अस्मिता विठ्ठल क्षिरसागर (कोकाटे )यांनी केले. त्या जागतिक महिला दिनानिमित्त पंचायत समिती जळगाव जामोद च्या कार्यालयात दिनांक ८ मार्चला २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरी करुन तालुक्याचे नाव लौकिक केला.

त्याबद्दल केलेल्या सत्काराला उत्तर देताना बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात प्रथमतः राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, माता रमाई यांच्या फोटोला माल्ल्यार्पण व दीप प्रज्वलनाने झाली. उच्च श्रेणी मुख्याध्यापीका पुष्पाताई कसुरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी संदीप मोरे,गटविकास गटशिक्षणाधिकारी श्रीकांत जोशी,कार्यालय अधीक्षक रवींद्र इंगळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सत्कारमूर्ती यांना पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देण्यात आले. क्रमाचे संचालन दीपक पसरटे व आभार प्रदर्शन सुनील हागे यांनी केले.



# युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि. ८:** येथील युगधर्म पब्लिक स्कूलमध्ये जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल तर मार्गदर्शनासाठी प्राचार्य अनिरुद्ध सर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. श्रुती लड्ढा, सौ. निर्मला जाधव मॅडम (शिक्षण विस्तार अधिकारी) आणि सौ. सुनिता गवई मॅडम (विषय तज्ञ, पंचायत समिती खामगाव) यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राची पवार व स्वरा पवार यांनी आत्मविश्वासपूर्ण पद्धतीने केले, स्वागत गीत सोनाली नगरी मॅडम यांनी गायीले तर आभार प्रदर्शन ईश्वरी बोदडे यांनी केले.



यावेळी प्राचार्य अनिरुद्ध आणि अध्यक्ष गोपाल अग्रवाल यांनी आपले विचार व्यक्त करताना महिला सन्मानाचे महत्त्व अधोरेखित केले. महिला दिन केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित न ठेवता महिलांचा सन्मान व आदर दररोज केला पाहिजे, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वंशिका गवई, नूतन मोरखडे, स्वरा वाकोडे तसेच इयत्ता पहिलीतील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि इयत्ता पाचवीतील सर्व मुलींनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व महिला शिक्षकांचा पुष्पगुच्छ, भेटवस्तू देऊन व पेढे भरवून सन्मान केला आणि महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्या शिक्षकांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**शैक्षणिक** — जागतिक महिला दिनानिमित्त डॉ. प्रिया बोचे यांचे प्रबोधन

# उत्कर्ष महाविद्यालयात जेंडर जस्टिस विषयावर विशेष व्याख्यानाचा जागर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**सिंदखेड राजा दि. ८ :** उत्कर्ष फाउंडेशन संचालित, उत्कर्ष कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य संदीप अवसरमोल लाभले होते. प्रमुख वक्त्या म्हणून संत भगवान बाबा कला महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रिया बोचे यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी भानुबाई राठोड यांची विशेष उपस्थिती लाभली, तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून प्रियंका मेहेत्रे हिने व्यासपीठावर उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे प्रतिनिधित्व केले.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ यांच्या विचारांना अभिवादन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मल्लिकार्जुन कोथडीकर यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी महिला दिनाचे महत्त्व विशद केले. यानंतर प्रा. सुमेध खरात यांनी उपस्थित सर्व मान्यवर पाहुण्यांचा सविस्तर परिचय करून दिला. मनोगत व्यक्त करताना प्रा. नरहरी राऊत आणि प्रा. अमितकुमार खरात यांनी स्त्री-पुरुष समानतेच्या काळातील आव्हानांवर प्रकाश टाकला. त्यानंतर प्रमुख वक्त्या डॉ. प्रिया बोचे यांनी 'राईटस टू रिॲलिटी : टेकिंग ॲक्शन फॉर जेंडर जस्टीस' या विषयावर आपले बीजभाषण दिले. त्यांनी आपल्या भाषणातून महिलांच्या हक्कांची अंमलबजावणी प्रत्यक्ष जीवनात कशी करावी, याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य संदीप अवसरमोल यांनी शिक्षणातूनच समाजात वैचारिक परिवर्तन शक्य असल्याचे सांगितले. शेवटी प्रा. अमितकुमार खरात यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे नेटके आयोजन आणि सूत्रसंचालन इंग्रजी विभागाच्या प्रा. स्नेहांकिता पुंडकर यांनी केले. या सोहळ्याला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंदातून प्रा. वीरेंद्र तायडे, प्रा. पांडुरंग तांबेकर, तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी परीक्षित जंजाळकर, नरेश जाधव, शुभम भाग्यवंत आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. सिंदखेड राजा येथील रेशमाई सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह निर्माण केला.

# सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पसमध्ये महिला सक्षमीकरण व रोजगार कौशल्य कार्यशाळा उत्साहात

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**शेगाव दि. ८ :** स्थानिक वसुंधरा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, खामगाव द्वारा संचालित सिद्धिविनायक टेक्निकल कॅम्पस, शेगाव येथील आय.सी.सी.विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय रोजगार क्षमता कौशल्य कार्यशाळेचा समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. ५ मार्च ते ७ मार्च २०२६ या कालावधीत नांदी फाउंडेशनच्या सहकार्याने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत मुख्य प्रशिक्षक प्रा. कृष्णा रविंद्र बुऱ्हाडे यांनी विद्यार्थिनींना भविष्यातील करिअरची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेले तांत्रिक ज्ञान, संवाद कौशल्य आणि आत्मविश्वास वाढवण्याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले. आधुनिक युगात नोकरीच्या संधी कशा शोधाव्यात आणि स्वतःला सक्षम कसे बनवावे, यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तंत्रनिकेतनच्या प्राचार्या प्रा. प्रिती चोपडे यांनी भूषविले. यावेळी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत जी. कुलकर्णी आणि तंत्रनिकेतनचे अधिष्ठाता प्रा. सचिन इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींना संबोधित करताना बदलत्या काळानुसार कौशल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आय.सी.सी. कार्यक्रमाधिकारी प्रा. दिपाली वनारे व प्रा.पुजा दळवी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अर्पिता बयस व कु. आनंदी वानखडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. अर्पिता बयस हिने मानले. या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सागर फुंडकर तसेच संस्थेचे उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री व अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अॅड. आकाश फुंडकर यांनी आयोजक टीमचे कौतुक करून सहभागी विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या.



## महत्त्वाचे



### बारागाड्या उत्सव समिती अध्यक्षपदी वानखेडे

**जालना :** जालना शहरातील रामनगर येथील आराध्य दैवत जागृत घनतृप्त हनुमान बारागाड्या उत्सव समिती अध्यक्षपदी बाबासाहेब वानखेडे यांची एकमताने निवड करण्यात आली.यावेळी उत्सव समितीच्या उर्वरीत कार्यकारिणीत सचिवपदी रामेश्वर सुरसे, कार्याध्यक्षपदी चरणदास महंत, उपाध्यक्षपदी भवगान गाडेकर, म्हसुजी वानखेडे, संदीप वानखेडे यांची एकमताने निवड झाली. २ एप्रिल २०२६ गुरूवार रोजी जागृत दक्षिणमुखी घनतृप्त हनुमान मंदिरासमोर ५ वाजता बारा गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी आ.अर्जुनराव खोतकर,मा. आ. कैलाश गोरंट्याल, भास्कर दानवे, भास्करराव अंबेकर, उपमहापौर राजेश राऊत, डॉ. विशाल धानुरे, अमोल धानुरे, विष्णु पाचफुले, ॲड.बी.एम. कुलकर्णी, भगवानराव गाडेकर, सुरेश रत्नपारखे, धनराज लोंढे, शंकर वानखेडे, पांडुरंग वानखेडे, वैजीनाथ नागरे, भागुजी वानखेडे, संतोष वानखेडे, निलेश वानखेडे, रामु वानखेडे, अशोक वाघमारे, म्हसुजी वानखेडे, बाबासाहेब सोनवणे, रामेश्वर खांडेभराड, परमेश्वर खांडेभराड , पंढरीनाथ सोळुंखे, सागर राऊत, अशोक मेहेत्रे, अशोक वाघमारे, अरूण शिवाजी वानखेडे, भगवान येवले, गणेश सोमधाने, हरिभाऊ वानखेडे, सिताराम रोडगे, राम रोडगे, शिवलाल घाडगे, नितीन तायडे, संतोष गायकवाड, शिवराम सुरसे, कृष्णा वानखेडे आदींनी योगदान दिले.

### छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर उत्साहात

**जालना :** देवमूर्ती येथे आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिराला परिसरातील शेतकरी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून शासनाच्या विविध योजनांची माहिती घेतली. या शिबिराला रमेश मिसाळ ,अपर जिल्हाधिकारी, मनीषा देशपांडे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), गहिनीनाथ कापसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, जालना तसेच विष्णू राठोड, तालुका कृषी अधिकारी, जालना यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते. मान्यवरांनी कृषी विभागाच्या स्टॉलला भेट देऊन विविध योजनांची माहिती घेतली. कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना, पीएम किसान योजना, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, ॲग्रीस्टॅक तसेच इतर विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांकडून विविध योजनांचे अर्ज स्वीकारण्यात आले व त्यांच्या कृषी विषयक अडचणी ऐकून त्यांचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी मदत झाली.

### आज स्त्री सन्मान सोहळा

**अंबड :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोमवार, दि.९ मार्च रोजी शहरातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृहात स्त्री मुक्ती नव्हे स्त्री सन्मान हा विशेष कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती संयोजकांच्यावतीने देण्यात आली.

# जिल्हाधिकारी व पालकमंत्र्यांची मनमानी; मर्जीतील लोकांना दिली कामे आणि निधी?



## औरंगाबाद खंडपीठाची दोघींनाही नोटीस

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ८ :** जालन्याच्या जिल्हाधिकारी आणि पालकमंत्री पंकजा मुंडे यांना नोटीस पाठवण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. जिल्हा नियोजन समितीचे गठन नियमानुसार नाही. तसेच नियोजन समितीत केलेल्या कामांची निवड आणि निधी वाटपाचे दिलेले आदेश हे नियम डावलून देण्यात आले आहेत. आपल्या मर्जीतील व्यक्तींना कामे व निधी दिल्याचा आक्षेप पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी जालना यांच्या वर याचिकेद्वारे घेण्यात आला होता. यावर उच्च न्यायालयाने हे आदेश दिले आहेत.

मंठा तालुक्यातील राष्ट्रवादी कांग्रेस चे कार्यकर्ते भाऊसाहेब गोरे हे राज्यपाल नियुक्त सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अडव्होकेट राजेंद्र डासाळकर यांच्या माध्यमातून जनहित याचिका औरंगाबाद खंडपीठात दाखल केली होती. ज्यात वरील आक्षेप नोंदवण्यात आले होते. यावर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने प्रतीवादी राज्य सरकार, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर सह पालकमंत्री पंकजा मुंडे आणि जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना नोटीस देण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, जालना जिल्हा नियोजन समिती कलम तीन महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती कायदा १९९८ प्रमाणे गठीत केलेली नसून ती अवैध आहे. पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी दिलेल्या निधी वाटपाचे आदेश रद्द करण्यात यावे, अशी विनंती न्यायालयाकडे करण्यात आली आहे. यावर खंडपीठाच्या न्या. विभा कणकणवाडी आणि न्या. वेणेगावकर यांनी प्रतिवादी राज्य सरकारसह इतरांना नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे.

डीपीडीसी बैठक आणि पत्रकार वाद

जालना जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात होणारी जिल्हा नियोजन समितीची बैठक ही मागील काही दिवसांपासून वादात असल्याचे पहायला मिळते. पत्रकार बैठकीत प्रवेश मिळावा यासाठी आग्रही असतात. मात्र मागील अनेक बैठकीनंतर पत्रकारांना नियमांचा हवाला देत प्रवेश नाकारण्यात आला आहे. यामुळे पत्रकारांनी अनेकदा नाराजी व्यक्त केली तर अनेकांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे देखील पहायला मिळाले. यातच डीपीडीसी बैठकीतील अनियमिततेबाबत न्यायालयाने कान उपटल्याने बैठकीत होणारे निर्णय आणि निधी वाटप संशयच्या भोवऱ्या अडकले आहे.



## परतूरमध्ये मारुती मंदिरावर दगडफेक

- हिंदुत्ववादी संघटनांचा संताप
- दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**परतूर, दि. ८ :** परतूर शहरातील मारुती मंदिर परिसरात अज्ञात असामाजिक तत्वांकडून दगडफेक करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांच्या धार्मिक भावना दुखावल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.

धार्मिक स्थळाची विटंबना झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात एकत्र येत या प्रकाराचा निषेध नोंदविला.

दरम्यान, या घटनेचा सकल हिंदू समाज व हिंदुत्ववादी संघटनांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. धार्मिक स्थळावर अशा प्रकारची घटना घडणे अत्यंत गंभीर असून समाजात तणाव निर्माण करण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न असू शकतो, असे संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन पोलीस प्रशासनाने सखोल चौकशी करून अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करावा व दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी मंदिर परिसरात कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त व सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचीही मागणी करण्यात आली आहे. जर या प्रकरणात तातडीने कारवाई झाली नाही, तर सकल हिंदुत्ववादी संघटनांच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनांनी दिला आहे.

**मंदिरासारख्या पवित्र स्थळावर दगडफेक होणे अत्यंत दुर्दैवी आहे. पोलिसांनी तात्काळ आरोपी शोधून कठोर कारवाई करावी.''**

**-अर्जुन जगताप, युवा मोर्चा, शहर अध्यक्ष.**

**''धार्मिक भावना दुखावणाऱ्या अशा घटना समाजातील सलोखा बिघडवतात. प्रशासनाने याकडे गंभीरतेने पाहावे.''**

**-कुणाल शहाणे**

## जिल्हा वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.गडगिळे तर उपाध्यक्षपदी ॲड.वाहुळकर

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. ८ :** जालना जिल्हा वकील संघाचे निवडणुकीत एकुण मतदान ६३७ झाले ,अध्यक्षपदाचे उमेदवार ॲड. परमेश्वर अशोकराव गडगिळे(मते-४२०)यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी ॲड.महेश सितारामजी धन्नावत(मते -२११) यांचा पराभव केला, यावेळी ६ मते बाद झाली.उपाध्यक्षपदाचे उमेदवार ॲड.अशोक लिंबाजी वाहुळकर(मते ४६४)यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी ॲड.उमर असलम परसुवाले(मते -१७०)यांचा पराभव केला यावेळी ३ मते बाद झाली,.सचिवपदाचे उमेदवार ॲड. विनोद रामराव कुलकर्णी(मते-३८३) यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी ॲड.विवेकसिंह कल्याणसिंह ठाकुर (मते- २४७)यांचा पराभव केला यावेळी ७ मते बाद झाली,सह सचिव पदाचे उमेदवार ॲड. शिवनाथ रघुनाथराव जऱ्हाड(मते-४३३)यांनी ॲड.प्रितम प्रकाशराव कुलथे(मते -१९७)यांचा पराभव केला यावेळी ७ मते बाद झाली.

मुख्य निवडणूक अधिकारी तथा मुख्य निर्वाचन अधिकारी ॲड.सय्यद तारेक सय्यद मजीद यांच्यासह निवडणूक समितीचे सदस्य म्हणून ॲड.मनोरमा महालकर, ॲड.गावंजी घोडे, ॲड. ऋषिकेश जाधव,ॲड. दिलीप जंजाळ, ॲड.खान सलमान दिलावर, ॲड.दर्शित आबड, ॲड. सुनिल कचरे,ॲड.दिपिका घवले, ॲड. सारिका वाघ,ॲड.वर्षा पटवकर-चव्हाण आदींनी काम पाहिले अशी माहिती ॲड.अरविंद मुरमे यांनी दिली आहे.

## गटविकास अधिकाऱ्याच्या दालनाला हार घालून निषेध

**जाफराबाद :** येथील पंचायत समिती कार्यालयांमध्ये शुक्रवारी घरकुलाच्या रखडलेल्या देयकाबाबत विचारपूस करण्यासाठी आम आदमी पार्टीचे तीन सदस्य गेले असता, गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनावर शासनाने नेमलेल्या बेळेतही कुलूप लावलेले होते. यावर निषेध म्हणून दरवाज्याला हार घालून निषेध नोंदविण्यात आला. आम आदमी पार्टीचे सुभाष बोर्डे यांनी इशारा दिला की, जाफराबाद तालुक्यातील घरकुलाचे देयक लवकरात लवकर अदा करावे, तसेच गटविकास अधिकारी देविदास मगर व नवीन अधिकारी गायकवाड यांची विभागीय चौकशी करावी. अन्यथा, पंचायत समितीवर आंदोलन करण्यात येईल. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, घरकुल लाभार्थीकडून वारंवार कार्यालयात भेट दिली जात असून गटविकास अधिकारी हजर नसल्यामुळे लाभार्थींना टोलवाटोलवीचे उत्तर मिळत आहे. यावर चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी बोर्डे यांनी केली आहे.



**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे धुळे दौर्या निमित्त छत्रपती संभाजीनगर येथे आगमन झाले, त्यावेळी बाबुराव कदम, बाळकृष्ण इंगळे, महेंद्र रत्नपारखे, अनिल खिल्लारे, विजय खरात, नितीन पट्टेबहादूर, प्रतीक लांडगे, विकास रत्नपारखी आदी पदाधिकारी स्वागतासाठी उपस्थित होते.**

## मुलींनी उच्चशिक्षणाचे ध्येय ठेवावे-संजय हेरकर

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. ८ :** बदनापूर तालुक्यातील नुतन वसाहत सेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्वप्रथम क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गावातील बारावी उत्तीर्ण मुलींचा सन्मान करण्यात आला. त्यांना पुष्प व महापुरुषांचे पुस्तक देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक संजय हेरकर म्हणाले की, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांनी देशात मुलींची पहिली शाळा सुरू करून शिक्षणाची क्रांती घडवून आणली. म्हणून आज देशातील अनेक महिला राजकीय, सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत. याची जाणीव ठेवून मुलींनी उच्च शिक्षण घेण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. उच्च शिक्षण असेल तर महिलांचा अधिक सन्मान होतो तसेच घराची, देशाची प्रगती जास्त प्रमाणात होते. या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहूल खिल्लारे, शिक्षणप्रेमी बबलू शेख, अमोल तुपे, जनार्दन अंभोरे तसेच सन्मानित करण्यात आलेल्या महिला मंदा घोरपडे, जया म्हस्के, बारावी उत्तीर्ण मुली स्वाती शिंदे, साक्षी खांडेभराड, ऋतुजा कापसे, दिव्या चंदेल, श्वेता डोंगरे, प्रिती ओहोळ, प्रियंका वानखेडे, जोया शेख, प्रतिक्षा घायतडक, श्रद्धा मांदळे, सलोनी साळवे यांची उपस्थिती होती.

**दिलासा** मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

# घरात क्रॉस किंवा येशूची मूर्ती असणे हे धर्मांतराचा आधार होऊ शकत नाही

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. ८ :** केवळ घरात पवित्र क्रॉसचे चित्र किंवा प्रभू येशू ख्रिस्ताची मूर्ती आढळल्यास, त्या व्यक्तीने किंवा त्याच्या पूर्वजांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे, असे गृहीत धरता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नुकताच दिला आहे. या निकालामुळे जात पडताळणी समित्यांच्या मनमानी कारभाराला चाप बसला असून, नागरिकांच्या वैयक्तिक श्रद्धेचा आणि गोपनीयतेच्या अधिकाराचा सन्मान राखला गेला आहे, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धनावत यांनी व्यक्त केले आहे.

न्यायमूर्ती मुकुलिका जवळकर आणि न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांच्या खंडपीठाने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा एक वादग्रस्त आदेश रद्दबातल ठरवत हा निर्णय दिला.या प्रकरणात, जिल्हा जात पडताळणी समितीने एका व्यक्तीला मांग किंवा मातंग या अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देण्यास नकार दिला होता. समितीने असा दावा केला होता की, अर्जदाराच्या आजोबांच्या शाळेच्या दाखल्यावर त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याची नोंद आहे. तसेच, अर्जदाराच्या घरात पवित्र क्रॉसचे चित्र आढळल्याने त्यांनी धर्मांतर केले आहे, असा निष्कर्ष समितीने काढला होता.

मात्र, अर्जदाराच्या कुटुंबातील इतर सदस्यांकडे सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवलेले जात प्रमाणपत्र होते. अर्जदाराने न्यायालयासमोर स्पष्ट केले की, शाळेत होणाऱ्या त्रासामुळे आजोबांना दुसऱ्या शाळेत दाखल करण्यात आले होते, जिथे चुकून त्यांच्या नावासमोर ख्रिस्ती अशी नोंद झाली. वस्तुस्थिती अशी होती की, त्यांच्या कुटुंबातील कोणीही किंवा त्यांच्या पूर्वजांनी कधीही ख्रिस्ती धर्म स्वीकारला नव्हता.उच्च न्यायालयाने या प्रकरणाची सखोल चौकशी केली असता, असे निदर्शनास आले की, जात पडताळणी समितीने केवळ घरातील धार्मिक चिन्हांच्या आधारावर निर्णय दिला होता. समितीने अर्जदाराच्या पूर्वजांचा किंवा कुटुंबातील कोणत्याही सदस्याचा बाप्तिस्मा झाल्याचा कोणताही ठोस पुरावा तपासला नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की, धर्मांतरासाठी बाप्तिस्म्यासारखे धार्मिक विधी पार पडल्याचा पुरावा असणे आवश्यक आहे. केवळ घरात एखाद्या देवतेचे चित्र किंवा मूर्ती असणे, हे त्या व्यक्तीच्या धर्मांतराचा निर्णायक पुरावा असू शकत नाही. हा निव्वळ श्रद्धेचा किंवा सजावटीचा भाग असू शकतो.न्यायालयाने आपल्या निकालात म्हटले आहे की, ''अर्जदाराचे वडील किंवा आजोबा यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला आहे, असा निष्कर्ष काढण्यापूर्वी जात पडताळणी समितीने बाप्तिस्म्याचे विधी पार पडले होते की नाही, याची खात्री करणे बंधनकारक होते. केवळ घरात क्रॉसचे चित्र किंवा प्रभू येशू ख्रिस्ताची मूर्ती आढळल्याने अर्जदाराच्या पूर्वजांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता, असे मानणे चुकीचे आहे.''

२६ फेब्रुवारी रोजी दिलेल्या या निकालात न्यायालयाने समितीच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. अर्जदाराच्या कोणत्याही रक्तनातेवाईकाने ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याचा किंवा त्यांच्याकडे मांग जातीच्या प्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य कोणतेही प्रमाणपत्र असल्याचा कोणताही पुरावा समिती सादर करू शकली नाही.अखेरीस, उच्च न्यायालयाने जिल्हा जात पडताळणी समितीचा २७ सप्टेंबर २०२३ रोजीचा आदेश पूर्णपणे रद्द केला आणि अर्जदाराला मांग जातीचे प्रमाणपत्र त्वरित जारी करण्याचे निर्देश दिले. या निकालामुळे, जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी संघर्ष करणाऱ्या अनेक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

ॲड. धनावत यांनी या निर्णयाचे स्वागत करत म्हटले आहे की, यामुळे समित्यांच्या अधिकारांचा गैरवापर थांबेल आणि नागरिकांना त्यांच्या घटनात्मक हक्कांपासून वंचित ठेवण्याचे प्रकार कमी होतील. या प्रकरणात याचिकाकर्त्याच्या वतीने ॲड. यू. जे. देशपांडे यांनी, तर सरकारच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील एन. आर. पाटील यांनी बाजू मांडली.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, सोमवार, ९ मार्च २०२६

## थोडक्यात

### पोकलँड मशीनवर नागरिकांची दगडफेक

निंभा : भातकुली तालुक्यातील निंभा डॅमवर पोकलँड मशीनने खोदकाम सुरू होते. दरम्यान त्यावरील ऑपरेट, मदतनीस व अन्य एक अशा तिघांनी तिचे कंट्रोल वॉल, डिस्प्ले स्क्रिन आदींसह सुमारे अडीच लाखांचे नुकसान केले. दीपक सुभाषराव पडोळे (३५, रा. कुऱ्हा) यांनी याबाबत बडनेरा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अंकीत कुमार (३२) व विकास कुमार (३६) दोघेही रा. सलेमपूर, बिहार व पवन तुरी (३५, रा. सरेगरा लतेहार, झारखंड) यांच्यावर गुन्हे नोंदवले.

### मोबाईल हॅक करून खात्यातून लाखो रूपये लंपास

अमरावती : एक अज्ञात व्यक्ती फिर्यादी मनीष श्यामराव बोडखे (४९, रा. अमरावती) यांच्या मोबाईलमधील गेमिंगचे मॅसेज डिलीट करीत होता. दरम्यान संधी साधून त्याने फिर्यादीचे बँक ऑफ इंडियाचे खाते हैंक करून त्यातील ३ लाख १७ हजार ३३६ रुपये काढून घेत त्यांची फसवणूक केली. गाडगे नगर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला. ही घटना फिर्यादीच्या राहत्या घरी घडली.

### भांडणात मध्यस्थी करणाऱ्याला मारहाण

अमरावती : दुकानासमोरील रस्त्यावर सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी निलेश प्रकाशराव ढेंगे (४१) गेले. मात्र मारहाण करणाऱ्यांनी पहिल्याला सोडून त्यांना मारहाण करीत जखमी केले. ही घटना गुलशन प्लाझा, राजापेठ येथे घडली. राजापेठ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### महिलेच्या पर्समधून रोकड लंपास

अमरावती : बँकेतून १ लाख ६० हजार रूपये काढून महिला ऑटोने राजापेठ येथील एका ज्वेलर्सच्या दुकानात गेली. दरम्यान ऑटोत इतरही महिला होत्या. ज्वेलर्सच्या दुकानात पैसे देण्यासाठी पाहिले असता, बॅगेत रक्कम दिसून आली नाही. राजापेठ पोलिसांनी महिलेच्या तक्रारीवरून अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### इसमावर तलवारीने प्राणघातक हल्ला

अमरावती : घर बांधण्यासाठी दिलेले ४५ हजार रुपये फिर्यादी महमूद खान (५७) यांनी परिचिताला परत मागीतले. त्याने पैसे परत न करता अन्य दोघांसोबत त्यांच्यावर तलवारीने हल्ला करीत जखमी केले. मेहबुब नगर येथे घडलेल्या घटनेप्रकरणी नागपुरी गेट पोलिसांनी तिघांवर गुन्हे नोंदवले.

### बस आगारातून दुचाकी लंपास

अमरावती : फिर्यादी राजेश छगनलाल गुप्ता (५६) यांनी त्यांची दुचाकी बस डेपो मार्गावरील पालेकर बेकरीजवळ उभी केली. अज्ञाताने ती चोरून नेली. तिची अंदाजे किंमत १५ हजार रुपये आहे. कोतवाली पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### सासरकडून पैशांसाठी विवाहितेचा छळ

मोर्शी : माहेरवरून पैसे आणण्यासाठी पतीसह दोन महिला विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करतात. त्याबाबत तिने मोर्शी पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी पती आशिष पंजाबराव गणोरकर (४५) याच्यासह दोन महिलांविरुद्ध गुन्हा नोंद केला. या घटनेचा पुढील तपास मोशी पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्शी पोलीस करीत आहे.

# राज्यातील शाळा महिला आयोगाच्या रडारवर !

**मुलींवरील अत्याचाराचा मागविला अहवाल | अहवालासाठी १७ मार्चचा अल्टीमेटम**

अजिंक्य भारत | सुधीर केने

**अमरावती, दि.८** : अलीकडे राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थिनीची सुरक्षा चव्हाट्यावर आली आहे. बहुतांश शाळांमध्ये विद्यार्थिनीवर केल्या जात असलेल्या अत्याचाराची दखल स्वत: महिला आयोगाने घेतली आहे .गेल्या तीन वर्षात ज्या ज्या विद्यार्थ्यांवर अत्याचार झाले त्या संदर्भात संबंधित शाळांवर नेमकी काय कारवाई करण्यात आली याचा अहवालच राज्य महिला आयोगाने तात्काळ मागविला आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी राज्याच्या शिक्षण आयुक्तांना या संदर्भात पत्रव्यवहार केला आहे .शालेय विद्यार्थिनींची सुरक्षा राज्यात कशा प्रकारे केली जाते याबाबतचा अहवाल मागितला आहे.



मागील तीन वर्षात राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थिनीवर झालेले अत्याचार प्रकरणात संबंधित शाळांवर आतापर्यंत काय कायदेशीर व प्रशासकीय कारवाई केली याचा अहवाल राज्य महिला आयोगाने मागितला आहे. प्रत्येक शाळेत तक्रार पेटी व त्यामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारी आणि त्यावर केलेल्या कार्यवाहीचा मासिक अहवाल शिक्षण विभागाकडे सादर करणे शाळांना अनिवार्य करण्यात आले आहे. याबाबत नेमकी काय कार्यवाही झाली त्याचाही अहवाल मागविण्यात आला आहे.प्रत्येक शाळेमध्ये असलेल्या सखी सावित्री समितीला अधिक सक्रिय करण्यात येऊन बळकट करण्यासाठी शिक्षण विभागाने विशेष मार्गदर्शक तत्वे जारी करावी असेही आदेशात म्हटले आहे. राज्य महिला आयोगामार्फत राबविल्या जाणाऱ्या सायबर सुरक्षा व युवती सक्षमीकरण उपक्रमासाठी प्रत्येक शाळेत एका नोडल ऑफिसरची नेमणूक करून समन्वयाची जबाबदारी निश्चित करावी असेही महिला आयोगाचे आदेशात म्हटले आहे .

या आदेशामुळे राज्यातील ज्या ज्या शाळांमध्ये गेल्या तीन वर्षात विद्यार्थिनींवर अत्याचार झाले त्या संबंधात शाळांवर नेमकी काय कार्यवाही केली याचे अहवाल तात्काळ मागविले आहे.ज्या शाळांवर या संदर्भात कार्यवाही केली नसेल त्या शाळा राज्य महिला आयोगाच्या रडारवर राहणार आहे.

### अनधिकृत शाळांची होणार तपासणी

शिक्षण विभागाच्या परवानगीशिवाय चालविल्या जाणाऱ्या शाळांमध्ये विद्यार्थिनीच्या सुरक्षेसाठी नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या आहेत याचा स्वतंत्र अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागाला देण्यात आले आहे. प्रत्येक शाळेच्या दर्शनी भागात तक्रार पेटी आणि सी बॉक्स पोर्टलची माहिती देणारे फलक लावने बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे राज्यातील अनधिकृत शाळांच्या तपासण्या करून त्याचा स्वतंत्र अहवाल शिक्षण विभागाला महिला आयोगाकडे पाठवावा लागणार आहे. सदर अहवाल महिला आयोगाकडे सादर करण्यासाठी १७ मार्च २०२६ चा अल्टिमेट देण्यात आला आहे.

# सराफा व्यावसायिकाचा ३२६ ग्रॅम सोन्यावर डल्ला

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.८** : अनेक वर्षांच्या ओळखीचा आणि विश्वासाचा गैरफायदा घेत एका सराफा व्यावसायिकाने ग्राहकाची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला - आहे. तब्बल ३२६ ग्रॅम सोन्याचे दागिने हडपल्याप्रकरणी सराफा व्यावसायिक मुकेश ठोसर आणि एका महिलेविरुद्ध खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात - फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरातील सराफा व्यवहारांबाबत पुन्हा एकदा विश्वासाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या - माहितीनुसार, दस्तूर नगर येथील रहिवासी संतोष शीतलाप्रसाद मिश्रा यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली - आहे. मिश्रा कुटुंब गेल्या अनेक वर्षांपासून मुकेश ठोसर यांच्या दुकानातून सोन्या-चांदीच्या दागिन्यांची खरेदी-विक्री करत होते. सातत्याने होत असलेल्या व्यवहारांमुळे दोन्ही कुटुंबांमध्ये ओळख वाढून घरगुती संबंध निर्माण झाले होते. याच विश्वासाचा फायदा घेत ठोसरने मिश्रा यांची फसवणूक केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीनुसार, संतोष मिश्रा यांना आपल्या सोन्याच्या दागिन्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन ते बँकेच्या लॉकरमध्ये ठेवायचे होते. ही बाब त्यांनी विश्वासाने मुकेश ठोसर यांना सांगितली. मात्र, हीच संधी साधत ठोसरने आपल्याला आणि पत्नीला नवीन ले-आउट टाकण्यासाठी पैशांची गरज असल्याचे सांगत, दागिने बँकेत ठेवण्याऐवजी आपल्याकडे दिल्यास दरमहा २० हजार रुपये व्याज देण्याचे आमिष दाखवले. ठोसरच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मिश्रा यांनी ३२६ ग्रॅम सोन्याचे दागिने त्याच्या स्वाधीन केले. सुरुवातीच्या तीन महिन्यांत ठोसरने २० हजार रुपयांप्रमाणे एकूण ६० हजार रुपये व्याज दिले. मात्र, त्यानंतर आर्थिक अडचणीचे कारण पुढे करत त्याने पैसे देणे बंद केले. मिश्रा यांनी वारंवार आपले दागिने परत मागितले असता ठोसरकडून टाळाटाळ सुरू झाली.

# चोरीच्या दुचाकीसह युवक जेरबंद



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.८** : शहरात दुचाकी चोरी करणाऱ्यांवर गुन्हे शाखेने कडक कारवाई करत चोरीच्या मोटारसायकलीसह एका युवकाला जेरबंद केले. गाडगेनगर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या दुचाकी चोरीच्या गुन्ह्याचा उलगडा करत पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून चोरीची मोटारसायकल जप्त केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गाडगेनगर पोलिस ठाण्यात दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेकडून सुरू असताना ६ मार्च रोजी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, धरमकाटा परिसरात एक युवक चोरीची मोटारसायकल विक्रीसाठी उभा आहे. माहिती मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ धाड टाकत संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने आपले नाव सोहेल खान सलीम खान (वय २०, रा. छायानगर, अक्सा मशिदजवळ, अमरावती) असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे असलेल्या हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकलबाबत कसून चौकशी केली असता, पंचवटी चौक येथील उड्डाणपुलाखालून सुमारे सात ते आठ महिन्यांपूर्वी ती मोटारसायकल चोरी केल्याची कबुली त्याने दिली. पोलिसांनी आरोपीकडून काळ्या रंगाची पांढऱ्या पट्ट्याची हिरो स्प्लेंडर प्लस मोटारसायकल जप्त केली असून तिची किंमत अंदाजे ५५ हजार रुपये आहे. आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी गाडगेनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ व सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली.

# सहा वर्षे पूर्ण झालेल्या मुलांनाच या वर्षी शैक्षणिक वर्षात पहिलीच्या वर्गात प्रवेश

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.८** : नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत राज्य सरकारने आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून पहिलीच्या प्रवेश नियमांमध्ये बदल केले आहेत. पहिलीच्या प्रवेशासाठी वयोमर्यादेचे नियम कडक करण्यात आले आहेत. ६ वर्षे पूर्ण झालेल्या मुलांनाच पहिलीच्या वर्गात प्रवेश दिला जाईल.शालेय शिक्षण विभागाच्या म्हणण्यानुसार, ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत ६ वर्षे पूर्ण झालेल्या मुलांनाच या वर्षी, म्हणजेच २०२६-२७ शैक्षणिक वर्षात पहिलीच्या वर्गात प्रवेश दिला जाईल. या नियमांशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. पूर्वी प्रवेशाची वयोमर्यादा ३१ मार्च होती, परंतु आता ती ३१ डिसेंबर आहे. डिसेंबर २०२५ मध्ये याबाबत एक सरकारी आदेश जारी करण्यात आला होता.



राज्यातील सर्व सरकारी, अनुदानित आणि खाजगी शाळांसाठी समान नियम लागू करण्यात आले आहेत. या संदर्भात संबंधित शाळांना सूचना देण्यात आल्या आहेत. शिक्षण विभागाने या संदर्भात एक परिपत्रक जारी केले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे प्रसिद्धीप्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.योग्य वयात शिक्षण सुरू झाल्यास मुलांचा मानसिक आणि बौद्धिक विकास चांगला होतो आणि ते बालपणातील आनंद देखील अनुभवू शकतात, असे शिक्षकांचे मत आहे. मुलाचे जन्म प्रमाणपत्र हा वयाचा एकमेव पुरावा असेल. प्राथमिक शिक्षण, म्हणजेच इयत्ता पहिली ते आठवी, ६ ते १४ वर्षे असते.इयत्ता पहिलीच्या प्रवेशासाठीचे किमान वय सहा वर्षे हे निश्चित करण्यात आले असून, ते काटेकोरपणे पाळले जावे असे निर्देश केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सगळ्या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना २०२३ मध्ये दिले होते. काही वर्षांपूर्वीपर्यंत अनेक शाळांमध्ये अडीच वर्षांच्या मुलांनाही नर्सरीमध्ये प्रवेश मिळायचा. म्हणजे पहिली प्रवेशाचे वय साधारणपणे पाच किंवा साडेपाच वर्ष होते. पण २०२० साली लागू झालेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा नुसार पहिल्या इयत्तेत प्रवेशाचे वय सहा वर्षे निश्चित करण्यात आले.

### तीन वर्ष पूर्ण झाल्यावरच नर्सरी

पहिल्या फाऊंडेशन या टप्प्यात अर्थात नर्सरी, लोअर केजी, अप्पर केजी (अंगणवाडी किंवा बालवाडी, छोटा शिशूवर्ग, बालवर्ग किंवा मोठा शिशूवर्ग) अशा पूर्वप्राथमिक शिक्षणासोबतच पहिल्या आणि दुसऱ्या इयत्तेचाही समावेश आहे. वयाची तीन वर्ष पूर्ण झाल्यावरच मुलांना नर्सरीमध्ये प्रवेश द्यावा, म्हणजे पहिलीत जाताना मुलांचे वय सहा पूर्ण झालेले असेल, असे धोरणात स्पष्ट करण्यात आले आहे.

# कुऱ्हा हद्दीत गोवंश वाहतूकीचा पर्दाफाश

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.८** : अवैधरित्या गोवंशीय जनावरांची कत्तली करण्यासाठी वाहतूक करणाऱ्या टोळीवर अमरावती ग्रामीण पोलीस शाखेने धडक कारवाई केली आहे.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने टोळी पकडण्यासाठी विशेष पेट्रोलिंग केले आणि क्रुरतेने वाहतूक केली जात असलेली टोळी थांबवली. ५ मार्च २०२६ रोजी पो.उप.नि. विशाल रोकडे यांचे नेतृत्व असलेल्या पोलीस पथकाने कुऱ्हा हद्दीत पेट्रोलिंग करत गोपनिय असताना माहितीदाराकडून माहिती मिळाली की, कुऱ्हा कडून अमरावतीकडे टाटा ए.सी. वाहनामध्ये गोवंशीय जनावरे पाय व तोंड बांधून क्रुरतेने पागवून कतलासाठी वाहतूक केली जात आहेत पोलीसांनी भिवापूर ते मार्डी रोडवरील विरगव्हाण फाटा येथे नाकाबंदी करून वाहन थांबविले. वाहन चालक प्रविण अर्जुन डोळत्त (वय ३८, रा. दिवाणखेड) असल्याचे समोर आले.

# प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण होण्याआधीच लोकार्पण

**बारा कोटींचा निधी खर्च तरीही कामे कागदावरच**

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**मोर्शी, दि.८** : स्थानिक सार्वजनिक बांधकाम उपविभागाने सामान्य जनतेची दिशाभूल करत तहसील कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण होण्याआधीच घाईघाईत लोकार्पण उरकून घेतल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. या गंभीर प्रकरणाची तक्रार नवं स्वर्णिम भारत संघटनेने राज्याचे महसूल मंत्री आणि अमरावतीचे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असून, दोषी



अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी केली आहे.अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते या इमारतीचे थाटामाटात उद्घाटन करण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात ही इमारत अजूनही निम्म्याहून अधिक अपूर्ण अवस्थेत आहे. नवं स्वर्णिम भारत संघटनेचे अध्यक्ष रमाकांत गावंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१९-२०२० या वर्षात या इमारतीसाठी १२ कोटी ९६ लाख ३१ हजार ३६६ रुपयांचे अंदाजपत्रक मंजूर झाले होते.

मात्र, प्रत्यक्ष पाहणी केली असता कोट्यवधी रुपये खर्च होऊनही अनेक महत्त्वाची कामे रखडलेली आहेत. इमारतीवर भारतीय ध्वज लावण्यासाठी कोणतीही जागा निश्चित केलेली नाही, दिव्यांगांसाठी वरील माळयावर जाण्यासाठी उद्वाहक (लिफ्ट) बसवलेली नाही, तसेच २५ लाख रुपयांचे वाहनतळ शेड आणि २१ लाख रुपयांची संरक्षक भिंत व मुख्य प्रवेशद्वार अपूर्ण आहे.

**कर्तृत्व** | **महिला दिनानिमित्त विशेष**

# आर्थिक संघर्षाशी झुंज देऊन उंच शिखर गाठणारी नारी : अलका तल्हार



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**खोलापुर, दि.८** : नारीला समाजामध्ये दुय्यम स्थान परंपरेनुसार मिळायचे परंतु नारीशक्तीचा इतिहास आजही अजरामर आहे, मैदानी जंग लढणारा राणी लक्ष्मीबाई, विविध क्षेत्रात अजरामर कामगिरी करणाऱ्या नारी आज विविध पैलूवर विराजमान आहे.

अशातच खोलापुर येथील रहिवासी सौ. अलका संजय तल्हार यांनी विवाहित असताना शैक्षणिक संघर्ष करून अत्यंत नाजूक आर्थिक परिस्थितीत शिक्षणाशी लढा देऊ त्यांनी शासकीय नोकरी मिळवली त्या महिला म्हणून त्यांचा लढा तरुण व तरुणीसाठी खोलापूर परिसरात प्रेरणादायी ठरला. पती श्री संजय मधुकरराव तल्हार यांचा तुटपुंजी असणारा दैनिक वर्तमानपत्राचा व्यवसाय व सुशिक्षित बेरोजगार अशा विषम परिस्थितीतून सौ अलका ताई तल्हार एक मुलगी अपत्य असताना दर्यापूर येथे कोरे अकॅडमीमध्ये वर्धा परीक्षा अभ्यास करून अहोरात्र



परिश्रम केले ध्येय ठेवून जिद्दी व चिकाटी जोरावर स्पर्धा परीक्षा पास करून पंचायत समिती स्तरावर कृषी सेवक पदावर विराजमान झाले. शासकीय नोकरी कुठल्या श्रेणीची आहे याला महत्त्व नसून ती नोकरी कुटुंबासाठी किती महत्त्वाची आहे. हे त्यांनी दाखवून दिले .आज त्यांची एकुलती एक मुलगी भोपाळ येथे वैद्यकीय शिक्षण घेत असून पती श्री संजय तल्हार खाजगी क्षेत्रात नोकरी करत असून कुटुंबाचा त्यांनी ग्रामीण परिसरात आदर्श निर्माण केला. तल्हार दांपत्य आपली नोकरी सांभाळून सामाजिक बांधिलकी ठेवून सामाजिक कार्यातही सिंहाचा वाटा उचलतो.सौ अलकाताई तल्हार सध्या स्थिती दर्यापूर येथे सहाय्यक कृषी अधिकारी टोंगलाबाद येथे म्हणून कार्यरत असून शेतकऱ्यांच्या समस्यावर कर्तव्यदक्षपणे सेवा देत आहे त्यांचं आदर्श कुटुंब व नोकरी तसेच सामाजिक कार्याचा वसा ठेवून त्यांच्या कार्याला महिला दिवसानिमित्त सलाम..!!

# सासरा आणि दिराकडून विवाहितेवर अत्याचार

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.८** : नात्याला काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना चांदूर रेल्वे तालुक्यात उघडकीस आली आहे. एका ३० वर्षीय मतिमंद विवाहितेवर तिच्याच सासऱ्याने आणि दिराने गेल्या दोन महिन्यांपासून वारंवार अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

याप्रकरणी चांदूर रेल्वे पोलिसांनी ६ मार्च रोजी गुन्हा दाखल करून आरोपी सासऱ्याला अटक केली, तर पीडितेचा दीर पसार झाला आहे.

एफआयआरनुसार, पीडित महिला ही ३० वर्षांची असून ती मतिमंद आहे. तिचे लग्न तीन वर्षांपूर्वी चांदूर रेल्वे तालुक्यातील रहिवासी असलेल्या व्यक्तीशी रीतिरिवाजाप्रमाणे झाले होते. पीडितेचा पतीदेखील मतिमंद आहे. पीडितेने दिलेल्या फिर्यादीनुसार, तिचे सासरे हनुमंत (६९) आणि तिचा दीर हे दोघेही गेल्या दोन महिन्यांपासून तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवत होते. हा प्रकार सहन न झाल्याने पीडितेने आपली आपबिती आईला सांगितली. पीडितेच्या आईने तत्काळ आपल्या पतीला अर्थात पीडितेच्या वडिलांना या घटनेची कल्पना दिली. त्यानंतर कुटुंबीयांनी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली.

## थोडक्यात

### वाहतूकीस अडथळा करणाऱ्यांवर कारवाई

अमरावती : ताब्यातील वाहने व हातगाड्या रस्त्यावर लावून रहदारीस अडथभा निर्माण करणाऱ्या १३ जणांवर नांदगाव पेठ, गाडगे नगर, नागपुरी गेट, खोलापुरी गेट व भातकुली पोलिसांनी गुन्हे नोंदवले.

### शस्त्र घेवून फिरणारा पोलिसांच्या ताब्यात

अमरावती : मसानगंज येथील मनपा गार्डन परिसरात शस्त्र जवळ बाळगून एक युवक फिरताना आढळून आला. त्याला नागपुरी गेट पोलिसांनी ताब्यात घेत गुन्हा नोंदवला. जब्बार खाँ रऊफ खाँ (२९) असे गुन्हा दाखल झालेल्या युवकाचे नाव आहे.

### महिलेची गळफास घेवून आत्महत्या

अमरावती : समता कॉलनी येथे राहत्या घरी महिलेने गळफास घेत आत्महत्या केली. पोलिसांनी या संदर्भात मर्ग दाखल केला.

### अल्पवयीन मुलीला पळविले

धामणगाव रेल्वे : १६ वर्षीय मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा धक्कादायक प्रकार दत्तापूर पोलीस ठाण्यांतर्गत घडला. या प्रकरणी तिच्या पालकांनी तक्रार दिली असून दत्तापूर पोलिसांनी जय सोनोने (२१) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दारूच्या पैशावरून मारहाण

मोर्शी : दारू पिण्याच्या पैशांच्या वादातून एकाला कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करून जखमी केल्याची घटना चिंचोळ गवळी येथे घडली. या संदर्भात मुकेश राजकुमार जवणे (३१) याने मोर्शी पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मारहाण करणारा महेंद्र पाटील (४५) व एक महिला यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### गोठ्यातून तीन जनावरे लंपास

माहुली जहाँगीर : केकतपूर येथील एका मजुराच्या घरातून अज्ञात चोरट्यांनी एकरा गाईसह एक शेजारील पशुपालकाची एक गाय अशी तीन जनावरे चोरून नेली. त्यांची अंदाजे किंमत ३० हजार रुपये आहे. महिलेच्या तक्रारीवरून माहली जहाँगीर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध जनावरे चोरीचा गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास माहुली जहाँगीर पोलीस यांच्या मार्गदर्शनाखाली माहुली जहाँगीर पोलीस करीत आहे.

### झाडगाव येथे हरभऱ्याच्या गंजीला आग

धामणगाव रेल्वे : झाडगाव येथे शेतकरी अरुण पंजाबराव ढोके (५५, रा. झाडगाव) यांनी हरभऱ्याची सोंगणी करीत त्याची एकच गंजी शेतात लावली होती. अज्ञाताने तिला आग लावली. त्यात अंदाजे ४० क्विंटल हरभऱ्याची राखरांगोळी झाली. त्यामुळे त्यांचे अंदाजे २ लाख रुपयांचे नुकसान झाले. त्यांच्या तक्रारीवरून मंगरूळ दस्तगीर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास धामणगाव रेल्वे पोलीस यांच्या मार्गदर्शनाखाली धामणगाव रेल्वे पोलीस करीत आहे.

### गोठ्यावरील कवेलूंची चोरी

चांदूर रेल्वे : तालुक्यातील सावंगी मग्रापूर शिवारात असलेल्या गोठ्यावरील कवेलू अज्ञाताने चोरून नेले. चोरट्याने एकूण ५०० कवेलू चोरून नेले असून त्याची अंदाजे किंमत १० हजार रुपये आहे. याबाबत विश्राम निळकंठ बापट (६८, रा. अमरावती) यांनी चांदूर रेल्वे पोलिसात तक्रार नोंदवली असून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# लाखोंची नोंदणी, कामावर केवळ ३३ हजार!

## मेळघाटातील मनरेगाची स्थिती बिकट; कामांची उपलब्धता अन् स्थलांतराचा फटका

**अजिंक्य भारत | भारत वरठे**

**धारणी, दि.८ :** मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा या दुर्गम आदिवासी तालुक्यांत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही रोजगाराची मुख्य सरकारी आधाररेषा मानली जाते. या दोन्ही तालुक्यात ८९,४३५ कुटुंब जॉबकार्डधारक आहेत. सरासरी कुटुंबातील कामकाजाच्या वयोगटातील सदस्यांचा विचार करता सुमारे 1.55 ते १.७० लाख मजूर पात्र ठरतात. कागदोपत्री दिसणारी ही भरारी प्रत्यक्षात कामावर ३३ ते ४५ हजार इतकीच राहत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

चार महिन्यांपासून प्रलंबित असलेली मजुरी अलीकडेच कामगारांच्या खात्यात जमा झाली. थकबाकीची २८.३९ कोटी रुपयांची रक्कम मिळाल्याने मेळघाटात कामगारांचा ओघ पुन्हा वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त होत असली तरी गेल्या काही वर्षांतील परिस्थिती पाहता, शक्यता कमी असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. मनरेगांतर्गत



पाणीसंवर्धन, शेततळी, मुरूम रस्ते, वृक्षारोपण अशा कामांची मंजुरी असली, तरी प्रत्येक गावात एकाच वेळी मोठ्या संख्येने मजुरांना काम उपलब्ध होत नाही. कामांची आखणी आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामधील दरी अधिक आहे. यातच मजुरीही थकीत राहत असल्याने जगण्याचा प्रश्न निर्माण होतो. परिणामी हंगामी शेतमजुरी, बांधकाम किंवा इतर मजुरीच्या संधी उपलब्ध झाल्यास अनेक मजूर तिकडे वळतात. काही कुटुंब तात्पुरत्या स्थलांतराचा पर्याय स्वीकारून अन्य शहरांमध्ये रोजगाराच्या शोधात जाणे पसंत करतात. परिणामी, जॉबकार्डवरील नावे कायम असली तरी प्रत्यक्ष हजेरी कमी दिसून येत आहे.

प्रशासकीय गती हासुद्धा मजुरांच्या प्रत्यक्ष कामावरील संख्येवर विपरीत करणारा महत्वाचा मुद्दा ठरत आहे. ग्रामपंचायतींच्या पातळीवर कामांची मंजुरी, मस्टर नोंदी, मोजमाप आणि देयके यामध्ये होणारा विलंब मजुरांचा विश्वास ढळवतो. सतत काम मिळेल आणि वेळेत मजुरी मिळेल, याची खात्री नसल्यास मजूर पर्याय शोधतात. परिणामी, नोंदणीची संख्या वाढत असली तरी प्रत्यक्ष श्रमशक्ती घटत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

> रोजगारातील अनिश्चितता आणि उत्पन्नातील खंडामुळे मेळघाटात हंगामी स्थलांतराला चालना मिळत असल्याचे दिसून येते. अनेक कुटुंब काही महिन्यांसाठी गाव सोडतात. मुलांचे शिक्षण खंडित होते, महिलांवर दुहेरी जबाबदारी येते, तर वृद्धांची देखभाल प्रश्नांकित होते. गावांतील श्रमशक्ती कमी पडल्याने स्थानिक अर्थचक्रावरही परिणाम होतो. मेळघाटात स्थलांतर ही केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक आव्हानाचीही साखळी ठरली आहे.

# ठाणेदार महांगरेंनी दिला स्वच्छतेचा संदेश



**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**खोलापुर, दि.८ :** स्थानिक पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार वैभव महांगरे यांनी व्यस्त कार्यालय कामकाजातून वेळ काढून सकाळी सात वाजताच्या सुमारास पोलीस स्टेशन परिसरात असलेला काडीकचरा व घाण खराट्याच्या साहाय्याने ठाणेदारांसह पोलीस कर्मचारी व होमगार्ड यांनी केरकचरा जाळून परिसर स्वच्छ केला. सामाजिक बांधिलकी ठेवून सामाजिक कार्याचा वसा ठेवणारे ठाणेदार वैभव महांगरे साहेब यांच्या स्वच्छतेचा संदेश या कृतीचा परिसरात कौतुक होत आहे.

# स्वर्गीय नारायणराव लाजुरकरांच्या अभय कवितेचा अभ्यासक्रमात समावेश

## मराठी राजभाषा दिनी मिळाले सन्मानपत्र

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दर्यापूर, दि.८ :** श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,अकोला मराठी विभाग, तरुणाई फाऊंडेशन कुटासा, वऱ्हाड शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था, लोणी, भावगंध साहित्य संघ अकोला, शुभम मराठी साहित्य मंडळ अकोला, मुक्ता पब्लिकेशन अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने २७ फेब्रुवारी कविवर्य कुसुमाग्रज जयंती,मराठी राजभाषा दिवस सन्मानपत्र देऊन नारायण लाजूरकर यांचा गौरव करण्यात आला त्याचे औचित्य असे की दर्यापूर येथील योगा शिक्षिका डॉ मंगला लाजुरकर यांचे बंधू स्व. ॲड नारायणराव जगदेवराव लाजुरकर यांच्या अभय या कवितेचा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात



आला आहे. ही बाब दर्यापूर शहरासह साहित्य क्षेत्रासाठी अभिमानास्पद मानली जात आहे. स्व. नारायण लाजुरकर हे वैदर्भीय जाणिवांचे कवी म्हणून साहित्यविश्वात परिचित होते. त्यांनी कला स्नातक, विधी स्नातक, आयुर्वेद विशारद तसेच आयुर्वेदरत्न ही पदवी संपादन केली होती. त्यांच्या कवितांमध्ये वऱ्हाडी संस्कृती, शेती, माती आणि ग्रामीण जीवनाशी घट्ट नाळ जुळलेली दिसून येते.त्यांच्या नांगराचे बैल दर्याचंद्र तनहा आणि द डेज या कविता संग्रहांना साहित्य रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यांच्या कविता संग्रहाला ज्येष्ठ सिनेगीतकार जगदीश खेबुडकर यांनी प्रस्तावना लिहिली होती, ही बाब त्यांच्या साहित्यिक गुणवत्तेची साक्ष देणारी आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने त्यांच्या अभय या कवितेचा अभ्यासक्रमात समावेश करून त्यांना अभिवादन केले असून, हा समावेश त्यांच्या साहित्य कार्याला मिळालेला मानाचा मुजरा मानला जात आहे.

# टोम्पे महाविद्यालयात महिला रोजगार क्षमता कार्यशाळा

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**चांदूर बाजार, दि.८ :** गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व गेल इंडिया लिमिटेडच्या सहकार्याने महिला उद्योजकता कक्ष अंतर्गत बी.ए. बी.कॉम. बी.एससी. बी.एड. पदवी व पदव्युत्तर अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींच्या उज्वल भविष्यासाठी तसेच त्यांच्यातील व्यावसायिक कौशल्य बरोबरच तांत्रिक कौशल्य सुद्धा वाढीस लागावे याकरिता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ ते १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान दृकश्राव्य माध्यमातून तीन दिवसीय महिला उद्योजकता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी मंचकावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके, महिंद्रा प्राइड व नंदी फाऊंडेशन हैदराबाद येथील प्रशिक्षक प्रतीक कांबळे, उपप्राचार्य डॉ. नंदकिशोर गव्हाळे, आयक्यूएसी कॉर्डिनेटर डॉ. सुमित इंगळे महाविद्यालयातील महिला उद्योजकता कक्षाच्या प्रा.डॉ. युगंधरा गुल्हाने, डॉ.प्रिया देवळे, डॉ.पार्वती शिर्के, डॉ.निधी दीक्षित, डॉ.मंजुषा पवार प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा व स्वर्गीय गोविंदरावदादा टोम्पे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी डॉ.युगंधरा गुल्हाने यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून कार्यक्रम आयोजनामागची भूमिका सविस्तर मांडून या तीन दिवसीय उद्योजकता कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना कोणकोणती कौशल्य आत्मसात करता येणार आहेत याची सविस्तर माहिती दिली. तर प्रमुख मार्गदर्शक प्रशिक्षक प्रतीक कांबळे यांनी यशाच्या जवळ जाण्यासाठी उत्तम व्यक्तिमत्व असणं खूप गरजेचं आहे. महिला प्रामुख्याने ब्युटी पार्लर, टेलरिंग, ट्यूशन सेंटर, खाद्यपदार्थ निर्मिती आणि लहान उत्पादन उद्योगांमध्ये कार्यरत आहेत. महिला उद्योजकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. स्टार्टअप इंडिया आणि मुद्रा योजनेसारख्या सरकारी पुढाकारांमुळे महिलांना आर्थिक साहाय्य, प्रशिक्षण आणि स्वयंपूर्णतेची संधी मिळत आहे असे म्हणून विद्यार्थिनींना व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी टिप्स दिल्या. तिसऱ्या दिवशी समारोपीय कार्यक्रमात प्राचार्य डॉ. राजेंद्र रामटेके व प्रशिक्षक प्रतिक कांबळे, हैदराबाद यांच्या हस्ते व महिला उद्योजकता कक्षाच्या सर्व प्राध्यापिका यांच्या उपस्थितीत प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनींना प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रिया देवळे यांनी केले तर आभार डॉ. मंजिषा पवार यांनी मांडले मानले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विभागातील अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# खल्लार हायस्कूलचे एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दर्यापूर, दि.८ :** श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित खल्लार हायस्कूल खल्लार येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृती परीक्षा एनएमएमएस मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परिक्षेत पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ग्रामीण भागातील शाळेने मिळविलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. या एनएमएमएस उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये आर्यन ईश्वर मेश्राम(चंद्रपूर), कु. पूर्वी योगेश शिंगणे(शिवारखेड)



कु. प्रीती दिनेश इंगळे(लांडी) अथर्व दिनेश खंडारे(गौरखेडा), वैभव डीगांबर खंडारे((खल्लार) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. कठोर परिश्रम, आणि योग्य मार्गदर्शनामुळे हे यश विद्यार्थ्यांना प्राप्त झाले आहे. या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख, प्राचार्य श्री केशवरावजी गावंडे कार्यकारणी सदस्य, श्री विनायकराव गावंडे शाळा तपासणी अधिकारी, तसेच आजीवन सदस्य तथा शाळा समिती सदस्य श्री मधुसूदनजी धाबे, श्री सुधाकररावजी जुनघरे, श्री पंजाबरावजी टवलारे यांनी विद्यार्थ्यांचे मनपूर्वक अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात .

मुख्याध्यापक श्री डी. आर. नवरे. एनएमएमएस परीक्षा प्रभारी श्री ए . डब्ल्यू . बागडे , श्री. यू.डी. राणे, श्री.पी डब्ल्यू. घुरडे, कु.ऋतुजा भोंडे ,. सय्यद अब्दुला यांचे मार्गदर्शन लाभले. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ,माता पालक संघ, व परिसरातील पालकांनी देखील विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचा सन्मान करून शुभेच्छा दिल्यात.

# मालमत्ता करावर ५० टक्के सवलत, अभय योजनेला शासनाची मंजुरी

## योजनेचा लाभ घेण्याचे नगराध्यक्ष सौ.भारसाकडेंचे आवाहन

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दर्यापूर, दि.८ :** शहरातील मालमत्ता कर थकबाकीदारांना दिलासा देण्यासाठी दर्यापूर नगरपरिषदेकडून अभय योजना राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत मालमत्ता करावर तब्बल ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. नगरपरिषद सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला होता.नगराध्यक्ष सौ. मंदाकिनी सुधाकरराव भारसाकळे यांच्या माध्यमातून हा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला होता. शासनाने यास मान्यता दिल्यानंतर अभय योजना राबविण्यास हिरवा कंदील मिळाला आहे.या योजनेनुसार शहरातील मालमत्ता धारकांनी थकीत कराचा भरणा केल्यास त्यांना ५० टक्के सवलतीचा लाभ मिळणार आहे. शासन निर्णयानुसार ही योजना २०/०१/२०२५ पासून लागू करण्यात आली असून नागरिकांनी



या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्ष सौ. मंदाकिनी भारसाकळे व मुख्याधिकारी डॉ. विकास खंडारे यांनी केले आहे. दर्यापूर शहरातील मालमत्ता धारकांनी नगरपरिषदेच्या अभय योजनेचा लाभ घेऊन थकीत कराचा भरणा करावा व ३० एप्रिल २०२६ पर्यंत सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले आहे.

**रणसंग्राम** | ११ सरपंचांसह सदस्यांची ९८ पदे रिक्त

# ६८ ग्रा.पं.मध्ये लवकरच पोटनिवडणुका

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती, दि.८ :** जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये विविध कारणांमुळे रिक्त झालेल्या ११ थेट सरपंचांसह सदस्यांच्या ९८ पदांसाठी गत दीड वर्षांपासून रखडलेल्या पोटनिवडणुका मार्चच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. या ग्रामपंचायतींमध्ये मंगळवार, २४ फेब्रुवारी रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार असून याकरिता प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. जिल्ह्यातील सन २०२२-२०२३ मध्ये गठित झालेल्या ग्रामपंचायतींमध्ये विविध कारणांमुळे सरपंच, सदस्यांची पदे रिक्त झालेली आहे. तब्बल दीड ते दोन वर्षांपासून सदरची पदे रिक्त असताना याकरिता कित्येकदा कार्यक्रम लागला. परंतु, काही कारणास्तव तो रद्द झाला. त्यामुळे ह्या ग्रामपंचायतींमध्ये सतत पोटनिवडणुका स्थगित करण्यात आल्या, परंतु,



यावेळी पोटनिवडणुका घेण्याबाबत न्यायालयाचे आदेश असल्याने शासनाकडून ३१ जानेवारीपर्यंत रिक्त झालेल्या जागांचा अहवाल सादर करण्याचे आदेश देत मतदार यादी कार्यक्रम लावला आहे. पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १६ फेब्रुवारी रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून यावर १६ ते २० फेब्रुवारीदरम्यान आक्षेप आणि हरकती स्वीकारण्यात आले आहेत. तर २४ फेब्रुवारीला या ग्रामपंचायतींमध्ये अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर लगेच कार्यक्रम घोषित होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात रिक्त पदांमध्ये ११ थेट सरपंच तसेच ९८ सदस्य पदांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, या ग्रामपंचायतींचा कार्यकाळ अजून दीड ते दोन वर्षे शिल्लक आहे. या ग्रामपंचायतींमध्ये रिक्त जागांबाबत ३१ जानेवारीपर्यंतची स्थिती लक्षात घेऊन हा अहवाल तयार करण्यात आला असून तो जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे २४ फेब्रुवारीनंतर कोणत्याही क्षणी कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

धारणी तालुक्यातील भोंडीवाला ग्रामपंचायतीमध्ये २०२३ मध्ये निवडणूक झाली. येथे थेट सरपंचासह चारच सदस्य निवडून आल्याने ही ग्रामपंचायत कोरम अभावी गठित झाली नाही परिणाम: येथे दीड वर्षापासून प्रशासक आहे. त्यामुळे येथील सरपंचांनी याविरोधात उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्यानंतर न्यायालयाने आयोगावर ताशेरे ओढत पोटनिवडणुका घेण्याचे आदेश दिले होते.

> **११ ग्रामपंचायतींमध्ये सार्वत्रिक निवडणूक**
>
> रिक्त जागांमध्ये ११ थेट सरपंचपदाचा समावेश असल्याने सरपंचपदाची निवडणूक ही जनतेमधून केली जाते. त्यामुळे या गावातील सर्वच वार्डाचा समावेश असल्याने ही निवडणूक सार्वत्रिकच मानली जात आहे. यामध्ये तिवसा तालुक्यातील आखतवाडा ग्रामपंचायतींमध्ये मात्र सरपंचपदाचा उमेदवार न मिळाल्याने तेथे पद रिक्त आहे. यावेळी ओबीसी प्रवर्गाचा उमेदवार मिळेल का, याकडे लक्ष लागले आहे.

# आता दर शनिवारी थेट पोलिस आयुक्तांना भेटता येईल

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती, दि.८ :** अमरावती शहराचा विस्तार वेगाने होत असतानाच, पोलिस ठाणे स्तरावरील पेंडसीच्या पार्श्वभूमीवर, आयपीएस पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आता दर शनिवारी पोलिस आयुक्त स्वत: उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घेणार असून, यामुळे कम्युनिटी पोलिसिंगच्या संकल्पनेला नवे बळ मिळणार आहे. अमरावती शहर आयुक्तालय हद्दीत एकूण १० पोलिस ठाणी कार्यरत आहेत. शहर विस्तारत असताना पोलिस ठाणे स्तरावर अनेकदा चौकशीत दिरंगाई होणे, तक्रारी नोंदवून न घेणे किंवा योग्य न्याय न मिळणे अशा नागरिकांच्या तक्रारी असतात. अनेकदा ठाणेस्तर वा सहायक पोलिस आयुक्त स्तरावर सुद्ध शकणारे प्रश्नही प्रलंबित राहत असल्याने हताश नागरिक थेट सीपी कार्यालयात धाव घेत असत. मात्र, व्यस्त नियोजनामुळे प्रत्येक वेळी आयुक्तांची भेट होणे शक्य नसायचे. हीच अडचण ओळखून सीपी राकेश ओला यांनी जनतेसाठी कार्यालयाचे दरवाजे थेट खुले केले आहेत. ज्या नागरिकांना आपल्या तक्रारींचे निवारण करून घ्यायचे आहे, त्यांनी निश्चित केलेल्या वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले.दिनांक ७ फेब्रुवारीपासून या उपक्रमाला सुरुवात झाली आहे.

या निर्णयानुसार, दर आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी दुपारी ४ ते ६ वाजेदरम्यान पोलिस आयुक्त कार्यालयाच्या तळमजल्यावर नागरिक आपली गाऱ्हाणी थेट पोलिस आयुक्तांसमोर मांडू शकतील.

## शॉर्टक्यात



### २८३ किलो प्लास्टिकचे संकलन करून होळी साजरी

**दिग्रस :** तालुक्यातील मांडवा येथे ग्रामपंचायत व पुण्यश्लोक अहिल्यादेवी संस्थेच्या पुढाकाराने यंदाची होळी पूर्णपणे पर्यावरणपूरक साजरी करण्यात आली. लाकडांऐवजी शेणापासून बनवलेल्या चाकोळ्यांचा वापर करून निसर्ग संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या विधायक उपक्रमात चिमुकल्यांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनी उत्साहात सहभाग नोंदवून देशभक्ती आणि संस्कारांचे दर्शन घडवले. होळी पूजन पोलीस पाटील अमोल गावंडे यांच्या हस्ते झाले. ग्रामसंवाद सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष यादव गावंडे यांनी झाडे तोडण्याच्या प्रथेवर टीका करत निसर्गाशी सुसंगत सण साजरे करण्याचे आवाहन केले. या मोहिमेत गावकऱ्यांनी तब्बल २ क्विंटल ८३ किलो प्लास्टिक संकलित केले. भविष्यात ग्रामपंचायत घरोघरी जाऊन प्लास्टिक विकत घेणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. चाकोळी स्पर्धेत विवेक चव्हाण, तर प्लास्टिक निर्मूलनात नवल बेले यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सोहळ्याला यादव पवार, अशोक गादेवार, भास्कर सोनुने, आनंदराव काजळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे मांडवा गावाने जिल्ह्यासमोर एक नवा आदर्श निर्माण केला असून, सण साजरे करताना सामाजिक जबाबदारीचे भान राखल्याबद्दल ग्रामस्थांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पुढील होळीपर्यंत गाव प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### शेलोडी येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर कलशारोहण सोहळा



**दारव्हा :** तालुक्यातील शेलोडी येथील ग्रामदैवत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा भव्य कलशारोहण सोहळा ९ मार्च रोजी उत्साहात पार पडणार आहे. ८ आणि ९ मार्च रोजी आयोजित या धार्मिक सोहळ्यानिमित्त गावात कलश मिरवणूक, होमहवन आणि नामजपाचे आयोजन करण्यात आले आहे. समस्त ग्रामस्थांच्या वतीने या पवित्र सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. कार्यक्रमाची सुरुवात ८ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता भव्य कलश मिरवणुकीने होईल. त्यानंतर रात्री ९ ते ११ या वेळेत संत ज्ञानेश्वर महाराज आणि मुक्ताबाई महिला मंडळाचा हरिपाठ होईल. मुख्य सोहळा ९ मार्च रोजी सकाळी ७ वाजता पूजन व होमहवनाने सुरू होईल. सकाळी ९ ते ११ या वेळेत विठ्ठल नामजप आणि सकाळी ठीक ११ वाजता मंदिरावर कलशारोहण करण्यात येईल. या मंगलप्रसंगी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, परिसरातील हजारो भाविक दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. शेलोडीतील माहेरवाशिणी, परिसरातील ग्रामस्थ आणि भाविक भक्तांनी या मंगल सोहळ्यास उपस्थित राहून विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घ्यावे, असे आवाहन समस्त गावकरी मंडळींनी केले आहे. या उत्सवामुळे संपूर्ण गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून सहकार्य मिळत आहे.



### राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत राम दंडावार देशात प्रथम

**यवतमाळ :** पुणे येथे पार पडलेल्या 'प्रोॲक्टिव्ह अबॅकस' राष्ट्रीय स्पर्धेत यवतमाळच्या संस्कार इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी राम आशिष दंडावार याने १०० पैकी १०० उदाहरणे अचूक सोडवून प्रथम क्रमांक पटकावला. ५,००० स्पर्धकांमध्ये चमकलेल्या रामला अडीच फूट उंच ट्रॉफी व रेंजर सायकल देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत प्रत्यूष अबॅकसच्या ३२ विद्यार्थ्यांनी यश मिळवले. प्रज्वल इंगोले (तृतीय), पूर्वी गोंडाणे व विहान गौरकार (चतुर्थ) यांच्यासह अश्मय वायकर, सम्राट कांबळे, विनम्र भिवगडे व अन्य २३ विद्यार्थ्यांनी विविध वर्गवारीत बाजी मारली. या यशाबद्दल विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक विवेक अलोणी, पर्यवेक्षक विवेक कवठेकर, संस्कार स्कूलचे शिक्षक आणि प्रत्यूषचे संचालक अनिल व राणी राऊत यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. रामचे वडील आशिष दंडावार स्वतः गणित शिक्षक असून, मुलाच्या या यशाने यवतमाळच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### जागतिक महिला दिनानिमित्त चालण्याची स्पर्धा

**यवतमाळ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च रोजी यवतमाळमधील गोधनी बायपास येथील 'सामका आयुर्वेद योग व वेलनेस सेंटर'च्या वतीने महिलांसाठी विशेष चालण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. "निरोगी स्त्री - सशक्त समाज" या उद्देशाने आयोजित या उपक्रमात सहभागी महिलांना निशुल्क प्रकृती परीक्षण शिबिराचाही लाभ घेता येईल. ही स्पर्धा रविवार, ८ मार्च रोजी सकाळी ७ वाजता गोधनी बायपास येथील केंद्रावर सुरू होईल. चालण्याद्वारे आरोग्य संवर्धन आणि जागृती निर्माण करणे हा या स्पर्धेचा मुख्य हेतू असून, विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. तरी परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्यदायी पद्धतीने महिला दिन साजरा करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९४०४२८९८५८ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

# रेतीऐवजी अनुदान द्यावे

## घरकुल लाभार्थ्यांची शासनाकडे महत्त्वाची मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि. ८ :** तालुक्यातील ग्रामीण भागातील गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांनी शासनाकडे आज एक अत्यंत महत्त्वाची मागणी केली आहे. घर बांधकामासाठी शासनाकडून मिळणाऱ्या पाच ब्रास मोफत रेतीऐवजी, त्या समतुल्य रकमेचे आर्थिक अनुदान थेट आमच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे, अशी आग्रही भूमिका संतप्त लाभार्थ्यांनी घेतली आहे. वेळेवर रेती मिळत नसल्याने बांधकाम रखडत असून गरिबांना मोठा फटका बसत आहे, त्यामुळे प्रशासनाने योग्य तो निर्णय तातडीने घ्यावा.

मुख्य बातमी: ग्रामीण भागातील अनेक निराधार आणि गरीब कुटुंबांसाठी शासनाची घरकुल योजना हा आयुष्याला स्थैर्य देणारा एक मोठा आणि महत्त्वाचा आधार असतो. पक्क्या घराचे स्वप्न उराशी बाळगून हे लाभार्थी घरकुलाची मंजुरी मिळवतात. घर बांधकामासाठी शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार प्रत्येक पात्र लाभार्थ्याला पाच ब्रास रेती मोफत देण्याची महत्त्वपूर्ण तरतूद करण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष जमिनीवर या धोरणाची अंमलबजावणी अत्यंत सदोष पद्धतीने होत असल्याचे विदारक चित्र दिग्रस तालुक्यात पाहायला मिळत आहे. शासनाने कागदोपत्री रेती मोफत देण्याचे जाहीर केले असले तरी, अनेक ठिकाणी ही रेती लाभार्थ्यांना वेळेवर उपलब्धच होत नाही. प्रशासकीय पातळीवरील लालफीतशाही, विविध तांत्रिक कारणे आणि वाळू घाटांच्या लिलावातील अडचणी यामुळे लाभार्थ्यांपर्यंत रेती पोहोचण्यास अनेक महिन्यांचा मोठा विलंब लागतो. रेतीच वेळेवर मिळत नसल्याने गरिबांच्या घरकुलाचे बांधकाम मध्येच रखडते. प्रशासनाने या अत्यंत न्याय्य आणि रास्त मागणीची तत्काळ गंभीर दखल घेऊन योग्य तो धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मोठी अपेक्षा आता संपूर्ण तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

> **ग्रामीण लाभार्थ्यांवर कर्जाचा डोंगर**
>
> **शहरी भागातील घरकुल योजनांच्या तुलनेत ग्रामीण भागातील योजनेसाठी मिळणारी आर्थिक तरतूद खूपच तोकडी आहे. त्यामुळे शासनाकडून मिळणाऱ्या अपुऱ्या निधीतून घराचे संपूर्ण बांधकाम करणे गरिबांसाठी अक्षरशः अशक्य होऊन बसते. स्वप्नातील घर पूर्ण करण्यासाठी अनेक गरीब लाभार्थ्यांना नाईलाजाने स्वतःच्या खिशातून अतिरिक्त खर्च करावा लागतो. प्रसंगी नातेवाईकांकडून उसनवार करून किंवा सावकाराकडून कर्ज काढून ते घराचे बांधकाम पूर्ण करत आहेत.**

# लाडकी बहीण योजनेचे हप्ते ३ महिन्यांपासून बंद

## टाकळी परिसरातील महिला आक्रमक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**टाकळी ई. दि. ८ :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'लाडकी बहीण' योजनेचे मासिक हप्ते उमरखेड तालुक्यातील टाकळी (ई) परिसरातील सुमारे ५० टक्के लाभार्थी महिलांना गेल्या तीन महिन्यांपासून मिळालेले नाहीत. हप्ते अचानक बंद झाल्याने हजारो महिलांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, "निवडणुका संपल्या आणि आम्ही सावत्र बहिणी झालो का?" असा जळजळीत सवाल या महिलांनी प्रशासनाला विचारला आहे.

लाभाच्या प्रतीक्षेत असलेल्या महिला दररोज बँक, ग्रामपंचायत आणि पंचायत समिती कार्यालयांमध्ये चकरा मारत आहेत. मात्र, 'केवायसी प्रक्रियेत त्रुटी' किंवा 'तांत्रिक अडचण' अशी उत्तरे देऊन त्यांची बोळवण केली जात आहे. निवडणुकीच्या काळात या योजनेचा मोठा प्रचार करून नियमित लाभाची ग्वाही देण्यात आली होती, मात्र आता मिळणारे दुर्लक्ष महिलांच्या संतापास कारणीभूत ठरत आहे. अनेक गरीब, विधवा आणि कष्टकरी महिलांसाठी हे १५०० रुपये औषधोपचार आणि मुलांच्या शिक्षणासाठी मोठा आधार होते. हप्ते बंद झाल्याने अनेक कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. प्रशासनाने ही तांत्रिक अडचण त्वरित दूर करून थकीत हप्ते जमा न केल्यास संघटितपणे तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा टाकळी परिसरातील महिलांनी दिला आहे. हक्काच्या पैशांसाठी आता रस्त्यावर उतरण्याची वेळ आल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

# अध्यक्षपदी लक्ष्मण कांबळे यांची निवड

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**पुसद, दि. ८ :** युनियन बँक चौक परिसरातील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र येथे बुधवारी (दि. ४) झालेल्या सभेत प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव प्रबोधनपर्व आयोजन समिती २०२६ च्या अध्यक्षपदी लक्ष्मण सदाशिव कांबळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या निर्णयामुळे समाजबांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण असून आगामी जयंती महोत्सवाच्या नियोजनाला आता गती मिळणार आहे.

रात्री आठ वाजता झालेल्या या सभेला शिक्षण सभापती विठ्ठल खडसे, माजी अध्यक्ष विश्वास भवरे, कल्याण साखरकर, मिलिंद सोमकुंवर, यादवराव जाभुंळकर, गणपत गव्हाळे, संतोष सुरवाडे, भगवान हनवते, दीपक कांबळे, अविनाश भवरे, भारत कांबळे, बंडू गंगावणे, प्रकाश धुळे, अंबादास वानखडे, व्हडगिर, अशोक भालेराव, नितेश खंदारे, भास्कर बनसोड आणि गुरू उचाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित असलेल्या ज्येष्ठ मंडळींनी प्रबोधनपर्व समितीच्या पुढील नियोजनातील विविध कार्यक्रमांबद्दल सविस्तर मार्गदर्शन करून आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर सर्वांच्या एकमताने लक्ष्मण कांबळे यांच्यावर अध्यक्षपदाची महत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली. या महत्वपूर्ण निवडीनंतर नवनियुक्त अध्यक्षांचे सर्व समाजबांधवांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तसेच, २०२५ चे मावळते अध्यक्ष संतोष आंभोरे यांचे विशेष स्वागत करण्यात आले व त्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना निरोप देण्यात आला. या सभेला विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर होते. आगामी काळात समितीचे सर्व काम अधिक जोमाने आणि अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने चालेल असा अतिशय ठाम विश्वास सर्वांनी व्यक्त केला आहे. सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

# दोन महिने उलटूनही डेक्कन शुगर कारखान्याकडून ऊस बिलाची रक्कम थकीत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि. ८ :** तालुक्यातील वाईमेंढी, तुपटाकळी, बेलुरा आणि लाख येथील शेतकऱ्यांचा ऊस नेऊन दोन महिने उलटले तरी मांगूळ येथील डेक्कन शुगर कारखान्याने अद्याप रक्कम दिलेली नाही. नापिकीमुळे आधीच खचलेल्या ऊस उत्पादकांची कारखान्याकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून थकीत रक्कम तत्काळ देण्याची आग्रही मागणी जोर धरत आहे.

सततची नापिकी आणि शासनाच्या धोरणामुळे दिग्रस तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन व कापूस पिकाला बाजूला सारून मागील दोन वर्षांपासून उसाची लागवड केली आहे. चालू वर्षी अतिवृष्टीमुळे उसाला एकरी केवळ तीस ते पस्तीस टन उतारा आला आहे. त्यामुळे शेतकरी अगोदरच आर्थिक संकटात सापडला आहे. त्यातच डेक्कन शुगर कारखान्याने साधारण दीड ते दोन महिन्यांपूर्वी ऊस नेऊनही त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अद्याप जमा केलेली नाही. उसाची तोड झाल्यानंतर एका महिन्यात शेतकऱ्यांना रक्कम देणे असा नियम आहे. पण कारखान्याच्या मनमानीमुळे शेतकऱ्यांचे गणित पूर्ण बिघडले आहे. या खरीप हंगामात सोयाबीनचे एकरी दोन ते तीन पोते तर कापसाचे दीड ते दोन क्विंटल एवढेच उत्पादन आले आहे. त्यामुळे डोक्यावरील कर्ज कसे फेडायचे हा मोठा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. एकेकाळी शेतकऱ्यांच्या हिताचा समजला जाणारा हा कारखाना आता फक्त संचालकांच्या फायद्याचा बनल्याची टीका होत आहे. या कारभाराला कंटाळून चालू हंगामात अनेक शेतकऱ्यांनी गुंज येथील कारखान्याला आपला ऊस दिला आहे. विशेष म्हणजे तिथे तिसऱ्याच दिवशी शेतकऱ्यांना रकमेचा धनादेश देण्यात आला आहे. त्यामुळे आता वाईमेंढी, तुपटाकळी, बेलुरा आणि लाख या गावांमधील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मांगूळ येथील डेक्कन शुगर कारखान्याने आमची थकीत रक्कम तत्काळ खात्यात जमा करावी अशी मागणी केली.

# घाटंजी येथे राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**घाटंजी, दि. ८ :** येथील शि. प्र. मं. विज्ञान व गिलानी कला, वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. विकसित भारतासाठी महिला वैज्ञानिक या मुख्य संकल्पनेवर आधारित असलेल्या या विशेष कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना विज्ञानाचे महत्व व तंत्रज्ञानातील प्रगती याबाबत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन करून नवोपक्रमाची प्रत्यक्ष जाणीव करून दिली.

प्राचार्य वाय. एस. माहुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात संस्थेचे सदस्य एम. ए. शहेजाद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मार्गदर्शक वक्ते आशिष गोदुरवार यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. व्यासपीठावर रसायनशास्त्र विभाग प्रमुख व्ही. एस. जगताप, टी. एम. कोटक, सी. आर. कासार, एस. एच. शेख आणि जे. पी. मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्ही. एस. जगताप यांनी केले. एम. ए. शहेजाद यांनी आपल्या मनोगतात स्पष्ट केले की, विज्ञान ही केवळ अभ्यासक्रमापुरती मर्यादित गोष्ट नसून ती एक विचार करण्याची पद्धत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती आणि चिकित्सक दृष्टिकोन नेहमी अंगीकारावा. आशिष गोदुरवार यांनी आजचा विद्यार्थीच उद्याचा वैज्ञानिक आहे, असे प्रतिपादन करीत विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीत युवकांची अत्यंत महत्वाची भूमिका असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांना नेहमी मोठी स्वप्ने पाहण्याचा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा प्रेरणादायी संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य वाय. एस. माहुरे यांनी विज्ञान शाखेच्या विविध उपक्रमांचे तोंडभरून कौतुक करीत विद्यार्थ्यांनी नेहमी समाजोपयोगी संशोधनाकडे आवर्जून वळावे, असे आवाहन केले. महिलांचे विज्ञान क्षेत्रातील अतुलनीय योगदान अधोरेखित करणाऱ्या या ज्ञानवर्धक कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन भाविका जाधव हिने केले, तर उपस्थितांचे आभार गौरी बिजेवार हिने मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राध्यापक आर. डी. घोडिले, प्राध्यापक पी. बी. राठोड आणि प्राध्यापक सि. एम. शहाकर यांनी विशेष परिश्रम घेतले. यासोबतच महाविद्यालयाचे प्राध्यापक पी. आर. राऊत, एस. ए. माकडे, एम. ए. ढाले, ए. एस. ओळंबे, एस. एन. बोटेवाड, के. के. किनाके, प्राध्यापक रामटेके, प्राध्यापक सोनटक्के यांच्यासह विज्ञान, कला आणि वाणिज्य शाखेचे सर्व प्राध्यापक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने आणि उत्साहाने या संपूर्ण कार्यक्रमाला येथे प्रामुख्याने उपस्थित राहिले होते.

# पाण्यासाठी वन्य प्राण्यांची दाहीदिशा भटकंती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. ८ :** तालुक्यातील वनक्षेत्रात सध्या भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून वन्य प्राण्यांना पाण्यासाठी आणि अन्नासाठी गावांकडे धाव घ्यावी लागत आहे. पानझडीमुळे वन उघडे पडले असून नद्या-नाल्यांतील नैसर्गिक पाणवठे पूर्णतः आटल्याने पशू-पक्षांचे जीव कासावीस होत आहेत. वनविभागाच्या नियोजनाअभावी वन्यजीव आता मृत्यूच्या उंबरठ्यावर उभे आहेत.

मानवी स्वार्थामुळे जंगलातील मोहा, चारोळी व आंब्यासारखी फळझाडे नष्ट झाली आहेत, तर वाढत्या उष्णतेमुळे लागणाऱ्या वनव्यांमुळे अनेक सूक्ष्म जीव आणि जैवविविधता धोक्यात आली आहे. पोटात अन्न आणि पिण्याला पाणी नसल्याने वन्यप्राणी मानवी वस्तीकडे वळत असून, याचा फायदा घेत शिकारी सक्रिय झाले आहेत. अनेकदा पाण्यासाठी गावात आलेल्या प्राण्यांचा मृत्यू होतो किंवा ते मानवावर हल्ला करतात. वानरांच्या टोळ्यांनी तर शहरांमध्ये शिरकाव केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वनविभागाच्या योजना केवळ कागदोपत्रीच असून प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या गंभीर समस्येकडे गांभीर्याने पाहत नसल्याची टीका जनसामान्यांतून होत आहे. वनविभागाने तातडीने जंगलातील कृत्रिम पाणवठे आठवड्यातून किमान दोनदा भरून प्राण्यांच्या अन्नाची सोय करावी. यामुळे वन्यप्राणी गावांकडे येणार नाहीत आणि मानव-वन्यजीव संघर्ष टाळता येईल. निसर्ग संतुलन राखण्यासाठी प्रशासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, अन्यथा भविष्यात वन्यजीव केवळ फोटोंपुरतेच मर्यादित राहतील.

# सिंचन विहीर अनुदानात महागाववर अन्याय!

## हजारो अर्ज, लाभ फक्त एकालाच, दिग्रस, दारव्हा तालुक्याला झुकते माप, नव्याने पंचनामे करण्याची मागणी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**महागाव, दि. ८ :** अतिवृष्टीमुळे खचलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात महागाव तालुक्यावर मोठा अन्याय झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हजारो शेतकऱ्यांनी अर्ज करूनही पंचायत समितीने पंचनामे न करता केवळ एकाच लाभार्थ्याची शिफारस केली आहे. या पक्षपाती कारभाराविरोधात संध्या रणवीर यांनी रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे थेट तक्रार दाखल केली असून, नव्याने पंचनामे करून सर्व बाधित शेतकऱ्यांना न्याय देण्याची आक्रमक मागणी केली आहे.

महागाव तालुक्यात गेल्या खरीप हंगामात अतिवृष्टी आणि महाभयंकर पुरामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. पुरामुळे अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील सिंचन विहिरी पूर्णपणे खचल्या आणि बुजल्या गेल्या. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने १३ ऑक्टोबर २०२५ च्या निर्णयानुसार, खचलेल्या विहिरींच्या दुरुस्तीसाठी दोन टप्प्यांत एकूण ३० हजार रुपयांची (प्रत्येकी १५ हजार रुपये) आर्थिक मदत जाहीर केली होती. या शासकीय मदतीच्या आशेने महागाव पंचायत समितीच्या रोजगार हमी योजनेच्या कार्यालयात हजारो बाधित शेतकऱ्यांनी रीतसर अर्ज दाखल केले होते. मात्र, स्थानिक प्रशासनाने या हजारो अर्जांची साधी दखलही घेतली नाही. कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष पंचनामा न करता, महागावच्या गटविकास अधिकाऱ्यांनी अनुदानाच्या पहिल्या हप्त्यासाठी (अग्रिम निधी) केवळ एकाच लाभार्थ्याची शासनाकडे शिफारस केली आहे. प्रशासनाच्या या अत्यंत बेजबाबदार आणि असंवेदनशील कारभारामुळे हजारो पात्र शेतकऱ्यांची अक्षरशः थट्टा उडवली गेली आहे. या अनुदानाच्या वाटपात संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात मोठा दुजाभाव झाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. जिल्ह्यातील १६ तालुक्यांमधून केवळ १२४ लाभार्थ्यांची निवड झाली आहे. यात सर्वाधिक झुकते माप दिग्रस-दारव्हा विधानसभा मतदारसंघाला देण्यात आले असून, एकट्या दिग्रसमधून २८ आणि दारव्हामधून ६५ असे एकूण ९३ लाभार्थी निवडले गेले आहेत. दुसरीकडे, अतिवृष्टीचा सर्वात मोठा आणि भीषण फटका बसलेल्या महागाव आणि पुसद तालुक्यातून प्रत्येकी फक्त एका लाभार्थ्याची निवड झाली आहे, तर उमरखेड तालुक्याला पूर्णपणे डावलण्यात आले आहे. शासकीय दप्तरी महागाव, पुसद आणि उमरखेडमध्ये सर्वाधिक अतिवृष्टी झाल्याची नोंद असतानाही प्रशासनाकडून हा अन्याय का? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. या गंभीर पक्षपाती कारभाराविरोधात संध्या संदेश रणवीर यांनी राज्याचे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. महागाव तालुक्यावर झालेला हा अन्याय त्वरित दूर करावा. तसेच, पंचायत समितीला तातडीने आदेश देऊन प्रलंबित असलेल्या हजारो अर्जांचे प्रत्यक्ष पंचनामे करावेत. यानंतर नव्या स्वरूपात सर्व खऱ्या पीडित शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम त्वरित वाटप करावी, अशी आग्रही मागणी या तक्रारीद्वारे करण्यात आली आहे.

# रेतीचा ट्रॅक्टर अडवून चालकाला मारहाण

**मारेगाव, दि. ८ :** ट्रॅक्टरचे पैसे न दिल्याच्या वादातून रेतीचा ट्रॅक्टर अडवून चालकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. ही घटना ६ मार्च रोजी सायंकाळी ४:३० वाजता कोसारा घाटाकडे जाणाऱ्या चौफुलीवर घडली. फिर्यादी वैभव सुभाष क्षीरसागर (२३) हे रेतीचा ट्रॅक्टर घेऊन जात असताना आरोपी देवानंद टाले, अभय बोढे, गजानन मोढक आणि रोहित मरसकोल्हे यांनी त्यांचे वाहन आडवे केले. "तुझ्या भावाने ट्रॅक्टरचे पैसे दिले नाही" असे म्हणत आरोपींनी वैभवला ट्रॅक्टरखाली ओढले आणि शिवीगाळ करत मारहाण केली. आरोपींनी वैभवला जीवे मारण्याची धमकीही दिली. मारेगाव पोलिसांनी याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
सोमवार दि. ९ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्वाचे

### ट्रकला धडकून चालकाचा मृत्यू

**कळंब:** रस्त्याच्या मधोमध धोकादायक स्थितीत उभा असलेल्या ट्रकला दुचाकीने पाठीमागून धडक दिल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाला. ही घटना ७ मार्च २०२६ रोजी सकाळी ११:०४ वाजता आमला गावासमोर घडली. मृतक बाळाभाऊ यशवंत किन्नाके (५०, रा. गुजर नागठाण) हे आपल्या दुचाकीने घरी परतत असताना, आरोपी ट्रक (क्र. MH ४९ AT ६०८९) चालकाने कोणतेही इंडिकेटर न लावता वाहन उभे केले होते. या धडकेत बाळाभाऊ यांच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. फिर्यादी महेश किन्नाके यांच्या तक्रारीवरून कळंब पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### तरुणाला दगडाने मारहाण

**यवतमाळ :** "तुझे वासरू माझ्या आवारात येते, त्याला बांधून का ठेवत नाही?" या कारणावरून झालेल्या वादात एका तरुणाला दगडाने मारहाण करण्यात आली. ही घटना ६ मार्च रोजी रात्री ११:१५ वाजता वाटखेड येथे घडली. फिर्यादी दिनेश श्रावण मेटकर (३०) याला आरोपी राजेश करे, विजय करे आणि विजय मुरमुरे यांनी शिवीगाळ करत कॉलर पकडून रस्त्यावर पाडले. आरोपी राजेशने दिनेशच्या डोक्यावर दगडाने मारून त्याला जखमी केले. तसेच आरोपींनी फिर्यादीच्या पत्नीलाही जीवे मारण्याची धमकी दिली. यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी याप्रकरणी तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### ५० हजारांची रोकड लंपास

**यवतमाळ :** बँकेत रक्कम भरण्यासाठी गेलेल्या व्यक्तीचे ५०,००० रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना ७ मार्च रोजी दुपारी ४:३० वाजता एलआयसी चौक येथील बँक ऑफ बडोदामध्ये घडली. फिर्यादी सुरेश भगवानदास हेमनानी (४४, रा. पळसवाडी कॅम्प) हे बँकेत असताना, त्यांचे लक्ष नसताना आरोपी रवींद्र नथ्थुजी ढवळे (३५, रा. वाघापूर) याने कॅश काउंटरवर ठेवलेली ५० हजार रुपयांची रोकड चोरून नेली. यवतमाळ शहर पोलिसांनी सीसीटीव्ही आणि इतर पुराव्यांच्या आधारे आरोपीला निष्पन्न करून त्याच्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

---

### यवतमाळच्या 'सिंघम'ची राळेगाव तालुक्यात मध्यरात्री धडक कारवाई; बोटी, १.४२ कोटींचा मुद्देमाल जप्त

# वाळूमाफियांवर 'सर्जिकल स्ट्राईक'!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.८ :** राळेगाव तालुक्यातील रोहिणी घाटावरून वर्धा नदीच्या पात्रातून सुरू असलेल्या बेसुमार अवैध वाळू उपशावर महसूल आणि पोलिस विभागाने संयुक्तरीत्या मोठी कारवाई केली आहे. यवतमाळचे 'सिंघम'म्हणून ओळखले जाणारे परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) आयपीएस अधिकारी रॉबिन बन्सल यांनी रविवारी (८ मार्च) मध्यरात्री केलेल्या या धडक 'सर्जिकल स्ट्राईक'मध्ये वाळूची अवैध वाहतूक करणारी वाहने, बोटी आणि पोकलेन मशिन्स असा एकूण एक कोटी ४२ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळेजिल्ह्यातील वाळूमाफियांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.



### नदीपात्र पोखरणाऱ्यांची गय नाही

**सध्या केवळ वाहनचालकांवरच कारवाई न थांबवता, या अवैध वाळूव्यवसायाचा 'मास्टरमाइंड' असलेल्या घाट मालकांकडेही पोलिसांनी आपला मोर्चा वळवला आहे. 'नदीपात्राचे नुकसान करणाऱ्या आणि शासनाचा महसूल बुडवणाऱ्या एकाही गुन्हेगाराला सोडले जाणार नाही,' असा कडक इशारा या कारवाईतून देण्यात आला आहे.**

यवतमाळ जिल्ह्याला लागून असलेल्या वर्धा नदीच्या पात्रातून गेल्या अनेक दिवसांपासून रेतीचा मोठा काळाबाजार सुरू होता. राळेगाव तालुक्यातील रोहिणी घाटावर लिलाव झालेल्या रेती घाटावरून रात्रीच्या अंधाराचा गैरफायदा घेत पोकलेन आणि जेसीबीच्या साहाय्याने नदीचे पात्र बेसुमार ओरबाडले जात होते. यातून दररोज शेकडो ट्रक अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची अत्यंत गोपनीय माहिती पांढरकवडा येथील सहाय्यक पोलिस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबिन बन्सल यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे बन्सल यांनी राळेगावचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि वडकीचे सहाय्यक पोलिस निरीक्षक यांच्याशी समन्वय साधून कारवाईचे अत्यंत गुप्त नियोजन केले. कोणत्याही स्थानिक किंवा राजकीय दबावाला बळी न पडता, महसूल व पोलिस अधिकारी, आवश्यक कर्मचारी आणि पंचांचे एक संयुक्त पथक तयार करण्यात आले. रविवारी मध्यरात्री दीड वाजताच्या सुमारास हे पथक अंतरगाव रस्त्याने रोहिणी घाटाकडे निघाले. रात्री २ वाजताच्या सुमारास वाळफमाफियांचे काम अत्यंत जोरात सुरू असतानाच, या पथकाने थेट नदीपात्रात धडक दिली. पोलिसांच्या गाड्या अचानक समोर पाहून तिथे उपस्थित असलेल्या मजुरांची आणि ट्रक चालकांची मोठी भंबेरी उडाली. पळ काढण्याच्या तयारीत असलेल्या अनेक वाहनांना पोलिसांनी जागेवरच घेराव घालून ताब्यात घेतले. या धडक कारवाईत रेती वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी एकूण ११वाहने (ट्रक/ट्रॅक्टर), वाळू उपसा करणाऱ्या २ मोठ्या बोटी आणि २ अवाढव्य पोकलेन मशिन्स असा एकूण एक कोटी ४२ लाख ५०हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी करताना रंगेहाथ पकडण्यात आला. नदीपात्रात शिरून यंत्रांच्या साहाय्याने वाळू उपसा करणे हा कायद्याने गंभीर गुन्हा असतानाही, येथे निसर्गाची राजरोसपणे लूट सुरू होती. या प्रकरणी एकूण २० आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, खाण आणि खनिज अधिनियम तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम या कठोर कायद्यांन्वये राळेगाव पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून, पुढील तपास युद्धपातळीवर सुरू आहे. सध्या केवळ वाहनचालकांवरच कारवाई न थांबवता, या अवैध वाळूव्यवसायाचा 'मास्टरमाइंड' असलेल्या घाट मालकांकडेही पोलिसांनी आपला मोर्चा वळवला आहे. 'नदीपात्राचे नुकसान करणाऱ्या आणि शासनाचा महसूल बुडवणाऱ्या एकाही गुन्हेगाराला सोडले जाणार नाही,' असा कडक इशारा या कारवाईतून देण्यात आला आहे. ही महत्त्वपूर्ण कारवाई यवतमाळचे जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता आणि अपर पोलिस अधीक्षक अशोक खरात यांच्या मार्गदर्शनात पार पडली. आयपीएस रॉबिन बन्सल यांच्या या आक्रमक पावित्र्यामुळे भ्रष्ट यंत्रणा आणि अवैध धंदे करणाऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.

---

## रिजवान बेग मिर्झा यांच्या अकाली निधनाने हळहळ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि.८ :** येथील रहिवासी रिजवान रहुफ बेग मिर्झा यांचे ब्रेन हॅमरेजच्या तीव्र धक्क्याने दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या या अकाली जाण्याने आर्णी शहर आणि परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.



शनिवारी (दि. ७ मार्च) सकाळी १० वाजेच्या सुमारास रिजवान यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना ब्रेन हॅमरेजचा झटका आल्याने उपचारासाठी तातडीने नागपूर येथील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, वैद्यकीय शर्थीचे प्रयत्न सुरू असतानाच रविवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. स्व. रिजवान मिर्झा हे आर्णीचे पहिले सरपंच स्व. आगा बेग यांचे नातू, तर माजी ग्रामपंचायत सदस्य स्व. रहुफ बेग यांचे सुपुत्र होते. त्यामुळे त्यांच्या निधनाने राजकीय आणि सामाजिक वर्तुळातही मोठी शोककळा पसरली आहे. रविवारी (दि. ८ मार्च) आर्णी येथील नवीन मुस्लिम कब्रस्तानमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते व त्यांनी मृताला श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि मोठा आप्तपरिवार आहे.

## यवतमाळात महिलांसाठी १०० सार्वजनिक शौचालये उभारणार!

### नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी उईके यांची मोठी घोषणा; नगरपरिषदेतर्फे महिला दिनाचा सोहळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.८ :** यवतमाळ नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने रविवारी (दि. ८) जागतिक महिला दिनानिमित्त विशेष सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी बोलताना नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी उईके यांनी शहरात महिलांच्या सोयीसाठी तब्बल १०० स्वतंत्र आणि सुरक्षित सार्वजनिक शौचालये उभारण्याचा मोठा संकल्प जाहीर केला. यासोबतच तरुणींसाठी स्वसंरक्षण शिबिर आणि महिलांसाठी रोजगार मेळावा घेण्याची महत्त्वपूर्ण घोषणा त्यांनी यावेळी केली.



यवतमाळ नगरपरिषदेत रविवारी महिला दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्याच्या पहिल्या सत्रात यवतमाळच्या नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी उईके आणि वणीच्या नगराध्यक्षा विद्या आत्राम यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला. यासोबतच शहरातील प्रत्येक वॉर्डातील प्रत्येकी दोन कर्तृत्ववान महिलांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके होत्या तर, कार्यक्रमाचे उद्घाटन दामिनी पथकाच्या प्रमुख पोलिस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर यांच्या हस्ते झाले. सत्काराला उत्तर देताना ॲड. प्रियदर्शिनी उईके यांनी महिलांच्या मूलभूत प्रश्नांवर भाष्य केले. त्यांनी यवतमाळकर जनतेचे आभार मानले. तसेच त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करण्याचे अभिवचन याप्रसंगी दिले. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात जयंत

> 'जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक महिलेला सन्मान, सुरक्षितता आणि प्रगतीची समान संधी मिळावी, हीच खरी भावना आहे. महिला या समाजाच्या प्रगतीचा भक्कम आधारस्तंभ आहेत.
> **-ॲड. प्रियदर्शिनी उईके,**
> **नगराध्यक्षा, यवतमाळ.**

चावरे यांचे 'आई नावाचा परमात्मा' या विषयावर, तर ॲड. शीतल जयस्वाल यांचे 'महिला सुरक्षेचे कायदे' यावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून पतंजली योग समितीच्या माया चव्हाण व आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ. अंजली गवार्ले आणि नगरपरिषदेचे उपाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी उपस्थित होते. तसेच बांधकाम सभापती नीता केळापुरे, आरोग्य सभापती लता ठोंबरे, शिक्षण सभापती प्रियांका भवरे, नियोजन सभापती नीता धावतोडे, स्थायी समिती सदस्य साधना काळे, गटनेत्या चैताली बेलोरेकर, डॉ. नीरज वाघमारे यांच्यासह नगरसेविका ज्योती खंडारे, सोनाली मडावी, माया शेरे, शैला मिर्झापुरे, संगीता बोबडे, कीर्ती राऊत, शोभा हर्षे, श्रद्धा भडके, मनीषा भावे, वनिता बडे, साधना शंभरकर, शाहीन परवीन मोहम्मद नईम, तबस्सुम मनवर शहा, शेख अंजुम, किरण प्रजापती आणि मीरा वीर आदी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या यशस्वी कार्यक्रमाचे आयोजन महिला व बालकल्याण सभापती शोभा साबळे आणि उपसभापती सोनाली तिडके यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन कीर्ती राऊत व शैला मिर्झापुरे यांनी केले, तर आभार नगरसेविका सोनाली मडावी यांनी मानले.

---

## आर्थिक घोटाळ्यातील मास्टरमाईंडला अटक

### ग्रो कॅपिटल घोटाळ्याचे प्रकरण, साडेसात कोटी रुपयांनी फसवणूक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. ८ :** शहरात जादा परताव्याचे आमिष दाखवून तब्बल सात कोटी त्रेचाळीस लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी पुसद पोलिसांनी ग्रो कॅपिटल घोटाळ्यातील मास्टरमाइंड पुष्पांजली दिनेश रंधेरिया आणि मनोज अशोक पाटील या बंटी-बबली जोडीला नुकतीच अटक केली. त्यांना न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावल्यामुळे या बहुचर्चित आर्थिक घोटाळ्याच्या तपासाला आता अत्यंत महत्वपूर्ण नवे वळण मिळाले आहे.





विश्वांजली आणि ग्रो कॅपिटल या कंपन्यांचे कथित मालक पुष्पांजली रंधेरिया आणि मनोज पाटील यांनी चित्रपटाच्या धर्तीवर एक टोळी तयार करून हा खूप मोठा घोटाळा केला. त्यांनी सामान्य नागरिक, महिला आणि शिक्षकांना लक्ष्य करून मोठी गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. दिग्रस येथील केंद्रप्रमुख गिरीश दुधे हा कमिशनच्या लालसेपोटी या दोघांच्या संपर्कात आला आणि त्याच्या माध्यमातून अनेकांनी यात आपले पैसे गुंतवले. या प्रकरणात गिरीश दुधे, त्याचा भाऊ शिक्षक विनोदकुमार दुधे आणि गिरीशचा मुलगा मंदार दुधे या तिघांना आधीच अटक झाली असून ते सध्या यवतमाळ कारागृहात बंदिस्त आहेत. आतापर्यंत केवळ ३७ गुंतवणूकदारांनी या फसवणुकीबाबत पोलिसांकडे आपली अधिकृत तक्रार नोंदविली आहे. या संपूर्ण आर्थिक घोटाळ्याचा कसून तपास उपविभागीय पोलिस अधिकारी हर्षवर्धन बी जे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक रवी चव्हाण, सुनील मदने, पंकज पातुरकर, राहुल मडावी आणि पुसद शहर पोलिस मागील दोन महिन्यांपासून अत्यंत वेगाने करीत आहेत. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असलेल्या बंटी-बबली जोडीच्या अटकेमुळे आता अनेक नवनवीन आणि धक्कादायक बाबी समोर येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या दोघांच्या सखोल चौकशीतून फसवणुकीची व्याप्ती आणखी वाढू शकते. त्यामुळे पोलिस प्रशासन पुढे नेमकी कोणती अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई करतात आणि सर्वसामान्य गुंतवणूकदारांना त्यांचे कष्टाचे सर्व पैसे परत मिळून खऱ्या अर्थाने न्याय कसा मिळतो, याकडे आता परिसरातील सर्वच नागरिकांचे पूर्ण लक्ष नक्कीच लागून राहिले आहे.

## भोयरमध्ये पाणीटंचाई ; गावकऱ्यांचे मुख्यमंत्र्यांना साकडे!

### पाण्यासाठी ७० कुटुंबांची रोज मोठी भटकंती, गावातील मूलभूत सुविधांचा पूर्णतः अभाव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ८ :** यवतमाळ शहरालगतच्या भोयर (ई-क्लास) गावातील भीषण पाणीटंचाई आणि मूलभूत सुविधांच्या अभावाकडे लक्ष वेधण्यासाठी शनिवारी (७ मार्च) संतप्त गावकऱ्यांनी शेतकरी चळवळीच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना साकडे घातले. पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या ७० कुटुंबांना तातडीने कायमस्वरूपी पाणीपुरवठा आणि इतर सुविधा द्याव्यात, अशी आग्रही मागणी या निवेदनातून करण्यात आल्याने प्रशासनाच्या सुस्त कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



यवतमाळ शहराच्या अगदी उंबरठ्यावर असूनही भोयर (ई-क्लास) गावाला अद्याप पिण्याच्या पाण्याची साधी कायमस्वरूपी सुविधा मिळालेली नाही. उन्हाळ्याची चाहूल लागल्याने गावातील सुमारे ७० कुटुंबांना, विशेषतः महिला व लहान मुलांना कित्येक किलोमीटरवरून वणवण भटकून पाणी आणावे लागत आहे. गावात अंगणवाडी, प्राथमिक शाळा, पक्का रस्ता आणि नालीसारख्या सुविधांचा पूर्णतः अभाव आहे. पावसाळ्यात चिखलामुळे गावाचा संपर्क तुटतो, तर जंगल परिसरामुळे वन्यप्राणी आणि सापांचा मोठा धोका नागरिकांच्या सुरक्षिततेला निर्माण झाला आहे. यापूर्वी गावकऱ्यांनी यवतमाळचे तहसीलदार योगेश देशमुख यांना निवेदन दिले होते. त्यावेळी त्यांनी रस्ता पूर्ण करण्याचे केवळ आश्वासन दिले, मात्र प्रत्यक्षात कामाला कोणतीही गती मिळाली नाही. प्रशासनाकडून कोणतेही सहकार्य मिळत नसल्याचा आरोप करत, जिल्हाधिकाऱ्यांच्या दुष्काळग्रस्त कृती आराखड्यात भोयरचा प्राधान्याने समावेश करून विहीर, बोअरवेल, टँकर व जलसंधारणाची कामे तातडीने मार्गी लावावीत, अशी मागणी करण्यात आली. यावेळी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे, सोशल मीडिया काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, सामाजिक कार्यकर्ते गौतम पाटील, ओम तिवारी, हितेश इंगोले, कॉम्रेड सचिन मनवर, प्रवीण आडे, शेतकरी चळवळीचे प्रा. पंढरी पाठे आवर्जून उपस्थित होते. तसेच ग्रामस्थ सविता नेवारे, मोनिका कुत्तरमारे, अर्चना पाटील, कांता चव्हाण, ललिता मिश्रा, विद्या गेडाम, सोनू पेटकुले, नंदा दामोदर, गौतम दामोदरे, रमेश पेटकुले, अंकुश तराडे, यशवंत शिंदे, राज गेडाम, अनिल टेकाम, आनंद पंधरे आणि शंकर सहारे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# आर्णी येथे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा

### महिला दिनानिमित्त उपक्रम, 'अद्विता अर्बन'तर्फे नारीशक्तीचा गौरव, विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान महिलांचा गौरव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. ८ :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि. ८) येथे 'अद्विता अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी'तर्फे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन भव्य सत्कार करण्यात आला. महिला सक्षमीकरणाचा संदेश देणाऱ्या या विशेष गौरव सोहळ्यामुळे नारीशक्तीच्या अतुलनीय योगदानाला मोठे प्रोत्साहन मिळाले असून, संपूर्ण समाजात एक अत्यंत सकारात्मक आणि प्रेरणादायी असा संदेश गेला आहे.



यवतमाळ-आर्णी येथील 'अद्विता अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड'च्या वतीने या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल वाकोडे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हा दिमाखदार सोहळा पार पडला. आजच्या आधुनिक युगात महिला केवळ घरापुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. शिक्षण, उद्योग, कला, क्रीडा आणि प्रशासकीय अशा प्रत्येक क्षेत्रात महिला आपल्या अफाट मेहनत, धैर्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत करत आहेत. त्यांच्या याच सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक क्षेत्रातील अमूल्य योगदानाचा या कार्यक्रमात विशेष उल्लेख करून कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला. जिद्द, कर्तृत्व आणि आत्मविश्वासाच्या रंगांनी उजळणारी नारीशक्ती ही खऱ्या अर्थाने समाजाच्या प्रगतीची मुख्य प्रेरणा आहे. या सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थित मान्यवरांनी महिलांचे समाजातील अढळ स्थान, त्यांचे अफाट कर्तृत्व आणि सध्याच्या काळात महिला सक्षमीकरणाचे अनन्यसाधारण महत्व यावर आपले अभ्यासपूर्ण मनोगत व्यक्त केले. समाजाचा गाडा समर्थपणे हाकणाऱ्या प्रत्येक स्त्रीच्या अफाट सामर्थ्याला, अतुलनीय कर्तृत्वाला आणि महत्वपूर्ण योगदानाला याठिकाणी सर्वांनी मनापासून सलाम केला. या भव्य आणि दिमाखदार सत्कार सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून महिला व बालकल्याण सभापती चैताली विशाल देशमुख, स्वीकृत नगरसेविका डॉ. नाहीद आरीज बेग, सरपंच स्वप्ना अतुल देशमुख, ॲड. अरुणा राठोड, बांधकाम सभापती अंजली संदीप खंदार, नगरसेविका प्रीती योगेश शिवरामवार, डॉ. सोनाली गंभीरे आणि नगरसेविका अश्विनी संजय राऊत यांची विशेष उपस्थिती लाभली. या सर्व मान्यवरांसह बँकेचे सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेच्या या स्तुत्य उपक्रमामुळे महिलांच्या कार्याची योग्य दखल घेतली गेली असल्याची समाधानकारक भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## शेतात आढळला दहा फुटांचा अजगर

### जीवनसृष्टी संस्थेकडून जीवदान, सावरला येथील घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि. ८ :** तालुक्यातील सावरला येथील मुर्लीधर चोपने यांच्या शेतात रविवारी (दि. ८) सकाळी काम करीत असताना मजुरांना एक दहा फुटांचा अजस्त्र अजगर आढळला. त्यामुळे परिसरात मोठी घबराट उडाली. मात्र, शेतमालकाने तत्काळ जीवनसृष्टी सामाजिक बहुउद्देशीय संस्थेला तिथे पाचारण केले. संस्थेच्या सदस्यांनी शिताफीने या अजगराला सुरक्षित पकडून वनअधिवासात सोडल्यामुळे शेतमजुरांना दिलासा मिळाला.



सावरला येथील शेताता अजगर आढळल्याने स्थानिक मजूर भयभीत झाले होते. मात्र, जीवनसृष्टीचे संस्थापक हरिष सुरेशराव कापसे यांनी वेळेवर धाव घेत अजगराला जीवदान दिले. यावेळी नथ्थुजी ठमके, गणपत ठमके, स्वप्निल चोपने, छोटू होले, जयप्रकाश वर्मा, पवनलाल यांनी मदत केली. अनेक सापांना वाचवण्याचे कार्य जीवनसृष्टी करते. या कार्यात पूजा आत्राम, पुजा कोवे, सोनु पेन्दोर, गजानन क्षिरसागर, अविनाश हिवलेकर, सुरज नथ्थुजी पारशिवे, स्वाप्निल गोवार दिये, गणेश चौधरी, अर्जुन राठोड, निलेश झाडे, तोहीद शेख, रोहित इनामे, अनिकेत काकडे, मनोज मोंढे, ऋषीकेश कठाणे, जगदिश कुडलवार, नितीन सुरहुसे, प्रशांत उमाटे, महेश मंदावार, सोयल अन्सार सय्यद, तुषार डागलवार आणि शंकर पिंपळकर यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य मिळत असते. या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांतून संस्थेचा विस्तार वेगाने वाढत असून निसर्ग तसेच पर्यावरण संवर्धनाचे अत्यंत महत्वाचे काम परिसरात निरंतर अतिशय उत्तम प्रकारे सुरू आहे.